PRGI NO-MAHMAR/2023/86554

लोकशाही चिरायु होवो!

समतावादी

# मुक्त संवाद

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

ऑगस्ट २०२६ वर्ष चौथे : अंक १



स्वातंत्र्य स्वतंत्रता آزادی FREEDOM

# रिंगण

आषाढी २०२६

संतपरंपरेचा सामाजिक सांस्कृतिक मागोवा घेणारा
आषाढी कार्तिकी एकादशीला प्रसिद्ध होणारा अंक

# संतमांदियाळी महाविशेषांक

## प्रसिद्ध झाला, सर्वत्र उपलब्ध




लेख ६८, पानं २८८
किंमत फक्त ₹२००

संत नामदेवराय आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या समकालीन १३-१४ व्या शतकातील महत्त्वाच्या पण अल्पपरिचित वारकरी संतांच्या चरित्र, कवित्व आणि कर्तृत्वाचा धांडोळा. त्यांच्याशी संबंधित गावी जाऊन त्यांच्या पाऊलखुणा आणि प्रभावखुणांचा शोध.

### या अंकात

- संत जगमित्र नागा
- संत जोगा परमानंद
- संत कूर्मदास
- संत भागुबाई महारी
- संत भोजलिंग काका
- संत कान्हो पाठक
- संत सच्चिदानंद बाबा
- संत काशिबा गुरव
- संत विश्वंभर बाबा
- संत रांका कुंभार
- संत नागरी
- संत त्रिलोचन
- संत काळोबा,
- संत वत्सरा,
- संत धोंगडा,
- संत जाल्हण सुतार

अंक घरपोच मिळवण्यासाठी या QR कोडवर स्कॅन करा
पाठवा ₹ २५० (अंकाचे २०० + पोस्टेज ५०)
9920839805 या नंबरवर तुमचा पत्ता पिन कोड आणि
मोबाईल नंबर सह पाठवा अंक स्पीड पोस्टाने घरपोच मिळेल.

संपर्क : सचिन परब । रिंगणचा संपादक । ९९८७०३६८०५

प्रकाशक, संपादक
डॉ. विवेक कोरडे

कार्यकारी संपादक
शेखर देशमुख

सल्लागार संपादक मंडळ
सुलक्षणा महाजन, डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे,
राजेंद्र साठे, सुजय शास्त्री, सायली परांजपे

संपादकीय साहाय्य
सुमेधा कुवळेकर

व्यवस्थापन सल्लागार
विकास नाईक

शीर्षनाम आरेखन
विजय नार्वेकर

मुखपृष्ठ
ए हिस्ट्री ऑफ फाइन आर्ट इन इंडिया अँड सिलोन, फ्रॉम द अर्लिएस्ट टाइम्स टु प्रेझेंट (१९११) या पुस्तकातील आर्किऑलॉजिकल सर्व्हेने टिपलेली सारनाथ येथील अशोकालीन सिंह स्तंभाची प्रतिमा.

अंक मांडणी, सजावट
वैभव केसरकर (८५५१८५०४६२)

व्यवस्थापक
चंद्रकांत माळगवे (९६१९८२३६७२)

विनामूल्य वितरणासाठी
'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले.
संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly Publication owned by Vivek Dattatrey Korde Printed at Jagruti Printers,Trimurti 91, Gharpure Path, Giragaon Mumbai 400004 and Published at Room No. 46, First Floor, SakharamBalaji Pawar Marg, Currey Road Naka, Delisle Road, Mumbai 400013
Editor : Vivek Dattatrey Korde
E mail Id- smsp.mumbai@gmail.com

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग

✶ स्वातंत्र्य दिनाचे गिफ्ट
– संपादकीय २

✶ लोकनाट्य चळवळीचा मौलिक दस्तऐवज
– सायली परांजपे ४

✶ ...आणि लंकेचे दहन सुरू झाले
– राजा पटवर्धन ८

✶ हे तर रामाचे गुन्हेगार
– डॉ. विवेक कोरडे १५

✶ वसंताचं आगमन तुम्ही रोखू शकत नाही!
– श्रीरंजन आवटे १९

✶ डॉ. आंबेडकर एकाकी का लढले?
– अरुण वाघ २२

✶ बनावट राजकीय कथनावरचा अभ्यासपूर्ण उतारा
– शेखर देशमुख २६

✶ समाजाला 'मुंढे' का हवेत?
– सुजय शास्त्री ३२

✶ नव्या जगाची रुपरेषा
– डॉ. मोहन द्रविड ३४

✶ नागरिकांना 'सरळ' करण्याचे अस्त्र
– रवि आमले ३९

✶ चिनी कार्यसंस्कृतीची विस्मयकारक रुपे
– गजानन जोशी ४३

✶ प्रेमाचे भूत, वर्तमान आणि भविष्य
– प्रा. श्रीनिवास हेमाडे ४८

✶ वर्तमानाचा आरसा आणि प्रश्नांची मशाल
– जगदीश काबरे ५३

✶ मंडी हाऊस कॉलिंग!
– आशय गुणे ५७

✶ पाब्लो पिकासोची 'वि' चित्रकला
– डॉ. आनंद जोशी ६४

✶ जो डुबा है सो पार...
– गणेश मनोहर कुलकर्णी ७०

✶ स्त्री मनाचे बंडखोर स्वगत
– डॉ. नेहा सावंत ७४

✶ श्यामसमान
इंद्रनील सान्याल; अनुवाद : सुमती जोशी ८०

✶ सुवर्ण प्राशन: किती आस्था, किती विज्ञान?
– डॉ. श्रीराम सावरीकर ८५



# स्वातंत्र्य दिनाचे गिफ्ट

**स्वातंत्र्य दिन विशेष** **संपादकीय**





**लोकशाहीत अ-राजकीय असे काही असत नाही. लोकशाही व्यवस्थेतल्या प्रचलित राजकारणाबरोबरच सामाजिक-सांस्कृतिक-शैक्षणिक-आर्थिक निर्णयांमागे, त्या त्या क्षेत्रातले हितसंबंध दडलेले असतात. याच हितसंबंधांतून राजकारण आकार घेत राहते. प्रारंभी केवळ बिडंबनात्मक म्हणून सुरू झालेली आणि गत जून-जुलै महिन्यात भारतभर फोफावलेली कॉक्रोच जनता पार्टी नावाची चळवळ हीदेखील एक राजकीय घटनाच होती. त्याला सत्ताधाऱ्यांचा आणि विरोधी पक्षांचा, सिव्हिल सोसायटीचा, न्याय व्यवस्थेचा मिळत गेलेला प्रतिसादसुद्धा राजकीयच होता. मुद्दा हे राजकारण मुख्यतः शासनसत्तेच्या बाजूने किती माणुसकीच्या पातळीवर साधले गेले हाच राहणार आहे...**

राजकारण हा चोवीस तास करावयाचा उपद्व्याप आहे. स्वातंत्र्यानंतरचा कोणीही नेता वा पक्ष हे जाणून होता. पण असे चोवीस तास राजकारण करताना तो नेता वा पक्ष सार्वजनिक सभ्यतेचे, माणुसकीचे संकेतही जाणून होता. मात्र, गेल्या १२-१५ वर्षांत विद्यमान सत्ताधाऱ्यांनी राजकारणाचे नियोजनबद्ध कॉर्पोरेटीकरण केले. सत्ता कॉर्पोरेट मशिनरीसारखी राबवली. राजकारणाला असलेला मानवी चेहरा हिरावून घेतला. व्यवस्था डिह्युमनाइज-यंत्रवत होत गेली.

उदारीकरणानंतर भारतात स्थिरावलेल्या कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये जसे कर्मचाऱ्यांना चोवीस तास उपलब्ध असण्याची सक्ती होऊ लागली, तसे वैयक्तिक आयुष्य बिनमहत्त्वाचे ठरू लागले. घरात कुणाचा मृत्यू झालेला असो, दैनंदिन चक्रातून बाहेर पडण्यासाठी कोणी निवांतपणा मिळावा म्हणून सुट्टीवर गेला असो, कॉर्पोरेट सक्तीने त्यांना सदासर्वकाळ अव्हेलेबल असणे बंधनकारक ठरू लागले. गलेलठ्ठ पगाराच्या बदल्यात घराघरांत ताणतणाव, वैताग, संताप, निराशा वास करू लागली. निर्दयी, निष्ठूर, कॉर्पोरेट कल्चरने माणसाला माणसापासून तोडले.

हीच संस्कृती आणि सक्ती विद्यमान सत्ताधाऱ्यांनी इतर राजकीय पक्ष आणि नेत्यांवर लादली. म्हणून जेव्हा जेव्हा राहुल गांधींसारखा विरोधी पक्ष नेता राजकारणापासून दूर खासगी सुट्टीवर गेला, त्याच्यावर संशय घेतला जाऊ लागला, त्याची लायकी काढली जाऊ लागली. सोशल मीडियावर त्याला निकम्मा, नालायक ठरवून ट्रोल केले जाऊ लागले. गंमत अशी, कॉर्पोरेट कल्चरने ज्यांचे जीणे हराम केले, तो सत्तासमर्थक 'कार्पोरेट मजदूर' वर्गही विरोधी पक्ष नेत्यावर होणाऱ्या चिखलफेकीत आनंदाने सामील होत गेला.

आज भारतातले राजकारण एका अशा टप्प्यावर येऊन पोहोचले आहे की, जिथे माणुसकीला जागा उरलेली नाही. सत्ताधारी-समर्थक-मतदार-विरोधक हे संबंध निव्वळ देवाणघेवाणीचे बनले आहेत. प्रशासन, तपास यंत्रणा, न्याय यंत्रणा, मुख्य प्रवाहातला



*तुम्ही कोण आम्हाला डिक्टेट करणारे अशा अहंभावी वृत्तीने राज्य करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी पोलिसांच्या माध्यमातून ताकद दाखवून देताना आपला अमानवी चेहरासुद्धा उघड केला. मात्र, कितीतरी आंदोलक नागरिक रक्तबंबाळ अवस्थेतही व्यवस्थेला निधड्या छातीने सामोरे गेले...*

बव्हंशी मीडिया थेट नियंत्रणाखाली आणि प्रभावाखाली येत गेल्याने सारेच माणुसकीहीनतेचे दर्शन घडवू लागले आहेत. आता राजकारणातल्या, राजकीय नेत्यांच्या माणुसकीच्या, मानवी चेहरा असलेल्या कहाण्या कर्णोपकर्णी होत नाहीत. आता फक्त भव्यदिव्य 'विकासा'च्या, राजकीय खुनशीपणाच्या, फंदफितुरीच्या गोष्टी कानी येतात. यात माणूस नसतो. माणुसकीच्या गोष्टी नसतात. असतो फक्त माणुसकीशून्य विकास.

अर्थात, यंत्रणा आणि वर्ग सत्ताधाऱ्यांच्या कह्यात जात असताना, या देशाच्या सुदैवाने समर्थक–मतदार असलेल्या एका वर्गाने सत्ताधाऱ्यांच्या प्रभावाखाली येऊनही नियंत्रणाखाली येण्यास नकार देण्यास सुरुवात केली आहे. जुलै महिन्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात दिल्लीच्या जंतरमंतर मैदानात, नीट परीक्षा प्रश्नपत्रिका फुटीनंतर २० विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्या आणि शिक्षण व्यवस्थेचा झालेला खेळखंडोबा याचा निषेध म्हणून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीने पुकारलेल्या आंदोलनात वैचारिक विरोधकांबरोबरच सत्ताधाऱ्यांचे नियंत्रण झुगारून देणारे समर्थक–अनुयायीही दिसले. आंदोलकांविरोधात कारवाई करताना दिल्ली पोलिसांनी शासनसत्तेच्या वतीने माणुसकीहीन चेहऱ्याचे दर्शन घडवले. त्यांनी ना आठ–दहा वर्षांचे मूल पाहिले ना, तरुण मुली, ना वृद्ध. हे खरेच की, अशा प्रकारच्या आंदोलनाची संधी साधून समाजकंटक आपला डाव साधतात, तो दिल्लीच्या आंदोलनातही साधला गेला असणार. पण सर्वसामान्य, जेन्युइन, पोटतिडिकीने सामील असलेले विद्यार्थी, पालक, शिक्षक, पीएच.डी. धारक, संशोधक आणि समाजकंटक यात फरक न करता दिल्ली पोलीस, राखीव सुरक्षा दल आणि गावगुंडासमान दिसणारे बिनानावाचे, बिना गणवेशातले काही 'रक्षक' सोबतीला घेऊन या सगळ्यांनी जो मुर्दाडपणा दाखवला तो लोकशाहीला आणि माणुसकीला लाज आणणारा होता.

परंतु, अत्याचाराच्या या प्रसंगांत काही आंदोलक असे निघाले, ज्यांनी पळून न जाता, रक्तबंबाळ अवस्थेत हिंसेशी डोळा भिडवत मारो मुझे मारो... मार डालो... गोली मारो... म्हणत अभूतपूर्व निर्धाराचे दर्शन घडवले. निष्ठूरतेचे दर्शन घडवणाऱ्या दिल्ली पोलिसांपुढ्यात निर्भयतेचे दर्शन घडवले. मुंबईतल्या आंदोलनात एका शिक्षित तरुणीने पोलिसांची गाडी अडवण्याची हिंमत दाखवली. हिंसेला, मरणाला सामारे जाणारे हे आंदोलक माणुसकीहीन व्यवस्थेच्या विरोधातल्या प्रतिकाराचे प्रतीक बनले. बहुदा आंदोलकांनी आणि विरोधी पक्षांनी दाखवलेला हाच निर्धार पाहून कोणापुढेही न झुकणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी २५ जुलै रोजी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधानांना राजीनामा देण्यास भाग पाडले. देशासाठी, देशातल्या तरुणाईसाठी आपण फार मोठा त्याग करत असल्याचा आव आणत मंत्रीमहोदयांनी तो राजीनामा जनतेपुढे आणला. भावनाशून्य व्यवहार करणाऱ्या कॉर्पोरेट कंपन्यांचा एकमेव नि अंतिम उद्देश नफा–अधिक नफा हा आणि एवढाच असतो. आता राजकारणाचे कॉर्पोरेटीकरण केलेल्या विद्यमान सत्ताधाऱ्यांचा एकमेव नि अंतिम उद्देश सर्वंकष सत्ता हा दिसतो आहे. या सत्तेने केलेले अत्याचार निधड्या छातीने परतवण्याची क्षमता नागरिकांमध्ये विशेषतः तरुण–तरुणींमध्ये येणे, हेच या आंदोलनाचे फलित आहे आणि ७९ व्या स्वातंत्र्यदिनाचे देशाला मिळालेले अविस्मरणीय गिफ्टही!

**– कार्यकारी संपादक**

# लोकनाट्य चळवळीचा मौलिक दस्तऐवज



सायली परांजपे

स्वातंत्र्य दिन विशेष

संदर्भ पट




*माहितीपटाची टायटल फ्रेम...*



*निर्माता-दिग्दर्शक मिलिंद चंपानेरकर*

**१९४७** मध्ये देश स्वतंत्र झाला हे खरेच, पण त्यानंतर किती तरी समाज समूहांचे मुक्तीचे लढे सुरूच राहिले. त्यातलाच एक लढा श्रमिक मुक्तीचा होता. महाराष्ट्रात अण्णा भाऊ साठेंनी लोकनाट्य या कला प्रकाराच्या आधाराने या लढ्याला बळ दिले. याच लोकनाट्याच्या पाऊलखुणांचा वेध घेणारा माहितीपट ज्येष्ठ लेखक-अनुवादक-कार्यकर्ते मिलिंद चंपानेरकर यांनी निर्मिला आहे. यंदाच्या १५ ऑगस्टला देशाच्या स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण होतील. म्हणजेच देशाचे स्वातंत्र्य वयाचा ऐंशीचा टप्पा गाठत असताना स्वातंत्र्योत्तर संघर्षाचा एक पटच चंपानेरकर यांनी प्रेक्षकांपुढ्यात उलगडला आहे...

*तुकाराम भाऊराव साठे (१ ऑगस्ट, १९२०-१८ जुलै, १९६९) हे अण्णा भाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते.[१] साठे हे हिंदू मातंग समाजामध्ये जन्मलेले होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते.[२] साठे हे सुरुवातीस मार्क्सवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता.[३४५६] त्यांनी प्रामाणिक साहित्य लिहिले. दलित म्हटले की, हिंदू मराठा, ब्राह्मण विरोधी असे लेखन असते. देवांना शिव्या देऊन लपून त्यांचीच पूजा करणे असा दुपट्टीपण त्यांच्या कडे नव्हते त्यांचा हिंदू धर्मावर प्रचंड लोभ होता. श्री हरी विठ्ठलाचे ते भक्त होते. त्यांनी देव मानले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.* (विकिपीडिया, मुक्त ज्ञानकोशातून... जसे उपलब्ध आहे, तसे. व्याकरण, शब्दांच्या सुधारणा न करता. दिनांक २० जुलै २०२६)

इतिहासाशी संबंधित जे जे काही आपल्या अडचणीचे आहे, ते सारे बिनमहत्त्वाचे ठरावे, अप्रासंगिक ठरावे किंवा ते असलेच तर आपल्या विचारांशी जुळणारे असावे अशा पद्धतीने सत्ताधारी वर्गाकडून सर्व स्तरावर आक्रमकपणे मोहिमा (ज्यास अलीकडे ऑपरेशन अमूक ऑपरेशन तमूक असे मोठ्या अभिमानाने नाव दिले जाते.) राबवल्या जात आहेत. लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंशी संबंधित विकीपीडियावर सध्या उपलब्ध असलेला वरील मजकूर हा याचाच ताजा मासला आहे. यात अण्णा भाऊ साठेंनी आयुष्यभर ज्या साम्यवादी विचारसरणीचा पुरस्कार केला, त्याचा साधा उल्लेख तर नाहीच, परंतु लोकनाट्याच्या माध्यमातून त्यांनी घेतलेल्या श्रमिक मुक्तीच्या ध्यासाची, त्यासाठी खर्ची घातलेल्या आयुष्याची नोंद नाही. न पेक्षा या विकीपीडियाच्या नोंदीत दिसतात, ते सत्ताधाऱ्यांच्या सोयीचे अण्णा भाऊ साठे. या पार्श्वभूमीवर लेखक-अनुवादक-कार्यकर्ते मिलिंद चंपानेरकर निर्मित आणि दिग्दर्शित 'अण्णा भाऊ साठे प्रणीत लोकनाट्याच्या पाऊलखुणा' (इंग्लिश सबटायटल्ससह) नावाचा माहितीपट वस्तुनिष्ठ इतिहासाच्या संदर्भाने मोलाचा ऐवज प्रेक्षकांपुढ्यात ठेवतो. अलीकडेच या माहितीपटाचा फक्त निमंत्रितांसाठी खासगी स्वरूपाने शो आयोजित करण्यात आला होता.

**लोककलेचे सामर्थ्य जोखले**

अण्णा भाऊ साठेंची साम्यवादी विचारांच्या अंगाने झालेली जडणघडण, त्यांनी उभारलेली लोकनाट्यसृष्टी, लाल बावटा कलापथकाची स्थापना आणि वाटचाल, राजकीय लोकनाट्याचा आकृतिबंध, त्यामागचे त्यांचे विचार, त्यांचे श्रमिक केंद्री लेखन, परिस्थितीशी दोन हात करत त्यांची साथसोबत करणारे कलावंत-कार्यकर्ते, लोकनाट्याच्या उतरणीची चिकित्सा, पथनाट्याच्या चळवळी आणि लोकनाट्याचा वारसा पुढे नेण्याचे प्रयत्न हा या घटितांवर माहितीपटाचा मुख्य झोत आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी शाहीर अमर शेख आणि शाहीर द.ना. गव्हाणकर यांच्या साथीने लाल बावटा कलापथकाच्या माध्यमातून केलेल्या जनजागृतीचा, त्यातील आलेल्या संघर्षाच्या अनेक टप्प्यांचा वेध या १०० मिनिटांच्या माहितीपटात घेण्यात आला आहे. साम्यवादी विचारसरणीचे अनुयायी असलेल्या अण्णा भाऊ साठे यांनी श्रमिकांच्या व्यथांना वाट करून देण्यासाठी, त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी लोककलेचे माध्यम वापरले; त्यांचा प्रभाव महाराष्ट्रातील लोककलेवर तसेच चळवळींवर कसा होत गेला, यावर माहितीपटात प्रामुख्याने भर दिलेला आहे. एका अर्थाने श्रमिक मुक्तीच्या इतिहासाचे राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक संदर्भबिंदू एकमेकांना जोडण्याचे, या संदर्भबिंदूंची एक शृंखला प्रेक्षकांपुढे ठेवण्याचे मोलाचे काम या माहितीपटाच्या निमित्ताने दिग्दर्शक चंपानेरकर यांच्याकडून झाले आहे.

मराठी साहित्यविश्वाला अण्णा भाऊ साठे लेखक म्हणून परिचित आहेत. त्या अनुषंगाने त्यांच्या कादंबऱ्यांचे, कथांचे ओझरते संदर्भ माहितीपटात येतात. त्यांच्या साहित्याचा अभ्यास केलेल्या, त्यांचा प्रवास निदान ऐकलेल्यांच्या बोलण्यातून त्यांच्या जीवनाबद्दल तपशीलही ओघाने येतात, पण त्यांचा संपूर्ण जीवनपट मांडणे हा माहितीपटाचा उद्देश नसावा. श्रमिकांच्या दु:खांना वाट करून देण्यासाठी तसेच त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी लोककलेचे माध्यम वापरण्याचा पाया अण्णा भाऊ साठे आणि लाल बावटा कलापथकाने कसा घातला, त्यासाठी आपले आयुष्य कसे पणाला लावले, यावर माहितीपटाचा भर आहे. या माहितीपटामध्ये अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेल्या गीतांतील प्रतिमा, त्यातील विद्रोह हे बारकाईने नोंदवण्यात आले आहे.







*अण्णा भाऊ साठेंच्या लाल बावटा कलापथकाने श्रमिकांची वेदना मुखर केली. त्या वेदनेची जाण राखत जुन्या पिढीतल्या केसर जैनु शेखपासून ते नव्या पिढीतल्या शाहीर रुपाली जाधवपर्यंतच्या अनेकांनी लोकनाट्याचा वारसा जपला...*

नफाकेंद्री भांडवलशाही व्यवस्थेला आव्हान देतानाच अण्णा भाऊ साठेंनी आपल्या शाहिरीतून श्रमिकांमध्ये आत्मसन्मानाची प्रखर जाणीव पेरली. जगण्याच्या संघर्षात श्रमिकांच्या वाट्याला येणाऱ्या तुटलेपणाची व्यथा शब्दबद्ध केली. केवळ आपला वा आपल्या समाजाच्या नव्हे, तर वैश्विक कल्याणाचा समताकेंद्री विचार मांडून असंख्य लोकांनी आपल्या विचारधारेशी जोडून घेतले हे सारे या माहितीपटात अधोरेखित करण्यात आले आहेच, जोडीला साहित्यिक, साम्यवादी विचारधारेशी एकनिष्ठ राजकीय कार्यकर्ते, सर्वसामान्यांच्या हृद्याला हात घालणारे शाहीर असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला असलेले पैलूही उजेडात आणण्यात आले आहेत.

त्यांच्या पथकात काम करणारे केसर (जगताप) जैनु शेख, विदर्भातल्या अमरावती जिल्ह्यातल्या कॉ. वेणूताई आवारे, शाहीर संभाजी भगत आदी जुन्या नव्या पिढीतले कलावंत–कार्यकर्ते या माहितीपटात अण्णा भाऊ साठे आणि त्यांची कला या विषयावर बोलले आहेत. या मंडळींच्या बोलण्यातली तडफ जशी लक्षवेधी आहे, तसेच काळाच्या रेट्यातून आलेले वैषम्य आणि विशादही लक्षात राहील असा आहे. यातल्या केसर जैनु शेख आणि वेणूताई आवारे या दोन कार्यकर्त्या कलावंत माहितीपट निर्मितीदरम्यान जग सोडून गेल्या. काळाच्या संदर्भाने त्यांच्या अनुभवांचे लोकनाट्यपरंपरेच्या अंगाने झालेले दस्तावेजीकरण ही या माहितीपटाची जमेची बाजू आहे.

**लोकनाट्य परंपरेचा वेध**

कलेच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्यांची सत्ताधाऱ्यांना कशी जरब वाटते याची नोंदही माहितीपटात घेण्यात आली आहे. देशभरातील अण्णा भाऊ साठे यांना समकालीन असलेल्या आणि त्यांच्या पश्चात कलेच्या माध्यमातून झालेल्या चळवळींचा देखील आढावा माहितीपटात घेण्यात आला आहे. अण्णा भाऊ साठे यांनी रचलेल्या पायावर कळस चढवणाऱ्या चळवळींचा आढावा हा माहितीपटाचा महत्त्वाचा भाग आहे, हेही या निमित्ताने नमूद होणे गरजेचे आहे.

रुपाली जाधव, शाहीर तुळशीराम जाधव, शाहीर सागर गोरखे, शाहीर दीपक ढेंगळे, शाहीर निशांत जैनु चांद, लोकशाहीर चेराबंडा राजू आदी लोकनाट्य कलावंतांच्या माध्यमातून अण्णा भाऊ साठे यांच्या पोवाड्यांचे सादरीकरण माहितीपटात करण्यात आले आहे. त्यामुळे केवळ गहन चर्चेच्या माध्यमातून माहिती प्रसारित केली जात नाही, तर त्यांच्या गीतांना गायनाच्या स्वरूपात उजाळादेखील दिला जातो. यामुळे एक तर माहितीपटात रंजकता येते आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे, त्यातील अनेक गाणी आजच्या परिस्थितीलाही लागू पडत असल्याची जाणीव माहितीपट बघणाऱ्या प्रेक्षकांना होते. जोडीलाच अण्णा भाऊ साठेंच्या गीतांतील अनेक स्तरांवर व्यक्त होणारी कविता यातून उलगडली आहे. 'माझी मैना गावाकडे राहिली'सारख्या गीतातून एका स्तरावर पोटासाठी गाव सोडून मुंबईत आलेल्या गिरणी कामगाराची व्यथा मांडतानाच त्याचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीशी साधलेले रूपक हे त्याचे एक उदाहरण.

**संदर्भांचा धागा मोलाचा**

मिलिंद चंपानेरकरांनी निर्मिलेला हा माहितीपट चकचकीत किंवा अतिसफाईदार नाही. त्यामागे आर्थिक तसेच मनुष्यबळाच्या मर्यादा असाव्यात. मात्र तांत्रिक चकचकाट किंवा नेत्रसुखद मांडणी हा या माहितीपटाचा उद्देशही नसावा. अण्णा भाऊ साठे यांचे नाव घेऊन आज सत्ताधारी पक्षाने एका समुदायाची मते जोडली असली आणि त्यासाठी अत्यंत हिडिस स्वरूपात कार्यक्रम केले जात असले, तरी अण्णा भाऊ साठे यांची विचारसरणी नेमकी काय होती, त्यांच्यासाठी श्रमिक मुक्तीचा नेमका अर्थ काय होता, याची आठवण करून देण्याचे काम हा माहितीपट चोख करतो.

तुम्ही अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याचे, लोकनाट्याचे अभ्यासक असा, दलित चळवळीबद्दल आस्था असलेले सहानुभूतीदार असा वा केवळ सजग प्रेक्षक हा माहितीपट प्रारंभापासून तुमचे लक्ष वेधून घेतो. त्यामध्ये अण्णा भाऊंच्या वर्तमान पिढीची व्यथा समोर येते. डॉ. बाबुराव गुरव, कॉ. सुबोध मोरे, कॉ. भालचंद्र कानगो, कॉ. मुक्ता मनोहर, डॉ. वंदना सोनाळकर, अर्जुन घोष, डाव्या विचारांचे अभ्यासक सुधन्वा देशपांडे, प्रा. प्रवीण भोळे, केशव वाघमारे आदी अभ्यासक, कार्यकर्ते अण्णा भाऊंच्या लोकनाट्याचे काळाच्या संदर्भाने महत्त्व उलगडून सांगतात. अर्थातच प्रस्तुत माहितीपट बघता बघता काही प्रश्नदेखील प्रेक्षकांच्या मनात निर्माण होतात. उदा. अण्णा भाऊ साठेंच्या कार्याला विविध जातीत आणि राजकीय विचारधारेत विभागला गेलेला दलित समूह कसा प्रतिसाद देत होता? अण्णा भाऊंनी पीडित-शोषित कामगारांमध्ये आत्मभान जागवण्यासाठी आरंभलेल्या लोकनाट्य चळवळीचे सद्य वर्तमान काय आहे? इ. अर्थात माहितीपट जसा पुढे सरकत जातो या प्रश्नांची उत्तरे प्रेक्षकांना मिळत जातात. किंबहुना, अण्णा भाऊंच्या लोकनाट्याचा धागा जेव्हा इप्टा, सफदर हाश्मींची पथनाट्यकेंद्री जन नाट्यमंच अशा आणि इतरही चळवळींशी तसेच अलीकडच्या काळातल्या सत्यशोधक, शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला या सामाजिक चिकित्सा करणाऱ्या नाटकांपर्यंत जोडला जातो, तेव्हा या माहितीपटाला व्यापक परिमाणही लाभते.

एकूणच मिलिंद चंपानेरकर यांनी अनंत अडचणींवर मात करत अण्णा भाऊ साठेंनी उभारलेल्या लोकनाट्य चळवळीच्या इतिहासाचे महत्त्वाच्या संदर्भांसह पुनरुज्जीवन घडवून आणले आहे. जग बदलण्याची ईर्षा असलेली व्यक्ती कलेच्या माध्यमातून आपले विचार समाजापर्यंत किती प्रभावीपणे पोहोचवू शकते, याचे समर्पक दर्शन प्रस्तुत माहितीपटाने घडवले आहे. सरतेशेवटी एवढेच की, श्रमिक मुक्तीकेंद्री लोकनाट्य चळवळींविषयी आस्था आणि इतिहासाबद्दल आदर असलेले जाणकार मिलिंद चंपानेरकरांच्या या प्रयत्नांचे स्वागत करतील, अशी आशा करणे निदान वस्तुनिष्ठा नि विवेकनिष्ठा दोहोंची वर्तमान काळातली आत्यंतिक गरज पाहता अप्रस्तुत ठरणार नाही. ठरूही नये.

**लेखिका, अनुवादिका असलेल्या सायली परांजपे यांची 'राया' (अनुवादित), 'शहीद भगतसिंग', 'क्रांतिज्योती सावित्राबाई फुले', 'सम्राट अशोक', ही लघुचरित्रपर पुस्तके प्रकाशित आहेत. सायली या 'समतावादी मुक्त संवाद पत्रिके'च्या सल्लागार संपादक मंडळाच्या सदस्या आहेत.**
**संपर्क :** sayalee.paranjape@gmail.com

समतावादी मुक्त संवाद पत्रिकेतील सदरावर आधारित
**मनोविकास प्रकाशनाचं नवं दमदार पुस्तक**
**गाथा भारतीय निवडणुकांची**
**डॉ. विजय चोरमारे**
इतिहास रोमहर्षक असतो आणि राजकारण चैतन्यदायी असते. या दोन्ही गोष्टी एकत्र येतात तेव्हा त्यातला जिवंतपणा खिळवून ठेवणारा असतो. भारतातील निवडणुकांचा इतिहासही असाच पानोपानी रोमांचक व वाचकांना खिळवून ठेवणारा आहे. त्याची प्रचिती देणारं पुस्तक!
मनोविकास प्रकाशन
पुस्तक घरपोच मिळवण्यासाठी संपर्क
फ्लॅट नं. 3 ए/4, शक्ती टॉवर्स, 672, नारायण पेठ, पुणे - 411030
8888550837 www.manovikasprakashan.com
मूल्य ₹ 450/-


# ...आणि लंकेचे दहन सुरू झाले



राजा पटवर्धन

पुनर्शोध रामायणाचा



**रा**म मुद्रा (अंगठी) हाती आल्यावर कपिश्रेष्ठ हनुमान हा खरोखरीच सुग्रीवाचा सचिव–मंत्री आणि रामाचाच दूत आहे, याची सीतेला खात्री पटली. ती वदली, ''हे हनुमाना! राम– लक्ष्मण हे दोन बंधू सर्व देवांपेक्षाही पराक्रमी असताना माझी सुटका का होऊ नये? पृथ्वीवर प्रलय कसा होत नाही? मी जवळ नाही म्हणून रामाचे माझ्यावरील प्रेमच आटले का? कौसल्या, सुमित्रा, भरत यांच्या संदर्भात काही अप्रिय गोष्ट त्यांच्या कानावर आली आहे का? माझा विरह सहन होत नाही म्हणून राम उदास तर झाले नाहीत? भरताचे अक्षौहिणी सैन्य आणि सुग्रीवाची वानरसेना मिळून माझी सुटका कधी करतील? रामाच्या भयंकर शस्त्राने मारलेला रावण मी लवकरच पाहीन ना?''...

समोर उभा ठाकलेल्या हनुमानाला उत्तर द्यायला सीतेने सवडच दिली नव्हती. अखेरीस सीतेचे 'रॅपिड फायर' थांबले आणि बद्धांजली नमन करून उभा असलेला हनुमान म्हणाला, ''देवी! तुम्ही अशा अवस्थेत बंदिवान आहात, हे फक्त मला आत्ताच माहीत झाले आहे. तुमचा ठाव ठिकाणा आता मला लागला आहे. मी त्यांना प्रत्यक्ष भेटून संपूर्ण वस्तुस्थिती सांगितली, की नंतरच अगणित ऋक्ष-वानर सैन्य घेऊन सशस्त्र राम समुद्र ओलांडून येतील. लंकेतील राक्षसांचा नाश करतील. मृत्युदेवतेसह कुणीही विरोध करायला धजावला तरी हा संहार होईल. ऐरावतावर इंद्र जसा वैभवी रुबाबात बसतो, तसे प्रस्रवण पर्वतावर बसलेले राम तुम्ही पाहाल. रघुवंशीय अन्य राजांप्रमाणे रामही मांस आणि मद्यपान न करता फक्त फळे कंदमुळे इत्यादी खाऊन राहतात. ते रात्रंदिवस तुमचीच चिंता करीत असतात. तुमच्या आवडीची फळे फुले वा एखादी वस्तू दिसली तरी 'हे सीते! हे सीते' असा त्यांचा जप सुरू असतो.''

हनुमानाच्या या कथनाने सीता थोडी शांत झाली तरी राम शोकमग्न आहेत म्हणून हिरमुसली, दु:खी झाली. ''हे हनुमाना! या वर्षाअखेर पर्यंतच मी जिवंत राहणार आहे. माझ्या या बंदिवासाचा दहावा महिना सुरू आहे. आणखी दोन महिन्यांचाच कालावधी उरला आहे. ही मुदत संपली की मी जिवंतच राहणार नाही. तशी धमकीच रावणाने मला दिली आहे. तो बिभीषणाचेही ऐकत नाही. बिभीषण कन्येकडून मला असेही समजले, की रावणाला आदरणीय असलेल्या अविंध्य नावाच्या राक्षसानेही माझ्या अपहरणाला विरोध केला. रावण त्यांचेही ऐकत नाही. ज्या रामाने एकट्याने १४ हजार राक्षसांना यमसदनी पाठवले, त्यांना कोण घाबरणार नाही?'' हे बोलत असतानाच सीतेला रडू आले. शोक अनावर झाला. हनुमानाने सीतेला धीर दिला.

**हनुमानाचा सीतेला दिलासा**

''या राक्षसांच्या बंदीतून मी तुमची आत्ताच सुटका करू शकतो. तुम्हाला पाठीवर बसवून मी महासागर उल्लंघून प्रस्रवण पर्वतावर नेऊन रामाची भेट घडवून आणतो. माझा पाठलाग करण्याचे सामर्थ्य एकाही लंकावासी राक्षसांजवळ नाही.'' (सागरोत्तारक हे हनुमानाचेच एक नाव) हनुमानाचा हा आत्मविश्वास पाहून सीता आश्चर्यचकित झाली. म्हणाली, ''हनुमाना हे दु:साहस कसे करशील? तुझा देह किती लहान आहे.'' हनुमानाने ही संधी साधून आपले विराट रुप धारण करून सीतेला दाखवले. (हनुमानाची एकूण १०८ नावे आहेत. त्यातील एक 'कामरुपिणे') मारुती अशोक वृक्षापेक्षाही मोठा झालेला सीतेने पाहिला. प्रदीप्त वन्हीचे तेज त्याला प्राप्त झालेले सीतेने पाहिले. तो सीतेला आश्वस्त करण्यासाठी म्हणाला, ''माझ्या अंगात ही संपूर्ण लंका नगरी वाहून नेण्याचे सामर्थ्य आहे. तुम्ही माझ्याबरोबर चला आणि राम-लक्ष्मणाला शोकमुक्त करा.''

''हे महाकपे! तुझ्या सामर्थ्याबद्दल माझ्या मनात कोणतीच शंका उरलेली नाही. तरीही अशाप्रकारे तुझ्याबरोबर येणे योग्य नाही. तुझ्या प्रचंड वेगानेच मला भोवळ आली, मी समुद्रात पडले तर? तू मला घेऊन निघालास हे गुपीत राहणारच नाही. राक्षसांच्या पाठलागाने युद्ध प्रसंग उद्‌भवल्यास ते प्राण संकटही ठरेल. तरीही तू यशस्वी होशील खरा, पण यात रामाचा पराक्रम दिसणार नाही आणि ते कीर्तिमानही ठरणार नाहीत. हे वानरश्रेष्ठा! मी पतिव्रता आहे. पती श्रीरामा व्यतिरिक्त मी स्वेच्छेने परपुरुषास स्पर्श करणे निंद्य समजते. रावणाने मी असमर्थ, अनाथ आणि निराधार असतानाच जबरदस्तीने स्पर्श केला. रामचंद्र लंकेत येऊन दशग्रीव (दशकंठ) रावणाचा वध करून मला परत घेऊन जातील हेच सर्वार्थाने कीर्तिमान ठरेल. त्यांच्यासमोर युद्धात कोणीही टिकणार नाही. मग देव असोत की अन्य देवगण. हे वानरश्रेष्ठा! तू त्या दाशरथी पुत्र बंधूंना इथे घेऊनच ये. मला त्यामुळेच आनंद होईल.'' हे ऐकून हनुमानालाही आनंद झाला. वाक्चतुर हनुमान सीतेला म्हणाला, ''हे विनयवती देवी! तुमची सर्व वचने महात्मा राम पत्नीला शोभणारीच आहेत. तुमचे हे सर्व बोलणे मी रामाना कथन करीन. मी जी विनंती केली त्याचे मुख्य कारण मला रामांची तुमची भेट लवकरात लवकर घडावी अशी उत्कट इच्छा होती. लंकेत प्रवेश करणे हेही फार अवघड आहे. आणि महासागर पार करणे ही तिसरी समस्या आहे.''

**राम सीतेच्या मांडीवर विसावले...**

''तुम्ही माझ्याबरोबर येणार नसाल, तर मी तुमची प्रत्यक्ष भेट घेतली याची एखादी खूण मला द्यावी.'' हनुमानाची ही विनंती सीतेला योग्यच वाटली. ''मी एक प्रसंग सांगते, तो आम्हा दोघांशिवाय कुणालाच माहीत नाही. वनवास काळातीलच तो प्रसंग आहे. चित्रकुटावरचा तो प्रसंग आहे. मी जसा सांगते तसाच्या तसा रामांना सांग.'' ''चित्रकुटावरून मंदाकिनी वाहते. तिच्या तीरावरील आश्रमात आपण राहत होतो. जलविहार करून आपण ओल्या अंगाने पर्णकुटीत आल्यावर तसेच माझ्या मांडीवर डोके टेकून झोपलात. मांसाच्या लोभाने एक कावळा मला त्रास देऊ लागला. तो मला चोच मारीत होता आणि मी त्याला मातीच्या

ढेकळाने हाकलू पाहत होते. पण तो पुन्हा पुन्हा येऊन मला चोच मारू लागला. कावळा भुकेलेला आहे म्हणून तो हाकलूनही हटत नाही असे मला वाटले. कावळा लपून राहतोय आणि वारंवार माझ्या जवळ येतोय, माझ्याकडेच टक लावून पाहातोय हे मला जाणवले. मी संतापले. माझे कमरेचे वस्त्र घट्ट बांधायचा प्रयत्न केला. हालचालीमुळे वस्त्र खाली सरकले. त्यावेळी तुमचे लक्ष गेले व तुम्हाला हसू आवरले नाही. मी लाजून चूर झाले. तेवढ्यात कावळा झेपावला. त्याने चोच मारून माझ्या अंगाला जखम केली. तेव्हा बसलेल्या तुम्हाला मी बिलगले. तुम्ही माझे प्रेमाने सांत्वन केले. मी रडत होते. माझ्या अंगातून रक्त आले होते. रामाने मला जवळ घेतले. मी त्यांच्या मांडीवर झोपले. मी उठले व राम पुन्हा माझ्या मांडीवर झोपले. कावळा पुन्हा आला. त्याने माझ्या स्तनावर पुन्हा चोच मारली. माझ्या छातीवरची जखम पाहून राम संतापले. कावळा माझी छेड काढतोय असे जाणून तो पुन्हा झेप मारण्याच्या तयारीत असताना त्यांनी एका दर्भावर ब्रह्मास्त्राचा मंत्रप्रयोग केला. तो दर्भ अग्नीसारखा तळपू लागला.तो प्रदीप्त दर्भ कावळ्यावर फेकला. हा पेटता दर्भ कावळ्याचा पाठलाग करीत होता.'' (प्रत्यक्षात तो कावळ्याचे रुप घेऊन आलेला देवेंद्र पुत्र जयंत होता. योगायोगाने चित्रकूट पर्वतावर इंद्रपुत्र जयंत विहारासाठी आलेला होता. सीतेच्या अप्रतिम सौंदर्यामुळे मोहित झाला. त्याने तिला जवळून न्याहाळण्यासाठी कावळ्याचे रुप घेतले होते. छेड काढण्याचा एक प्रकार होता.)

आपले प्राण वाचवण्यासाठी कावळा वेगाने पळू लागला. त्याला वाटले, आपण इंद्रपुत्र आहोत. या फडतूस दर्भाला सहज चुकवू. त्याने दिशा बदलून वेगही वाढवला. दर्भ अचूक त्याचाच पाठलाग करीत होता. त्याला पळता भुई थोडी झाली. तो स्वर्गात गेला तरीही दर्भ त्याचा पाठलाग करीतच होता. स्वर्गात इंद्रासह अन्य कुणीही त्याला थारा दिला नाही. तिन्ही लोकात हा पाठलाग सुरू झाला. (गाइडेड मिसाइल?) शेवटी कावळा दमला. त्याने रामाची क्षमा मागून जीवदान मागितले. दीन आणि शरणागताला राम आश्रय देत असल्याने जयंत वाचला. राम त्या कावळ्याला म्हणाले, ''हे ब्रह्मास्त्र आहे. ते असेच शांत होत नाही. तुझा कोणता तरी अवयव निकामी करूनच ते शांत होईल. कावळ्याने उजवा डोळा देऊन आपले प्राण वाचवले. कावळा अत्यंत संशयी असतो तिरकी मान करूनच कायम पाहत असतो. समजूत अशी की कावळ्याला एकच डोळा (एकाक्ष) असतो?''

''हे हनुमंता! य:कश्चित कावळ्याची खोड मोडण्यासाठी ब्रह्मास्त्राचा वापर करणारे राम माझा वियोग कसा सहन करतात? मला पळविणाऱ्या रावणाला कसे क्षमा करतील? तरीही माझी उपेक्षा का सुरू आहे? हे मी माझे दुर्भाग्य समजते.'' ''देवी! तुमच्या चिंतेने रामांच्या जिवाला घोर लागला आहे. मला तुमचे दर्शन झाले. माझा शोध पूर्ण झाला. आता चिंता करू नका. लवकरच तुम्ही दु:खमुक्त व्हाल. आता रावणाचा वध फार दूर नाही. तुमचा काही त्या दोन बंधूंना आणि सुग्रीवाला निरोप किंवा संदेश असेल तर सांगा.''

**सीतेची प्रणयरम्य आठवण**

''हे वीरा! माझ्या वतीने त्या देवतुल्यांना नतमस्तकपूर्वक प्रणाम सांग. सर्वांचे मंगल कुशल चिंतिले म्हणून सांग. माझी लवकरात लवकर सुटका होईल असे बोलून त्या सर्वांना प्रोत्साहित करत अखेर हेही सांग की, ...नाहीतर माझे आयुष्य फक्त दोन महिनेच उरले आहे. रामा! माझा उद्धार कर आणि हे हनुमंता! आपल्या भेटीची खात्री पटावी म्हणून तू एक खूण मागितलीस? आजपर्यंत वस्त्रात बांधून ठेवलेला चुडामणी माझी खूण म्हणून देत आहे, तो रामाना द्यावा.'' मानव राजवंशातील हा दागिना हनुमंताने पूर्वी कधीच पाहिलेला नसल्याने, त्याने आपल्या बोटात घालून बघितला. ते जमले नाही. (चुडामणी हा अलंकार एक तर मस्तकी धारण करतात किंवा स्त्रिया केश संभारात खोचतात) मारुतीने आता सीतेचा निरोप घेण्याचे ठरवले. त्याने सीतेला प्रणाम करून प्रदक्षिणा घातली.

''हे हनुमाना, हा चुडामणी पाहून रामाना माझ्या माता पित्यांसह माझी आणि दशरथ महाराजांचीही आठवण येईल.'' हनुमान म्हणाला, ''माते मी तुमचे दु:ख दूर करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीन, अशी प्रतिज्ञाच करतो.'' हनुमान तिथून निघता निघता सीतेने त्याला एक दिवस लपून राहून विश्रांती घे, असे सांगितले. तिची एक शंकाही तिने बोलून दाखवली. ''इतके प्रचंड ऋक्ष-वानर सैन्य महासागर ओलांडून कसे येईल? गरूड, वायू आणि आता तू सोडून हे दुष्कर कृत्य कोण आणि कसे करू शकेल? हे कसे साध्य होईल? रावणाचा वध होऊन रामांचा पराक्रम उजळून निघेल आणि त्यांची कीर्ती अजरामर होईल, अशी योजना कशी यशस्वी होईल हे तूच ठरव.''

''वानरही यशस्वी उड्डाण करू शकतात. ते संकटांवर मात करण्यात मातब्बर आहेत. सुग्रीवाच्या सेनेत माझ्याहूनही पराक्रमी बलवंत अनेक वानर आहेत. अतिश्रेष्ठ वीर असतात त्यांना कुणी

दूत म्हणून पाठवीत नाहीत. त्यामुळे निराशेचे कोणतेच कारण नाही. वेळ पडल्यास मी राम-लक्ष्मणांना माझ्या पाठीवर बसवून आणीन. ते लंकापुरीचा विध्वंस करतील. तुम्हाला घेऊनच अयोध्येत जातील. तुम्ही शोक मुक्त होऊन थोडी वाट पाहा.'' ''हे हनुमंता! रामांना मी तुला कथन केलेली कावळ्याची गोष्ट जरूर सांग. माझ्यातर्फे त्यांना हेही विचार, की कावळ्याला जीवदान दिल्यावर तुम्ही माझ्या गालावरचा पुसला गेलेला तिलक पुन्हा लावला होता, हे आठवते ना?'' (रामायणात क्वचितच असे प्रणयरम्य-रोमँटिक प्रसंग आहेत.) ''मी आज बऱ्याच दिवसांनी हा दिव्य चुडामणी पाहिल्याने मला रामदर्शनाचाच आनंद झाला आहे. अल्प काळातच मला रामांचे दर्शन झाले नाही तर मी जिवंतच राहू शकणार नाही. क्रूर रावणाची मजवर दुष्ट पापी नजर आहे. राम-लक्ष्मणांच्या भेटीसाठी मी आतूर आणि उत्कंठित आहे. लंका नगरी ते भस्म करून टाकतील यांची मला खात्री आहे.'' दिव्य चुडामणी घेऊन हनुमान उड्डाण करण्याच्या तयारीत आहे हे सीतेने जाणले. हनुमानाचे शरीर विस्तारताना तिने पाहिले. ''हनुमंता! माझ्या छळाची संपूर्ण हकीकत तू राम लक्ष्मणाला सांग.'' प्रसन्न मुद्रेने हनुमान म्हणाला, ''होय!!'' (वा.रा.सुंदर कांड सर्ग ४०. सुंदर कांड हे सर्वार्थाने हनुमान महात्म्य आहे. माता अंजनी आपल्या या पुत्राला पाहून इतकी खूश झाली, तिने याचे नाव ठेवले, 'सुंदर'. मारुती स्तोत्रामध्येही 'सुंदरा जगदांतरा' असे शब्द आहेत. वाल्मिकींनी या कांडाला 'सुंदर कांड' नाव दिले आहे.)

**हनुमानाने रावणाची कळ काढली...**

सीतेच्या तोंडून लंकेचा विध्वंस आणि भस्म हे शब्द हनुमानाने अनेक वेळा ऐकले होते. सीतेचा शोध लागलेला होता. प्रत्यक्ष भेटही झाली होती. राम-लक्ष्मणाला सीता जिवंत आहे की नाही हेही नक्की माहीत नव्हते. सर्वार्थाने हनुमानाचे 'मिशन लंका' यशस्वी झालेले होते. हनुमानाने केलेला पराक्रम शंभर योजने दूर समुद्र तीरावर वाट पाहणाऱ्या किश्किंधावासी अंगद-जांबुवंत आणि इतर वानर चमूला तसेच राजा सुग्रीवालाही समजला नव्हता. राम-लक्ष्मणाला तरी कुठून आणि कसे कळणार होते? (दूरभ्रमणध्वनी मोबाइलचा शोध विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मोटोरोला कंपनीने लावला, तो १९७३ साली.) हनुमान प्रत्यक्ष परत गेल्याशिवाय याचा पत्ता कुणालाच लागणे शक्य नव्हते. इतका त्वरित आणि इतका दूर संपर्क साधू शकेल, असा कोणताही मंत्र कुणाजवळच नव्हता. अशा मंत्र सामर्थ्याची ताकद ना रामाजवळ होती, ना हनुमानाजवळ! रावणाच्या सैन्याच्या सामर्थ्याचा अंदाज घ्यायचे हनुमानाच्या मनात आले. सीतेचा छळ आपण प्रत्यक्ष पाहूनही काहीच केले नाही, याचीही क्लेशकारक चुटपूट हनुमानाला होती. साम दाम भेदा ऐवजी दंड म्हणजे बळाचा वापर करून शत्रूला थोडेतरी शासन करावे, असे हनुमानाच्या मनात आले. आपल्या पराक्रमाची चुणूक दाखवावी, असे हनुमानाने ठरवले. शत्रूच्या मनात भय निर्माण होईल. काही प्रमुख वीर तरी मारले जातील, अशी योजना करण्याचा निर्णय मारुतीने केला. राम आणि रावण यांच्या बलाची तुलना करावी हा विचार त्यामागे होता. सैनिक, मंत्री, सेनापतींना धडा शिकवला की ताकदीचा अंदाज येईल. रावणाची कळ काढावी म्हणून त्रिभुवनात विख्यात असलेल्या अशोकवनाचा विध्वंस करावा असे त्याने ठरवले. एका मागून एक मोठे वृक्ष त्याने पाडून टाकायला सुरुवातच केली. (अशोकवनकाच्छेत्रे-हे एक हनुमानाचे नाव आहे). प्रमदावनाचे (अशोकवनाचा खास मध्यभाग) उजाड मैदानच झाले.

सीता ज्या शिंशपा म्हणजे अशोक वृक्षाखाली बसायची, तेवढाच परिसर भीमरुपी वानराने सुरक्षित ठेवला. लंकेतील राक्षसांना अपशकून जाणवू लागले. राक्षशिणी जाग्या झाल्या. पर्वतासारखे महाभयंकर रुप घेतलेला हनुमान प्रवेशद्वारासमोर जाऊन उभा राहिला. मध्यवर्ती असलेल्या प्रमदावनातील राक्षशिणींनी सीतेला त्याच्याशी बोलताना पाहिले होते. ''तो कोण आहे? तू त्याच्याशी काय बोलत होतीस?'' सीता म्हणाली, ''राक्षसांचे खरे रुप मी कसे जाणणार? ती विद्या तुमच्याजवळ आहे ना? मी स्वतःच या महाकाय वानररूपी राक्षसाला पाहून घाबरून गेलेली आहे.'' राक्षशिणी घाबरून गेल्या होत्या. त्यापैकी काही धावतच रावणाकडे गेल्या. ''महाराज एका भयंकर वानराने प्रमदावनासह सर्वत्र विध्वंस आरंभला आहे. तो सीतेजवळ बोलताना आम्ही पाहिले आहे. अजूनही तो प्रवेशद्वारावर आहे. तो राम, इंद्र वा कुबेराचा दूत असणार. सीता ज्या अशोक वृक्षाखाली रडत बसलेली असते, तो वृक्ष वगळून सर्वत्र विध्वंस झालेला आहे. त्याला तुम्ही पकडा आणि कठोर शिक्षा करा.''

**रावण बिथरला... चवताळला... बरळला**

या भयंकर बातमीने रावण चवताळला. त्याने त्या महाकाय वानराला कैद करून हजर करण्याची आज्ञा दिली. लगेच किंकरांची (सुरक्षा रक्षक दल) अशितीसाहस्त्रं म्हणजे, ८०,००० सशस्त्रसेना सज्ज होऊन निघाली. त्यांनी हनुमंतावर हल्ला चढवला. हनुमंताने प्रचंड गर्जना करून परिसर दणाणून सोडला.

राम-लक्ष्मणाचा जयजयकार केला. त्याने, सुग्रीव आणि रामाचा मी दास आहे. मी वायुपुत्र हनुमान आहे, हेही सांगितले. मी तुम्हा सर्वांचा नि:पात करीनच, पण हजारो रावणही माझ्यासमोर टिकणार नाहीत. मी लंकेलाच उद्ध्वस्त करीन, असे म्हणत महाद्वाराजवळ पडलेला धातूचा अजस्त्र दांडका हाती घेऊन किंकरांना बदडून काढायला सुरुवात केली. हनुमानाने आपण राक्षसांप्रमाणे आकाशात उडी मारू शकतो हेही दाखवून दिले. वरूनही संहार सुरू केला. किन्नर सेनाच नष्ट झाल्यावर हनुमान पुन्हा प्रवेशद्वारी आला. (रामाने एकट्याने १४ हजार राक्षसांना दंडकारण्यात मारले होते. हनुमानाने ८० हजार किन्नरांना ठार केले? हे इतिहास म्हणून कसे शिकवायचे?) रावणाला ही बातमी समजली. त्याने प्रमुख सेनापती प्रहस्ताच्या मुलाला आज्ञा केली. अशोकवनात जाऊन पिसाळलेल्या वानराचा वध करण्याचीच आज्ञा दिली.

किंकरांचा नि:पात झाल्यावर राक्षसांच्या कुलदेवीचे मंदिर हनुमानाला दिसले. त्याने तेही उद्ध्वस्त केले. हनुमान जोर जोरात गर्जना करू लागला. ''रामाचे संरक्षण प्राप्त असलेल्या सुग्रीवाचा विजय असो! मीच हजारो रावणांचा वध करीन.'' लंकापुरी उद्ध्वस्त करून सीता देवीला वंदन करूनच मी परत जाईन. प्रासादरक्षक हनुमंतावर तुटून पडले. पण त्यांचाही खात्मा झाला. हनुमान वारंवार किश्किंधेच्या राजा सुग्रीवाचा आणि रामाचा उल्लेख करून लंकापती रावणाचाही मागमूस राहणार नाही, असे म्हणाला. प्रहस्तपुत्र जंबुमाली रावणाच्या आज्ञेने वानराचा वध करायला येऊन पोहोचला. त्याचा थाट खास होता. तो गर्दभ रथातून आला. हनुमानाने त्याचेही पाणी जोखले. हनुमानाच्या शरीरातून रक्त काढणारा जंबुमाली हा पहिला राक्षस होता. हनुमानाने एका परिघाच्या दणक्याने त्याचा वध केला.

पिसाळलेला सामर्थ्यवान वानर जो कुणी वीर पुढे येतो त्याला ठार करतो, ही बातमी सर्वत्र पसरली. रावण एकापेक्षा एक सरस वीर पाठवीत होता. रावणाच्या सात मंत्र्यांचे सात पुत्र आपापल्या सेनेसह पुढे सरसावले. एकत्र आलेले सैन्य सात जण आणि एकटा हनुमान अशी लढाई जुंपली. हनुमानाने जणू एक क्रीडा करत त्यांचा जंबुमालीप्रमाणे फडशा पाडला. हनुमान पुन:पुन्हा प्रवेशद्वारी जाऊन उभा ठाकत राहिला. आता खुद्द पाच सेनापती हनुमानासमोर सशस्त्र ससैन्य हजर झाले. आज्ञा होती, पकडून आणायची. हा वानर सामान्य नाही हे रावणाने मान्य केले. तो वानर तरी कशावरून? तपश्चर्येतून इंद्राने मिळवलेला हा खास आगळा प्राणी आहे. तो सूडबुद्धीने पेटलेला आहे. रावणाने आज्ञेत फरक केला रावणाने चक्क वाली, सुग्रीव, जांबुवानाचाही उल्लेख केला. नील, द्विविद यांचाही उल्लेख केला. हा वानर थोडा अधिक पराक्रमी आणि विचित्रही आहे. पुढे सरसावलेल्या राक्षस वीरांना तो महावानर दिसला. यावर एक, दहा, शंभर, हजार बाण मारूनही काही परिणाम होत नाही. आकाशात उड्डाण केलेल्या हनुमानाला पकडायला गेलेल्या दुर्धराला केवळ हुंकारानेच हनुमानाने मारून टाकले.

विरुपाक्ष युपाक्ष राक्षसांचीही तीच गत झाली. फरक इतकाच की यांना धोपटून ठार केले. थोडक्यात, प्रहस्त असो वा भासकर्ण, कुणाचाच निभाव लागत नव्हता. महाप्रचंड पर्वत हाती घेऊन हनुमानाने काही राक्षसांना चिरडून मारले. नाईलाज झालेल्या रावणाने मोठ्या आशेने पुत्र अक्षकुमाराकडे पाहिले. सूर्यासारख्या तेजस्वी रथातून रावण पुत्र निघाला. त्याचा रथ सोने आणि रत्नांनी मढवलेला होता. हनुमानाला अक्षकुमाराने रक्तबंबाळ केले. हनुमानाला अधिकच चेव चढला. त्याला त्या रावण पुत्राच्या पराक्रमाचे कौतुक वाटले. हनुमानाने आकाशात उंचावर जाऊन अक्षकुमाराच्या रथावर उडी मारली. घोडे मारून रथच उद्ध्वस्त केला. अक्षकुमार आकाशात उडाला. त्याला हनुमानाने पकडून गरगर फिरवून जमिनीवर आपटला. स्वर्गातून हे द्वंद्व युद्ध पाहायला महर्षी इंद्र सर्व देवता यक्ष नाग भूत समुदाय जमले होते. हनुमान प्रवेशद्वारावर चढून उभा राहिला. बुद्धिबळात जसे प्यादे-उंट-घोडा-हत्ती आणि शेवटी सर्वशक्तिमान वजीर असतो, तसा रावणाचा सर्वोत्तम मोहरा इंद्रजीत (मेघनाद) लढायला आला. रावणाने इंद्रजीताला सेनेविनाच जायचा आग्रह केला. इंद्रजीताचा ठणत्कार आणि हनुमानाची गर्जना होताच युद्ध जुंपले. हनुमानाने इंद्रजीताचा बाणवर्षाव युक्तीने वाया घालवला. हनुमानाला इंद्रजीताची मुंडी दाबायची संधीही मिळत नव्हती. हनुमानाला खिळवून ठेवण्याचे सर्व प्रयत्न फोल ठरल्यावर इंद्रजीताने ब्रह्मास्त्राचा प्रयोग करण्याचे ठरवले. (हनुमानाला ब्रह्मदेव, वायु, इंद्र, अग्नि, यम आणि महादेव अशा देवांची वरदाने प्राप्त होती.) हनुमानाने ब्रह्मदेवाचा मान राखण्याची युक्ती लढवली. इंद्रजीताच्या ब्रह्मास्त्राने तो बद्ध झाला. (त्या बंधनातूनही हनुमान बंधमुक्त होऊ शकत होता) तो निश्चल पडून राहिला. राक्षसांनी त्याला ठोसे मारले. अवहेलना केली. हनुमानाने बेशुद्ध पडल्याचे नाटक केले. राक्षसांनी दोरखंडानेही बांधल्यामुळे ते दुसरे बंधन झाल्याने ब्रह्मास्त्राचेही बंधन उरले नव्हते. राक्षसांना फारच चेव चढला. पकडलेल्या वानराचा त्यांनी सर्व प्रकारे अवमान केला.

फरफटवीत रावणासमोर उभा केला. कुणी त्याला मारून टाका म्हणत होते. कुणीतरी खाऊन टाका म्हणत होते. कुणी जाळायलाही निघाले. हनुमानाने अखेरीस तेजस्वी बलवान रावणाला पाहिले. ''याचा संपूर्ण परिचय मिळवा'' रावणाने मंत्र्यांना दरडावले. लंकेत येण्याचे प्रयोजन काय याची सर्व चौकशी सुरू झाली. ''मी वानर राज सुग्रीवाकडून त्याचा दूत म्हणून आलो आहे.'' हनुमान रावणाला निरखून पाहत होता. रावणाची एकासारखीच दहाही मस्तके हनुमानाला यावेळी पाहता आली. शरीर दागिन्यांनी मढवलेले होते. देह काळा कुळकुळीत असूनही कांती तेजस्वी दिसत होती. सिंहासन स्फटिकाचे रत्नजडित होते. दागिन्यांनी नटलेल्या युवती चवऱ्या ढाळीत होत्या. रावणाचे राक्षस मंत्री सभोवती बसले होते. दुर्धर, प्रहस्त, महापार्श्व आणि निकुंभ. राक्षसांकडून होणाऱ्या पीडेकडे दुर्लक्ष करून हनुमान सर्वराज लक्षणांनीयुक्त अशा रावणाकडे दृष्टी खिळवून पाहत होता. हनुमान मनाशी म्हणाला, ''की जर या राक्षसाला अधर्माने पछाडलेले नसते, तर हा इंद्रपदाचा दावेदार झाला असता.''

हनुमानाकडे रावणाने क्रुद्ध होऊन पाहिले. त्याच वेळी तो मनातून घाबरूनही गेला होता. आपण कैलास पर्वतावर नंदीचा उपहास केला होता, त्याचे उट्टे काढण्यासाठी हा वानराचे रुप घेऊन आला आहे? की बाणासूर वानर बनून सूड उगवला आला आहे? हे प्रहस्ता, हा वानर माझ्या प्रमदावनाचा विध्वंस करायला का आला? माझे किंकरादी राक्षस याने का मारले? लंकेत हा घुसूच कसा शकला? हे सर्व त्यांच्याकडून वदवून घ्या. प्रहस्ताने वानराला विचारले, ''तू कोणाच्या सांगण्यावरून इथे आलास? कुबेर यम की वरुणाने तुला पाठवले? की तू विष्णुचाच दूत आहेस? तू सामान्य वानर नाहीस. सत्य सांगितलेस तर तू वाचशील. खोटे बोललास तर मारला जाशीलच. तू रावणाच्या नगरीत का आलास?'' हनुमान म्हणाला, ''मी तुम्ही म्हणता त्यापैकी कुणाकडूनही आलेलो नाही. मी वानरच आहे. रावणाच्या भेटीच्या इच्छेने मी प्रमदावनाचा विध्वंस केला. राक्षस माझ्याशी युद्ध करायला आले म्हणून मी स्वसंरक्षणासाठी त्यांना मारले. मी अस्त्र, पाशाने बद्ध होऊच शकत नाही. मला ब्रह्मदेवाचे वरदान आहे. मी पाशाने बांधला गेल्याचे नाटक केले. म्हणून मी तुमच्यासमोर आहे. प्रत्यक्षात मी महा तेजस्वी रामाचाच दूत आहे. तुझ्या हिताचे मी जे बोलणार आहे ते नीट ऐक. हे दशग्रीवा! मी सुग्रीवाचा संदेश घेऊन आलो आहे. त्याने तुझे कुशलही विचारले आहे. त्यांचा संदेश नीट ऐक.'' ''अयोध्येचा दशरथ राजा महापराक्रमी होता. त्याचा रामचंद्र नावाचा प्रभावी तेजस्वी पुत्र आहे. पित्याच्या वचनाप्रमाणे तो त्याचा भ्राता लक्ष्मण आणि पत्नी दंडकारण्यात आला असता जनक कन्या जनस्थानात कुठेतरी हरवली. तिचा शोध घेत असता ऋष्यमुख पर्वतावर त्याची सुग्रीवाची भेट झाली. सुग्रीवाने रामांना सीतेचा शोध घेण्यासाठी सहाय्य करण्याचे ठरवले. रामाने वालीचा वध करून सुग्रीवाचे राज्य त्याला मिळवून दिले. आता तो किश्किंधेचा राजा आहे. सर्व अस्वले आणि वानरांचा तो राजा आहे.''

''तुझी वालीशी ओळख होतीच. त्या वालीचा एकाच बाणात रामाने वध केला. सुग्रीवाने आपले पराक्रमी सेनावीर सीतेचा शोध घ्यायला पाठवले आहेत. मी मरुताचा औरस पुत्र. हनुमान आहे. वानर आहे. मी सीतेच्या शोधार्थ शत योजने दूर समुद्र ओलांडून आलो आहे. अशोक वनात सीतेला मी पाहिले आहे. तू तपस्वी आहेस. धर्म जाणतोसच. दुसऱ्याची स्त्री पळवून आणणे हा अधर्म आहे. घोर पाप आहे. अशा व्यक्तीचा समूळ नाश होतो. रामांचा अपराधी सुखी कसा राहील? जानकीला रामचंद्रांकडे परत पाठव. यातच तुझे हित आहे. तोच खरा धर्मार्थ आहे. मला दुर्लभ असे सीता दर्शन झाले आहे. सीता फार दु:खी आहे. शोकग्रस्त आहे. सीतेला कुणीही बळाने वश करू शकणार नाही. कुणा देवाला किंवा राक्षसाला ते शक्य नाही. हे दुष्कृत्य करून तू प्राप्त केलेले सर्व वैभव आणि सामर्थ्य गमावून बसणार आहेस. तुझे सर्व तप आणि सामर्थ्य परस्त्रीची अभिलाषा बाळगल्याने नष्ट करीत आहेस. तुला अमरत्व प्राप्त नाही. तू श्रेष्ठ नर आणि वानर यांची उपेक्षा केलीस. राम आणि सुग्रीव सेनेपासून तू वाचू शकणार नाहीस. तुझे धर्मफळ आता संपले आहे. जनस्थानातील राक्षस संहाराचा, वालीवधाचा आणि राम सुग्रीव मैत्रीचा राजनीतीज्ञ म्हणून विचार कर. मी एकटा तुझ्या संपूर्ण लंकेचा नाश करू शकतो. मला फक्त सीतेचा शोध करण्यास आणि दूतकार्य एवढीच आज्ञा आहे. उरलेले सर्व सत्कार्य रामचंद्र करतील. अशोक वनातील बंदीवान सीता ही तुझ्यासाठी कालरात्र आहे. सीतेच्या रूपाने कालपाश तुझ्या समीप आले आहेत. फाशीचा दोर तुझ्या गळ्याभोवती अडकला आहे. त्रिलोकातील कोणताही सजीव प्राणी रामाहून अधिक पराक्रमी नाही. इंद्र, ब्रह्मा, विष्णु आणि त्रिपुर महादेवही रामासमोर युद्धात टिकू शकणार नाहीत.''

रावण किंचाळला, ''याचा वध करा.''

ज्ञानी बिभीषणाने दूताचा वध राजनीतीत बसत नाही, असे रावणाला ठणकावले. रावण बिभीषणावरच डाफरला. ''पापी व्यक्तीचा वध पाप नसते.'' ''हे लंकेश्वरा! शांत व्हा. मोठा शत्रू दारात आला आहे, हे खरे आहे. त्यासाठी अन्य शिक्षा विहित आहेत. मार देणे, फटके मारणे, मस्तकाचे मुंडण करणे अखेर अवयव कापणे इ. दूताला प्राणदंड हे कोणत्याही नीतीत बसत नाही. सर्वदेवगण राक्षस गण यात तुम्ही श्रेष्ठ आहात. देवांसह कुणीही तुमच्यावर विजय मिळवू शकत नाही. ज्यांनी हे दु:साहस केले ते आज जिवंत नाहीत. या वानराला ठार करून काय श्रेय मिळेल? या दूताला ज्याने पाठवले त्याला प्राण दंड द्या!'' (असेल हिंमत तर?) बिभीषणाच्या आव्हानात्मक निवेदनाने रावण शांत झाला. ''हे बंधो! तुझे बोलणे मला पटले आहे.''

**लंकादहन सुरू झाले...**

''वानरांना त्यांचे पुच्छ सर्वाधिक प्रिय असते. त्याच्या शेपटीलाच आग लावा. पेटलेल्या शेपटीसह त्याची नगरात सर्वत्र धिंड काढा. जळलेली शेपटी घेऊनच त्याला इथून जायला द्यावे. राक्षसांनी हनुमानाच्या शेपटीला कापडी वस्त्रांनी गुंडाळून आग लावली. हनुमानाने भीमरुप धारण केले. शेपटी अधिक लांब केली. राक्षसांनी जळत्या शेपटीवर तेल ओतले. हनुमानाने जळत्या शेपटीने राक्षसांना तडाखे देऊन चुणुक दाखवली. संपूर्ण लंका नजरेत साठवण्याची चालून आलेली संधी त्याने साधली. आपले शरीर आक्रसवले. वानराच्या पेटत्या शेपटीचे कारण सर्व जनांना राक्षस सांगत होते. धिंड संपूर्ण नगरात फिरत असताना हनुमान त्याची मजा घेत होता. बारकाईने निरखित होता. राक्षशिणींनी ही वार्ता मिटक्या मारत सीतेला सांगितली. सीतेला अपहरणाइतकेच दु:ख झाले. सीतेने अग्नीची प्रार्थना केली. ''मी जर पती सेवेचे पुण्य प्राप्त केले असेल, रामाने निष्ठेने एकपत्नी व्रताचे पालन केले असेल तर हनुमानाचे रक्षण कर. माझे सौभाग्य उरलेले असेल तर हे अग्ने हनुमानासाठी शीतल हो! माझ्या सुटकेची सुग्रीवाची इच्छा खरी असेल तर हनुमंतासाठी शीतल हो.'' तसाच चमत्कार झाला. साक्षात अग्नीच हनुमंताला प्रदक्षिणा घालू लागला. हनुमानपिता वायू शीतल होऊन सर्वत्र वाहू लागला. शेपटी तर अधिकाधिक पेटत आहे, ज्वाला अधिकाधिक उंच होत आहेत तरीही हनुमान हसतमुख होता, हे नागरिकांनाही जाणवत होते. इतक्यात एक महान चमत्कार झाला, बद्ध असलेला हनुमान चक्क वर उडाला! आणि पेटत्या शेपटीसह नगर द्वारावर जाऊन बसला. हाती परीघ घेऊन रक्षण करणाऱ्या राक्षसांना मारून टाकले. उत्साहित झालेल्या हनुमानाने लंकेतील घरांवर चढून सर्वप्रथम वानर सेनाप्रमुख प्रहस्ताचे घरच जाळून टाकले. रावणाचे प्रमुख चार मंत्री होते. महापार्श्व, वज्रदंष्ट्र, शुक आणि सारण यांची घरे भस्मसात केली. इंद्रजीताचे घर जाळून टाकले. एकेक करून राक्षसप्रमुखांची घरे आधी जाळून टाकली. कुंभकर्ण, नरांतक, निकुंभ, ब्रह्मशत्रू अशा वेचून वेचून राक्षसांची घरे जाळून टाकली. बिभीषणाचे घर वगळून हनुमान राक्षसराज रावणाच्या प्रासादावर चढला. रत्नविभूषित पर्वतासारखा उंच असलेला रावणाचा महाल अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडला. हा वानर नसून साक्षात अग्नी देवच आहे, असे सर्वांना जाणवले. सर्व लंका नगरी जळावू लाकडासारखी अग्नीचे भक्ष्य झाली होती. प्रलयाग्नी कसा असेल, याचा प्रत्यय लंकावासींनी अनुभवला.

स्वर्गवासींना पर्वत शिखरेच पेटत असल्याचा भास झाला. ही आग प्रवाही वायुदेवाने आणखीच प्रज्वलित करून लंकाभर पसरवली. विजेचा गडगडाट सर्व लंकेत होत आहे असे वाटू लागले. गंमत अशी की अग्नी तांडव सुरू असूनही धूर कुठेच दिसला नाही! हे सर्व अग्नी तांडव सुरू असताना अशोक वन सुरक्षित आहे ना? अशी शंका हनुमानाच्या मनात आली. सीतेचे आत्मतेजच तिचे रक्षण करील याची हनुमानाला खात्री होती. इतक्यात स्वर्गीय देवयोनी चारणांचे शब्द त्याच्या कानी आले. ''लंका दग्ध झाली तरी सीतेला अग्नीने स्पर्शही केलेला नाही. जनक नंदिनी सुखरुप आहे.''

हनुमानाने सीता दर्शन घेण्याचे ठरवले. त्याने अशोक वृक्ष गाठला. राम चिंतनात मग्न असलेल्या सीतेला वंदन करून म्हणाला, ''आपली भेट होत आहे हेच माझे परम भाग्य आहे. तू आणखी एक दिवस थांबून विश्रांती घे. माझे दु:ख कमी होईल. वानरवीरा, तू गेलास की माझ्या देहात प्राण टिकून राहील ना?'' ''देवी सुग्रीवाने तुमच्या सुटकेची अग्नी साक्षीने प्रतिज्ञा केली आहे. कोट्यवधी वानरसेना लंकेत येईल. रावणासह राक्षस सेनेचा नाश होईल. श्रीराम तुम्हाला घेऊनच अयोध्येत जातील!''

हनुमानाने वेदघोष चालू असलेल्या अरिष्ट नामक पर्वतावरून सागराचे दर्शन घेतले. आकाशात उत्तर दिशेला झेप घेतली! अरिष्ट ते महेंद्र असे परतीचे सागर उल्लंघन सुरू झाले...

**लेखक संपर्क :** ९८२००७१९७५

# हे तर रामाचे गुन्हेगार



डॉ. विवेक कोरडे

**विरोधी बाकावरून**






**प्रा**रंभापासूनच म्हणजेच संघटनेच्या स्थापनेपासूनच इरादे संशयास्पद होते, प्रसंगी विघातकही होते. म्हणूनच कावेबाजपणा राखत लोकशाही व्यवस्थेने देऊ केलेल्या स्वातंत्र्याचा गैरवापर करत वाढलेल्या या संघटनेने आणि संघटनेच्या राजकीय अवताराने संपूर्ण सत्ता हस्तगत करेपर्यंत आपली चाल, चलन आणि चेहरा जनतेवर प्रभाव टाकील, अशा पद्धतीने जपला. पण जशी संपूर्ण सत्ता हाती आली, राजकीय अवताराची चाल बिघडली, चलनात भ्रष्टता आली आणि चेहऱ्यावर मुखवटा आला. आपद्धर्म म्हणून लोकशाहीला जे जे निषिद्ध ते ते सारे केले गेले. ज्या राम मंदिरातून सत्तेचा मार्ग प्रशस्त होत गेला, त्याच राम मंदिरात चारित्र्यवानांच्या गटाकडून कोट्यवधींच्या देणगी आणि दानाची चोरी झाली. धर्माच्या नावाने उच्छाद मांडणारे भलेभले त्यात अडकले. हा धर्मभोळ्या जनतेच्या श्रद्धेवर आघात आहे. सत्तेच्या राजकारणाचे अत्यंत विद्रुप असे हे रुप आहे. पुढे जाऊन सत्तेच्या राजकारणाची गणिते जुळतील, तसे हे प्रकरण निवळेल. या प्रकरणाचा लाभ घेऊन सत्तेअंतर्गत नवी समीकरणे आकारास येतील. सर्वोच्च नेतृत्वाखालचा राजकीय अवतार आपल्या मातृसंघटनेवर पूर्ण ताबा मिळवेल. कदाचित समर्थकांमधला ढळलेला विश्वास परत मिळवण्यासाठी राम मंदिराच्या अस्तित्वाला अधिक बळकटी देण्यासाठी जनतेमध्ये सहानुभूती निर्माण होईल या हेतूने नेपथ्यरचनाही केली जाईल, परंतु धर्मरक्षक म्हणवणाऱ्यांनी कितीही शोक प्रकट केला तरीही, रामाच्या सावलीत केलेली लूट जनतेला यापुढेही खुपत राहील...

अन्नाच्या शोधार्थ पशुच्या अवस्थेत भटकंती करणाऱ्या मानवी समूहाला जेव्हा एक सुपीक असा भूभाग सापडला. त्याला शेतीचा शोध लागला आणि तो शेती करू लागला. त्याच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त व्हायला सुरुवात झाली. त्यामुळे टोळ्यांचे रूपांतर हळूहळू समाजात होऊ लागले. तेव्हा समाजाच्या नियंत्रणासाठी आणि आपला प्रदेश सुरक्षित ठेवण्यासाठी मनुष्याने धर्म, राष्ट्र, न्याय, नीती अशा काही मूलभूत संकल्पनांचा स्वीकार केला. हे सारं स्थित्यंतर घडत असताना त्याचा निसर्गाबरोबर तसेच अन्य टोळ्यांबरोबर जो संघर्ष झाला, त्यातून आलेल्या अनुभवातून त्याने जी नीतिमूल्ये स्वीकारली, जे नियम-कायदे बनवले त्यालाच संस्कृती असे म्हणतात. थोडक्यात धर्म, राष्ट्र, नीती, न्याय या साऱ्या मानवाने स्वीकारलेल्या संकल्पना आहेत.

धारयति इति धर्मः (धारयते अनेन इति धर्मः) अर्थात जो धारण केला जातो वा सर्वांना धारण करतो तोच धर्म आहे. सनातन परंपरेत धर्म केवळ पूजापाठ वा संप्रदायापुरता सीमित नाही, तर तो जीवन जगण्याचे एक संपूर्ण विज्ञान आहे. धर्म हे नैतिक आणि सार्वभौमिक मूल्य आहे जे समाजाला, प्रकृती आणि पूर्ण ब्रम्हांडाला व्यवस्थित ठेवते.

महर्षी वेदव्यास यांनी महाभारतात धर्माचे सार सांगताना एका श्लोकात म्हटले आहे :

*धारणाद्धर्ममित्याहुः धर्म धारयत प्रजा :*
*यस्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चय :*

धर्मच प्रजा अर्थात समाज आणि विश्वाला धारण करतो. जो धारण करण्यायोग्य आहे आणि ज्याने जगाचे कल्याण होते, तोच खरोखरचा धर्म आहे.

**धर्माचे ठेकेदार शिरजोर**

कोणताही धर्म जेव्हा प्रतिपादित केला गेला, स्थापला गेला तेव्हा त्या धर्माचा उद्देश समाजाची धारणा करणे व त्यासाठी नीतिनियम निश्चित करणे आणि साऱ्या समाजाची नैतिक, आध्यात्मिक आणि भौतिक उन्नती करणे हाच होता. असायला हवा. परंतु समाजातील विशिष्ट वर्गाचे हितसंबंध निर्माण झाले. या हितसंबंधांना मान्यता मिळावी, यासाठी ते देवाने सांगितले असल्याने ते धर्ममान्य आहेत असे प्रतिपादन त्या वर्गाकडून करण्यात आले आणि धर्माची धारयति इति धर्म : ही व्याख्या ग्रंथांमध्ये बंदिस्त करून धर्म एका विशिष्ट वर्गाच्या हितसंबंधांसाठी सोयीस्करपणे बदलण्यात आला. म्हणूनच लादल्या गेलेल्या गुलामीचेही धर्माने रक्षण केल्याचे आपणास दिसते. त्याचबरोबर धर्मगुरूंनी स्वर्गाचे पासेसही आगाऊ विक्री केल्याचे आपण ऐकतो. तसेच वर्णव्यवस्थेच्या नावे कामांचे वाटप जन्मजातपणे करून तथाकथित उच्चवर्गीयांची चंगळ केल्याचेही आपण पाहतो. हे सर्व होत असताना सर्वसामान्यांनी वा ज्यांच्यावर अन्याय-अत्याचार होत होते, त्यांनी फारशी खळखळ केल्याचे आपणास दिसत नाही. याचे कारण धर्माने पाप-पुण्याच्या संकल्पनेत पुढच्या जन्माच्या कोटकल्याणाची तरतूद करून सर्वसामान्य जनतेला दाखवलेली लालूच होय. म्हणूनच जे नशीब व भोग वाट्याला आले ती परमेश्वराची इच्छा असे मानून पुढच्या जन्मी व स्वर्गात कोटकल्याणाच्या आणि सर्व सुखप्राप्तीच्या आशेने माणसे धर्मपालन करत असल्याचे दिसते. थोडक्यात, धर्म या संकल्पनेवर त्याची पूर्ण श्रद्धा बसली आणि धर्माच्या रक्षणासाठी तो स्वतःची अवस्था विसरून प्राणपणाने लढू लागला.

मानवाच्या या श्रद्धेचा वापर आधुनिक काळात धर्माच्या नावे स्वतःची चंगळ करून घेणाऱ्या ऐतखाऊ लबाड लोकांनी करून घेतला. जो समाजाचे धारण करतो तो धर्म, ही व्याख्या ग्रंथबद्ध राहिली आणि धर्माचा वापर समाजात वैमनस्य आणि हिंसा पसरवून स्वतःची दुष्ट उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी होऊ लागला. धर्माचा ताबा धार्मिकांकडे न राहता धर्माचा वापर राजकीय पक्ष व संघटनांच्या निवडणुकीत सत्ताप्राप्तीसाठी सुरू केला. धर्मातले कर्मकांड म्हणजेच धर्म अशी धर्माची सोपी व्याख्या पसरविण्यात आली आणि मानवकल्याण या धर्माच्या मूळ हेतूला तिलांजली दिली गेली. धर्माला दिलेली ही तिलांजली म्हणजेच, राम जन्मभूमी आंदोलन होय.

आंदोलन जरी रामाच्या नावे करण्यात आले असले तरी या आंदोलनात राम नव्हता. कारण या आंदोलनात केवळ लोकशाहीच्याच नव्हे तर नैतिकतेच्या साऱ्या मर्यादा ओलांडण्यात आल्या आणि मर्यादा पुरुषोत्तम रामाला निवडणुकीच्या आखाड्यात उतरविण्यात आले.

कवी अजहर इकबाल लिहितात,

*दया अगर लिखने बैठू, होते है अनुवादित राम,*
*रावण को भी नमन किया, ऐसे थे मर्यादित राम.*

**मंदिराच्या सावलीत लुटीचा अध्याय**

राम मंदिर आंदोलनाच्या राजकारणी नेत्यांनी साऱ्याच मर्यादा ओलांडल्या असल्याने राम मंदिर निर्माण आणि निर्माणादरम्यान व नंतर चोऱ्या आणि भ्रष्टाचार होणे अटळ

होते. कारण आंदोलकाच्या नेत्यांची प्रेरणा धार्मिक नव्हती, राजकीय होती. छोट्या रामलल्लाचे बोट धरून मोदीजी त्यांना मंदिरात घेऊन जात असल्याचे कटआउट्स सर्वत्र लागले तेव्हाच रामाबद्दल या मंडळींना किती आस्था आणि आदर आहे याची झलक पाहायला मिळाली होती. आता रामाला वाहिलेल्या 'चढाव्याची', पैशांची आणि मौल्यवान वस्तूंची चोरी झाल्याचे समोर आल्यावर ही मंडळी रामाची नसून रामाच्या नावे लूट करणारी टोळी आहे, ही गोष्ट स्पष्ट झाली आहे.

अर्थात, राम मंदिरातील लोकांनी दान केलेला पैसा चोरण्यात येत असल्याची गोष्ट आत्ता समोर आली असली तरी असल्या लफंगेगिरीची सुरुवात फार आधीपासूनच झाल्याचे आरोप आहेत. राम मंदिर निर्माणासाठी लोकांनी दिलेल्या देणग्या आणि रोख रकमेचा अपहार झाल्याचे आरोप केले गेले आहेतच, पण सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने साक्षात नॉन बायोलॉजिकल विश्वगुरू माननीय नरेंद्र मोदी यांनी निर्माण केलेल्या राम मंदिरासाठी नेमलेल्या विश्वस्त मंडळाने ज्या जमिनी अवघ्या पंधरा-वीस मिनिटांत दोन-चार कोटी रुपयांमध्ये विकल्या गेल्याची कागदोपत्री नोंद झाली, त्याच जमिनी कधी आठपट तर कधी बारापट रक्कम देऊन विकत घेतल्याचा विलक्षण विक्रम मोदीजींच्या विश्वस्त मंडळाच्या नावे केव्हाच जमा झाला आहे.

या संदर्भातल्या तक्रारी नोंदवून चार वर्षे उलटून गेली आहेत. परंतु चौकशी समिती नेमण्यापलीकडे काहीही झालेले नाही. आणखीन एक पराक्रम या विश्वस्त मंडळाच्या नावे जमा आहे. राम मंदिरापासून आठ किलोमीटर अंतरावर असलेली जमीन मंडळाने ८४ कोटी रुपयाला विकत घेतली. तेथेही जमिनीच्या बाजारभावापेक्षा अनेक पटीने पैसे देण्यात आले. या जमिनीचा वापर चरावू गवत लावण्यासाठी केला जात आहे, असा खुलासा न्यासाने केला. गंमत म्हणजे, राम मंदिराची गोशाळा नाही. गवत लावण्यासाठी ८४ कोटींना जमीन खरेदी करणे हा देखील एक विक्रमच असावा. हा चारा खाणारे चाराचोर कोण आहेत, ही गोष्ट अद्यापही स्पष्ट झालेली नाही.

**रामाच्या नावाने व्यापार**

राम मंदिराच्या दानचोरी प्रकरणात ज्या आठ जणांना अटक करण्यात आली. ते आठजण ट्रस्टचे सर्वेसर्वा चंपतराय यांच्या मर्जीतील आहेत असे म्हटले जाते. या प्रकरणाच्या निमित्ताने ट्रस्टचे महासचिव चंपतराय आणि ट्रस्टी अनिल मिश्रा यांनी दिलेले राजीनामे मोठ्या मनाने स्वीकारण्यात आले आहेत. परंतु या दोघांची चौकशी करण्याची हिंमत पोलिसांमध्ये नाही. काही अंशी खऱ्या आणि बहुतांशी खोट्या प्रकरणात विरोधकांच्या मागे हात धुवून लागणाऱ्या ईडी, सीबीय, इन्कम टॅक्स या तपास यंत्रणा अद्याप गपगार आहेत. कारण स्पष्ट आहे. यांच्या मागे फार मोठ्या शक्ती उभ्या आहेत. या साऱ्यांचेच मालक कोण हे कदाचित आपल्याला कधीच समजणार नाही. पण त्यांचे मालक दिल्ली आणि नागपूरमध्ये असले पाहिजेत त्याशिवाय या चोरांना संरक्षण मिळणे अशक्य आहे.

केवळ ४० दिवसात चोरीच्या ७० घटना घडल्या आहेत हे सीसीटीव्ही फुटेजवरून स्पष्ट होते. त्या आधीचे सीसीटीव्ही फुटेज गायब आहे वा गायब करण्यात आलेले आहे. याचा स्पष्ट अर्थ हा आहे की या चोऱ्या नियमितपणे होत होत्या आणि त्या चोऱ्या उघड होऊ नयेत म्हणून सीसीटीव्ही फुटेज गायब केले जात असावे. कारण या चोरीचा वाटा योग्य मार्गाने योग्य जागी पोहोचत असावा. रामभक्तीचा आव आणणारी ही नेते मंडळी रामाचे भक्त नाहीत तर रामाच्या नावाने सरळसरळ व्यापार करणारी कोणतीही नीतिमत्ता शिल्लक नसलेली व्यापारी मंडळी आहे. या नीतिशून्य व्यापाऱ्यांनी उघडपणे कोट्यवधी रामभक्तांची फसवणूक केली आहे.

आरएसएसचे सहकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी राम मंदिरातील दान आणि दागिने चोरी बाबतच्या घटनांवर तीव्र प्रतिक्रिया दिली. अर्थात ही तीव्र प्रतिक्रिया द्यायला त्यांना तीन आठवडे लागले, यातूनच त्यांच्या लेखी प्रकरणाची तीव्रता समजून येते. या चोऱ्यांनी रामभक्तांच्या आस्थेला गंभीर आघात झाला असल्याचे म्हणून ते या घटनेने दुःखी आणि क्रोधित आहेत, असे त्यांनी म्हटले. त्यांनी हिंदू समाजाला धैर्य आणि संयम कायम ठेवण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर त्यांनी काही हिंदूविरोधी आणि राष्ट्रविरोधी शक्ती या दुर्भाग्यपूर्ण घटनेचा फायदा घेऊन धर्म आणि समाजाला बदनाम करण्याचा कट करीत आहेत असाही आरोप केला.

**पसंतीचा कांगावा**

होसबळेंनी हे उपरोक्त विधान संघाच्या प्रवृत्तीला धरूनच केले आहे. आपण हिंदू धर्माचे एकमेव रक्षणकर्ते आणि ठेकेदार आहोत, हा संघाचा दावा नवा नाही. त्यामुळे संघावर आरोप झाला की देशाची बदनामी होते, हा संघ परिवाराचा पसंतीचा कांगावा आहे. संघ-भाजपचे प्रवक्ते दूरदर्शनवरील चर्चेत



*आम्ही सारे कसे वचनबद्ध, आमचे सगळे कसे शिस्तबद्ध, आम्ही सारे कसे देशबद्ध असा आव आणणाऱ्यांचे बिंग अयोध्येच्या राम मंदिरात देणगी आणि दागिन्यांचे चोरी प्रकरण उघड झाले म्हणून फुटले...*

अगदी पढवून पाठवल्याप्रमाणे विरोधकांना तुम्ही राममंदिरात गेला होतात का? तुम्ही राममंदिर विरोधक आहात तुम्हाला याबाबत बोलण्याचा अधिकार नाही, असे पुन्हा पुन्हा बजावत असतात. जणू रामभक्तीचा ठेकाही केवळ यांच्याकडेच आलेला आहे. वस्तुतः रामभक्ती हा ज्याच्या-त्याच्या आस्थेचा विषय आहे. तर राममंदिरातील चोरी हा भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे. खरा गुन्हेगार कोण हे जाणून घेण्याचा आणि त्याच्यावर कारवाईची मागणी करण्याचा हक्क हा प्रत्येक भारतीयाला आहे. मग त्याला रामाबद्दल आस्था असो वा नसो. आरएसएस म्हणजे हिंदू धर्म नाही आणि भारत देशही नाही, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

'न खाऊंगा न खाने दूंगा' अशी वल्गना करणारे आपले विश्वगुरू पंतप्रधान माननीय मोदीजी राममंदिरात झालेल्या चोरीच्या बाबत चकार शब्द काढायला तयार नाहीत. खरंतर पंतप्रधान मोदीजींनीच या राममंदिर ट्रस्टची स्थापना केली आहे. त्यामुळे झालेल्या चोरीची नैतिक जबाबदारी मोदीजींचीही आहे. मोदीजींचे हे मौन एक प्रकारे राम जन्मभूमी ट्रस्टला संरक्षण देत आहे, ही गोष्ट दुःखद आहे.

जो समाजाचे धारण करतो त्याला धर्म म्हणतात, ही धर्माची व्याख्या लेखाच्या सुरुवातीला स्पष्ट केली आहे. ज्यायोगे समाजामध्ये विद्वेष पसरतो, तो धर्म नसून अधर्म असतो, जो धार्मिक असतो, तो नीतिवान असतोच असे नाही, याची स्पष्ट जाणीव देशातील कोट्यवधी खऱ्याखुऱ्या धार्मिकांनी निदान आता तरी करून घ्यायला हवी. अन्यथा देवाचा आणि धर्माचा बाजार मांडून त्यावर धंदा करणाऱ्या धंदेवाईक लुटारू मंडळींना अप्रत्यक्षपणे मदत केल्याचे पातक रामावर श्रद्धा असलेल्या प्रत्येक भारतीयास लागेल.

चोरी होताना जो चौकीदार शिट्टी वाजवत नाही, चोरी थांबवत नाही, तो चौकीदार चोरांना ओळखत असतो व चोरीतला वाटा खात असतो. राम मंदिरातील चोरी प्रकरणात हेच घडले आहे.

**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.**
**ई मेल :** drvivekkordeg@mail.com

## आमचे पाठीराखे

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका

**कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जगदीश काबरे, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ.आनंद जोशी-सुमती जोशी, डॉ. अनंत फडके-संध्या फडके, आशिष पाटकर, डॉ.दिलीप खताळ, डॉ.प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, गणेश मनोहर कुलकर्णी, डॉ.अजित जगताप, डॉ.रेखा शेळके, डॉ. नेहा सावंत, प्रशांत पवार, चंद्रकांत पाटणकर, सुधीर साठे, अजय वाळिंबे, वासुदेव (काका) खानोलकर, सुनील वालावलकर, नेहा आसगावकर, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, डॉ.मंदार काळे, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, अविनाश हावळ, प्रभाकर कुंभार, शिरीष हेडवाळकर, दीपक अधिकारी, अशोक चांदोरकर, स्मिता मनोहर हेरवाडकर, विकास डी. परांजपे, देवेंद्र जयसिंह राणे.**

# वसंताचं आगमन तुम्ही रोखू शकत नाही!



श्रीरंजन आवटे

मर्म संविधानाचे





जुलैचा महिना केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी लाखो सामान्य विद्यार्थी आणि  विरोधी पक्ष-संघटनांनी पुकारलेल्या आंदोलनांनी गाजला. मुद्दा आहे, तो हजारो लोकांना एकत्र येऊन आंदोलन करण्याचा संविधानाने हक्क दिला आहे काय? त्याचे उत्तर 'होय' असे आहे. या हक्काच्या संदर्भात 'रेग्युलेशन ऑफ गॅदरिंग ॲक्ट' महत्त्वाचा आहे. पंधराहून अधिक लोक जमतात तेव्हा हा कायदा लागू होऊ शकतो. आंदोलनाचा हा हक्क अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अनुच्छेदातच आहे. यावरून आंदोलन हा आपल्या अभिव्यक्तीशी जोडलेला मूलभूत मुद्दा आहे, हे लक्षात घेणं आवश्यक आहे. आजवर दमनशाहीच्या विरोधातच अनेक अहिंसक आंदोलनं उभी राहिली. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन हा संपूर्ण जगासाठी एक वस्तुपाठ आहे...

२० जुलै २०२६ चा दिवस. दिल्लीतल्या 'जंतर मंतर'वर वातावरण शब्दशः मंतरलेलं. देशभरातून साधारण लाखभर तरुण तरुणी रस्त्यावर आलेले. नीट पेपरफुटी प्रकरणावरून देशभर आंदोलन पेटलेलं. पण त्याआधी घडलं काय, हे लक्षात घेतलं पाहिजे. मुळात केवळ 'नीट'चा पेपर फुटलेला नाही, तर २०१४ पासून २०२६ पर्यंत भारतातल्या विविध राज्यांमध्ये १५२ पेपर फुटले आहेत, अशी ताजी आकडेवारी आहे. त्यामुळं लाखो विद्यार्थ्यांचं नुकसान झालं. हजारो विद्यार्थी नैराश्यग्रस्त बनले. म्हणूनच कदाचित मे महिन्यात नीट पेपर फुटल्यामुळे मध्यमवर्ग जागा झाला. शिवाय ही परीक्षा देणारे विद्यार्थीही सुमारे २३ लाख. स्वाभाविकच त्याविषयी असंतोष निर्माण झाला. केवळ याच वर्षी नव्हे, गेले काही वर्षे हे पेपर फुटताहेत. भ्रष्टाचार, अनागोंदी यातून शिक्षणाचा दर्जाच ढासळला आहे.

या अनुषंगाने विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अनेकदा आवाज उठवला. वेगवेगळ्या ठिकाणी सभा घेतल्या. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. 'छात्रों की गूंज' हा त्यांचा कार्यक्रम प्रचंड गाजला. कोटा, डेहराडून येथे हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत राहुल गांधी यांनी हा मुद्दा मांडला. किती रुपयांना पेपर फुटतात, याचं रेट कार्डच जाहीर केलं.

**वणवा आंदोलनाचा**

याच दरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बेरोजगार तरुणांना 'झुरळ' म्हटल्यामुळे ऑनलाइन आंदोलन सुरू झाले. अभिजीत दिपके या तरुणाच्या इंस्टाग्राम पेजला सुमारे दोन कोटीहून अधिक लोकांनी फॉलो केलं. हा आकडा भाजपच्या फॉलोअर्सपेक्षाही जास्त झाला, तेही अवघ्या आठवड्यात. ऑनलाइन सुरू झालेली 'कॉक्रोच जनता पार्टी' जमिनीवर आली, ती दिल्लीतल्या आंदोलनाच्या निमित्ताने. त्या आधी देशातल्या पुणे, बंगलोर, लखनौ अशा विविध शहरांमध्ये 'शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हवा' ही प्रमुख मागणी करत आंदोलन झालेलं.

या आंदोलनाला साथ मिळाली पर्यावरणवादी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांची. ते आमरण उपोषणाला बसले. हळूहळू युवा वर्ग या आंदोलनाशी जोडला जाऊ लागला. डाव्या विद्यार्थी संघटना या आंदोलनात सक्रिय होत्या. AISA विद्यार्थी संघटनेचे नेहा बोरा, मनीष कुमार, आमिन आमितोज या विद्यार्थ्यांनीही उपोषण केलं. अनेक विरोधी पक्षांचे नेते या मंचावर येऊन आंदोलनाला पाठिंबा देत होते. हे आंदोलन सरकारच्या अपेक्षेपेक्षा मोठं होऊ लागलं, तेव्हा अचानक १८ जुलैला सोनम वांगचूक यांना जंतर मंतर मैदानावरून उचलून सफदरजंग हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं. साध्या वेशात पोलीस आले त्यांनी मुलांवर लाठीचार्ज केला.

**रक्षणकर्तेच क्रूर बनतात तेव्हा...**

सुरुवातीलाच उल्लेखलेलं २० जुलैचं 'चलो संसद' असं आंदोलन आधीच ठरलेलं. हे आंदोलन दडपण्यासाठी वांगचूक यांना जंतर मंतरवरून हटवलेलं. त्याचा परिणाम उलटा झाला आणि तरुणाईची अभूतपूर्व गर्दी उसळली. त्यांनी अहिंसक मार्गाने पण अत्यंत क्रिएटिव्ह (ज्यामुळे सत्ताधाऱ्यांनी तयार केलेली पटकथा विस्कटली.) होत आंदोलन सुरू केलं. दिल्ली पोलिसांनी पाशवी बळाचा वापर करत गंजलेले खिळे ठोकलेल्या लाठ्यांचा मारा केला. अश्रू धुराच्या नळकांड्या फोडल्या. लोखंडी बॅरिकेट्समध्ये इलेक्ट्रिक करंट सोडला. राखीव दलाच्या जवानांनी दहशतवाद्यांविरोधात उपयोगात आणलेल्या पेलेट गन्सचा वापर करत आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना लक्ष्य केलं. यात आऊटलूक साप्ताहिकाचा प्रतिनिधीही जखमी झाला. साधारण दीडशे दोनशे आंदोलकांना हॉस्पिटलमध्ये भर्ती करावं लागलं. उलट त्यांच्यावरच एफआयआर दाखल करण्यात आले. यातील एक मुलगी व्हेंटिलेटरवर होती, यावरून पोलिसांच्या अमानुष हिंसेचा अंदाज येऊ शकतो.

या सगळ्या घटनेतून मूलभूत प्रश्न उपस्थित होतो, की आंदोलन करण्याचा भारतीय नागरिकांना हक्क आहे काय? संविधानाने तो मान्य केला आहे काय? केवळ हेच आंदोलन नव्हे तर २०२० मध्येही असेच आंदोलन शेतकऱ्यांनी केले. केंद्र सरकारने २०२० मध्ये कृषीविषयक तीन कायदे संमत केले. हे कायदे अन्यायकारक आहेत, ते रद्द व्हावेत म्हणून पंजाब, हरियाणासह देशाच्या विविध भागांतील शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केले. या आंदोलनासाठी हजारो शेतकरी दिल्लीच्या सीमेवर जमले. अनेकदा पोलिसांनी त्यांच्यावर हल्ला केला. शेतकऱ्यांमुळे देशाची सुरक्षितता धोक्यात येते आहे, असा पोलिसांचा दावा होता. हे आंदोलन वर्षभर चालले. नैसर्गिक आणि राजकीय संकटांना सामोरे जात शेतकरी निष्ठेने एकत्र सभा घेत राहिले. मागण्या मांडत राहिले. सातशेहून अधिक शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. अखेरीस एका वर्षानंतर पंतप्रधानांना तीनही कायदे रद्द करण्याची घोषणा करावी लागली.

**संविधानाचे संरक्षण**

मूळ मुद्दा आहे तो अशा प्रकारे हजारो लोकांना एकत्र येऊन आंदोलन करण्याचा हक्क आहे काय? त्याचे उत्तर 'होय' असे आहे. भारतीय संविधानाच्या १९ व्या अनुच्छेदातील तरतुदींनुसार लोकांना विनाशस्त्र एकत्र जमण्याचा हक्क आहे. शेतकरी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते, मात्र कोणाकडेही शस्त्र नव्हते. हिंसा करण्याचा त्यांचा कोणताही इरादा नव्हता. त्यामुळे शेतकरी शांततापूर्ण मार्गाने, संवैधानिक पद्धतीने आंदोलन करत होते. अगदी त्याचप्रमाणे जंतर मंतर मैदानावरील आंदोलनात कोणाकडेही शस्त्र नव्हते. महात्मा गांधींनी अहिंसक मार्गाने लढण्याचे तंत्र भारतीयांना शिकवले आहे. तोच मार्ग शेतकऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी निवडला होता. संविधानाने आंदोलन करण्याचा, निदर्शने करण्याचा अधिकार मान्य केला आहे. त्यात 'विनाशस्त्र' असा शब्द वापरून अहिंसेचे तत्त्वच अधोरेखित केले आहे. गौतम बुद्धापासून भारतीय मातीत अहिंसेचा विचार रुजलेला आहे.

या हक्काच्या संदर्भात 'रेग्युलेशन ऑफ गॅदरिंग अ‍ॅक्ट' महत्त्वाचा आहे. पंधराहून अधिक लोक जमतात तेव्हा हा कायदा लागू होऊ शकतो. संबंधित स्थानिक प्रशासनाला आंदोलन करण्याबाबतची पूर्वसूचना एक आठवडा आधी दिली पाहिजे. दोन दिवसांपेक्षा कमी कालावधी उरलेला असेल तर त्याबाबत स्थानिक प्रशासन परिस्थितीच्या गांभीर्याचा विचार करून परवानगी देण्याबाबत निर्णय घेऊ शकते. सार्वजनिक कायदा व सुव्यवस्थेला धोका पोहोचू नये, याकरता एकत्र जमण्याच्या स्वातंत्र्याच्या या हक्कावर बंधने घातली जाऊ शकतात. देशाच्या एकात्मतेला छेद जाऊ नये म्हणून एकत्र जमण्याच्या हक्कावर बंधने येऊ शकतात. या कायद्यानुसार, हिंसा भडकावण्यासाठी किंवा द्वेष निर्माण करण्यासाठी होणाऱ्या सभा निषिद्ध आहेत. तसेच एकत्र जमणाऱ्या किंवा निदर्शने करणाऱ्या व्यक्तींवरही शांततेच्या मार्गाने वागण्याची जबाबदारी आहे. त्यांनी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. मुळात, लोकांच्या एकत्र जमण्याच्या हक्काचे रक्षण करण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे. कायदा व सुव्यवस्था राखताना त्यांनी किमान बळाचा वापर करणे अपेक्षित आहे. पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या लोकांशी शत्रुत्वाच्या भावनेतून वर्तणूक करणे अपेक्षित नाही. त्यांनी सतर्कतेचा इशारा द्यावा. अगदीच निरुपाय झाला आणि अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली तरच बळाचा वापर करावा, असे सारे कायद्याच्या चौकटीत अपेक्षित आहे; मात्र दंड प्रक्रिया संहितेतील (सीआरपीसी) जमावबंदीविषयक १४४ वा अनुच्छेद लागू करून नागरिकांच्या हक्कांवर आक्रमण होते. देशाच्या एकात्मतेचा, सुरक्षेचा बहाणा करून नागरिकांच्या स्वातंत्र्याची वारंवार गळचेपी होते. जंतर मंतर आणि देशातल्या इतर भागांत जुलै महिन्यात झालेल्या आंदोलनप्रसंगी पोलिसांनी संविधानातल्या नैतिकतेच्या विपरीत अशी कारवाई केली, हे सुस्पष्टपणे दिसले. आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांना चिनी एजंट, पाकिस्तानी एजंट म्हटले गेले. एका गुंड प्रवृत्तीच्या सत्ता समर्थक अँकरने तर अमेरिका हे आंदोलन घडवून आणते आहे, असे आरोप केले. आंदोलन चिरडून टाकण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यातही काही बदल करून तो दिल्लीमध्ये लागू करण्यात आला. उठताबसता संविधानाची शपथ घेतलेल्यांनी दमनशाहीचा नवा अध्याय रचला.

**हा तर जगण्याचा श्वास**

दमनशाहीच्या विरोधातच अनेक अहिंसक आंदोलनं उभी राहिली. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन हा संपूर्ण जगासाठी एक वस्तुपाठ आहे. आंदोलनाचा हा हक्क अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अनुच्छेदातच आहे. यावरून आंदोलन हा आपल्या अभिव्यक्तीशी जोडलेला मूलभूत मुद्दा आहे, हे लक्षात घेणं आवश्यक आहे आणि अभिव्यक्ती हा तर जगण्याचा श्वास आहे. प्रख्यात साहित्यिक उदय प्रकाश यांच्या सुप्रसिद्ध ओळी आहेत :

*आदमी मरने के बाद*
*कुछ नही बोलता*
*आदमी मरने के बाद*
*कुछ नही सोचता*
*कुछ नही बोलने*
*और कुछ नही सोचने पर*
*आदमी मर जाता है!*

त्यामुळं विचार करणं, अभिव्यक्त होणं ही जिवंत मानवांची पहिली खुण आहे. अभिव्यक्तीला चिरडण्याचे सारे प्रयत्न विफल होतात, हा आजवरचा इतिहास आहे. चिलियन कवी पाब्लो नेरुदा यांनी म्हटलं आहेः तुम्ही सगळी फुलं तोडू शकता; पण वसंताचं आगमन तुम्ही रोखू शकत नाही!

**लेखक संपर्क** : poetshriranjan@gmail.com

# डॉ. आंबेडकर एकाकी का लढले?



अरुण वाघ

स्वातंत्र्य दिन विशेष

विचार–विमर्श







भारताच्या सामाजिक इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुकारलेली जातिअंताची चळवळ ही सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा, समता आणि स्वातंत्र्य यांचा महान संघर्ष म्हणून ओळखली जाते. अस्पृश्यता, जातिव्यवस्था आणि सामाजिक विषमता यांच्या विरोधात उभ्या राहिलेल्या या चळवळीने भारतीय लोकशाहीला नवी दिशा दिली. तरीही एक प्रश्न वारंवार उपस्थित झाला, तो म्हणजे, देशातील सर्व दलित समाजघटक त्यांच्या हयातीत आणि त्यांच्या पश्चात आंबेडकरांच्या जातिअंताच्या चळवळीसाठी एकत्र का आले नाहीत. हाच प्रश्न उलट्या क्रमाने असाही विचारला गेला, तो म्हणजे जातिअंताच्या उद्दिष्टाला स्वत:ला बांधून न घेता दलितांमधले काही जात घटक आंबेडकरांच्या हयातीत आणि पश्चात दलितविरोधी राजकारण करणाऱ्या जातीवादी, धर्मवादी शक्तींसोबत का जात राहिले?

दलित ही संज्ञा आज व्यापक अर्थाने वापरली जाते; परंतु इतिहासाचा विचार करता अनुसूचित जातींमध्ये शेकडो जाती होत्या. प्रत्येक जातीची सामाजिक परिस्थिती, उपजिविकेचा व्यवसाय, परंपरा, स्थानिक नेतृत्व आणि राजकीय हितसंबंध वेगवेगळे होते. आंबेडकरी चळवळ ही विचारांची चळवळ होती, पण दोन वेळच्या अन्नाची भ्रांत आहे, अशा जातींना विचारांच्या लढ्यात टिकून राहणे कठीण असते. शिक्षणाचा अभाव, आर्थिक परावलंबित्व आणि ग्रामीण सत्ताकेंद्रांचा दबाव यामुळे अनेकांना उघडपणे चळवळीत सहभागी होता येणे शक्य नसते. त्यामुळे सर्व पीडित शोषितांनी एकाच वेळी एकाच नेतृत्वाखाली येणे सहज शक्यही नसते. प्रादेशिक मर्यादा, सांस्कृतिक वेगळेपण हेदेखील एकत्र न येण्यामागचे महत्त्वाचे घटक ठरतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रभाव विशेषतः महाराष्ट्रात अधिक दृश्यमान होता. वाहतूक, प्रसारमाध्यमे, शिक्षण आणि संघटनांची मर्यादित साधने यामुळे त्यांच्या चळवळीचा विस्तार टप्प्याटप्प्याने झाला होता. बहुसंख्य दलित समाज निरक्षर होता. दारिद्र्य, उपासमार आणि जगण्यासाठीची या समाजाची धडपड अतितीव्र होती. त्यातही जे काही समाज घटक वा दलित नेते सक्रिय होते, ते स्वातंत्र्यलढ्याच्या काळात काँग्रेस किंवा साम्यवादी पक्षाशी जोडले गेले होते. त्यांनी आंबेडकरांऐवजी इतर नेतृत्वावर विश्वास ठेवला होता. परिणामी, दलित राजकारणाची एकप्रकारे विभागणी झाली होती.

त्यात दलित समाजातही पूर्वापार जात अंतर्गत भेदभाव अस्तित्वात होताच. बाबासाहेबांनी संपूर्ण जातिव्यवस्थेचा विरोध केला; पण अनेक ठिकाणी अंतर्गत जात अस्मिता अधिक प्रभावी होती. त्यामुळे व्यापक ऐक्य निर्माण होण्यास प्रारंभापासूनच अडथळे आले होते.

**आर्थिक अवलंबित्वाचा अडसर**

ग्रामीण भागातील दलित समाज रोजगारासाठी जमीनदार आणि उच्चवर्णीयांवर अवलंबून होता. अनेक दलित जाती स्थानिक धार्मिक परंपरांशी जोडलेल्या होत्या. बाबासाहेबांनी धर्माची कठोर चिकित्सा केली आणि शेवटी बौद्ध धर्म स्वीकारला. हा परिवर्तनाचा खडतर मार्ग सर्वांना तत्काळ स्वीकारता आला नाही. याचे एक कारण मुख्यतः रुढी-परंपराग्रस्तेत दडले होते.

शतकानुशतके चालत आलेल्या सामाजिक दडपशाहीमुळे अनेक दलित जाती आत्मविश्वास गमावून बसल्या होत्या. त्यामुळे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची मानसिक तयारी होण्यासाठी काळ जावा लागणे अपरिहार्य होते. हे तर खरेच की, सामाजिक सुधारणांआधी राजकीय सुधारणांचा विचार अधिक प्रभावी होता आणि त्यादिशेने त्या-त्या काळचे नेतृत्व समाजमनाला आकार देत होते. या धुमश्चक्रीत संविधान, सामाजिक लोकशाही, स्त्री-पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन, आर्थिक न्याय आणि बंधुता या बाबासाहेबांच्या संकल्पना तत्कालीन दलित समाजाच्या आकलनापलीकडच्या होत्या.

मात्र, १९५६ मध्ये बाबासाहेबांनी आणि त्यांच्या अनुयायांनी घेतलेली बौद्ध धम्मदीक्षा, त्यानंतरची आंबेडकरी चळवळ, दलित साहित्य, दलित पँथरसारख्या चळवळी, आरक्षणाचा प्रत्यक्षात येत गेलेला विचार यामुळे शिक्षण आणि नोकरीच्या संधी, तसेच संविधानिक हक्कांविषयी वाढलेली जागरूकता यामुळे विविध दलित समाजघटकांमध्ये बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव सातत्याने वाढत गेला.

आज देशातील जवळपास सर्व अनुसूचित जातींमध्ये डॉ. आंबेडकरांविषयी आदरभाव आहे. त्यांच्या विचारांचे आकलनही पूर्वीपेक्षा अधिक व्यापक झाले आहे. कारण, बाबासाहेबांचे ध्येय कोणत्याही एका जातीचे नव्हते; ते संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीचे होते. म्हणूनच आज त्यांच्या विचारांचा प्रभाव केवळ दलित समाजापुरता मर्यादित नसून भारतीय लोकशाही, संविधान, सामाजिक न्याय आणि मानवी अधिकार यांच्या प्रत्येक चर्चेत ते केंद्रस्थानी आहेत. इतिहासाचा अभ्यास करताना दोषारोपापेक्षा वस्तुनिष्ठ विश्लेषण अधिक महत्त्वाचे असते. तेव्हाच बाबासाहेबांच्या कार्याची खरी व्यापकता आणि परिवर्तनकारी शक्ती आपल्याला समजते.

**दलित जातीअंतर्गत उतरंड**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण जीवन हे भारतीय समाजातील गुलामगिरी, जातिव्यवस्था आणि अन्याय यांच्या विरोधातील अखंड संघर्षाचे प्रतीक आहे. त्यांनी दलित, शोषित आणि वंचित समाजाला केवळ हक्कांची भाषा शिकवली नाही, तर स्वाभिमानाने जगण्याची नवी दृष्टी दिली. तरीही इतिहासाचा प्रामाणिक अभ्यास करताना एक वेदनादायी प्रश्न उभा राहतो. तो म्हणजे, ज्या समाजाच्या मुक्तीसाठी बाबासाहेबांनी आयुष्य अर्पण केले, त्या दलित समाजातील



*सत्ताधारी जमात बना, या आवाहनाचा चुकीचा अर्थ लावून आजवर अनेक दलित नेत्यांनी धर्मवादी पक्षांसोबत जुळवून घेतले. पण आजची दलित तरुण पिढी प्रतिकात्मकतेच्या पलीकडे जाऊन जुन्या पिढीने केलेल्या चुका टाळून आंबेडकरी विचारांशी तडजोड न करता आपले भवितव्य घडवू पाहते आहे...*

काही घटक त्यांच्या चळवळीशी पूर्ण ताकदीने का जोडले गेले नाहीत?

या प्रश्नाचे उत्तर व्यक्तींमध्ये नसून सामाजिक रचनेत, सत्तेच्या राजकारणात आणि मानसिक गुलामगिरीच्या इतिहासात शोधावे लागते. बाबासाहेबांनी अनेकदा स्पष्ट केले की, गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव झाली तर तो बंड करतो. पण शतकानुशतके अपमान, दारिद्र्य आणि धार्मिक भीतीमध्ये जगलेल्या समाजाला स्वतःच्या गुलामगिरीची जाणीव करून देणे, हेच सर्वात मोठे आव्हान होते. अनेकांनी तर अन्यायाला आपली नियती मानले होते. अशा परिस्थितीत स्वाभिमानासाठी संघर्ष स्वीकारणे सोपे नव्हते.

जातिअंताच्या आंबेडकरी चळवळी पासून महाराष्ट्रातील महारेतर दलितांनी अंतर का ठेवले, हा प्रश्न बाबासाहेबांच्या काळातही विचारला गेला होताच. या संदर्भात आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते अर्जुन डांगळे म्हणतात, आंबेडकरी चळवळीच्या प्रारंभीच्या काळात इतर मागास प्रवर्गातील जात समूह आपल्या सामाजिक-सांस्कृतिक अस्तित्वाबाबत पुरेशा सजग झालेल्या नव्हत्या हे वास्तव होते. मुख्य म्हणजे, या जाती सवर्णांवर विसंबून असलेल्या परंपरागत व्यवसायात अडकलेल्या होत्या. हे अडथळे पाहता डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र परिषदा भरवून दलित जातींमध्ये स्व अस्तित्वाचे भान पेरण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता.

महार समाज वगळता इतर दलित समाज डॉ. आंबेडकरांच्या जातिअंताच्या चळवळीत पुरेशा ताकदीनिशी सामील झाला नाही, याचा बराचसा दोष हा महार समाजातील लोकांचा असल्याचे ज्येष्ठ लेखक-समीक्षक आणि अभ्यासक डॉ. रावसाहेब कसबे मानतात. ते म्हणतात, महार समाजातील लोक चळवळीवर मालकी हक्क असल्याप्रमाणे कब्जा करून बसले होते. त्यांनी इतर जातींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जवळ येऊ दिले नाही.

तर आंबेडकरी चळवळीकडे इतर मागासवर्गीय वळले नाहीत, हे म्हणणे तितकेसे योग्य नाही. माझ्यासह असे असंख्य स्त्री पुरुष (इतर मागासवर्गीय) आहेत, जे आंबेडकरवादाचा खूप गांभीर्याने विचार करत आले आहेत, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागात कार्यरत डॉ. वंदना महाजन यांनी केले आहे. त्या म्हणतात, विचारांची तीव्रता एखाद्या व्यक्ती वा समूहापर्यंत किती प्रमाणात पोहोचते आणि विचार स्वीकारण्याची कितीशी तयारी आहे, यावर विचारांचा प्रचार-प्रसार अवलंबून असतो. याच संदर्भाने 'क्रांतिकारी जनता'चे, संपादक, साहित्यिक जयवंत हिरे, म्हणतात; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जाती विध्वंसनाची चळवळ देशभरात पसरली असली तरी महारेतर इतर अस्पृश्य जातींना हिंदू जाती संस्थेने काही ना काही उत्पादक साधने दिलेली होती. त्या मुळे ते गावगाड्यावर अवलंबून होते. तरीही आंबेडकरी चळवळीत चांभार आणि मांग समाजही दखलपात्र प्रमाणात सहभागी होता. चवदार तळे सत्याग्रहाच्या काळात बाबासाहेबांनी चांभार स्त्रियांचीही स्वतंत्र सभा घेतल्याचे आढळते.

इतकेच नव्हे, तर बाबासाहेबांनी धर्मांतर करून बौद्ध धम्म स्वीकारण्याच्या घेतलेल्या निर्णयात सर्व अस्पृश्य जातींना सहभागी करून घेण्यासाठी या अस्पृश्य जातींच्याही स्वतंत्र परिषदा घेऊन धर्मांतरासाठी त्यांची मानसिक तयारी त्यांनी करून घेतली होती. त्या तयारीकडे पाहूनच १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे पाच लाख अस्पृश्यांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली होती.

याच मुद्द्याच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभागात कार्यरत सुनीता सावरकर यांनी त्यांच्या 'ढोर-चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परीघ' (ग्रंथाली, २०२३) या पुस्तकात सविस्तर विवेचन केले आहे. पुस्तकात लिहिलेल्या मनोगतात त्या म्हणतात, ''पुणे करारामुळे एकत्र येण्याचा प्रयत्न करणाऱ्या अस्पृश्यांमधील दरी

आणखी वाढली. महार समाजाने बौद्ध धर्म स्वीकारला, तर इतर अस्पृश्यांमधील जातींनी सार्वजनिक पातळीवर बौद्ध धर्म स्वीकारला नाही. त्यांच्यातील काही ठरावीक व्यक्तींनी बौद्ध धर्म स्वीकारला, सामूहिक पातळीवर एक समाज म्हणून चांभार, मातंग, ढोर यांनी बौद्ध धर्म स्वीकारला असता, तर आजचे चित्र वेगळे दिसले असते; परंतु तसे झाले नाही. याचा सामाजिक व राजकीय पातळीवर इतरांनी फायदा घेतला.

मुळात, आंबेडकरांनी स्पष्टपणे सांगितले होते, की जातिव्यवस्था ही केवळ सवर्णांना नव्हे, तर दलित समाजालाही एकमेकांपासून दूर ठेवते. ते एक वास्तवही होते. अनुसूचित जातींमध्येही परस्पर श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भावना निर्माण करण्यात जातिव्यवस्थेला यश आले होते. त्यामुळे दलितांचे ऐक्य ही कल्पना जितकी आवश्यक होती, तितकीच कठीणही होती.

बाबासाहेब स्वतंत्र राजकीय नेतृत्व उभारत होते. हे तत्कालीन सत्ताधारी राजकारणासाठी आव्हान होते. त्यामुळे दलित समाजात पर्यायी नेतृत्व उभे करणे, विभागणी निर्माण करणे आणि आंबेडकरांच्या प्रभावाला मर्यादा आणणे, अशा विविध राजकीय डावपेचांचा तेव्हा वापर झाला. याचा परिणाम असा झाला की अनेक समाजघटक तात्कालिक राजकीय लाभांकडे वळले, तर व्यापक सामाजिक परिवर्तनाचा कार्यक्रम मागे पडला.''

अर्थात, बाबासाहेबांनी धार्मिक अंधश्रद्धा आणि ब्राह्मणवादी सामाजिक रचनेवर कठोर टीका केली. त्यांनी विचाराअंती बौद्ध धम्म स्वीकारला, कारण त्यांना समानता, करुणा आणि विवेक यांवर आधारित जीवनपद्धती अपेक्षित होती. बाबासाहेबांचे विचार काळाच्या पुढे होते. संविधानवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-पुरुष समानता, आर्थिक लोकशाही, बंधुता आणि सामाजिक न्याय यांची बाबासाहेबांनी मांडलेली संकल्पना तत्कालीन समाजासाठी अत्यंत क्रांतिकारक होती. अनेकांना त्यांच्या विचारांची खरी उंची त्यांच्या हयातीत समजली नाही; ती पुढील पिढ्यांनी अधिक स्पष्टपणे अनुभवली.''

**आत्मपरीक्षणाची गरज**

एकूणच, आंबेडकरी विचारसरणी इतरांवर टीका करण्याबरोबरच आत्मपरीक्षणही शिकवते. बाबासाहेबांनी कधीही अंधानुकरणाची अपेक्षा केली नव्हती. त्यांनी विवेक, अभ्यास आणि संघटन यांवर भर दिला होता. आज बाबासाहेबांचे विचार देशभर पोहोचले आहेत. संविधान, आरक्षण, मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि बौद्ध धम्म यांमुळे नवी पिढी अधिक जागरूक झाली आहे.

तरीही खरी आंबेडकरी भूमिका म्हणजे केवळ बाबासाहेबांचा जयघोष करणे नव्हे; तर त्यांच्या विचारांचा अभ्यास करून सामाजिक समता, बंधुता आणि न्याय यासाठी संघटित कृती करणे होय, याचे भान दलित समाजघटकांनी राखणे आवश्यक बनले आहे. आंबेडकरी दृष्टिकोन आपल्याला कोणावरही द्वेष करायला शिकवत नाही. तो सत्याचा शोध, अन्यायाचे विश्लेषण आणि परिवर्तनाची दिशा देतो. त्यामुळे इतिहासाकडे पाहताना आत्मपरीक्षण, संघटन आणि प्रबोधन या मार्गाने पुढे जात राहणे, हीच समस्त दलित समाजाची खरी गरज आहे.

**अरुण वाघ हे वैज्ञानिक दृष्टिकोन ठेऊन विविध नियतकालिकांत लेखन करतात. दैनिक महानायक मध्ये दहा वर्षे 'गती' नावाचे सदर त्यांनी लिहिले. समाजाला दिशा देणारे साहित्यिक, विचारवंत, वैज्ञानिक हे त्यांचे लेखनविषय आहेत.**
**संपर्क : ९२२३२०३५४५**

## मुखपृष्ठाविषयी



**सम्राट अशोकाने इ.पू. २५६ ते २४२ या कालावधीत जवळपास वीसेक शिलास्तंभ उभारले. त्यातले सारनाथ येथील चौमुखी सिंहशिल्प हे राजधानीचे प्रतीकचिन्ह. अशोककाळाचे अभ्यासक चार्लस ॲलन यांनी शिल्प साकारणाऱ्यांचे वर्णन 'मौर्यन मायकलेंजेलो' असे केले. भारताच्या संविधानकर्त्यांनी आधुनिक नि प्रागतिक लोकशाहीला पूरक अशा प्रतिमा राष्ट्रीय प्रतीक म्हणून निवडताना या सिंहशिल्पाची निवड केली. न्याय, समतामूलक दूरदृष्टी, स्थैर्य आणि मुख्य म्हणजे, लोकशाहीप्रती बांधिलकीची जाणीव करून देणारे हे शिल्प पुढे जाऊन भारताची ओळख बनले...**

# बनावट राजकीय कथनावरचा अभ्यासपूर्ण उतारा



शेखर देशमुख

स्वातंत्र्य दिन विशेष

ग्रंथवेध






*कर्नाटक शैलीचे गायक संशोधक टी.एम. कृष्णा*

घेरून राहिलेल्या अस्वस्थतेला भेदण्यासाठी टी. एम. कृष्णा हे वेळोवेळी देश आणि समाजाविषयक चिंतनाकडे वळताना दिसतात. किंबहुना, याचेच प्रतिबिंब त्यांच्या आजवरच्या संगीतकला सादरीकरणात, इतिहासाच्या अभ्यासात आणि साहित्यकृतींमध्ये उमटले आहे. समाजात दुहीची बिजे पेरणाऱ्या, जाती-धर्मात दुरावा निर्माण करणाऱ्या अलीकडच्या काळातल्या घटनांनी त्यांना अस्वस्थ केल्याचा उल्लेख प्रस्तुत पुस्तकाच्या मनोगतामध्ये आलेला आहे. यातूनच स्वातंत्र्याचा पाया रचणाऱ्या धुरिणांनी देशाला एकसंध ठेवण्यासाठी अत्यंत विचारपूर्वक निवडलेल्या प्रतिकांचा, या प्रतिकांशी निगडित ऐतिहासिक संदर्भांचा आणि वर्तमानाच्या संदर्भाने या प्रतिकांना असलेल्या मोलाचा मागोवा घेण्याच्या प्रक्रियेत त्यांनी स्वतःला गुंतवले आणि त्यातून 'वुई द पीपल ऑफ इंडिया: डिकोडिंग ए नेशन्स सिम्बल्स' हे अत्यंत उद्बोधक पुस्तक आकारास आले आहे...

**मा**णूस अस्वस्थचित्त झाला की, बाहेरचा कोलाहल टाळून अंतर्मनात डोकावतो, आपल्या मुळांचा शोध घेऊ पाहतो. टी. एम. कृष्णा हे तर बोलूनचालून हाडाचे कलावंत. समाज, संस्कृती देश, कला याविषयी आस्था असलेले कर्नाटक संगीतातले चिंतनशील व्यक्तिमत्व ही त्यांची ठळक ओळख. अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी किंमत मोजण्याचे धाडस राखून असलेले कृष्णा आसपासचे जग टिपताना न संकोचता आत्मशोधाचा आणि आत्मटीकेचाही स्वर आळवतात, तेव्हा त्यांच्यातला वास्तवाचे भान असलेला सजग नागरिक लक्ष वेधून घेतो. स्वातंत्र्योत्तर भारताची ओळख ठसवण्यासाठी निवडण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रतिकांचा प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी घेतलेला शोध हा त्यांच्या दृष्टीने एकप्रकारे राष्ट्राला बळकटी देणाऱ्या मुळांचाच शोध ठरतो. सद्यस्थितीत आपण आपल्या मुळांपासून, ध्येय उद्दिष्टांपासून दूर चाललो आहोत, हेही बहुदा त्यांना या पुस्तकाद्वारे (प्रकाशक : कॉण्टेक्स्ट, किंमत : ८९९ रुपये) प्रकर्षाने सूचित करायचे आहे.

प्रतिके वा प्रतिमाचिन्हे राज्यकर्त्यांना त्यांची ओळख, सामान्य माणसास मानसिक सुरक्षितता आणि भावनिक आधार मिळवून देतात. जगाच्या आधुनिक इतिहासात झेंडा हे प्रतीक त्या-त्या देशाची पहिली ठसठशीत ओळख असते. देशात असो वा जगात कुठेही भारताचा तिरंगा फडकताना पाहिला की, अभिमानाने नागरिकांचा ऊर भरून येतो. पण समस्त देशवासीयांचा अभिमानबिंदू ठरलेला राष्ट्रीय झेंडा नेमका आकारास आला कसा, झेंड्याच्या निश्चितीसाठी देशाला दिशा देऊ पाहणाऱ्या थोरामोठ्यांमध्ये कशा स्वरुपाचे विचारमंथन घडून आले, याची मोलाच्या ऐतिहासिक नोंदींसह गुंतवून ठेवणारी कहाणी या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात लेखक कृष्णा वाचकांपुढ्यात ठेवतात.

१९०७ मध्ये स्टुटगार्ट इथल्या इंटरनॅशनल सोशलिस्ट काँग्रेसच्या अधिवेशनात भिकाजी रुस्तम कामा यांनी पहिल्यांदा भारताचा म्हणून एक तिरंगा झेंडा फडकावला. त्याआधी भारताचा विशिष्ट झेंडा अस्तित्वात नव्हता. जे होते, ते ५६५ संस्थानांचे स्वतंत्र ध्वज होते. कामा यांनी फडकावलेल्या तिरंग्यात पहिला रंग हिरवा, मधला सोनेरी छटा असलेला केसरी आणि तळाचा रंग लाल होता. या घटनेच्या दोन वर्ष आधी बंगालची फाळणी झाली होती. या फाळणीने स्वदेशी चळवळीची बिजे रोवली होती. या चळवळीच्या प्रभावातून विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने अँटि सर्क्युलर सोसायटीची स्थापना झाली. या सोसायटीने सर्वधर्मसमभावाचा आग्रह धरत ऑगस्ट १९०६मध्ये राष्ट्रीय झेंड्याची रचना केली. त्यानंतर भगिनी निवेदिता यांनी राष्ट्रीय झेंड्याची कल्पना पूर्णत्वास नेली. एकीकडे १९०७ पासून आंध्र जातीय कलाशाळेच्या पिंगळी वेंकैया यांनी राष्ट्रीय झेंड्याची जवळपास २८ प्रारुपे तयार केली. त्यातल्या एका झेंड्यावर आठ वेगवेगळ्या धर्मांचे प्रतिनिधित्व करणारे रंग पट्टे ठेवले. त्यात हिंदू धर्मासाठी शंख, त्रिशूळ आणि चक्रासह पिवळा रंग, मुस्लीम धर्मासाठी लाल रंग त्यात चंद्रकोर आणि चांदणी, बौद्ध धर्मासाठी नारंगी, ख्रिश्चन धर्मासाठी निळसर जांभळा, शीख धर्मासाठी हिरवा, जैन धर्मासाठी पांढरा, पारसी धर्मासाठी गुलाबी त्यावर उगवता सूर्य आणि ज्यूंसाठी निळा असे रंग वापरले. तर झेंड्याच्या मध्यभागी कमळाचे फूल आणि डाव्या कोपऱ्यात वरच्या भागात ब्रिटिशांच्या युनियन जॅकची प्रतिमा रचली. महात्मा गांधींना वेंकैयांच्या अभिव्यक्तीचे कौतुक होते, मात्र धर्मांचे प्रतिनिधित्व करणारा हा झेंडा पसंत पडला नव्हता. त्याच सुमारास ॲनी बेझंट नेतृत्व करत असलेल्या होम रुल समितीचाही लाल-हिरव्या रंगाचा झेंडा दक्षिणेत फडकला. १९२० नंतर असहकार चळवळीने जोर धरला आणि खऱ्या अर्थाने भारतीय झेंड्याबाबत गंभीरपणे विचार सुरू झाला. गांधीजींच्या पंजाब दौऱ्यादरम्यान शिक्षणतज्ज्ञ लाला हंसराज यांनी झेंड्यावर चरखा घेण्याची कल्पना मांडली. गांधीजींसाठी चरखा हे स्वावलंबनाचे, राष्ट्राच्या क्रियाशीलतेचे आणि स्वातंत्र्याचे प्रतीक होते. म्हणूनही ती कल्पना गांधीजींच्या मनाला स्पर्शून गेली.

त्यानंतर प्रत्येक काँग्रेसच्या अधिवेशनात आणि अधिवेशनाच्या बाहेर यावर चर्चा आणि मंथन सुरू झाले. वि.दा. सावरकरांनी सुचवल्यानुसार तो अखिल हिंदू ध्वजाऐवजी राष्ट्रीय झेंडा हा तिरंगाच का असावा, त्यात रंग कोणते असावे, त्या रंगांनी कशाचे प्रतिनिधित्व करावे, इथपासून तिरंग्यावर चरख्याऐवजी अशोक चक्रच का असावे, या झेंड्याची प्रमाणबद्धता कशी असावी, तो खादीच्या कापडापासून बनलेलाच का असावा, पं. नेहरुंच्या सौंदर्यदृष्टीचा झेंड्याच्या निर्मितीवर कसा प्रभाव पडला, झेंड्याचे अंतिम स्वरुप निश्चित करण्यासाठी झेंडा समितीची स्थापना कशी झाली इथपासून ते अगदी राष्ट्रीय सन्मान कायदा

अस्तित्वात येईपर्यंतचा इतिहास या प्रकरणात मौलिक तपशिलांसह पुढे येतो. त्यात म.गांधी-प.नेहरू-सी. राजगोपालचारी, सरदार पटेल, मौलाना आझाद, रवींद्रनाथ टागोर, ॲनी बेझंट यांच्यातल्या विचारप्रवर्तक वाद-चर्चा, पत्र व्यवहार त्यातून पुढे येणारे सहमती-नकार या साऱ्यामधून अभिमानास्पद भारतीय वाद-संवाद परंपरा अधोरेखित होतेच, परंतु धुरिणांची लोकशाहीवादी मनोवस्थादेखील ठळक होते. राष्ट्रीय झेंड्याच्या निर्मितीवर प्रकाशझोत टाकताना लेखकाने विविध राज्यांच्या अस्मितेशी निगडित उदा. कन्नड. तमीळ आदी झेंड्यांच्या अस्तित्वाचाही आढावा घेतला आहे. सोबतच जगातल्या १९५ देशांपैकी किती देशांच्या झेंड्यावर धार्मिक प्रतिकांचा वापर झालेला आहे, किती देशांनी इस्लाम हा राष्ट्रीय धर्म म्हणून जाहीर केला आहे, किती देशांनी हिरव्या रंगाला धर्माचा रंग म्हणून प्राधान्य दिले आहे, असे पूरक तपशीलही पुरवले आहेत. सर्वसाधारणपणे भारतीय झेंड्याला तिरंगा म्हणण्याची प्रथा आहे, मात्र मध्यभागी निळ्या रंगातल्या धम्मचक्रामुळे हा झेंडा चौरंगा ठरतो, हेही या प्रकरणात लेखकाने सहजपणे नोंदवले आहे.

**लोककेंद्री आज्ञावली**

'दी लायन कॅपिटल' हे पुस्तकातले दुसरे प्रकरण, राष्ट्रीयत्वाचे सर्वव्यापी प्रतीक बनलेला अशोकस्तंभ, चौमुखी सिंहशिल्प आणि लोकशाहीसाठी आदर्शवत रचना ठरलेल्या सम्राट अशोकाच्या साम्राज्याचा तसेच त्याच्या लोककेंद्री आज्ञावलींचा वेध घेते. इ.स. पूर्व ३०४ ते २३२ हा अशोकाचा काळ. सर्वशक्तिमान सम्राट ते अहिंसावादी बौद्ध धर्मपालक असा विलक्षण आयुष्यपट असलेला सम्राट अशोक हा सोळावे शतक येतायेता सार्वजनिक चर्चा विश्वातून अदृश्य झाला. एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात जेम्स प्रिन्सेपने ब्राह्मी लिपीचे कोडे सोडवले. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात अशोकाच्या आज्ञावली प्रकाशझोतात आल्या आणि त्याच सुमारास म्हणजेच १९१५ साली गांधीजी द. आफ्रिकेतून भारतात परतले. अशोकाचे पुनरुज्जीवन आणि गांधीजींचे पुनरागमन या दोन घटना एकाच वेळी घडून आल्या, अशी सूचक नोंद लेखक ओघाने घेतो. याच ओघात अशोकाच्या काळात दगडांवर कोरलेल्या आज्ञा आधुनिक लोकशाही भारताच्या जडणघडणीत कशा मार्गदर्शक ठरत गेल्या, पं. नेहरूंना सम्राट अशोकाच्या राज्यकारभाराची पद्धती कशी लोकशाहीपूरक भासली आणि त्यांनी बोधचिन्ह म्हणून इतर कोणतेही धर्मकेंद्री वा इतिहासातल्या सत्तांचे प्रतिनिधित्व करणारे प्रतीक न निवडता अशोकाने उभारलेला सांचीचा स्तंभ, सारनाथचे चौमुखी सिंहाचे शिल्प आणि २४ आऱ्या असलेले धर्मचक्र भारतीय लोकशाहीचे प्रतीक म्हणून स्वीकारण्याचा आग्रह का धरला, महत्त्वाचे म्हणजे, ही प्रतिके काय सुचवत होती, या संदर्भाने घडून आलेली सर्वव्यापी सखोल चर्चा, विविध विचारप्रवाहांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नेत्यांमध्ये उद्भवलेले वैचारिक वाद, बोधचिन्हांच्या प्रमाणीकरणासाठी धरले गेलेले शास्त्रशुद्ध आग्रह अशा कितीतरी गोष्टी इथे लेखक ओघवत्या भाषेत सांगत जातो.

बघणाऱ्याला प्रथमदर्शनी तीन दिशांना समान न्यायाने बघणारे स्थिरचित्त, आत्मविश्वासी, धैर्यवान सिंह नजरेस पडतात. चौथा सिंह अदृश्य राहतो. हा न दिसणारा सिंह भारताचा अंतरात्मा आहे, हे गोपाळकृष्ण गांधींचे उद्धृत विधान वाचक म्हणून आपले लक्ष वेधून घेते. याच ओघात २०२२ मध्ये नव्या संसदेच्या आवारात प्रचलित बोधचिन्हरुपी सिंहांचे काहीसे आक्रमक नि उग्र रुप राष्ट्रीय चिन्ह निवडीमागच्या मूळ उद्देशांनाच हरताळ फासणारे असल्याचे मतही लेखक नोंदवतो. सोबतच सम्राट अशोकाच्या धर्मविषयक विचारांची चिकित्सा करताना लेखक न्यायाच्या मुद्द्याला धरून गांधी आणि डॉ. आंबेडकरांमध्ये विषमता, अस्पृश्यता आदी मुद्द्यांवर झालेल्या वादचर्चांचा, त्यांच्या विचारांमध्ये असलेल्या मूलभूत फरकाचा तरीही परस्पर सन्मानाच्या भावनेचाही वेध घेतो. संविधान सभेत सदस्यांनी भारताच्या भविष्याबाबत अनेक पैलूंवर सखोल चर्चा केल्या, त्या तुलनेत दोनच वेळा बोधचिन्हांच्या निवडीबाबत चर्चा झाल्या असल्या तरीही, संविधान सभेपलीकडे जाऊन अशोककालीन बोधचिन्हे निवडण्यामागे ज्या प्रकाराने मंथन घडून आले, ते व्यापकतेचे परिमाण असलेले होते, याचाही या प्रकरणातून सहजपणे बोध होतो.

**गांधीविचारांचा प्रभाव**

पुस्तकातले तिसरे प्रकरण 'सत्यमेव जयते' हे सत्य आणि न्यायाचे अधिष्ठान प्रकट करणारे घोषवाक्य कसे निवडले गेले, त्या निवडीसाठी उपनिषदांपासून ते आधुनिक इतिहासापर्यंतच्या काळाचा धुरिणांनी कसा वेध घेतला, यावर सविस्तर प्रकाश टाकते. 'सत्यमेव जयते' हे केवळ घोषवाक्य नाही, तर तो एक

निर्धार आहे, याकडे लक्ष वेधून लेखकाने विविध देशांच्या, राज्यांच्या घोषवाक्यांचा इथे आढावा घेतला आहे. एक देश म्हणून भारताने हे आपले घोषवाक्य निवडण्याआधी मध्य भारतातल्या जांबुघोडा आणि बरौंदा या दोन संस्थानांनी मुंडक उपनिषदामध्ये उल्लेख असलेले 'सत्यम् एव जयते' हे घोषवाक्य म्हणून स्वीकारले होते. अलीराजपूरचा राजादेखील हे घोषवाक्य उपयोगात आणत होता. महाराष्ट्रातल्या कोल्हापूरचे एस.जी. चव्हाण नावाचे गृहस्थ आणि त्यांचे कुटुंबीय त्यांच्या नोंदपत्रांवर या छापील घोषवाक्याचा वापर करत होते. मात्र, ॲनी बेझंट, मदनमोहन मालविया, सरदार पटेल आदींनीही वेगवेगळ्या प्रसंगांत ते कोणाही आधी उच्चारल्याचे दावे त्या त्या वेळी झाले होते. त्या दाव्यांची चिकित्सा करताना वैश्विक तत्त्व असलेल्या 'सत्यमेव जयते'चा बोधवाक्याचा स्वीकार करताना राष्ट्रकर्त्यांवर गांधीजींनी अंगीकारलेल्या सत्याग्रहाच्या संकल्पनेचा प्रभाव असल्याचे मत लेखकाने नोंदले आहे. या घोषवाक्याची निवड होताना वाद उद्भवले, 'जयते' ऐवजी 'जयती' हा योग्य शब्द असल्याचा आग्रह काहींनी धरला, काहींनी 'सत्यम् वज धर्मम् चर' हे घोषवाक्य योग्य आहे म्हटले, याच्याही लक्षवेधी नोंदी लेखकाने या प्रकरणात केल्या आहेत. १९४९ सालच्या मध्यावर निवड झालेल्या या घोषवाक्याच्या अनुषंगाने वर्तमानाचा धागा पकडत देशाच्या अस्तित्वाकडून 'सत्यमेव जयते' अशी हमी देणाऱ्या लोकशाही राष्ट्रातल्या मानवी अस्तित्वाच्या मुद्द्याला लेखकाने सविस्तरपणे हात घातला आहे.

हिंदू धर्मात जन्म-मरणाकडे कर्मफळाचे आवर्तन अशा नजरेने पाहिले गेले आहे. त्यामुळे मुंडक उपनिषदामध्ये कोण कशामुळे नि कशा अवस्थेत मरण पावत आहे, याकडे फारसे स्वारस्याने पाहिले जात नाही, असे मत नोंदवत प्रत्यक्षात सगळ्यांचे मरण एकसमान पातळीवरचे राहत नाही, न्यायालये काहींना चुकीच्या आरोपांखाली देहदंडाची शिक्षा सुनावून ते मरण प्रदान (इंग्रजीतः टु बी अवॉर्डेड) करते, या वास्तवाकडे लक्ष वेधून लेखकाने देशातल्या आणि परदेशांतल्या न्यायालयांनी सुनावलेल्या फाशीच्या शिक्षेचा मुद्दा चर्चेला आणून हा विषय उंचीवर नेला आहे. याच संदर्भाच्या ओघात, सत्य म्हणजे काय या मुद्द्यांच्या अनुषंगाने अल्बेर कम्यूच्या 'रिफ्लेक्शन्स ऑन गिलोटिन' या गाजलेल्या निबंधाचा संदर्भ येतो. 'ट्रुथ इज पाथलेस लँड' म्हणणाऱ्या जे. कृष्णमूर्तींच्या विचारांवरही विवेचन येते. ज्या समाजात देहदंडाच्या शिक्षेला मान्यता दिली जाते, त्या समाजात भिन्न स्तरावरची हिंसादेखील न्याय्य ठरवली जाते, हे निरीक्षण मांडून 'सत्यमेव जयते' या वचनाची विविधार्थांसह एम.ए. मेहेंदळे, पॅट्रिक ऑलिव्हिलकृत चिकित्साही लेखक समोर ठेवतो. मात्र, तमीळ रामायणाचे लेखक आणि कवी कंबन यांचे, जेव्हा लोक असत्य बोलणार नाहीत, तेव्हा सत्याचे अस्तित्वच उरणार नाही... हे वचन या प्रकरणात सर्वाधिक लक्ष वेधून घेते.

**कालसुसंगत मीमांसा**

पुस्तकातले चौथे प्रकरण रवींद्रनाथ टागोरांचे 'जन गण मन' आणि बंकिमचंद्रांचे 'वंदे मातरम्' या दोन प्रेरक गीतांच्या इतिहासाशी निगडीत लक्षवेधी तपशील वाचकांपुढ्यात मांडते. ते मांडताना, लेखक या दोन गीतांची पार्श्वभूमी गीतलेखनामागचे व्यापक हेतू, दोन्ही गीतांचे सांगीतिक, साहित्यिक मूल्य, होकार-नकारामागचे राजकारण, थोरामोठ्यांची मतेमतांतरे अशा विविध मुद्द्यांना स्पर्श करतो, तेव्हाच्या राष्ट्रकर्त्यांनी राष्ट्रगीत म्हणून 'जन गण मन' या टागोरलिखित गाण्याची केलेली निवड किती दूरदर्शीपणा दर्शवणारी होती हेही उमगते आणि ज्या कारणांनी तेव्हा 'वंदे मातरम्'ला राष्ट्रगीताला दर्जा दिला गेला नाही, त्याच कारणांसाठी विधेयकाच्या माध्यमातून २०२६ मध्ये हे गीत जाणीवपूर्वक कसे सार्वजनिक चर्चेत आणले गेले आहे, हेही आकळते.

'कला ही कल्पकतेची सप्रेम भेट असते, ही भेट कलाकाराने श्रोत्यांना दिलेली असते,' या विधानासह लेखक या प्रकरणाला सुरुवात करतो. मग मातृभूमी, पितृभूमी या संकल्पनांच्या संदर्भाने विवेचन येते. १८६६ मध्ये भूदेब मुखोपाध्याय यांनी पहिल्यांदा व्यंगात्मक पद्धतीने भारतमातेचे चित्र रंगवल्याचा उल्लेख येतो आणि टप्प्याटप्प्याने भारतमातेच्या कल्पनाचित्रात होत गेलेला बदल आणि सर्वतोमुखी होत गेलेले 'वंदे मातरम्' हे घोषवाक्य या दोहोंतला धर्मकेंद्री आंतरबंध स्पष्ट केला जातो. 'वंदे मातरम्' हे गीत पहिल्यांदा १८९६ च्या कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनात गायले गेल्याची नोंद करत लेखक 'वंदे मातरम्' आणि 'जन गण मन'चा होत गेलेला एकसमांतर प्रवास, या गाण्यावरून झालेले वाद-विवाद-संवाद नेहरू-गांधी-टागोर-सुभाषचंद्र बोस यांच्यातल्या समान उद्दिष्टे अधोरेखित करणाऱ्या उद्बोधक चर्चा, 'जन गण मन'ला सुभाषबाबूंनी दिलेली पसंती आणि या

गीताचे त्यांनी केलेले हिंदुस्थानीकरण, आझाद हिंद फौजेतल्या अबिद हसन यांनी 'जन गण मन'च्या पहिल्या तीन कडव्यांचे 'हिंद कौमी तराना' म्हणून 'शुभ सुख चैन की बरखा बरसे' असे केलेले भाषांतर, गांधीजींनी त्यांच्या 'आश्रम भजनावली'त या दोन्ही गीतांसोबतच इक्बालांच्या 'सारे जहाँ से अच्छा' या प्रेरक गीताचाही केलेला समावेश, गांधीजींनी आपल्या पत्राचा शेवट 'वंदे मातरम्' जयघोषाने करणे, टागोरांनी 'वंदे मातरम्'साठी धून बांधणे, कुमार गंधर्वांनी मुंबईतल्या गवालिया टँक इथल्या सभेत गांधीजींच्या उपस्थितीत 'वंदे मातरम्' चे गायन करणे, बंकिमचंद्र आणि टागोरांमध्ये असलेली राष्ट्र संकल्पनेमधली भिन्नता, राष्ट्रगीत आमच्या भाषेतलेच हवे यासाठी उफाळून आलेल्या प्रांतीय अस्मिता आदी महत्त्वाच्या घटनांचा वेध लेखक या प्रकरणात घेतो.

सोबतच 'आनंदमठ' कादंबरीत राजकीय अभिव्यक्ती म्हणून आलेल्या 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा का नाकारला गेला, त्यातली सुरुवातीचीच कडवी का स्वीकारली गेली, 'जन गण मन' हे राष्ट्रीय गीत का निवडले गेले, याची ऐतिहासिक संदर्भांसह कालसुसंगत कारणमीमांसा प्रकरणात येते. ती वाचताना 'वंदे मातरम्' हे गीत राग मल्हार, राग देश, राग तिलक कमोद अशा विविध रागांमध्ये वेगवेगळ्या टप्प्यांवर बांधले गेले होते, तसेच भारताने अधिकृतपणे राष्ट्रगीताची मान्यता देण्याआधीच आझाद हिंद सेनेचे नेतृत्त्व करणाऱ्या सुभाषचंद्र बोसांनी 'जन गण मन' हे आमचे राष्ट्रगीत असल्याचे जाहीर केले होते, १९४२ मध्ये चेंबर ऑर्केस्ट्रा ऑफ हॅम्बर्ग आणि बर्लिन रेडिओ ऑर्केस्ट्राने ते सादर केले होते, ही ज्ञानात भर घालणारी माहिती वाचकांपर्यंत पोहोचते. जातीय तणावाचे ऐतिहासिक ओझे वागवणाऱ्या 'वंदे मातरम्' ऐवजी प्रत्येक भारतीयाला विविधेत एकता राखण्याचे आवाहन करत सर्वसमावेशकतेचे भान जागवणारे, सौंदर्यवादी दृष्टिकोनातून लिहिलेले 'जन गण मन' हे कसे भारताचे राष्ट्रीय गीत बनले, 'जन गण मन'ची प्रमाणित धून कशी तयार झाली, त्यासाठी कोणते निकष ठरवले गेले, ब्रिटन आणि भारतातल्या संगीतकारांना कसे आजमावले गेले, धून तयार होत असताना राष्ट्रगीताचे संगीत जीवनरसपूर्ण आणि गीताची प्रतिष्ठा जपणारे असावे, असे म्हणणाऱ्या पं. नेहरुंचे सांगीतिक नि सौंदर्यशास्त्रीय आग्रह कसे वरचढ ठरले आदी घटनाक्रम टिपताना लेखक कृष्णा यांनी पुरवलेल्या ऐतिहासिक संदर्भांमुळे हे प्रकरण खूप खिळवून ठेवणारे बनले आहे. स्वतः कृष्णा हे गायक, संगीतकार असल्यामुळेही असेल, पण ज्या सूक्ष्मपणे त्यांनी या विषयाचे पदर त्यातही मुख्यतः 'जन गण मन'चे सांगीतिक सौंदर्य उलगडून दाखवले आहे, ते पाहता हे प्रकरण सर्वाधिक रंजक आणि प्रबोधनात्मक ठरले आहे. या प्रकरणात 'जन गण मन'चे टागोरांनी केलेले गायन एखाद्या मंत्रासम भासते, हे लेखक कृष्णा यांचे लिखाणाच्या ओघात मांडलेले निरीक्षण स्मरणात राहणारे ठरते.

**दूरदृष्टिपत्रामागचे चिंतन**

पुस्तकातले पाचवे नि अखेरचे प्रकरण संविधानाच्या उद्देशिकेवर प्रकाश टाकताना जगभरातल्या संविधानांचा तुलनात्मक पट मांडणारे आहे. जगातल्या १९४ देशांपैकी केवळ २० देशांच्या संविधानात 'बंधुता' या मूल्याचा समावेश असल्याचे तसेच ५४ देशांची उद्देशिका नसल्याचे निरीक्षण लेखकाने येथे मांडले आहे. भारताच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये ठळकपणे आलेली आहेत, ही मूल्ये 'शब्द बापुडे केवळ वारा'सम ठरू नयेत, ती प्रत्यक्ष समाजात रुजावीत, यासाठी स्वातंत्र्यपूर्वकाळापासून राष्ट्रकर्त्यांनी समाजजोडणीसाठी केलेल्या कठोर प्रयत्नांचे दर्शन लेखक या प्रकरणात घडवतो. त्या अनुषंगाने संविधान सभेत झालेले ठराव, त्यासाठी झालेल्या चर्चा यांचे तपशील इथे येतात. बंधुत्वाच्या मूल्यांची चिकित्सा करताना न्यायालयांनी या मूल्याच्या संदर्भाने दिलेल्या निकालांचे तपशील येतात, स्वातंत्र्य आणि समतेच्या मूल्यांची चर्चा करताना देशात अजूनही दबा धरून असलेली अपृश्यता, महिलांना मंदिर प्रवेशबंदी आदी विषयांवर लेखकाने आपली सडेतोड मत मांडली आहेत. संविधानाची उद्देशिका हे एक दूरदृष्टीपत्र आहे, असे मत नोंदवत लेखक या प्रकरणात उद्देशिकेत प्रतिष्ठा (डिग्निटी) हा शब्द आलेला आहे मात्र, अभिमान (प्राइड) हा शब्द आलेला नाही, हे अचूक निरीक्षण मांडतो. प्रतिष्ठेचे मूल्य नाकारले जाते तेव्हा स्वातंत्र्य, समता, न्याय हे सारे हक्क नाकारले जातात. मुळातच वैयक्तिक प्रतिष्ठेची प्रतिष्ठापना होणे, हेच एका अर्थाने समानता येणे आहे, असे सुचवून परखड भाष्यही करतो.

उद्देशिकेत एकता (युनिटी) या मूल्यासोबत नंतरच्या काळात समाविष्ट झालेल्या एकनिष्ठा (इंटिग्रिटी) या अधिकच्या मूल्यावर चर्चा करताना ही दोन्ही मूल्ये भिन्न अपेक्षा

प्रकट करतात. त्यातही एकनिष्ठेची अपेक्षा एखाद्यामध्ये भयाची, दहशतीची, दमनाची भावना निर्माण करू शकते, असे मत लेखक नोंदवतो. अखेरीस समानता, न्याय, बंधुता या मूल्यांची पाठराखण करणाऱ्या भारताच्या संविधानात उद्धृत एकेक शब्दांत संगीत सामावलेले आहे, असे निरीक्षण मांडून 'वुई द पीपल ऑफ इंडिया' हे विधान विविध भारतीय भाषांत उद्धृत करत 'आम्ही भारताचे लोक' या मराठी वाक्याने प्रतिकांच्या अनुषंगाने योजलेल्या एकूण विवेचनाला आणि युक्तिवादांना लेखक टी. एम. कृष्णा पूर्णविराम देतात.

**सभ्य माणसाचे वचन**

पुस्तकाचे वाचन संपल्यानंतर पहिला विचार मनात येतो, तो प्रतीकचिन्हांची निवड हे राष्ट्रकर्त्यांच्या लेखी केवळ एक उपचार नव्हते, तर देशाला स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर आणून ठेवलेल्या पिढीने स्वतःला आणि इतरांना दिलेले ते सभ्य माणसाचे वचन ('ए जंटलमन्स प्रॉमिस') होते. आजच्या घडीला आक्रमक होत चाललेल्या बहुसंख्यांकवादी राजकारणात धर्मकेंद्री प्रतिके जनतेच्या मनावर ठसवण्याचे नियोजनबद्ध प्रयत्न तेदेखील उघडपणे होत असताना टी. एम. कृष्णांचे हे पुस्तक प्रकाशित व्हावे, हीदेखील एकप्रकारे प्रतिकात्मकच घटना म्हणता येते. ते पाहता, हे पुस्तक एकेकाळच्या पिढीने दिलेल्या वचनाचे आजच्या पिढीला स्मरण करून देणारे ठरते.

पुस्तक वाचल्यानंतर अशा निष्कर्षाप्रत आपण येतो की, निवडलेली राष्ट्रीय प्रतिके पुढे जाऊन देशाची मानसिकता घडवणार आहेत, त्यातून मिळणाऱ्या प्रतिसादावर देशाची जडणघडणही अवलंबून असणार आहे, याचे लख्ख भान राष्ट्रकर्त्यांना होते. म्हणूनच त्यांनी देश उभारणीच्या त्या पायरीवर बहुसंख्यांकवादी मानसिकतेतून केली जाणारी उग्र नि आक्रमक राष्ट्रीय प्रतिकांची निवड जाणीवपूर्वक टाळली होती. मुळामध्ये संविधानाची निर्मिती आणि प्रतीकचिन्हांची निवड करणाऱ्या धुरिणांना तोवर घडलेला इतिहास स्वतःमध्ये आणि इतरांमध्ये सुडाची भावना भिनवण्यासाठी वापरायचा नव्हता, तर व्यामिश्र इतिहासातले त्याज्य ते टाळून सर्वसमावेशक, सर्वधर्मीयांचा अधोगामी नव्हे, पुरोगामी देश घडवण्याचे स्वप्न साकार करायचे होते. त्या स्वप्नांना अनुसरूनच प्रतीकचिन्हांची निवड तसेच संविधानाची निर्मिती झाली होती. त्यामागे त्याला अर्थातच त्यांचा वैश्विक दृष्टिकोन कारणीभूत होता. त्याचमुळे आकारास आलेले संविधान आणि प्रतिके भूतकाळाग्रस्त नव्हती, भविष्यवेधी होती. संस्कृती आणि नवतेचा संगम साधणारी होती. त्यात परधर्मद्वेष आणि जातश्रेष्ठत्वाच्या भावनेला थारा नव्हता. त्याच दृष्टीने त्यांचे प्रत्येक पाऊल पुढे पडत होते. प्रत्येक पावलावर मूल्यांचा, तत्त्वनिष्ठांचा आग्रह दिसत होता. मुख्य म्हणजे, निर्णयप्रक्रियेदरम्यान जे काही घडत होते, त्यात गुप्तता नव्हती. अधिकारशाही प्रवृत्तीचा रेटा नव्हता. प्रत्येकाच्या विचारांचा सन्मान, प्रत्येक मताचा आदर या सूत्राला धरून प्रतिकांच्या रुपाने संचित आकारास येत गेले होते.

आज प्रशासकीय अधिकारी आणि नेत्यांच्या जोडीला अगदी गावातल्या पुढाऱ्यांच्या कार्यालयातही संबंधितांची शान वाढवणाऱ्या अशोकस्तंभ, चौमुखी सिंह आदी राष्ट्रीय बोधचिन्हांच्या सुबक नि आकर्षक प्रतिकृती नजरेस पडतात. यातल्या अगदी सगळ्यांनी नाही, पण दोन-पाचांनी जरी या पुस्तकात नमूद या प्रतिकांमागचा विचार आणि निर्मिती प्रक्रिया समजून घेतली आणि त्यानुरूप स्वतःच्या सार्वजनिक वर्तनात बदल घडवून आणला तर, टी.एम. कृष्णांच्या या पुस्तकाचा एक हेतू सफल झाल्यासारखे होईल.

स्वतःच्या सामाजिक-व्यावसायिक स्थानाला प्रतिष्ठेला आव्हान देत टी.एम. कृष्णा हे आजवर आपला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क बजावत आले आहेत. प्रस्तुत पुस्तकसुद्धा त्यास अपवाद नाही. त्यांनी या पुस्तकाद्वारे संशोधनाची शिस्त पाळत, काल्पनिक नव्हे, तर तथ्याधारित ऐतिहासिक पुराव्यांचा आग्रह धरत अतिशय संयतपणे आपली राजकीय-सामाजिक भूमिका पोहोचवली आहे. पुस्तकाच्या शेवटाकडे असलेली जवळपास पन्नासएक पानांची संदर्भसूची कृष्णा यांनी या पुस्तकासाठी घेतलेल्या मेहनतीची निदर्शक आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, मोकाट सुटलेल्या वावदुकांच्या तोंडाला न लागता, बनावट राजकीय कथनावरचा अभ्यासपूर्ण असा उतारा त्यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून सादर केला आहे. सरतेशेवटी, देश म्हणून, समाज म्हणून आपली दिशा तर चुकत नाही ना, हे ताडून बघण्यासाठी आवश्यक तो विरामाचा-आत्मपरीक्षणाचा क्षण राष्ट्राच्या आयुष्यात येत असतो. तो क्षण प्रस्तुत पुस्तकाने पुरवला आहे, असे निश्चित म्हणता येते.

**लेखक संपर्क :**
deshmukhshekhar101@gmail.com

# समाजाला 'मुंढे' का हवेत?



सुजय शास्त्री

**विवेचन-विश्लेषण**






**आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे हे सध्या संपूर्ण देशभरात त्यांच्या धडाडीच्या कार्यामुळे लोकप्रियतेच्या लाटेवर आहेत. कायदा-नियम यांच्या चौकटीत आपल्या प्रत्येक कृतीला बसवून ते एक प्रकारे कायद्याचे राज्य या देशात चालू शकते, असा आशावाद उभा करताना दिसतात. अशा धडाडी राखून असलेल्या मुंढे यांच्या संघर्षशील आयुष्यावर बेतलेले शफी पठाणलिखित 'तुकाराम' या नावाचे चरित्र नुकतेच प्रकाशित झाले. पुणे येथे वाचक-चाहत्यांच्या प्रचंड गर्दीत पुस्तक प्रकाशनाचा सोहळा पार पडला. या सोहळ्याच्या निमित्ताने वर्तमानतले अनेक सामाजिक-राजकीय-प्रशासकीय पैलू समोर आले...**

नागपूर, जालना, नांदेड जिल्ह्यातील नागरी समस्यांवरचे काम तडीस नेणारा सजग अधिकारी, पंढरपूरमधील विठ्ठल मंदिरातील व्हीआयपी प्रवेशबंदीचा घेतलेला निर्णय घेणारा खमका प्रशासक, नवी मुंबईत लोकांच्या समस्या ऐकण्यासाठी दर रविवारी रस्त्यावर भेटायला जाणारा कार्यतत्पर आयुक्त, दिव्यांग खात्यात असताना बोगस दिव्यांग सर्टिफिकेट वितरित करणारे विविध भागांतील रॅकेट उद्ध्वस्त करणारा संवेदनशील अधिकारी आणि आता अन्न व औषध खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतर अन्नातील भेसळी-विरोधात अक्षरशः जनचळवळ उभी करणारा कर्तव्यकठोर अधिकारी अशा विविध रुपांत तुकाराम मुंढे आजवर समोर आले आहेत.

मुंढे यांची ही प्रशासकीय शैली सत्ताधाऱ्यांना उलट फायद्याची वाटायला किंवा साहाय्यभूत वाटायला हवी. पण तसे होताना दिसत नाही. उलट सत्ताधारी मुंढेंची अडचण करतात आणि मुंढेही सत्ताधाऱ्यांना कायद्याच्या नियम-चौकटीत आव्हान देतात. परिणाम असा की, मुंढे आपल्या पदावर सात-आठ महिनेही काढू शकत नाहीत. नेहमी अपूर्ण असे काम त्यांच्या वाट्याला येत राहते. तरीही मुंढेंच्या कार्यशैलीत तसूभरही फरक पडलेला नाही.

आपल्या देशातील सरकारी यंत्रणा ही मुजोर, लोकांच्या प्रश्नाला बेदखल करणारी, भ्रष्टाचारी आणि शिरजोर स्वरुपाची आहे. मुंढे याच बजबजलेल्या यंत्रणेतील एक अधिकारी आहेत. पण लोकांचे मुंढेंविषयीचे मत मात्र पूर्णपणे वेगळे आहे.

जुलै महिन्याच्या १७ तारखेला मुंढे यांच्यावरची 'तुकाराम' नावाची बायोग्राफी (न्यू एरा पब्लिशिंग हाऊस, मूल्य : २५० रुपये) पुण्यात प्रकाशित करण्यात आली. शफी पठाण या पत्रकाराने मुंढे हे आयएएस होण्यापर्यंतचा प्रवास या पुस्तकात रेखाटला आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनाला किमान चार ते पाच हजार वाचक-चाहते हजर होते. एखाद्या मराठी पुस्तकाच्या प्रकाशनाला हजारो नागरिक उपस्थित राहतात, ही घटनाच मुळी अभूतपूर्व समजली पाहिजे. परंतु ही घटना एवढ्यापुरती मर्यादित नाही, तर या पुस्तकाच्या ३० हजार प्रतींची प्रकाशनपूर्व नोंदणी झाल्याचे तसेच एकूण लाखभर प्रती विक्रीला गेल्याचे प्रकाशकांनी जाहीर केले. हा तर मराठी प्रकाशन विश्वाला बसलेला धक्का होता. मराठीतच काय तर देशभरातील कोणत्याही प्रादेशिक भाषेत एखाद्या पुस्तकाची पहिली आवृत्ती एक लाखापर्यंत विकली गेलेली नाही. हा आकडा वाढत जाईल, ते मराठीतील बेस्टसेलर म्हणून गणले जाईल.

पण मुद्दा तो नाहीये. या कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची तयारी करणारी महाराष्ट्रातून आलेली शेकडो मुले होती. प्रत्येकाच्या डोळ्यात कर्तव्यदक्ष अधिकारी कसा दिसतो, कसा वागतो याविषयी प्रचंड उत्सुकता होती. आकर्षण होतं. इकडे मुंढेंच्या पुस्तकाचे प्रकाशन सुरू असताना देशात जंतर मंतरवर नीट पेपरफुटीवरून तरुणांचे मोठे आंदोलन सुरू होते. या आंदोलनातील तरुणांमध्ये जो व्यवस्थेविषयी संताप, राग आणि अस्वस्थता दिसत होती, त्याचे प्रतिबिंब या संपूर्ण कार्यक्रमात उमटलेले दिसत होते. मुंढे हे आपल्या स्वप्नांना वाट करून देतील, मार्ग दाखवतील, या देशात कायद्याचे राज्य येईल, असा आशावाद या तरुणाईच्या डोळ्यांत दिसत होता. एक व्यक्ती सिस्टीम सरळ करू शकते, असा भाबडा समजही त्यांच्या ठायी दिसत होता. एक प्रकारची हतबलता म्हणा किंवा साचलेपणा म्हणा, पण कोंडीत सापडलेली मुलं कोणीतरी मार्ग दाखवतोय या आशेने येथे आलेली होती. व्यासपीठावर उपस्थित असलेले रंगनाथ पाठारे, राजीव खांडेकर, संग्राम गायकवाड, अशोक मुंढे, संजय नहार आदी मान्यवर वक्तेही जमलेल्या गर्दीमुळे अवाक् होऊन गेल्याचे दिसत होते. लोकशाही सांभाळण्याची प्रत्येकाची जबाबदारी असते याची जाणीव हे वक्ते करून देत होते. वातावरणात एकाएकी गांभीर्य आले होते. मुंढेंसारखा अधिकारी सिस्टिमशी नव्हे, तर सिस्टिमवर कब्जा करून बसलेल्यांविरोधात लढतोय हा सूर अप्रत्यक्षपणे उलगडला जात होता.

**शोध मसिहाचा**

पण, मुद्दा पुन्हा तोच की समाजाला मसिहाची गरज का लागते? समाजाला सदासर्वकाळ एखादा आयडॉल का हवा असतो? अशा आयडॉलमुळे समाजाला वळण मिळते का? तर याचे उत्तर नकारार्थी तर अर्थातच नाही. म्हणूनच तुकाराम मुंढे यांच्याकडे केवळ एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या नजरेने पाहून चालणार नाही. त्यांच्या लोकप्रियतेकडे समाजशास्त्रीय आणि राजकीय दृष्टीने पाहण्याची गरज आहे. ज्या समाजात एखादा अधिकारी नियम पाळतो, भ्रष्टाचाराला आव्हान देतो, नागरिकांशी थेट संवाद साधतो आणि कायद्याची समान अंमलबजावणी करतो, तेथे तो 'अपवाद' ठरतो. आणि अपवाद ठरणाऱ्या व्यक्तीभोवतीच नायकत्वाचे वलय निर्माण होते.

खरा प्रश्न मुंढे यांचा नाही. खरा प्रश्न असा आहे की, आपली प्रशासकीय व्यवस्था अशी कशी आहे की, प्रामाणिकपणा हा सामान्य नियम न राहता अपवाद बनतो आहे? जनतेला प्रत्येक वेळी एखाद्या 'मुंढे'ची वाट का पाहावी लागते आहे? वस्तुतः कायद्याचे राज्य व्यक्तीच्या इच्छाशक्तीवर अवलंबून राहणार असेल, तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. म्हणूनच कायद्याचे राज्य व्यक्तीच्या धैर्यावर नव्हे, तर संस्थांच्या सामर्थ्यावर उभे राहिले पाहिजे, हा खरा मुद्दा आहे.

त्यामुळे तुकाराम मुंढे यांची लोकप्रियता एखाद्या अधिकाऱ्याच्या यशाची गोष्ट नाही; ती आपल्या व्यवस्थेतील अपयशाचीही ठळक नोंद आहे. लोकशाही मूल्य स्वीकारलेल्या समाजाला विश्वासार्ह व्यवस्था हवी असते. पण जेव्हा व्यवस्था विश्वासार्हता गमावते, तेव्हा एखाद्या व्यक्तीमध्येच लोक आपल्या आशा आकांक्षा शोधू लागतात. मुंढे यांच्या सभोवती उभे राहिलेले हे आकर्षण, ही गर्दी आणि हा आशावाद त्यामुळेच दिसतो. तो योग्य की अयोग्य याचे, उत्तर ज्याचे त्याने शोधायला हवे आहे.

**ज्येष्ठ, पत्रकार, लेखक असलेले सुजय शास्त्री हे सध्या लोकमत समूहात वृत्तसंपादकपदी कार्यरत असून, 'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' मासिकाच्या सल्लागार संपादक मंडळाचे सदस्यही आहेत. संपर्क :** sujayshastri@gmail.com

# नव्या जगाची रुपरेषा



डॉ. मोहन द्रविड





**अमेरिकन लोकांना इराणविरोधातल्या लढाईत अजिबात रस नव्हता. इराणपासून–अगदी अण्वस्त्रधारी इराणपासून– अमेरिकेला धोका आहे, या कथनावर अमेरिकन लोकांचा विश्वास केव्हाच बसला नव्हता. म्हणूनच गाझामध्ये झालेल्या नरसंहारामुळे अमेरिकन लोकांचं इस्रायलबद्दलचं मत दिवसेंदिवस खराब होत गेलं. दोन वर्षांत ते ६० टक्के अनुकूलपासून ६० टक्के प्रतिकूलपर्यंत पोचलं. तरुण वर्गात तर ते ८० टक्के प्रतिकूल झालं. पॅलेस्टिनी लोकांबद्दल सहानुभूती दाखवणाऱ्या युनिव्हर्सिटीतल्या विद्यार्थ्यांवर झालेल्या दडपशाहीमुळे तर हा प्रश्न जास्तच चिघळत गेला. कसलाही आगापिछा नसलेला ममदानी हा भारतीय मुसलमान न्यूयॉर्क शहराचा, जिथले ३० टक्के लोक ज्यू धर्मीय आहेत, तिथे महापौर म्हणून निवडून येतो. यावरून अमेरिकन लोकांची ट्रम्प आणि इस्रायल यांवरची संमिश्र चीड कळून चुकते. मात्र, हे सगळं 'टिकटॉक'मुळे होतं, या समजुतीखाली एका ज्यूधर्मीय धनवानाने 'टिकटॉक' काही अब्ज डॉलरना विकत घेतलं. बुडत्याचा पाय खोलात जात राहिला...**

अमेरिका-इराणमध्ये अद्याप धुसफूस सुरू असली तरीही, जुलै महिना संपताना मध्यपूर्वेतील आततायी युद्धाला विराम मिळण्याची चिन्हं अस्पष्ट का होईना, दिसायला लागली आहेत. (पूर्णविराम, स्वल्पविराम की अर्धविराम हे काळ ठरवेल!) इस्रायलला युद्धाची खुमखुमी परिस्थितीनुरुप कमी करावीच लागेल. तशी खुमखुमी जोपासायला लागणारा लष्करी जोश आपल्याकडे असला तरी टिकाऊपणा (Resilience) नाही, याची कल्पना इस्रायली समाजाला आणि सरकारला हळूहळू का होईना, पण यायला लागलेली आहे. इस्रायलने कितीही वल्गना केल्या तरी त्याची मदार ही मुख्यतः अमेरिकेवर असते. शिवाय इस्रायल ते इराण भौगोलिक अंतर असं आवाक्याबाहेरचं आहे की अमेरिका आणि अरब राष्ट्रांच्या मदतीशिवाय इस्रायलची लढाऊ विमानं किंवा क्षेपणास्त्रं इराणपर्यंत पोचू शकत नाहीत. (इस्रायलचं पायदळ खास नाही आणि इराणमध्ये युद्ध करायला पायदळाचा फारसा उपयोग नाही.) इराणच्या मानाने युद्धात इस्रायलचं नुकसान खूप कमी झालं हे खरं असलं तरी इस्रायल हा मुळातच लहान देश आहे, हे लक्षात घेतलं पाहिजे.

**ट्रम्पमहाशय कात्रीत... समर्थक हैराण परेशान**

अमेरिकेतील राजकारणात एक विसंगती ही आहे, की ज्या रिपब्लिकन पक्षात ट्रम्प आहेत आणि ज्या पक्षातल्या अनेक बड्या पुढाऱ्यांचा इस्रायलला जोरदार पाठिंबा आहे, त्यात एक मोठा गट असा आहे की जो पारंपारिकदृष्ट्या ज्यूद्वेष्टा आहे. (हिटलरच्या काळातील ज्यूद्वेष आठवा.) तो गट मोठ्या प्रमाणात ट्रम्प यांच्या विरोधात जायला लागला आहे. अमेरिका फर्स्ट या ट्रम्प यांच्या २०१५ सालापासूनच्या घोषणेविरुद्ध ट्रम्प यांचं स्वतःच वागणं पाहून त्यांनी उभ्या केलेल्या चळवळीतून लोक मोठ्या प्रमाणात बाहेर पडू लागले आहेत. इराणयुद्धानंतर झालेल्या पेट्रोलच्या वाढत्या किंमती आणि आकाशाला भिडलेली महागाई यांनी सर्वसामान्य जनतेसारखे ट्रम्पचे समर्थकही हैराण झाले आहेत.

इराणविरुद्धचं युद्ध चुटकीसारखं संपेल किंवा आपण ते संपवू या भ्रामक कल्पनेवर आधारलेले ट्रम्प यांचे इमले कोसळू लागले आहेत. येऊ घातलेल्या मध्यवर्ती निवडणुका लक्षात घेता ही लक्षणं अडचणीची ठरू लागली आहेत. निवडणुका जशा जवळ येतील तसं ट्रम्पना युद्धापासून लांब राहणं गरजेचं वाटू लागलं आहे. अर्थात त्यासाठी युद्धात विजय झाल्याची घोषणा करणं महत्त्वाचं होतं. अशा घोषणा ट्रम्पनी एकदा दोनदा नाही तर सदतीस वेळा केल्या. (असं हा हिशेब ठेवणाऱ्या पंडितांचं म्हणणं आहे.) तरीसुद्धा या चिखलात रुतलेला त्यांचा पाय बाहेर काढणं त्यांना कठीण गेलं. शेवटी त्यांनी ज्या प्रकारे कोलांटउडी मारून आपली सुटका करून घेतली ते पाहून सर्व जग आश्चर्यचकित झालं!

दोन दिवसांत संपवायची या ईर्षेने चालू केलेल्या लढाईला तीन महिने झाले. युद्धाच्या उद्दिष्टांपासून अमेरिका अधिकाधिकच लांब जात चालली होती. तेव्हा युद्धसमाप्तीकडे ट्रम्पसाहेबांचे डोळे लागले. आता मूळ प्रश्नांची उजळणी करणे आले. युद्धाआधीचे आणि युद्धानंतरचे मिळून दहा प्रश्न आहेत. १) इराणची अणुशक्तीची वाजवी मागणी, २) इराणची गोठवलेली मालमत्ता, ३) इराणवर टाकले गेलेले आर्थिक आणि व्यापारी निर्बंध, ४) अमेरिकेचे पश्चिम अशियातील लष्करी तळ, ५) इराणचे हेजबोल्लासारखे छोटे शिलेदार, ६) इराणकडे असलेली क्षेपणास्त्रे, ७) यापुढे युद्ध होणार नाही याची हमी, ८) या युद्धात झालेली अब्जावधी डॉलरची नुकसानभरपाई कोण आणि कशी करणार? ९) नवीन सुरक्षारचना, १०) हॉर्मुझ आखाताचं भवितव्य.

या प्रश्नांची तजवीज कशी लावायची, हे स्पष्ट झालं नसलं तरी त्या दिशेने वाटचाल झाली आहे. यात अमेरिका हरली किंवा ट्रम्पनी शरणागती पत्करली असं म्हणणं अप्रस्तुत ठरावं. अमेरिका ही एक परिपूर्ण महासत्ता आहे. तिच्याकडे इराणच काय पण सर्व जग संपवायची ताकद आहे. अविचाराने चालू केलेल्या युद्धामुळे अमेरिकेला नामुष्की स्वीकारावी लागत आहे, एवढंच काय ते. ती सयंमाने वागते, याचं सर्वांनी कौतुक केलं पाहिजे. इराण हा काही नराक्षस नाही आणि इतर राष्ट्रांसारखे त्यालाही अधिकार आहेत, हे ट्रम्पनी उशीरा का होईना, पण एकदा मान्य केलं असल्यानं बरेचसे प्रश्न आपणहून सुटणार आहेत.

**फुसकुलीबहाद्दर ट्रम्पांची उद्दिष्टपूर्तीसाठी लगबग**

इराणसाठी लागणारी अणुशक्ती हा पहिला प्रश्न. तो प्रश्न पुढच्या वाटाघाटीत घ्यायचं ठरलं आहे. अणुशक्तीसाठी लागेल तेवढ्याच शक्तीचं - म्हणजे साधारण ४ टक्के किंवा कमी - युरेनियम ठेवावं असा तोडगा दोन्ही बाजूंना मान्य होईल असं दिसतंय. संवर्धित युरेनियमचा त्याग करण्याच्या बदल्यात इराणची गोठवलेली मालमत्ता हळूहळू सोडण्यात येईल. इराणची गोठवलेली संपत्ती अमेरिकन धान्याच्या रूपाने देऊ अशी एक फुसकुली मध्यंतरी ट्रम्पनी सोडली होती (एका



*युद्धखोर इस्रायली पंतप्रधान नेतन्याहूंनी फूस दिल्यानंतर जगाचा चेहरामोहरा बदलून टाकायचा आणि तो आपल्याला हवा तसा बदलायचा या हव्यासापोटी, ट्रम्प प्रत्यक्षात जगातली अमेरिकेची पत झपाट्याने कमी करत आहेत...*

दगडात दोन पक्षी!). पण इराणला हा पर्याय मान्य नाही. शिवाय, इराणवर टाकले गेलेले निर्बंध सैल करण्यात येतील. (नाही तर इराण चीनच्या अधिकच कक्षेत जाईल, ही भीती अमेरिकेला आहेच.) यामुळे अमेरिकेच्या पश्चिम अशियातील लष्करी तळांचा प्रश्न आपणहून सुटणार आहे. त्यांचा ना अमेरिकेला उपयोग ना अरब राष्ट्रांना.

पाचवा प्रश्न इराणच्या गाझामधील हमास आणि लेबनॉनमधील हेजबोल्लासारख्या छोट्या शिलेदारांचा. त्यांना दिलेलं कवचकुंडल इराण कोणत्याही परिस्थितीत काढून घेणार नाही. या मित्रनिष्ठेतून इराणची नैतिक प्रतिष्ठा अनेक पटीने वाढणार आहे. पण ही बाब इस्रायलला पटवणे विशेष कठीण जाणार आहे, कारण 'विशाल इस्रायल' हे त्या देशाचं धार्मिक कर्तव्य आहे, अशी त्या देशातील लोकांची भावना आहे. या नवीन प्रांतांना पौराणिक नावं त्यांनी दिलेली आहेत. उदाहरणार्थ; वेस्ट बँकला समारिया. पण होऊ घातलेल्या युद्धबंदीतील अटीप्रमाणे लेबनॉनवर हल्ला झाला, तर त्याच्या मदतीला जायला इराण आणि अमेरिका बांधले गेलेले आहेत.

पुढचा प्रश्न इराणकडे असलेल्या क्षेपणास्त्रांचा. कोणत्याही परिस्थितीत त्यांची संख्या मर्यादित ठेवायला इराण इतर स्वाभिमानी राष्ट्रांसारखा तयार होणार नाही. क्षेपणास्त्रं सगळ्यांकडे आहेत, सौदी अरोबियाकडेसुद्धा आहेत, असं ट्रम्पसाहेब स्वतःच म्हणाले आहेत. तेव्हा तिथे मोठी समस्या दिसत नाही. युद्धात झालेली अब्जावधी डॉलरची नुकसानभरपाई हा पुढचा प्रश्न. इराणचं ३०० अब्ज डॉलरचं नुकसान झालं आहे, असा त्या देशाचा दावा आहे. सहसा नुकसानभरपाई ज्या राष्ट्राने युद्ध चालू केलं किंवा जे राष्ट्र हरलं त्याने करायची असते. त्या तत्त्वाप्रमाणे ही जबाबदारी अमेरिका-इस्रायल या जोडगोळीची राहील. पण हे देश ती जबाबदारी झटकून टाकायचा प्रयत्न करतील, यात शंका नाही. तो प्रश्न सोडवायचे दोन पर्याय सध्या समोर दिसताहेत.

**पळपुटे लक्ष्मीधर**

पहिला पर्याय म्हणजे, ही जबाबदारी त्या क्षेत्रातल्या लक्ष्मीधरांवर टाकायची. हे लक्ष्मीधर म्हणजे गडगंज पैसा असलेली पण पळपुटी अशी अरब राष्ट्र. सौदी अरेबिया आणि अमिराती या फक्त दोन देशांचं मिळून वार्षिक उत्पन्न ३०० अब्ज डॉलरच्या आसपास आहे. तेव्हा नुकसानभरपाईचा प्रश्न या एका मार्गानेसुद्धा सहज सुटण्यासारखा आहे. दुसरा पर्याय म्हणजे, हॉर्मुझ आखातातील जहाजांवर जकात आकारायची. यातून रशिया आणि चीन यांना इराण नक्की सूट देईल. तेव्हा तो भार बाकीचे आशियाई आणि युरोपीय देश यांच्यावर पडणार आहे.

आणखी एक प्रश्न म्हणजे, असं आक्रमण आणि असं युद्ध पुन्हा होऊ नये याकरता सुरक्षारचना कशी करायची? असली कामं खरं म्हणजे संयुक्त राष्ट्राची (युनायटेड नेशन्स). पण इतकी वर्षं या संस्थेचा इतका दुरुपयोग झाला आहे आणि तिच्याकडे इतकं दुर्लक्ष झालं आहे, की ही कामं करायला तीही विसरली असेल! तिला पुनरुज्जीवन द्यायची ही एक चांगली संधी आहे. इस्रायल आणि लेबनॉन यांच्या सीमेवर यूनोची फौज आहे, पण तीत काही दम नाही. इस्रायलचं सैन्य तिला माशीसारखे झटकून टाकते. तिथे यूनोच्या देखरेखीखाली चीन, रशिया, अमेरिका अशा मजबूत देशांच्या फौजा एकत्र ठेवता येतील. तशीच योजना गाझा आणि इस्रायल यांच्या सीमेवर करता येईल. अर्थात त्याकरता पॅलेस्टिनी लोकांना त्यांचं राज्य दिलं पाहिजे. ते राज्य द्यायला इतकी वर्ष अमेरिका (इस्रायलच्या साथीने) विरोध करत होती. ट्रम्पसाहेबांच्या नवीन पवित्र्यामुळे स्वतंत्र पॅलेस्टिन राज्य व्हायची शक्यता खूप वाढली आहे.

**इतिहासाला कलाटणी**

इराणी आखातीवरील नियंत्रण हा नवीन प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः हॉर्मुझ या ठिकाणी ती फार चिंचोळी होत असल्याने तिच्यावर इराण (ओमानच्या सहकाराने) हक्क सांगू शकतो आणि जकात टाकू शकतो. अमेरिकेला ते अजिबात पसंत नाही. हॉर्मुझवर ताबा इराणचा पण जकात आकारायची नाही, असा एक तोडगा निघू शकतो. तरीसुद्धा या युद्धानंतर अमेरिकेची जगातील पत कमी होणार यात शंकाच नाही. ताज्या बातमीनुसार सदा आक्रमणाच्या पवित्र्यात असलेल्या अमेरिकेने त्या भागातलं सैन्य मागे घेणं चालू केलं आहे. इस्रायलची दादागिरीही कमी होणार आहे. या घटनांमुळे पश्चिम अशियात काही काळ तरी शांतीचं राज्य चालू होईल, अशी आशा आहे.

इराणयुद्ध इतिहासाला कलाटणी देणारी महत्त्वपूर्ण घटना ठरणार आहे. खुद्द इराण ही चौथी महासत्ता म्हणून गणली जाणार आहे. जगही मोठ्या संक्रमणातून जाणार आहे. यात होणाऱ्या बदलांपैकी एक म्हणजे, अरब राष्ट्र, इराण (पॅलेस्टाइन, येमन, लेबनॉन यांसह), तुर्कस्तान, पाकिस्तान आणि एखादे वेळेस अफगाणिस्तान यांचा एक शक्तिमान इस्लामी गट तयार होईल. (यांच्यात पॅलेस्टिनी आणि लेबनीझ ख्रिश्चनही मोठ्या संख्येने असतील.) पाकिस्तानला पहिल्यापासून मध्यपूर्वेचे आकर्षण आहे, भारतीय उपखंडाचं नाही. पाकिस्तानचं राष्ट्रगीत उर्दूपेक्षा फारसी भाषेत जास्त आहे. लोकसंख्या आणि लष्करी बळ या दोन गोष्टीत तो या भागात सर्वांच्या पुढे आहे आणि अणवस्त्रधारी आहे. इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात झालेल्या तडजोडीत पाकिस्तानने घेतलेला भाग बघून त्याचं राजकीय वजन वाढलेलं आहे. पण पैशाने तो कंगाल आहे आणि ती त्याच्या दृष्टीने एक कमतरतेची बाब आहे.

एका अर्थी पर्शियन आखातातील श्रीमंत अरब राष्ट्रं आणि पाकिस्तान एकमेकांना पूरक आहेत. सौदी अरेबियाच्या सैन्यात मोठ्या प्रमाणात (१३,०००) पाकिस्तानी सैनिक आहेत. सौदी अरेबियाचं वायुदल पाकिस्तानच चालवतं. दोन्ही देशांत झालेल्या २०२५ साली झालेल्या संरक्षण कराराप्रमाणे कोणत्याही एकावर हल्ला झाला, तर दुसऱ्याने स्वतःवर हल्ला झाला असं समजून मदतीला धावलं पाहिजे, असं बंधन आहे. अरब राष्ट्रांत एकमेकांत मतभेद आहेत हे खरं आहे. पण तिथली बरीचशी चिल्लरपिल्लर राष्ट्र या युद्धानंतर अमेरिकेच्या वरदहस्ताशिवाय कुचकामी झालेली दिसतील. त्यांचं वैयक्तिक अस्तित्व कितपत टिकेल हीच शंका आहे.

तुर्कस्तानसुद्धा या गोटात चपखल बसेल. आज नेटो या लष्करी संघटनेत तो अमेरिकेच्या खालोखाल बलवान देश समजला जातो आणि लष्करी बळात तो या भागात पाकिस्तानच्या खालोखाल समजला जातो. पंधरा ते विसाव्या शतकात त्याचं साम्राज्य अशिया, आफ्रिका आणि युरोप खंडांत पसरलं होतं. त्याची गुर्मी या देशाला अजूनही आहे. पण पाकिस्तानसारखी त्याचीही आर्थिक बाजू लंगडी आहे. म्हणून तीस वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतरसुद्धा त्याला युरोपीयन संघात (EU) प्रवेश मिळालेला नाही. त्याच्या राजकीय भूमिकेत सातत्य नाही, हेही त्यामागचं कारण असू शकेल. त्याची पाकिस्तानबरोबर गेली अनेक वर्ष चांगली गट्टी जमली आहे. भारत-पाकिस्तान वादात त्याने पाकिस्तानची बाजू नियमितपणे उचलून धरली आहे.

**चीनच्या हातात जगाच्या नाड्या**

हे खरं असलं तरी या इस्लामी गटात स्वतःच्या गुरुत्वाकर्षणाने सर्वांना एकत्र ठेवू शकेल, असा एकही मोठा आणि सामर्थ्यवान देश नाही. (पूर्वी अमेरिका होता.) अमेरिका-इराण युद्धामुळे चीनचं (आणि चीनचं चलन युवानचं) महत्त्व प्रचंड वाढलं आहे. त्यामुळे चीन, अमेरिकेप्रमाणे, बाहेर राहूनसुद्धा ही भूमिका बजावू शकेल. युक्रेनयुद्धाच्या वेळी तेलाच्या किंमती बॅरलमागे २०० डॉलर इतक्या कडाडल्या होत्या. तेलाच्या किंमतीवर इराणयुद्धाचा परिणाम यापेक्षा अनेक पटीने होईल असा अंदाज जाणकार करत होते. पण चीनने तेलाची आयात संपूर्ण बंद केली आणि चढत्या किंमतीला ब्रेक लावला, असं सीएनएनसारख्या अमेरिकन वृत्तसंस्थेलासुद्धा मान्य करावं लागलं आहे. असं करणं चीनला शक्य होतं. याचं कारण चीनमध्ये आता निम्म्याहून अधिक वाहने विजेवर चालतात. (आता विजेवर चालणारी कंटेनर जहाजं चीनने बांधली असून ती आता वापरात आली आहेत!) यापुढे जगातील तेलाच्या किंमती चीन ठरवणार, असं दिसतंय.

**इस्रायलचा पचका**

चपळ, वेगवान आणि आधुनिक सैन्याबरोबर इस्रायलचा दुसरा हुकुमाचा पत्ता म्हणजे, त्याची प्रभावी प्रचारयंत्रणा. हिब्रू भाषेत 'हासबॅरा' असा एक शब्द वापरला जातो. त्यात प्रचाराव्यतिरिक्त अनेक गोष्टी येतात. पाश्चात्य देशातील निवडणुकांत हस्तक्षेप. त्यांत अमाप पैसा खर्च करणं हा एक भाग झाला. मतमोजणीसाठी वापरत असलेल्या सॉफ्टवेअरमध्ये ठकबाजी हा दुसरा भाग. राजकारण्यांना इस्रायलच्या सहली, इस्रायलच्या पुढाऱ्यांना

अमेरिका व युरोपच्या सहली. अप्रगत देशांत पैशाची पेरणी. चित्रपट व्यवसायावर अंमल. हिटलरने केलेल्या जुलूमाचं सतत भांडवल. इराणबरोबरचं हे मिलहेमत मित्सवा (हिब्रू भाषेत जिहादी युद्ध) ज्यूंच्या दृष्टीने शेवटची संधी होती. या सर्व व्यापात इस्रायलच्या वाट्याला संपूर्ण निराशा आली आहे.

मध्यपूर्वेतील राष्ट्र एकत्र येत असताना जगाच्या सारीपाटावरील युरोपचं महत्त्व कमी होतंय. युक्रेनप्रकरणात युरोपनं स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. रशियाकडून मिळणारं स्वस्त तेल बंद झाल्याने, काही मोजके देश वगळता, सर्व देशांचा उर्जेवरील खर्च जबरदस्त वाढला आहे. रशिया-युक्रेन युद्धात दोनशे अब्ज युरोपेक्षा अधिक खर्च झाला आहे. तो कमी होण्याची चिन्हं दिसत नाहीत. त्याप्रमाणात स्वतःच्या देशांकडे दुर्लक्ष झालं आहे. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी (EU3) हे युरोपमधले दादा देश. त्यांच्या देशप्रमुखांची लोकप्रियता तळाला गेली आहे. दुर्दैवाने तिथे जातीयवादी पक्ष डोकं वर काढायला लागले आहेत. (ते फक्त मुसलमानांविरुद्ध आहेत, अशा समजुतीखाली आपले लोक टाळ्या वाजवतात. खरी परिस्थिती अशी आहे की त्यांच्या दृष्टीने सर्व काळे सारखेच.)

**युरोपची सातत्यपूर्ण वाताहत**

युरोपच्या ऱ्हासावर गेल्या वर्षी २०२५ मध्ये 'मुक्त संवाद'च्या एप्रिल, मे आणि जूनच्या अंकांमध्ये मी अनुक्रमे जर्मनी, फ्रान्स आणि ब्रिटन या देशांवर लेख लिहिले होते. आता ब्रिटनमधले स्टार्मर गेले. ब्रिटनने नुकताच एक नवीन पंतप्रधान नेमला आहे. गेल्या दहा वर्षांतला हा सहावा पंतप्रधान. त्याच्यात आणि स्टार्मर यांच्यातला फरक काढायला सूक्ष्मदर्शक लागेल. एप्रिल महिन्याच्या अंकात जर्मनीतील व्होक्सवॅगन या वाहने बनवणाऱ्या सुप्रसिद्ध कंपनीला लागत असलेल्या ग्रहणाबद्दल लिहिलं आहे. आता आलेल्या बातमीवरून व्होक्सवॅगन चार कारखाने बंद करणार आहे आणि तिथले पन्नास हजार आणि बाकीच्या कारखान्यातील पन्नास हजार अशा एक लाख कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करणार आहे. व्होक्सवॅगनच्या शेअरहोल्डर्सनी कारखाने चीनमध्ये हलवायची सूचना केली आहे.

EU3 या देशांची जगातील पत नगण्य झाली आहे. युनोच्या सुरक्षा समितीच्या सभासदत्वासाठी जून महिन्यात झालेल्या निवडणुकीत जर्मनीचा उमेदवार युनोची स्थापना झाल्यापासून पहिल्यांदा हरला. युनोला पुरवण्यात येणाऱ्या निधीत जर्मनीचा अमेरिकेनंतर दुसरा क्रमांक लागतो. युरोपसाठी असलेल्या दोन जागांसाठी जर्मनी, पोर्तुगाल आणि ऑस्ट्रिया उभे होते. त्यात पोर्तुगाल आणि ऑस्ट्रिया यांना साधारण १३५ तर जर्मनीला १०३ मतं मिळाली. जर्मनीच्या या दारूण पराभवात रशियाचा हात होता, हे उघडच आहे. पश्चिम आफ्रिकेतल्या अनेक देशांनी रशियाबरोबरचे संबंध दृढ करून फ्रान्सबरोबरचे राजनैतिक संबंध तोडायला सुरुवात केली आहे.

अमेरिका आणि इतर गौरवर्णीय राष्ट्र तसंच अमेरिका आणि जपान यांच्यात दुरावा येताना दिसत आहे. त्यांच्यातील व्यापारी संबंध ताणले गेल्यासारखे वाटतात. जकातयुद्धानंतर झालेले करार अजून कागदावर आलेले नाहीत आणि मंजूरही झालेले नाहीत. नेटो ही लष्करी संघटना संपुष्टात येण्याची चिन्हं दिसत आहेत. ट्रम्पसाहेब म्हणतात, त्याप्रमाणे अमेरिकेला जेवढी त्यांची गरज आहे त्यापेक्षा त्यांना अमेरिकेची गरज जास्त आहे. अमेरिकेचे हे जुने साथीदार नवीन तंत्रज्ञानात चीन आणि अमेरिकेच्या मानाने पार लांब फेकले गेलेले आहेत. जपानच्या येनने मागील चाळीस वर्षातील नीचांक गाठला आहे. जुलै २०२२च्या 'मुक्त संवाद' अंकात जपानी येन घसरगुंडीवर हा लेख लिहिला होता तेव्हा एका डॉलरला १३३ येन हा दर होता, तो आता १६२ येन झाला आहे. या युद्धानंतर चीन आणि रशिया यांचं प्रभुत्व वाढणार तर आहेच आणि त्यांचा ब्रिक्स गट अपेक्षेइतका मजबूत झाला नसला, तरी तो आर्थिकदृष्ट्या संपूर्ण स्वावलंबी झालेला आहे. दुर्दैवाने, या सर्व घडामोडींत भारत संपूर्ण निष्क्रिय झाल्यासारखा आहे. अशाने भारताचं जगातलं वजन वाढायला किंवा जागतिक राजकारणातील भारताचा भाग वाढायला फारशी मदत होणार नाही. आपण जी-सेव्हनच्या संमेलनाला जाणं हे श्रीमंतांच्या समारंभाला आश्रितानं जाण्यासारखं आहे. त्यामुळे आपली प्रतिमा फार उंचावण्यास मदत होणार नाही. थट्टा झाली नाही म्हणजे, परवडलं.

इराणयुद्धानंतर अमेरिका आणखी एका युद्धाच्या फंदात सध्या तरी पडणार नाही. एका विनोदी लेखकाने म्हटलं आहे, की अमेरिकन लोकांना जगाचा भूगोल समजावा म्हणून ईश्वराने युद्धाची निर्मिती केली आहे. गेल्या तीस वर्षांत भूगोलाचे भरपूर धडे झाले असल्याने, आता अमेरिकेने सुट्टी घ्यावी, हे इष्ट!

**लेखक संपर्क : ९८२०५ ६३१३०**

# नागरिकांना ‘सरळ’ करण्याचे अस्त्र



रवि आमले

पाळतशाहीच्या पाऊलखुणा – ८




सर्वसामान्य, पापभीरू नागरिकांच्या मनात सत्तेचे भय असते. ते स्वाभाविकच. पण सत्ताही – खासकरून राजकीय सत्ता – सामान्य नागरिकांना घाबरत असते. वरवर पाहता हे म्हणजे, बंदुकधारी शिकाऱ्याने सशाला घाबरण्यासारखे झाले. पण ते तसे नाही. कारण अमेरिकेइतका दुसरा नवतावादी देश नाही हे विधान जितके खरे आहे, तितकेच अमेरिकेइतका कारस्थानी देशही दुसरा नाही, हे ही विधान तितकेच खरे आहे. किंबहुना, परदेशांविरोधातच नव्हे, तर आपल्याच नागरिकांविरोधात घृणास्पद कारस्थाने रचणाऱ्यांत अमेरिकेला तोड नाही. मात्र, या कारस्थानांना उघड करण्याचे मेकॅनिझम तिथल्या व्यवस्थेने कालानुक्रमे विकसित करत नेले आहे. त्यातूनच पाळतखोर शासकांचे पितळ उघडे पडत गेले आहे...

**ना**गरिक आणि राजकीय सत्ता यांच्यातला हा एक वेगळाच सत्ताबंध आहे, 'पॉवर रिलेशन' आहे. आपल्या हे लक्षात येत नाही, की सत्ता अंतिमतः टिकून असते ती नागरिकांच्या बळावर. हे केवळ लोकशाहीतच घडते असे नाही. हुकूमशाहीत, झालेच तर लोकशाहीचा गमछा घातलेल्या एकाधिकारशाहीतही तसेच असते. या शहांनाही नागरिकांकडून 'मान्यता' – लेजिटिमसी – हवी असते. त्यांच्या सत्तेला नागरिकांचे 'सँक्शन' – सहमती – हवी असते. म्हणून मग ते निवडणुका घेतात. निवडून यायची खात्री असेल, तर विरोधकांना 'असू' देतात. काही हुकूमशहा अतिशय चलाख असतात. त्यांच्याकडे काही कठपुतळ्या असतात. त्यांनाच ते विरोधक म्हणून उभे करतात. पण केवळ निवडणुका जिंकणे हेच त्यांना पुरेसे नसते. त्यांना हवी असते, लोकमान्यता आणि वैधता. त्यासाठी त्यांच्याकडे अनेक मार्ग असतात. धर्मवाद, अतिरेकी राष्ट्रवाद, अराजकतेचे भय, ते विरुद्ध आपण अशा द्वंद्वाची निर्मिती आणि हे करणारा प्रोपगंडा हे तर मार्ग झालेच. पण ते नागरिकांना लाभार्थी बनवतात. रेवड्या वाटतात. हे मतांसाठी असते, असे वाटते अनेकांना. परंतु मतप्राप्ती हा त्यातला एक भाग झाला. त्यांना हवी असते, लोकमान्यता. रशियातील पुतीन हे त्याचे आजचे सर्वोत्तम उदाहरण. देशोदेशीच्या गावठी पुतीनांचेही मासले आपल्या समोर आहेतच.

**भयग्रस्त सत्ता**

पण असे सर्व मार्ग चोखाळले तरी सगळेच नागरिक काही महिषीपुत्र नसतात. सगळेच पत्रकार काही सरीसृपवंशीय नसतात. ते प्रश्न विचारतात. काही नागरिक विचार करतात. सरकारी धोरणांना, निर्णयांना विरोध करतात. समाजात बदल घडवून आणण्यासाठी आपापल्यापरीने प्रयत्न करतात. हे असे विचार करणारे, प्रश्न विचारणारे लोक सत्तेला आवडत नसतात. त्याची कारणे अनेक. हुकूमशहा, एकाधिकारशहा यांच्यात एक विकृती असते. आपण अवतारी आहोत. समाजाच्या, राष्ट्राच्या उद्धारासाठी आपला जन्म झालेला आहे, असा भ्रम झालेला असतो त्यांना. अहंगंड तर असतोच. ते 'नार्सिसिस्ट' – आत्मप्रेमीही असतात. त्यामुळे आपण या प्रजेसाठी जे काही करतो आहोत, ते योग्य आणि पुरेसे आहे. त्याउपर ते जर प्रश्न विचारणार असतील, विचार-बिचार करणार असतील, तर ते चुकीच्या मार्गावर जातील. मुळात या मर्त्य मनुष्यांनी आपणांस प्रश्न विचारावा हा आपला अपमान आहे. आपण काही त्यांना उत्तरदायी नाही. ही त्यांची मनोमन भावना असते. वरवर ते जनतेस 'जनार्दन'ही म्हणतील. प्रसंगी पादप्रक्षालन करतील लोकांचे. पण ते नाटक असते. ते लोकांना केवळ भुलवणे असते. त्यातूनही अनेकदा त्यांच्या मनातील सामान्य लोकांप्रती असलेला तिरस्कार लपून राहत नाही. ते लोकांचा तिरस्कार करतात, कारण त्यांना याची जाणीव असते, की आपण असे अवतारी वगैरे असूनही आपल्या सत्तेला याच सामान्य लोकांची सहमती आवश्यक आहे. हे अवलंबित्व डाचते त्यांना. सत्तेला लोकांचे भय वाटते, त्याचे हे एक कारण आहे. जनतेची मेंढरे करण्याचे अनेक मार्ग त्यांना अवगत असतात. विचारी नागरिकांनाही सूतासारखे सरळ करण्याचे एक अस्त्र त्यांच्याकडे असते. ते म्हणजे पाळतखोरी. गरजेनुसार कमी अधिक प्रमाणात ते वापरले जाते. हे केवळ हुकूमशहाच करतात असे नाही. लोकशाही राष्ट्रांतही ते चालवले जात असते. ते कसे, याचे उत्तर 'चर्च समिती'च्या अहवालाद्वारे अमेरिकी इतिहासाने मागेच देऊन ठेवलेले आहे.

**गुप्तचरांचीही झाडाझडती**

ही अमेरिकी सिनेटची सिलेक्ट समिती. तिचे अध्यक्ष होते, सिनेटर फ्रँक चर्च. पत्रकार सेम्युर हर्श यांनी उघड केलेले सीआयएचे पाळतकांड, पेरी फेलवॉक या तरुणाने फोडलेले एनएसएच्या कारवायांचे भांडे, तत्पूर्वी ख्रिस्तोफर पाएल या लष्करी गुप्तचराने केलेला नागरिकांवरील लष्कराच्या पाळतखोरी कार्यक्रमाचा पर्दाफाश आणि या सगळ्यामुळे अमेरिकेत उठलेले वादळ या पार्श्वभूमीवर सिनेटने या समितीची स्थापना केली होती. तिच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली होती गुप्तचर आणि अन्य सरकारी यंत्रणांनी काही बेकायदेशीर, अयोग्य आणि अनैतिक कारवाया तर केलेल्या नाहीत ना, याची चौकशी करण्याची. या समितीने त्यानुसार वर्षभर विविध गुप्तचर यंत्रणांची कसून चौकशी केली. त्याचा अंतिम अहवाल १९७६ मध्ये सादर केला. (तत्पूर्वी, १९७५ मध्ये या समितीने एक अंतरिम अहवाल सादर केला. त्याचे शीर्षक होते – 'परदेशी नेत्यांच्या हत्येची तथाकथित षड्यंत्रे'. भारतातील त्या आणीबाणीपूर्व काळात इंदिरा गांधी परकीय हाताविषयी जे बोलत होत्या, त्यावर शिक्कामोर्तब करणारा हा अहवाल.) समितीचा अंतिम अहवाल अनेक भागांत होता. त्यातला पहिला भाग होता परदेशातील हेरगिरी आणि लष्करी

हेरगिरीविषयीचा. हेरगिरी आणि तीही लष्करातर्फे करण्यात आलेली म्हटल्यावर तिच्या चौकशीचे नाव काढताच तोबा तोबा केले जाईल, एखाद्या कुडमुड्या लोकशाहीत. अमेरिकेत मात्र लष्कर, गुप्तचर या यंत्रणांना पवित्र गाय वगैरे मानण्याची पद्धत नाही. त्यांनाही 'चेक्स अँड बॅलन्स' हे तत्त्व लागू असते तेथे. समितीच्या अंतिम अहवालाचा दुसरा भाग होता, 'गुप्तचर कारवाया आणि अमेरिकी नागरिकांचे हक्क' यांविषयीचा. त्यातून जे चित्र समोर आले, ते भयावह होते. खुले अधिकार असलेली सरकारची कोणतीही यंत्रणा आणि बिनवेसणीचा माजलेला वळू यांत फरक नसतो हेच त्यातून अधोरेखित होत होते. आणि यामुळेच हा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्यातील अडचणीचा भाग गाळून टाकण्याचा रीतसर प्रयत्न तेथे झाला होता. तो करणारे होते, राष्ट्राध्यक्ष जेराल्ड फोर्ड. त्यांनी सिनेटला तशी विनंती केली. मुद्दे नेहमीचेच आणि सर्रास यशस्वी ठरणारे होते, की या अहवालातून गुप्तचरांचे माहीत स्रोत आणि पद्धती उघड होतील. सध्याच्या चालू हेरमोहिमांवर परिणाम होईल. आणि सर्वांत भारी म्हणजे यामुळे परराष्ट्रांशी असलेले आपले संबंध खराब होतील. पण सिनेटने त्याला भीक घातली नाही. अगदीच संवेदनशील होतील अशा बाबी गाळून वा 'रिडॅक्ट' म्हणजे त्यावर काळी शाई फासून ते अहवाल बव्हंशी जसेच्या तसे प्रसिद्ध करण्यात आले.

या अहवालातून समोर येणारी भयावह बाब होती ती ही, की सरकारच्या सगळ्याच यंत्रणा घटनेची, कायद्याची कोणतीही पर्वा न करता राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली सामान्य नागरिकांवर पाळत ठेवीत होत्या. आता कू-क्लक्स क्लॅन, ब्लॅक पँथर पार्टी यांसारख्या हिंसक गटांवर नजर ठेवणे वेगळे. ते आवश्यकच. पण देशाला कम्युनिस्टांचा धोका आहे, युद्धविरोधी लोकांपासून धोका आहे, असे म्हणत तेथील डावे, शांततावादी नागरिक, त्यांच्या संघटना, गट यांवरही सरसकट पाळत ठेवण्यात येत होती. अनेकांना अटकेत टाकण्यात येत होते. अनेकांची आयुष्ये उद्ध्वस्त करण्याचे उपद्व्याप केले जात होते. हे करणाऱ्या एनएसए, सीआयए, एफबीआयसारख्या गुप्तचर यंत्रणा होत्या आणि त्यांची शिकार होणारे लोक कोण होते? राजकीय नेते, कार्यकर्ते, गायक, अभिनेते, प्राध्यापक, शिक्षक, नोकरदार आणि त्यांचे कुटुंबीय. हे लोक राजकीय हेतूंनी सरकारी धोरणांना, निर्णयांना विरोध करीत असले, तरी तो काही गुन्हा नव्हता. ते लोक डाव्या विचारांचे असले, तरी तोही काही गुन्हा नव्हता. एफबीआयने अशा लोकांवरही पाळत ठेवली होती. त्या 'ऑपरेशन'चे नाव होते 'को-इंटेल-प्रो' (काऊंटर इंटेलिजन्स प्रोग्राम).

**पाळतशाहीचे कुटीलोद्योग**

येथे प्रश्न असा येतो, की या सामान्य नागरिकांवर पाळत ठेवली, तरी त्यातून साध्य काय होणार? तिचे उद्दिष्ट काय? ती व्यक्ती कायदे पाळत असेल, नियमांनी चालत असेल, हिंसक कारवायांत तिचा सहभाग नसेल, तर पाळत ठेवून तिला 'सरळ' करायचे म्हटले, तरी ते कसे करणार? हे पाहण्यासाठी चर्च समितीने नोंदवलेली काही उदाहरणे पाहावी लागतील. त्यातले हे एक उदाहरण एका पती-पत्नीचे. ही पत्नी सामाजिक कार्यकर्ती. समाजातील वर्णविद्वेष नाहीसा व्हावा म्हणून झटणाऱ्या काळ्या-गोऱ्यांचा एक गट होता. त्यात ती काम करत असे. त्यावरून तिचा पती जरा काळजीत असायचा. एके दिवशी त्याला एक निनावी पत्र आले. त्यात लिहिले होते - 'मला वाटतं, तुझ्या बायकोचं घरी भागत नसावं. नाही तर ती इथं आमच्या काळ्या पुरूषांशी कशाला लगट करत बसली असती?' १९ जून १९७० रोजी सेंट लुईस फिल्ड ऑफिसमधून एफबीआयच्या मुख्यालयास पाठवण्यात आलेल्या अहवालात म्हटले आहे, की 'या पत्राचा अपेक्षेनुसार परिणाम झाला आहे. टार्गेट आणि तिचा पती हे विभक्त झाले आहेत.' ते निनावी पत्र अर्थातच एफबीआयने पाठवले होते.

असाच प्रकार घडला होता एका कृष्णवर्णीय कार्यकर्त्याबाबत. तो काळ्यांच्या हक्कांसाठी लढणारा. त्याच्या पत्नीला एक निनावी पत्र आले, की 'तुझ्या पतीचे संघटनेतील काही स्त्रियांशी संबंध आहेत. त्या स्त्रिया अंथरूणात तुझ्याहून किती चांगल्या आहेत, असे तो आम्हाला सांगत असतो.' हे पत्र एफबीआयच्या सेंट लुइस फिल्ड ऑफिसमधून गेले होते. हे असे उद्योग अविचाराने केलेले नसतात. त्यामागे विशिष्ट योजना असते. पती-पत्नीचे वैवाहिक संबंध कसे आहेत, त्यातील कोणी संशयी वृत्तीचे आहे का, धार्मिक प्रवृत्तीचे आहे का, निनावी पत्रांचा त्यांच्या संबंधांवर परिणाम होऊ शकतो का, अशा गोष्टी आधीच विचारात घेतलेल्या असतात. त्या कृष्णवर्णीय कार्यकर्त्याच्या पत्नीला 'तुझा पती व्यभिचारी आहे' असे निनावी पत्र पाठवण्यापूर्वी, ती स्त्री तिच्या पतीशी एकनिष्ठ आहे, समाजात तिला मान आहे, ती हुशार आहे, ती चर्चच्या कार्यक्रमांत




*कोणत्याही सत्तेला त्यांची जागा दाखवून देणारे विरोधक पसंत नसतात. अमेरिकेत जेव्हा ब्लॅक पँथर चळवळ आकार घेऊ लागली, तेव्हा असेच घडले. मुक्तीचे स्वप्न दाखवणाऱ्या या चळवळींतल्या नेत्या-कार्यकर्त्यांना जेरबंद करण्यासाठी अमेरिकी तपास यंत्रणांनी माणुसकीला लाज आणणारे वर्तन केले...*

उत्साहाने सहभागी होत असते, अशी माहिती एफबीआयला होती. तिच्या फिल्ड ऑफिसने पाठवलेल्या अहवालात ती नोंदवलेली होती. एफबीआयला हे कसे समजले? अर्थातच पाळतीतून.

हे सामान्यच नागरिक होते. आणि तरीही त्यांना एफबीआयने टार्गेट बनवले होते. ते का, याचे उत्तर चर्च समितीच्या अहवालात एके ठिकाणी स्पष्ट नोंदवलेले आहे, की हे लोक समाजात बदल व्हावा असे म्हणतात. त्यासाठी काम करतात. म्हणून त्यांना लक्ष्य करण्यात आले होते. एफबीआयने जेव्हा 'को-इंटेल-प्रो' हा कार्यक्रम सुरू केला, तेव्हा त्याचे घोषित उद्दिष्ट होते, राष्ट्रीय सुरक्षा राखणे आणि हिंसाचार रोखणे. पण अनेक टार्गेट तर अहिंसक होती. त्यातील बहुतेकांचा विदेशी शक्तींशी काडीमात्र संबंध नव्हता. तरीही त्यांच्यावर पाळत ठेवली जात होती. त्याचे कारण सुरक्षा यंत्रणांच्या, सरकारच्या संशयी वृत्तीत आणि भयगंडात दडलेले आहे.

समाजातील अहिंसावादी संघटना वा व्यक्ती पुढेमागे हिंसक होऊ शकतात. त्यांच्यात तशी 'क्षमता' असते. व्हिएतनाम युद्धाच्या विरोधात असलेले अहिंसावादी नागरिक हे युद्धविरोधी हिंसक निदर्शनांना प्रतिष्ठा देऊन साह्य करीत असतात. म्हणून त्यांच्यावर पाळत ठेवायला हवी, या वाटण्यातून एफबीआय हे उद्योग करीत होती. येथे 'वाटणे' पुरेसे होते. पुराव्यांची गरजच नव्हती. या अशा लोकांना 'सरळ' करायचे. न पेक्षा त्यांच्यासमोर कौटुंबिक समस्या उभ्या करायच्या, त्यांना घाबरवून सोडायचे. चारित्र्यहनन करायचे. त्यांचे वैवाहिक जीवन बरबाद करायचे. म्हणजे मग त्यांचे सामाजिक प्रश्नांवरून लक्ष विचलित होईल. ते त्यांच्या समस्यांतच अडकून राहतील, असा तो डाव होता. पाळतीचे हत्यार त्यासाठी वापरले जात होते.

**पाळतीचे घोटीव तंत्रमंत्र**

हे केवळ अमेरिकेतच घडत होते असे नाही. सोव्हिएत रशिया त्यात मागे नव्हता. तेथे एकटी केजीबी एफबीआय आणि सीआयएचे काम करीत होती. जर्मनी हे सारे नाझी कालखंडात भोगून चुकली होती. नाझींच्या 'गेहाइम् स्टाट्सपोलित्झाय' म्हणजेच 'गेश्टापो'ची पाळतखोरी केवळ ज्यूंसाठीच नव्हती. ती 'आर्य जर्मनां'नाही सूतासारखे सरळ ठेवण्यासाठी होती. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कम्युनिस्टांच्या जोखडाखालील पूर्व जर्मनी तेच भोगत होती. आजचे पाळतशाहीचे वर्तमान समजून घेण्यासाठी हा भूतकाळ पाहणे गरजेचे आहे. याचे कारण कमी-अधिक प्रमाणात त्यांचीच तंत्रे, पद्धती आजही वापरली जात आहेत. कुठे ती अदृश्य प्रकारे कार्यरत आहेत, तर कुठे ती जॉर्ज ऑर्वेलच्या '१९८४'च्या वरताण आहेत.

ऑर्वेलची ही कादंबरी सुपरिचित आहे. साहित्याच्या 'डिस्टोपियन' जॉनरमध्ये समावेश केला जातो, तिचा. याचा अर्थ एक असे जग की जे काल्पनिक आहे, ज्यात लोक भयग्रस्त, अभावग्रस्त, किड्यामुंगीसारखे जीवन जगत आहेत. जेथे माणसाचे अमानुषीकरण झालेले असते. जेथे त्याच्यावर सत्ताधाऱ्यांची सतत पाळत असते. ऑर्वेलने असा समाज कसा असू शकतो, याचे भीषण चित्र वाचकांसमोर मांडले होते. ही कादंबरी ऑर्वेलच्या कल्पनाशक्तीची निर्मिती, हे खरेच. पण तो जेव्हा ही कादंबरी रंगवत होता, तेव्हा तशा प्रकारचा समाज पूर्व जर्मनीत अवतरलेला होता. तेथील पाळतशाहीचा चेहरा होता – 'श्टासी'. त्याविषयी पुढच्या लेखात...

**रवि आमले हे ज्येष्ठ पत्रकार-संपादक, प्रथितयश लेखक आणि भाष्यकार आहेत. त्यांची प्रोपगंडा, रॉ: भारतीय गुप्तचर संस्थेची गूढ गाथा, मॅनहंट (अनुवादित), परकीय हात, वरुण ते बहिर्जी आदी पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.**
**संपर्क:** ravi.amale@icloud.com

# चिनी कार्यसंस्कृतीची विस्मयकारक रुपे



गजानन जोशी

**शोधक नजर**





**मा**गील लेखामध्ये चीनमधील एका मोठ्या मॉलमध्ये आलेला लक्षणीय अनुभव नोंदवला. त्यामध्ये अत्योत्तम गुणवत्तेचे उत्पादन कमीत कमी वेळेमध्ये आणि अविश्वसनीय ठरावे अशा कमीतकमी किमतीमध्ये कसे मिळवता येते हे मांडले. १६-१७ वर्षांनंतरही ही कपडेरुपी उत्पादने टिकाऊपणामुळे कशी नवीनच वाटतात, या विषयी देखील निरीक्षणे नोंदवली. याच संदर्भाने कच्च्या मालाची गुणवत्ता आणि त्यापासून तयार होणाऱ्या विकण्यायोग्य वस्तू या सगळ्या गोष्टींना अगदी छोट्यातल्या छोट्या व्यवसायामध्ये आणि प्रचंड मोठ्या उत्पादन क्षेत्रामध्ये चीनने किती महत्त्व दिले आहे, हे या लेखात जाणून घेणार आहोत...

सप्टेंबर २००७ मध्ये मी चीनमध्ये दाखल झालो. आमच्या कंपनीने एका उत्तुंग व्यावसायिक इमारतीच्या पंधराव्या मजल्यावर ५००० स्क्वेअर फुटांची जागा भाड्याने घेतली होती. या लगबगीत लगेचच दसरा आणि दिवाळी हे सण असल्याने भारतीय नागरिक असलेले आमचे दोन-तीन कर्मचारी भारतात जाणार होते. मी जाणार नसल्याने इतर तंत्रज्ञान विषयक कामाव्यतिरिक्त ऑफीसच्या इंटरनल लेआऊट आणि इंटिरिअरचे काम देखील माझ्याकडे देण्यात आले होते. लक्ष्मी पूजनाच्या दिवशी ऑफिस प्रवेश करणे, हे आमचे उद्दिष्ट होते.

आम्ही एका अतिशय नामांकित वास्तुविशारद कंपनीला आर्किटेक्ट आणि इंटिरिअर डिझाइनचे काम दिले होते. त्याचप्रमाणे एका आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या फर्निचर आणि ऑफिस सेटअप पुरविणाऱ्या कंपनीलाही काम दिले होते. या कंपनीच्या ऑफिसला जेव्हा प्रथम भेट दिली, त्यावेळेला चीनमधील आंतरराष्ट्रीय दर्जाचे ऑफिस काय असते, किती आकर्षक आणि परीपूर्ण असते याची जाणीव झाली.

**व्यावसायिकतेचा वस्तुपाठ**

हा माझ्यासाठी एक अनोखा अनुभव होता. अतिशय नियोजनबद्ध हे काम चालले होते. प्रथम सविस्तर चर्चा मग आलेल्या सर्व सूचनांवर सगळ्या बाजूने चर्चा करूनच पसंती अथवा त्याला नाकारण्यात येत होते. चर्चेत सहभागी प्रत्येकाला मत मांडता येत होते. मी स्वत: कंपनीचा कर्मचारी असल्यामुळे म्हणत नाही, परंतु जे इतर छोटे-छोटे कंत्राटदार होते ते देखील यामध्ये सहभागी होत होते. आम्ही काही मोजक्या तीन-चार व्यक्ती (म्हणजे प्रत्येक कंपन्यांचे मॅनेजर) इंग्रजी जाणणाऱ्या होतो. कंत्राटदारांच्या लोकांना फक्त चिनी भाषा येत होती. परंतु त्यांना देखील आम्ही चर्चेत सहभागी करून घेत होतो. या दरम्यान एक महत्त्वाची बाब जी कायम लक्षात राहिली, ती म्हणजे नियोजन करणाऱ्यांमधला प्रत्येकजण आपापल्या कामामध्ये अतिशय अनुभवी होता. प्रत्येकाने अशाप्रकारचे काम यापूर्वी यशस्वीपणे हाताळले होते. मी स्वत: एक ग्राहक म्हणून मला काय पाहिजे, यांची पूर्ण माहिती होती. त्यामुळे सगळे मुद्दे समोर येत होते. त्यावर लगेच उत्तर मिळत होते.

अशा नियोजनबद्धतेमुळे कामाचे संपूर्ण नियोजन पहिल्या दहा दिवसांत पूर्ण झाले. हे सारे मार्गी लावण्यासाठी सकाळी बरोबर नऊ वाजता आम्ही जमायचो. बरोबर बाराच्या ठोक्याला जेवणाची सुट्टी. पुन्हा दुपारी एक वाजता सगळे जमायचो आणि संध्याकाळी पाचच्या ठोक्याला काम बंद. या काटेकोर दिनक्रमामध्ये जराही खंड पडला नाही. प्रत्येक दिवशी काम मात्र योग्य पद्धतीने आणि योग्य वेगाने पुढे जात राहिले. आमच्या हातात साधारण ४५ दिवस होते. कामांची वाटणी झाली. योग्य नियोजन झाले आणि मग प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरुवात झाली. खरं म्हणजे, काही देश का झपाट्याने पुढे जातात आणि काही का मंद गतीने जातात किंवा मागे पडतात, याचे दर्शन घडवणारा तो एक वस्तुपाठ होता. नियोजनाच्या कामामध्ये फक्त आणि फक्त त्या कामासंबंधातील अनुभवी व्यक्तीच असल्या पाहिजेत. दुसरे तेवढेच महत्त्वाचे म्हणजे, ग्राहकाला स्वत:ला नक्की काय पाहिजे याची संपूर्ण कल्पना असली पाहिजे. तसेच एखादी गोष्ट अशीच का पाहिजे यांचे कारण वा माहिती असली पाहिजे, हाही धडा या कामांदरम्यान मिळत गेला.

हे काम आम्ही वेळेच्या आठ दिवस आधीच पूर्ण केले. यामध्ये कोणतेही काम, छोटे अथवा मोठे म्हणून सोडून न देता सगळी कामे, सुविधा, प्रणाली (फायर फायटिंग, वायफाय नेटवर्क, वातानुकुलीन व्यवस्था इत्यादी) पूर्ण होऊन तयार होत्या. बीजिंगमधील सरकारी कार्यालयाने त्यानुसार आम्हाला ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले होते. ऑफिसच्या एकूण क्षेत्रफळाप्रमाणे विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे लोकांची संख्या असू नये, तसेच फायर अँड सेफ्टीच्या दृष्टीने बाहेर जाण्याचे मार्ग याचेही आम्ही काटेकोरपणे पालन केले होते. तरीही सरकारी अधिकाऱ्यांनी प्रत्येक गोष्ट अतिशय काळजीपूर्वक नि काटेकोरपणे तपासली होती. शेवटी नियोजनाला पर्याय नाही, नियोजन हे येऱ्यागबाळ्याचे काम नाही, रुथलेस इम्प्लिमेंटेशन शिवाय पर्याय नाही. सगळ्यात महत्त्वाचे, प्रगतीची आकांक्षा धरायची तर, नियम काटेकोरपणे पाळल्याशिवाय तुम्हाला दुसरा मार्गच नाही.

**जबाबदारीचे व्यापक भान**

आम्ही ठरल्याप्रमाणे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी बीजिंगमधील कार्यालयाचे उद्घाटन केले आणि आमच्या कार्यालयीन कामाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. चीनमध्ये कामे कशापद्धतीने होतात, अगदी छोट्या कामांना देखील कसे महत्त्व दिले जाते, याची चुणुक मला या पहिल्या काही दिवसांतच मिळाली. शिस्तबद्ध सरकारी अधिकारी-कर्मचारी-

तेथील काम करण्याच्या पद्धती-नियम-वक्तशीरपणा-प्रामाणिकपणा आणि कोणतेही काम कमी प्रतीचे न मानणे अथवा चुकीचे काम खपवून न घेणे याचा अनुभव आला. या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी चुकीचे काम असेल तर कधीही पैसे खाऊन, भ्रष्टाचार करून मंजुरी दिली नाही. उलट दिलेल्या वेळेला आमच्या कामाच्या ठिकाणी ते हजर राहिले. आमचे कोणतेही काम त्यांच्यामुळे थांबले वा अडले नाही. नंतर समजले की चिनी कायदे अत्यंत कडक आहेत आणि कायद्याची अंमलबजावणी देखील अत्यंत काटेकोरपणे केली जाते. ज्याप्रमाणे सार्वजनिक स्तरावर नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते तसेच तेथील न्याय व्यवस्था देखील अतिशय जलद गतीने काम करते. या सगळ्याचा हा परिणाम आहे की चीनमध्ये नियम पालन - सुरक्षा पालन - वेळेचे पालन अतिशय महत्त्वाचे असते. भ्रष्टाचाराला त्वरित आणि कडक शिक्षा अगदी मृत्युदंड देखील होऊ शकतो असे त्यावेळी ऐकण्यात आले.

अर्थात याचा अर्थ तेथे भ्रष्टाचार होत नसेल का? वशिल्याची काम होत नसतील का? तर नक्कीच होतात असे ऐकले, परंतु आपल्याकडे जर अशा स्वरुपाच्या एक लाख घटना घडत असतील तर तिकडे एक किंवा दोनच.

या अनुभवाच्या संदर्भाने आपल्याकडील एक विशिष्ट काम करण्याची पद्धती डोळ्यांसमोर आली. आपले कोणतेही सार्वजनिक काम कंत्राटदाराला देणे एवढीच आपण आपली जबाबदारी मानतो. अगदी सरकारी असो वा खासगी दोन्ही क्षेत्रांत कंत्राटदारावर काम सोपवले की आपली जबाबदारी संपली, असे मानले जाते. जर काही दुर्घटना किंवा चुकीचे काम झाले तर संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराने घ्यावी, असे आपण मानतो. सरकार किंवा खासगी क्षेत्र एखाद्या कंत्राटदाराकडे एखादे काम सोपवतात, तेव्हा ते ग्राहकाच्या भूमिकेत असतात. या ग्राहकांनी आपल्या कामाचे कंत्राट इतरांना दिल्यानंतर खरे म्हणजे, या ग्राहकांची जबाबदारी वाढलेली असते. याची जाणीव मला चीनमध्ये खूप प्रकर्षाने होत गेली. चीनमध्ये कंत्राटदार तर जबाबदार असतोच, पण त्याला कंत्राट देणारा ग्राहक सगळ्यात जास्त जबाबदार असतो. त्यामुळे कंत्राटदार करत असलेल्या कामावर अतिशय काळजीपूर्वक लक्ष असते. ग्राहकांच्या ऑफीसमधील जाणकार आणि अनुभवी कामगार वा अधिकाऱ्याला जबाबदारी दिलेली असते आणि त्यांनाच जबाबदार धरले जाते.

आपल्याकडे नुकत्यात ज्या दुर्घटना घडल्या, त्यात केवळ कंत्राटदाराला जबाबदार धरले गेल्याचे दिसले. या पार्श्वभूमीवर चीनमधील माझा अनुभव महत्त्वाचा ठरावा, अशी माझी प्रामाणिक अपेक्षा आहे. सगळ्याचे मूळ हे भ्रष्टाचारामध्येच आहे आणि चीनमध्ये भ्रष्टाचारच अशाप्रकारच्या कामांमध्ये गायब आहे. असो.

चीनमधल्या कार्यालयाचे दैनंदिन कामकाज सांभाळताना कधी मला इतर गावी प्रवास करावा लागे. तेथील उत्पादकांशी चर्चा, त्यांच्या फॅक्टरीला भेट, तंत्रज्ञाना संदर्भातील गोष्टींवर चर्चा असे बरेच घडत असे. या संदर्भात मी प्रथम शांघाय आणि हार्बिन या शहरांना भेटी दिल्या. त्यापूर्वी मी भारतामधील अशाच प्रकारच्या उत्पादकांना आणि त्यांच्या फॅक्टरींना भेटी दिल्या होत्या, त्याचप्रमाणे अमेरिका आणि युरोपमधील फॅक्टरींनादेखील भेटी दिल्या होत्या. त्यांच्याकडून विद्युतनिर्मिती क्षेत्राला लागणारे संच आणि प्रणाली देखील विकत घेतल्या होत्या. युरोप आणि अमेरिकेमधील फॅक्टरीच्या संदर्भात बोलायचे झाले, तर चीनमधील हे उत्पादक कुठेही कमअस्सल वाटले नाहीत. उलट उत्पादन क्षमतेमध्ये चीनमधील सेटअप जास्त मोठे वाटले. त्याच प्रकारची क्षमता आणि क्वॉलिटी चीनमध्ये मिळत होती. कित्येक ठिकाणी असे लक्षात आले की काही अमेरिकेच्या तसेच युरोपमधल्या नामांकित उत्पादकांच्या बरोबर त्यांचे कोलॅबरेशन होते आणि नंतर त्यांनी स्वत:च्या ताकदीवर हे सर्व सुरू ठेवले होते.

भारताच्या संदर्भात बोलायचे झाले, तर त्या काळात भारतामध्ये एक सगळ्यात मोठी उत्पादन करणारी कंपनी सरकारी मालकीची होती (आजही आहे) आणि काही छोट्या क्षमतेच्या कंपन्या होत्या. या सगळ्याची मिळून एकत्रित क्षमता होती, साधारण दहा हजार मेगावॅट प्रतिवर्ष. या तुलनेत चीनमधील जर फक्त तीन मोठ्या उत्पादन करणाऱ्या कंपन्या (म्हणजे हारबीन तसेच डुंगफंग आणि शांघाई इलेक्ट्रिक) जर आपण उदाहरण दाखल घेतल्या, तर त्या प्रत्येकाची क्षमता साधारण ३५ हजार मेगावॅट म्हणजे तिन्हीही मिळून एक लाख पाच हजार मेगावॅट प्रतिवर्ष अशी ही अफाट क्षमता. एकूणच चीनमधल्या इतर छोट्या कंपन्यादेखील आपल्याकडच्या मोठ्या कंपन्यांच्याबरोबर स्पर्धा करू शकतील, अशी ही परिस्थिती.

ही माहिती काही मी नवीन म्हणून सांगत नाही.

आपल्यापैकी बऱ्याच लोकांना ही माहिती असेलही. विद्युतनिर्मिती प्रमाणेच इतर उत्पादन क्षेत्रामध्ये देखील हेच प्रमाण आपल्याला बघायला मिळेल. परंतु काही बाबी ज्या बऱ्याच वेळेला आपल्या नजरेमध्ये येत नाहीत किंवा कार्यालयीन कामामध्ये आपण त्याला कदाचित पुरेसे महत्त्व देत नाही. त्यापैकी काही मला नमूद कराव्याशा वाटतात.

१) प्रचंड मोठ्या प्रमाणात उत्पादन क्षमता जरी असली तरी त्याची क्वालिटी कुठेही कमी प्रतीची नाही. त्याबद्दल अतिशय काटेकोर पालन.

२) जगामध्ये आर्थिक कुवतीप्रमाणे वेगवेगळे देश चीनकडून खरेदी करत असतात. त्या प्रत्येक देशाला सोयीचे परंतु क्वालिटीमध्ये कुठेही कमतरता नसणारी उत्पादने बनवली जातात. त्याचा फायदा प्रगत देश, प्रगतीशील देश तसेच अप्रगत देशांना त्यांच्या गरजेप्रमाणे मिळणे अगदी सहज शक्य आहे.

३) प्रचंड मोठ्या प्रमाणात उत्पादन क्षमता त्यामुळे वस्तूंच्या किंमती कमी करण्यामध्ये फायदा.

४) बहुतेक फॅक्टरीच्या आवारातच किंवा बाजूलाच कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय. त्यामुळे कर्मचारी कार्यक्षमता अतिशय उच्च दर्जाची. विशेषतः करोना काळात जगात इतरत्र उत्पादनक्षमता घटली असताना, चीनमध्ये मात्र फॅक्टरीच्या आवारात कर्मचारी राहात असल्याने उत्पादनक्षमतेवर फारसा परिणाम दिसला नाही.

५) आधुनिक तंत्रज्ञानाची कायम ओढ आणि त्याचा समजून योग्य पद्धतीने उपयोग. जगाच्या बाजारात कायम स्पर्धा करण्यास तयार.

६) ग्राहकांच्या भेटी दरम्यान उच्च आणि अतिउच्च अधिकारी कायम एका हाकेवर उपलब्ध, जेणे करून त्यांच्या शंकांचे निरसन होणार आणि ग्राहकाचे समाधान होणार.

**स्त्री वर्गाचा प्रभाव आणि शिस्तबद्ध कार्यसंस्कृती**

यामध्ये इतर ज्या गोष्टी मला प्रकर्षाने जाणवल्या, त्या म्हणजे, फॅक्टरीमधल्या प्रत्येक कामांमध्ये स्त्रियांचा सहभाग नजरेत भरण्याइतका असतो. किंबहुना, चीनमध्ये कोणतेही काम वा विभाग हा स्त्रियांसाठी वर्ज्य नाही. मी स्त्रियांना हाय प्रेशर वेल्डिंगचे काम करताना बघितलेले आहे. हे काम आपल्याकडे फक्त पुरुषांना करताना आपण बघतो. मोठमोठ्या इमारतींमध्ये बांधकाम चालू असताना देखील स्त्रियांचा तेवढाच सहभाग दिसतो. शांघायमध्ये पर्यटकांचे एक आकर्षणाचे ठिकाण आहे, जीन माओ ताशा. या ठिकाणच्या बाजूलाच आणखी एक प्रचंड भव्य इमारत उभारली जात होती. कदाचित ८०-९० मजल्याची असावी. त्या इमारतीचे अर्ध्यापेक्षा जास्त उंचीचे बांधकाम झालेले होते. त्या वेळेस एक स्त्री तेथील क्रेन ऑपरेट करताना मी पाहिली होती. स्त्रियांच्या व्यापक सहभागामुळे कार्यक्षमता आणि कामातले सातत्य अतिशय चांगल्या पद्धतीने राखले जाते, असा त्यांचा देखील अनुभव आहे.

चीनमधील वास्तव्यात चिनी कार्यसंस्कृती संदर्भातल्या इतरही आणखी काही बाबी लक्षात आल्या. ज्याचा उत्पादन क्षमता आणि गुणवत्ता यावर कसा थेट काय परिणाम होतो हे जाणून घेण्याची मला फार उत्सुकता वाटली. अर्थात, याचा मी शास्त्रीय अभ्यास केलेला नाही तरी आपल्या समोर त्या मांडतो. त्या बाबी म्हणजे, चीनमध्ये सकाळी साधारण सात वाजता कामाला सुरुवात होते. म्हणजे त्याआधी सकाळचा नाष्टा झालेला. बरोबर बारा वाजता जेवणाची सुट्टी. विशेष म्हणजे जेवण झाल्यावर बहुतेक (जवळ जवळ सर्व) कर्मचारी साधारण १५ ते ३० मिनिट झोप घ्यायचे. त्यानंतर साधारण एक वाजता कामाला पुन्हा सुरुवात व्हायची. संध्याकाळी साधारण साडेचार ते पाच दरम्यान फॅक्टरीच्या आवारामध्येच एका प्रचंड मोठ्या हॉलमध्ये कर्मचारी व्यायाम करण्यासाठी जमायचे. प्रत्येक मोठ्या किंवा छोट्या फॅक्टरीमध्ये जेवणासाठी उत्तम सोय असल्यामुळे बहुतेक सगळे कर्मचारी तेथेच जेवण घ्यायचे.

**पक्ष प्रतिनिधीची नजर उत्पादन प्रगतीवर**

तिथल्या सरकारी फॅक्टरीमध्ये आणखी एक गोष्ट बघायला मिळाली ती म्हणजे, फॅक्टरीच्या ऑफिस बिल्डिंगमध्ये एक ऑफिस असते, कम्युनिस्ट पक्षाच्या प्रतिनिधीचे. चीनच्या राजकीय व्यवस्थेबद्दल मला येथे काही सांगायचे नाही. परंतु कुतूहल म्हणून मी याबद्दल चौकशी केली, तेव्हा जी माहिती मिळाली ती अशी होती, की बरेच कर्मचारी हे कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य आहेत. परंतु कोणालाही पक्षाचे सदस्य होण्याबद्दल सक्ती नाही. कर्मचारी सदस्य यांच्या पगारामधून काही रक्कम सदस्यनिधी म्हणून घेतली जाते. या पक्षाच्या प्रतिनिधीचे कर्तव्य असते की सगळ्या कर्मचाऱ्यांना योग्य सवलती मिळतात की नाही, नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते की नाही, या गोष्टीवर लक्ष ठेवणे आणि तंतोतंत पालन करून घेणे. प्रत्येक कंपनीमध्ये मॅनेजिंग डायरेक्टर, चेअरमन, सीईओ अशी अधिकाऱ्यांची उतरंड असते. सोबत एचआर डिपार्टमेंटही



*काम कितीही छोटे असो वा मोठे त्या कामाप्रती बांधिलकी आणि एकनिष्ठा राखणे हे चिनी कार्यसंस्कृतीचे ठळक वैशिष्ट्य आहे. याच वैशिष्ट्यांचे दर्शन चीनमध्ये जागोजागी घडत जाते आणि त्यात महिलांचा सहभाग लक्षणीय असतो...*

असते, परंतु पक्षाच्या प्रतिनिधीला काही बाबतीत या सगळ्यांच्या पलीकडे अधिकार असतात. कोणत्याही प्रकारचा फिडबॅक या पक्ष प्रतिनिधीला कर्मचारी देऊ शकतात. यामध्ये कामाच्या बाबतीतील सुधारणा, काही कन्स्ट्रक्टिव्ह फिडबॅक दिला जातो, ज्यामुळे कंपनीचा फायदा होण्यास मदत होते. हे पक्ष प्रतिनिधी फक्त पक्षाचे सदस्य असलेल्या कर्मचाऱ्यांनाच नव्हे, तर इतर कर्मचाऱ्यांना देखील वेळोवेळी उपलब्ध असतात. ग्राहकांच्या दृष्टीने सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, ग्राहक देखील या प्रतिनिधींना आपले मत आणि सूचना देऊ शकतात. याचा प्रत्यक्ष अनुभव मला स्वत:ला घेता आला. काही बाबतीत त्या कंपनीचे अधिकारी आमचे म्हणणे मानत नव्हते. बराच वेळ आम्ही एकमेकांना आपापली मतं समजून सांगत राहिलो, परंतु एकमेकांना पटवून देण्यात यशस्वी झालो नाही. शेवटी ते मला केवळ चिनी भाषा बोलता येत असलेल्या प्रतिनिधीच्या कार्यालयात घेऊन गेले. तेथे पुन्हा चर्चा झाली. शेवटी सगळ्या गोष्टी ऐकून घेतल्यावर या प्रतिनिधीने आश्वासन दिले की एका आठवड्यामध्ये मला प्रतिसाद मिळेल. आणि खरोखर ४-५ दिवसांत या प्रतिनिधीचे मला उत्तर मिळाले. तेही अतिशय सविस्तर. त्यामध्ये त्यांच्या अधिकाऱ्यांना काम करण्याबद्दलच्या सूचना देखील होत्या. थोडक्यात, पक्षाचा सदस्य असलेला हा कर्मचारी तेवढ्याच मेहनतीने आणि प्रामाणिकपणे काम करत होता. फुकट चकाट्या पिटत वेळकाढूपणा करीत नव्हता.

चीनमध्ये दररोज नवेनवे अनुभव येत असताना, एक महत्त्वाची बाब तेव्हाही माझ्या लक्षात आली. ती म्हणजे, चीनशी जगाबरोबर स्पर्धा आहे आणि व्यवसायाच्या यशापयशामागे भाषा हे अतिशय महत्त्वाचे माध्यम आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये मी ज्या लोकांशी चर्चा करायचो, त्यातल्या काहींनाच अगदी जुजबी तेही महत्त्वाच्या शास्त्रीय संज्ञा पुरतेच इंग्रजी येत होते. विशेष म्हणजे हे सगळे पदव्युत्तर (एम.टेक) आणि पी.एचडी. झालेले तंत्रज्ञ होते. त्यांचे सगळे शिक्षण मातृभाषेत म्हणजे चिनी भाषेत झाले होते. तरीही, त्यांचे शोध निबंध जागतिक कीर्तीच्या सायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झाले होते. जगातल्या इतर कोणत्याही टेक्नोक्रॅट्सपेक्षा हे लोक मागे नव्हते. जागतिक व्यासपीठावर दोन हात करण्याची त्यांची तयारी होती.

एका अर्थाने, चीनच्या विस्मयकारक प्रगतीची गुपिते माझ्यापुढ्यात उलगडत होती. त्याच्याशी निगडीत अनुभव मांडल्यानंतर पुढील लेखांमध्ये चीनमधील औद्योगिक आणि तंत्रज्ञान विषयक नियोजन, जागतिक आव्हाने, स्वत:ची ताकद तसेच मर्यादा, जागतिक स्पर्धक आणि त्यांची ताकद तसेच मर्यादा आणि चीन स्वत:साठी पाहात असलेले दीर्घकालीन फायदे या बद्दलचे माझे आकलन आपल्यासमोर ठेवणार आहे.

**(क्रमश:)**

**गजानन जोशी नामवंत ऊर्जानिर्मिती अभ्यासक, भाष्यकार आहेत. समाज, साहित्य आणि कला हे त्यांचे चिंतन आणि आस्वादनाचे विषय आहेत.**
**संपर्क** : joshigajanan@hotmail.com

# प्रेमाचे भूत, वर्तमान आणि भविष्य



प्रा.श्रीनिवास हेमाडे

गोष्ट प्रेमाची

लेखांक – ८



*प्रेम बदलत आहे.* किमान वैषयिक प्रेम तरी नेहमीच विषमलिंगी असले पाहिजे असे नसून, समलिंगी जोडप्यांमध्येही प्रेम असू शकते, हे आता सर्वमान्य झाले आहे. त्याचप्रमाणे लोक एकाच वेळी एकापेक्षा जास्त व्यक्तींसोबत प्रेमसंबंधात असू शकतात, हेही अधिकाधिक स्वीकारले जात आहे. तंत्रज्ञान व विज्ञानात अतिवेगाने आकार घेणाऱ्या विकासामुळे आपल्याला दूरचे संबंध अधिक चांगल्या प्रकारे टिकवणे शक्य होत आहे, ही विधायक बाजू म्हणता येईल. त्याचवेळी प्रेमाचे (आणि लैंगिक संबंधांचे) 'किरकोळीकरण' (casualisation) सुद्धा वेगाने होत आहे. म्हणूनच ते अधिकाधिक अनौपचारिकतेकडे झुकते आहे, हे देखील आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. शिवाय भविष्यात होऊ पाहणारी तंत्रज्ञान व विज्ञानातील प्रगती सुद्धा 'आपण कोणावर किती, कधी, कुठे, कसे आणि का प्रेम करतो' याच्या मूलभूत संकल्पना बदलून टाकू पाहात आहे; त्यानुसार खुद्द 'प्रेम प्रकिया' देखील नि:संशयपणे बदलतील राहतील, असाही इशारा स्पष्टपणे देत आहे. हे सारे बदल अगदी ठळकपणे जाणवत आहेत, हे कोणताही सूज्ञ माणूस नाकारणार नाही...

काळानुरुप 'प्रेम प्रक्रिया' बदलत तरीही, प्रेम तेच राहते. प्राचीन ग्रीक काळापासूनच जगभरातील अनेक तत्त्ववेत्ते, कवी, साहित्यिक मंडळी प्रेमाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप आणि प्रेमाचे मूल्य यावर (प्रेमात न पडता देखील) विचार मंथन करत आले आहेत. त्यांच्या बरोबरीने खुद्द अगणित प्रेमिक मंडळींनीही प्रेम विषयक चिंतन केल्याचे आढळते. अर्थात प्रेमिकांचे प्रेमचिंतन तार्किक असण्यापेक्षा भावुक असण्याची दाट शक्यता नेहमीच असते. पण प्रेमिकांचे प्रेम चिंतन क्वचितच आढळते. प्रेमिक आणि तत्त्वचिंतक अशा दोन्ही गुणांनी युक्त असलेल्या व्यक्तीकडूनही तार्किक प्रेमचिंतन व्यक्त होण्यापेक्षा भावूक प्रेम चिंतन झाल्याचे आढळते; उदाहरणार्थ; अकराव्या शतकातील पीटर अबेलार्ड या तरुण तत्त्वचिंतकाचे प्रेम प्रकरण आणि प्रेम चिंतन.

आपल्या गतिमान वर्तमान बदलाच्या काळामध्ये आपल्या बौद्धिक इतिहासातून, समकालीन प्रथांमधून आणि भविष्यात काय घडणार आहे यातून आपण बरेच काही शिकू शकतो. ते नवे आव्हान तर आहेच, पण ते समजून घेण्याचे नवे आवाहनही आहे. भूतकाळातील, वर्तमान काळातील आणि भविष्यकाळातील प्रेमाच्या संकल्पनेशी संबंधित तीन समस्या पुढीलप्रमाणे मांडता येतील. त्यांच्यावर (खरे तर तातडीने) विचार करण्याची गरज उद्‌भवते (इतके ते ऐरणीवर आले आहेत).

१. प्रेमाविषयी जो काही विचार आजवरच्या तत्त्ववेत्ते, कवी अन् साहित्यिकांनी मांडला आहे, त्या विचारांचा इतिहास रचला त्या इतिहासातून आपण काय शिकू शकतो? याचाच अर्थ प्रेमाविषयी जे काही वैचारिक चिंतन भूतकालात झाले, ते चिंतन आपणास काय शिकवते?

२. ज्यांना 'आधुनिक, उत्तराधुनिक, अतिउत्तराधुनिक, अतिअतिउत्तराधुनिक' म्हणता येईल अशा आपल्या वर्तमान कालीन प्रेमाविषयीच्या संकल्पनांबद्दल कशारीतीने विचार करायला हवा? आज प्रचलित झालेल्या व नव्याने रूढ होत असलेल्या प्रेम प्रथांबद्दल आपण कसा विचार करायला हवा? अर्थात प्रेमविषयक वैचारिक वर्तमानकाळ आपणास काय शिकवतो?

३. भविष्यात प्रेम या 'संकल्पने' त कोणते बदल होण्याची, ते कसे होतील, त्यांची प्रक्रिया व आविष्कार कसे असतील, इत्यादीबद्दल कोणत्या व कशा अपेक्षा आपण करू शकतो? आपण अशा बदलांचे स्वागत करावे की त्याबद्दल खेद व्यक्त करावा? याचाच अर्थ प्रेमविषयक वैचारिक भविष्यकाळ आपणास काय शिकवू पाहतो ?

**भाग १ : प्रेमाचा भूतकाळ**

विचार कसा करावा? याचा निखळ 'भौतिक विचार' प्राचीन ग्रीक वैचारिक विश्वातच उगम पावला आहे, यात शंका नाही. 'विचाराचा विचार' ग्रीक, भारत आणि चीन या तीन देशांच्या प्राचीन काळातील विचारवंतानी केला, हा विचारांचा इतिहास आहे. ग्रीकांनी कोणत्याही आध्यात्मिक, दैवी इत्यादी शक्तींच्या दबावाखाली अथवा प्रभावाखाली न येता 'विचाराचा विचार' केला. अगदीच प्रागैतिहासिक काळात दैवी शक्तींच्या प्रभावाखाली ग्रीक पुराणे रचली गेली, हे खरे असले तरी पद्धतशीर विचार करण्याची पद्धत सुरू झाली, तेव्हा ग्रीक विचारवंतानी तो दबाव आणि प्रभाव झुगारून निखळ भौतिक विचार पद्धती रूढ केली, हे श्रेय त्यांना द्यावेच लागेल.

भारत आणि चीनमध्ये मात्र दैवी शक्ती, नियती, स्वर्ग नरक, ईश्वर, कर्म या साऱ्याच गोष्टीबद्दलची मिथके, पुराणे, कथा, भक्ती इत्यादी भावनेने ओथंबलेले अनेक दबाव व प्रभाव 'विचारांचा विचार' निखळ भौतिक रीतीने करण्यास मज्जाव करत आले आहेत, हा इतिहास आहे. तरीही 'गांधर्व विवाह पद्धती' आणि वात्सायनाचे 'कामशास्त्र' कामभाव प्रेरित प्रेमाचा विचार करते.

ग्रीक वैचारिक पद्धतीच्या प्रभावानेच संपूर्ण युरोपीय–पाश्चात्य वैचारिक पद्धती प्रभावित झाली, हे नाकारता येत नाही. साहजिकच 'प्रेम' भावनेचा निखळ भौतिक विचार करण्याचे श्रेयही ग्रीक विचारवंतांकडे जाते, हे ओघानेच येते. प्रेम भावनेचा पद्धतशीर विचार प्लेटोच्या 'Symposium' या संवादरुपी रचनेपासून करावा लागतो. 'सिम्पोझियम'मधील प्लेटोच्या (किंवा सॉक्रेटिसच्या) प्रेमाविषयीच्या विचारांचा मागोवा घेणे अनिवार्य ठरते. प्लेटोचा विचार एक महत्त्वाचा संदेश देतो, जो आजही प्रस्तुत आहे. तो संदेश असा की प्रेमात पडलेली व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडून बदलले जाण्यासाठी स्वतःला खुले करते. बदलण्यासाठी ती तयार असते. या संदेशासह आणखी एक विशेष प्लेटो नजरेस आणून देतो. प्रेमाचा विषय बनलेल्या व्यक्तीचे विशेष सौंदर्य आपल्यामध्ये शाश्वतता आणि स्थायीत्वाची एक विलक्षण भावना जागृत करते, याचे भानही प्रेम प्रेमिकाला देत असते, हा प्लेटोच्या विचारांचा गाभा म्हणता येईल.

प्लेटोनंतर त्याचा परमशिष्य ॲरिस्टॉटलनेही प्रेम संकल्पनेत



*ब्लूम्सबरी ग्रुप हा बहुप्रेमिकतावादी आणि बहुलैंगिकतावादी ज्ञानवंतांचा गोतावळा. वर्जिनिया वूल्फ, ई. एम. फॉर्स्टर यांसारखे दिग्गज लेखक विचारवंत या गोतावळ्याचा भाग होते. त्यांच्यातल्या परस्पर प्रेमातून जगाला बहुज्ञानशाखीय आधुनिक दृष्टिकोन मिळाला...*

अतिशय मूलभूत भर टाकली. त्याने मांडलेली Philia – 'मैत्री'ची संकल्पना ही निश्चितच प्लेटोची पुढील पायरी मानता येते. हा प्लेटोचा केवळ वारसा गतिमान करणे नसून वा केवळ आज्ञाधारक अनुयायीत्व नसून हा 'ग्रीक वैचारिक विस्तार' आहे. ॲरिस्टॉटलच्या मते, 'प्रणयभाव' अथवा प्रेम हा 'Philia' चाच एक प्रकार आहे. खरे तर प्रणय भावना हाच मैत्रीचा मूळ आविष्कार आहे, असे त्याला सुचवायचे आहे. आजच्या कठोर फलवादी (pragmatic) जीवन धारणेच्या पार्श्वभूमीवर 'प्रणयरम्य प्रेम' (romantic love) ही संकल्पना धोक्यात आली आहे. आपण विद्यमान काळात ॲरिस्टॉटलच्या प्रेम संकल्पनेशी नाते जोडू शकतो.

ग्रीक प्रेम विचार स्त्री–पुरुष यांच्यातील प्रेमाबद्दल असला, तरी ग्रीक विचार समलिंगी प्रेमाचाही अगदी गंभीर विचार करते. किंबहुना प्लेटोच्या 'अशरीरी' आध्यात्मिक प्रेम संकल्पनेत 'सम–विषमलिंगी प्रेमाकर्षण' हा उभय प्रेमविचारच मांडला आहे. मात्र तेथे शरीराच्या अतीत जाण्याचे सूचनच तर आहेच आहे; पण 'प्रेमभावना शरीरातीत' असण्याची अनिवार्यता अधोरेखित केली आहे. 'अशरीरी प्रेम' हे प्रेमाचे अधि–भौतिकशास्त्र (metaphysics) आहे, यावर प्लेटो भर देतो; पण त्या आधी प्रेमाचा सुव्यवस्थित भौतिक (physical) विचार प्लेटो करतो. या परंपरेचा काहीसा समांतर धागा आपण करुणामूर्ती येशू ख्रिस्ताच्या 'शेजाऱ्यावर प्रेम करावे' या वचनाशी जोडू शकतो. 'शेजाऱ्यावर प्रेम करण्यासाठी आधी स्वतःवर प्रेम करा' हे त्यातील अंतर्गत सूत्र महत्त्वाचे ठरते.

भारतीय भूतकालीन परंपरेतील महात्मा गौतम बुद्धाची 'ब्रह्मविहार' ही संकल्पना आणि योग दर्शनाचे प्रवर्तक महर्षि पतंजली यांचीही 'ब्रह्मविहार' ही संकल्पना ते महात्मा गांधीजी यांची अहिंसा व सत्याग्रह या संकल्पना, पुढे जाऊन आधुनिक तत्त्ववेत्ते दलाई लामा यांच्या पर्यंतच्या 'प्रेम' संकल्पना भौतिक आणि अधिभौतिक स्वरूप स्पष्ट करतात.

या साऱ्या तत्त्ववेत्त्यांनी प्रेमाचे स्वरूप, प्रेमाचा अर्थ, प्रेमाचे मूल्य चिंतन करत त्यावर गंभीर लेखन केले आहेच, पण या साऱ्यातून निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीवर देखील चिंतन केले आहे. त्याचप्रमाणे प्रेम संकल्पना व वर्तन व्यवहार या मधील पेचप्रसंगावरही लिहिले आहे. या समग्र लेखनाचा विचार करता या चिंतनाची काहीएक वर्गवारी करता येऊ शकेल. हे चिंतन एका अनोख्या चौकटीत मांडता येईल. या चिंतनाची विशिष्ट रचना करता आल्यास त्यातून मानवी जीवनातील विविध क्षेत्रे आणि त्यांच्या कार्यांमधील महत्त्वाची क्षेत्रे स्पष्ट करता येतील. त्यानुसार प्रेम विषयक चिंतनाच्या पद्धती आणि परंपरा यांच्यातील समृद्ध विविधताही लक्षात घेता येईल. चिनी वैचारिक विश्वातील ताओवाद (दावोवाद) आणि कन्फ्युशियसवाद अनुक्रमे आध्यात्मिक आणि राजकीय प्रेम संकल्पना स्पष्ट करतात.

**भाग २ : प्रेमाचा वर्तमान काळ**

आजच्या काळात आपण प्रेमाबद्दल ज्या प्रकारे विचार करतो, त्याबाबत वेगळा विचार आवश्यक आहे. उदाहरणार्थ; प्रेम आणि काळ. प्रेमाचा कालावधी आणि त्या त्या काळाच्या तुकड्यात प्रेमाचे स्वरूप कसे असते, याचा विचार करणे. प्रेमाचा भूत, वर्तमान आणि भविष्य या काळाच्या तुकड्यांशी कोणता संबंध आहे, त्या त्या तुकड्यांच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर व विविध प्रकारांमध्ये 'प्रेम कसे वेगवेगळे' स्वरूपाचे असते, यावर विचार केला पाहिजे. प्रेमाला इतिहास आहे आणि असतो, जो प्रेमाला एक विशिष्ट स्वरुपाची कथनात्मक संरचना बहाल करतो. मानवी जीवनाच्या मानववंशीय, सामाजिक, राजकीय आणि कौटुंबिक विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर जी विशिष्ट नातेसंबंधांचे जाल विणले जाते त्यातून अनेक प्रेमयुक्त नात्यांना एक इतिहास असतो, ही वस्तुस्थिती आहे. तिचा थेट प्रभाव प्रेमी युगुलांच्या वर्तमानातील प्रेमाच्या अनुभवावर पडतो.

उदाहरणार्थ; व्यक्तिगत प्रेम प्रकरणात अगदी प्राथमिक काळात प्रेमाच्या पूर्वप्राथमिक टप्प्यावर 'प्रेमात पडणे' ही कृती घडते. प्रेमात पडण्याच्या प्रक्रियेबद्दल बहुधा खूप नकारात्मकता

असते. कारण प्रेमात पडण्याला अनेकदा तीव्र आकर्षण किंवा मोहाशी जोडले जाते. पण प्रेमात पडण्याला केवळ या गोष्टींपुरते मर्यादित ठेवणे दिशाभूल करणारे ठरते. त्याऐवजी, आपण प्रेमात पडण्याकडे एक तटस्थ दृष्टिकोनातून पाहता येईल का याचा विचार करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. 'प्रेमात पडणे'कडे प्रणयी प्रेमाचा (romantic love) प्रारंभिक टप्पा म्हणून पाहणे शक्य आहे.

त्यानंतर पुढे जाऊन प्रणय प्रेमाचा अधिक सखोल अभ्यास करता येईल. जसे की प्रेमाच्या 'कामुक पैलू'चा आणि प्रेमीजनांच्या गुणधर्मांचा विचार करता येतो; 'तो खूप चांगला आहे' किंवा 'ती खूप चांगली आहे'/बुद्धिमान आहे, देवाला मानतो/मानते, लोकांना मदत करतो/करते इत्यादि अनेक गुणधर्मावर आपले प्रेम आहे, असे दाखवणे. याला आपण प्रणयी प्रेमाच्या गुणधर्म सिद्धांत म्हणू शकू. आपण लोकांवर त्यांच्या गुणधर्मांमुळे प्रेम करतो हा दृष्टिकोन. आपल्या प्रत्येकाला स्वतःबद्दल एक 'गुणी आत्म संकल्पना' असते. त्या गुणधर्मांमुळे लोकांनी आपल्यावर प्रेम करावे, असे आपल्याला वाटत असते. नेमके तेच आपण किंवा प्रेमीजन करतात. त्यांचा दावा असतो, की मी त्याच्या/तिच्या शरीरावर किंवा दिसण्यावर प्रेम करत नाही, भाळलो/भाळले नाही, तर त्याच्या/तिच्यात असलेल्या गुणांमुळे मी प्रेमात पडलो/पडले. पुढे अशा गुणधर्मांतून 'लैंगिक आकर्षण' वाटावे असे वाटते. हा 'गुणधर्म सिद्धांत' लक्षात घेतला तर हे गुणधर्म इतरांना लैंगिक उत्तेजित देणारे कसे ठरू शकतात, हे आपल्याला समजू शकते.

पण भूतकाळाचा विचार केला तर काय आढळते? तर 'प्रेम नेहमीच टिकत नाही', ते चिरस्थायी असावे, असे वाटत असले तरी ते टिकावू असेलच असे नसते. म्हणून तर अनेकदा जोडीदाराचा कंटाळा येतो किंवा संसारात रस उरत नाही! Breakup होतो. हे पाहा, प्रणयी प्रेमाचा कोणताही सिद्धांत स्वतःहून प्रेमभंगाचे पुरेसे स्पष्टीकरण देऊ शकत नाही. त्याची कारणे शोधली पाहिजेत. शोधात येईल का ते पाहू...

प्रेमाच्या वर्तमान काळाचा आणखी एक चिरस्थायी, पण तत्त्ववेत्त्यांनी आणि कवी, साहित्यिक लोकांनी आतापर्यंत दुर्लक्षित ठेवलेला पैलू म्हणजे 'आजी-आजोबांचे प्रेम'. वर्तमानकाळात या प्रेमाला विभक्त कुटुंबे, वृद्धाश्रम, रोजचे धकाधकीचे वेगवान स्पर्धात्मक जीवन इत्यादींचे आव्हान आहे. आजी-आजोबा आणि नातवंडे यांचे एकमेकांच्या आयुष्यात एक अद्वितीय आणि मौल्यवान स्थान असते आणि आजी-आजोबांच्या प्रेमाकडे तात्त्विकदृष्ट्या लक्ष देणे आवश्यक आहे. हे प्रेम तात्त्विकदृष्ट्या महत्त्वाचे का आहे, याची त्या दोन कारणे देता येतील. पहिले कारण, आजी-आजोबा आणि त्यांची नातवंडे यांच्यातील वयाचे मोठे दीर्घ अंतर. हे अंतरच त्या नात्याला समृद्धता देते आणि त्याला वेगळेपण देते. दुसरे कारण, हे नाते मुलाच्या पालकांद्वारे मध्यस्थीतून विकसित झालेले असते, ज्यामुळे हे प्रेम कसे जगले जाते याचे प्रशिक्षणही आपसूकच लाभते. त्यातूनच तर पालक हेच भावी आजी-आजोबा बनतात. पण हे आजी-आजोबा व नातवंडे प्रेम प्रकरण आजच्या वर्तमानकाळात अनेक कारणांमुळे धोक्यात आले आहे.

**भाग ३ : प्रेमाचे भविष्य**

प्रेमाचा भूतकाळ एक आदर्श समोर ठेवतो, तर वर्तमानकाळ एक आव्हान उभे करतो. त्यामुळे भविष्यात प्रेम कोणते स्वरूप घेऊ शकेल आणि आपल्याला कोणते स्वरूप हवे आहे, या प्रश्नाचा विचार करणेही अनिवार्य ठरते. माणसाच्या व्यक्तिगत पातळीवरील बदलत्या सवयी, शासकीय नियम आणि नव्याने उदयास येणारे तंत्रज्ञान यांचा, आपण प्रेमाची संकल्पना कशी करतो आणि त्याला किती महत्त्व देतो यावर परिणाम होतो. उदाहरणार्थ; भारतातील Love Jihad ही नवी संकल्पना किंवा 'धर्मांतर विषयक नवे विधेयक' आपल्यावर एकूण प्रेम संकल्पनेवर आणि प्रत्यक्ष प्रेम करणे या 'कृती' वरच आघात करते.

दुसरे म्हणजे, भविष्यकालीन प्रेम संकल्पना एक-प्रेमिक न राहाता 'बहु-प्रेमिक' असू शकते. 'बहुप्रेमसंबंध' हे प्रेमाचे भविष्य असू शकते का? 'बहुप्रेमसंबंध' हे एकपतीपत्नीत्वाच्या प्रचलित सामाजिक प्रथेपासून अनेक मार्गांनी लक्षणीयरीत्या वेगळे आहेत, हे तर मान्य केलेच पाहिजे. तथापि विविध बहुप्रेमी जीवनशैली कधीकधी प्रेमातील तात्कालिक नियमांना सुधारित स्वरूप देतात. हे बहु प्रेमसंबंध 'प्रेम' संकल्पनेबाबत अकल्पित नवेच शोध लावू पाहातात, ते खरेच असल्याचे दावे देखील करतात आणि त्याचे पुरावे देण्याचे जोरदार व अथक प्रयत्न करतात.

एकाप्रकारे हे प्रेमाचे सातत्याने पुनरुत्पादन असते. अशाप्रकारे, जर प्रेमाच्या कल्पनेत प्रगती करायची असेल, तर बहुप्रेमसंबंध हे प्रेमाचे भविष्य असू शकते, या कल्पनेवर विचार करणे अपरिहार्य ठरते. काही वर्षांपूर्वी आलेल्या Friends या अमेरिकन दूरदर्शन मालिकेने या बहुसंबंधविषयक प्रेम

प्रकरणातील अनेक पैलू समोर आणले. तथापि त्याही खूप पूर्वी ब्रिटनमधील मित्रगट 'ब्लूम्सबरी ग्रुप' असा बहुप्रेमीकतावादी आणि बहुलैंगिकतावादी होता. 'ब्लूम्सबरी ग्रुप'ची स्थापना औपचारिकपणे कोणत्याही एका व्यक्तीने केली नव्हती. १९०४च्या सुमारास ब्रिटिश लेखक, विचारवंत, तत्त्वज्ञ आणि कलाकार यांचा हा एक मित्रसमूह होता. व्हर्जिनिया वूल्फ, जॉन मेनार्ड केन्स, थोबी स्टीफन, ई. एम. फॉर्स्टर, व्हेनेसा बेल आणि लिटन स्ट्रॅची यांनी तो सुरू केला होता. मित्र आणि भावंडांच्या एका अनौपचारिक गटातून तो उदयास आला. या गटात व्हेनेसा बेल आणि व्हर्जिनिया वूल्फ यांचा समावेश होता. लंडनच्या ब्लूम्सबरी भागातील '४६ गॉर्डन स्क्वेअर' येथे ते नियमितपणे गुरुवारी आणि शुक्रवारी चर्चा करण्यासाठी एकत्र जमत होते. अर्थात हा उच्च अभिरुचीच्या संवेदनशील लोकांचा समूह असल्याने त्यांच्या कलाकृतींनी आणि दृष्टिकोनाने साहित्य, सौंदर्यशास्त्र, समीक्षा व अर्थशास्त्र, तसेच स्त्रीवाद, शांततावाद आणि लैंगिकता यांबाबतच्या आधुनिक दृष्टिकोनांवर खोलवर प्रभाव पाडला. पण हे झाले, उच्च लोकांबाबतचे. आजचे एक आव्हान असे की उच्च अभिरुची नसलेले सधन किंवा निर्धन लोकही बहुप्रेमसंबंधक बनत आहेत. तेव्हा 'घटकंचुकी समूह' निर्माण होण्याची शक्यता जास्त असते. त्यावेळी 'प्रेम' संकल्पनेचा विचार आणखी गांभीर्याने करणे आवश्यक ठरते.

तिसरी गोष्ट अशी, की या बहु–प्रेमसंबंधाचा 'कुटुंब संस्थेवर होणारा परिणाम. या कुटुंबात 'आजी–आजोबा नातवंडे प्रेमप्रकरण' समाविष्ट असल्याने या नात्याला कोणते परिणाम भोगावे लागतील, हे अजून तरी स्पष्ट नाही. मराठी समाजात किंवा खरे तर साहित्य विश्वात या संबंधाची अजून चर्चा नाही. खूप पूर्वी आलेल्या स्मिता पाटील व गिरीश कार्नाड यांच्या 'उंबरठा'मध्ये केवळ विवाहबाह्य संबंध सूचन झाले होते, तर मराठी मध्यमवर्गात भयंकर खळबळ व चुळबुळ झाली होती.

खरं तर, एक महत्त्वाची गोष्ट अशी की विद्यमान काळातील प्रेमसंबंधांचे स्वरूप हे प्रिय व्यक्तीवर हक्क गाजवण्याच्या इच्छेने प्रेरित आहे. त्यामागे केवळ प्रेमसंबंधांमधील एकाधिकारशाहीला मान्यता देऊन आपण स्वीकारलेल्या स्पर्धेत हरण्याची भीती दडलेली आहे. विरोधाभास असा, की अशा भीतीतून जे वर्तन होते त्यामुळे उलट प्रेमाचा ऱ्हास होतो आणि खरं तर, प्रिय व्यक्तीला गमावण्यास प्रोत्साहन मिळते. या उलट, हक्क न गाजवणारे प्रेम हे सध्याच्या प्रेमासाठी कमी विनाशकारी आणि भविष्यात येणाऱ्या प्रेमासाठी अधिक सामावून घेणाऱ्या भविष्याचे वचन देते. परंतु असे प्रेम शक्य करण्यासाठी, आपल्या सामान्य सामाजिक विचारांमध्ये अधिक सखोल सुधारणांची आवश्यकता आहे.

एकमेकांशी स्पर्धात्मक अटींच्या अधीन राहून बहु–प्रेमसंबंध ठेवण्याची पद्धती समजा स्वीकारली तर काय? किंबहुना तीच परिस्थिती आज मोठ्या प्रमाणावर आढळते आहे. इथे हे लक्षात घेतले पाहिजे, की 'लग्नसंस्था' ही मूलभूत राजकीय एकाधिकारशाही संस्था आहे. आणि बहुप्रेमसंबंध ही घटना राजकीय उदारमतवादाच्या मूळ मूल्यांशी विसंगत बनत आहे.

प्रेमाच्या भविष्याबाबत चौथी गोष्ट अशी की विविध उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या व त्यानुसार बदलणाऱ्या जीवनशैलीचा 'प्रेम करणे' या मानवी क्षमतेवरच होणारा परिणाम. भविष्यातील लोक प्रेमाला कसे महत्त्व देतील व त्याबद्दल कसा विचार करतील, याचा काहीएक अंदाज करणे आवश्यक आहे. तथाकथित 'क्वांटिफाइड रिलेशनशिप' तंत्रज्ञान, बायोमेडिकल प्रेमवर्धक औषधे ('लव्ह ड्रग्स') आणि रोबोट्सने मानवाच्या प्रेमात पडणे किंवा मानवाने रोबोट्सच्या प्रेमात पडणे आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ते' (AI)च्या प्रेमात पडण्याच्या सर्वसाधारण शक्यतेवर आहे.

पाचवी गोष्ट म्हणजे, ऑनलाइन डेटिंग प्लॅटफॉर्म आणि लव्ह रोबोट्स ही दोन तंत्रज्ञान आपल्या भविष्यातील प्रेमाच्या आदर्शांवर कशाप्रकारे मूलतः अवांछित परिणाम करू शकतात, याचा विचार करणे. 'परिपूर्ण जोडीदार शोधण्याची' आस आणि त्या शोधाची शक्यता, त्याची अथक धडपड – मग तो माणूस असो वा रोबोट – आपल्या मनात एक विशिष्ट दृष्टिकोन आणि अपेक्षा निर्माण करते. तो असा की, आपले प्रेम–जोडीदार आपल्यासाठी 'तयार', परिपूर्ण, कोणत्याही क्षणी बदलण्यायोग्य आणि सरतेशेवटी आपल्याच आवडीनिवडी व इच्छांना अनुकूल असायला हवेत; आणि ते आपल्या निःस्वार्थ प्रेमाचे पात्र असायला नकोत.

प्रेमाचे भविष्य काय असेल, हा बव्हंशी एक तर्कवितर्कांचा विषय आहे. तरीही ही प्रकरणे भविष्याचा वेध घेण्याचे महत्त्व दाखवून देतात; कारण ती प्रेमावर होणाऱ्या नवीन सामाजिक घडामोडींच्या परिणामांचा अंदाज घेतात आणि त्यांच्या नैतिक परिणामांवर चिंतन करतात.

**लेखक व्यावसायिक तत्त्ववेत्ते आणि सल्लागार आहेत.**
**संपर्क : ९१५ ८६५ ८०६६**, wiselove2026@gmail.com

# वर्तमानाचा आरसा आणि प्रश्नांची मशाल



जगदीश काबरे

**नास्तिक दर्शन**




'**चा**र्वाक कोण होते?' हा प्रश्न केवळ एका प्राचीन तत्त्वज्ञानी पंथाची ओळख करून देणारा नाही, तर भारतीय बौद्धिक इतिहासाच्या संपूर्ण रचनेलाच विचारणारा प्रश्न आहे. कारण भारतीय विचारपरंपरेचा इतिहास बहुधा आस्तिक, धर्मप्रधान आणि आध्यात्मिक चौकटीतून लिहिला गेला आहे. त्या चौकटीत जे विचार ईश्वर, आत्मा, परलोक, कर्मकांड आणि पुनर्जन्म या संकल्पनांना प्रश्न विचारतात, ते विचार अनेकदा 'विचलित', 'अधर्म्य', 'नाकारण्याजोगे' किंवा 'धोकादायक' ठरवले गेले. चार्वाक हे या प्रक्रियेचे सर्वात ठळक उदाहरण आहेत...

**भा**रतीय परंपरेत चार्वाकांचा उल्लेख वारंवार आढळतो. पण, तो बहुतेक वेळा विरोधकांच्या लेखनातून, टीकात्मक संदर्भात किंवा उपहासात्मक स्वरूपात येतो. त्यामुळे चार्वाक कोण होते, त्यांनी नेमके काय प्रश्न उपस्थित केले आणि ते प्रश्न का अस्वस्थ करणारे होते, याचा समतोल आणि स्वतंत्र विचार फार कमी प्रमाणात झालेला दिसतो. चार्वाकांचा विचार समजून घेण्याआधी भारतीय समाजाच्या त्या ऐतिहासिक टप्प्याचा विचार करणे आवश्यक ठरते, ज्या काळात धर्म, कर्मकांड आणि पुरोहितसत्ता यांचे प्राबल्य होते. वैदिक यज्ञव्यवस्था, ब्राह्मणवर्गाचा बौद्धिक आणि धार्मिक अधिकार आणि सामान्य माणसाच्या जीवनावर लादल्या जाणाऱ्या धार्मिक बंधनांची रचना या सगळ्यांनी मिळून एक अशी सामाजिक उतरंड निर्माण केली होती, जिथे प्रश्न विचारणे हा अपराध मानले जाऊ लागला होता. अशा परिस्थितीत प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे सत्य तपासण्याची मागणी करणे, ग्रंथप्रामाण्याला आव्हान देणे आणि धार्मिक दाव्यांना शंकास्पद ठरवणे ही केवळ या तत्त्वज्ञानाची कृती नव्हती, तर ती सामाजिक धाडसाची बाबही होती. चार्वाक विचारांचा उदय या धाडसाच्या पार्श्वभूमीवर झाला, हे समजून घेतल्याशिवाय त्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात येणार नाही.

**पुरोहितसत्तेला आव्हान**

चार्वाकांचा उदय ज्या काळात झाला, त्या काळात भारतीय समाजात यज्ञयाग, विधी, मंत्र आणि पुरोहितसत्ता यांचे प्रचंड प्राबल्य होते. धर्म ही केवळ आध्यात्मिक बाब न राहता, सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन बनला होता. कोण जन्माला कसा आला, त्याने काय करावे, काय खावे, काय वाचावे आणि काय विचारावे यावरही धार्मिक चौकट नियंत्रण ठेवत होती. अशा वातावरणात हे सगळे खरंच आहे का? याचा पुरावा काय? याचा सामान्य माणसाच्या आयुष्याशी काय संबंध? असे प्रश्न विचारणे म्हणजे समाजव्यवस्थेच्या मुळावर घाव घालण्यासारखे होते. चार्वाक विचार हा त्या अर्थाने केवळ तत्त्वज्ञानाचा प्रश्न नव्हता, तर तो एक सामाजिक हस्तक्षेप होता.

भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास अनेकदा 'षड्दर्शनां'च्या चौकटीत मांडला जातो. ही चौकटच मुळात आस्तिक दृष्टिकोनातून उभी राहिलेली असल्यामुळे चार्वाकांना त्यात बाहेरचे, दुय्यम किंवा अपूर्ण ठरवले जाते. प्रत्यक्षात चार्वाक विचार हा त्या काळातील प्रमुख तात्त्विक प्रवाहांशी थेट संवाद साधणारा, त्यांना प्रश्न विचारणारा आणि त्यांच्याशी संघर्ष करणारा विचारप्रवाह होता. तरीही चार्वाकांचे स्वतंत्र ग्रंथ आज उपलब्ध नाहीत, ही बाब त्यांच्या विचारांच्या कमकुवतपणाचे लक्षण नसून, त्यांच्या विचारांना दडपून टाकण्याच्या ऐतिहासिक प्रक्रियेचे द्योतक आहे.

जेव्हा एखादा विचारप्रवाह सत्ताधाऱ्यांना, धार्मिक प्रस्थापितांना किंवा सामाजिक उच्चवर्गाला अस्वस्थ करतो, तेव्हा तो नष्ट करण्यासाठी केवळ शस्त्रांचा नव्हे तर इतिहासलेखनाचाही वापर केला जातो. चार्वाकांच्या बाबतीत नेमके हेच घडले. कारण चार्वाकांबद्दल आपल्याला जे काही माहीत आहे, ते प्रामुख्याने त्यांच्या विरोधकांच्या लेखनातून येते. त्या लेखनात चार्वाकांना बहुधा भोगवादी, नैतिकताविरहित, समाजविघातक किंवा अल्पबुद्धी ठरवले गेले आहे. परंतु एखाद्या विचारप्रवाहाचे मूल्यमापन त्याच्या शत्रूंच्या वर्णनावर आधारित असेल, तर ते कितपत न्याय्य ठरू शकते, हा प्रश्न उपस्थित होतो.

येथे हेही स्पष्ट करणे आवश्यक आहे की चार्वाक विचारांचा अभ्यास म्हणजे केवळ प्राचीन इतिहासाची उजळणी नाही. चार्वाकांनी उपस्थित केलेले प्रश्न उदा. ज्ञानाचे निकष काय असावेत, अनुभव आणि श्रद्धा यांचे नाते कसे असावे, समाजावर धर्माचा अधिकार कितपत असावा आणि माणसाचे सुख-दुःख या जगात कसे समजून घ्यावे इत्यादी, हे आजही तितकेच जिवंत आहेत. आधुनिक विज्ञान, विवेकवाद आणि लोकशाही मूल्ये ज्या बौद्धिक परंपरेतून आकाराला आली, त्या परंपरेशी चार्वाक विचारांचे अनेक ठिकाणी अनपेक्षित साम्य दिसून येते. त्यामुळे चार्वाकांचा अभ्यास हा भूतकाळात डोकावण्यापुरता मर्यादित न राहता, वर्तमानकाळ समजून घेण्याचे साधन ठरतो.

**आंधळ्या श्रद्धेचा धिक्कार**

भारतीय समाजात 'नास्तिक' हा शब्द आजही नकारार्थी अर्थाने वापरला जातो. नास्तिकता म्हणजे नैतिकतेचा अभाव, संस्कृतीचा अपमान किंवा समाजविरोधी वृत्ती असा एक समज रूढ झालेला आहे. या समजाच्या मुळाशी चार्वाकांसारख्या विचारप्रवाहांविषयी पसरवलेले अपप्रचार आहेत. प्रत्यक्षात नास्तिकता ही श्रद्धेला नकार नसून, आंधळ्या श्रद्धेचा केलेला धिक्कार आहे, हे चार्वाक विचार समजून घेतल्यावर स्पष्ट होते. चार्वाक विचार गैर कर्मकांडांना प्रश्न विचारतात आणि

नास्तिकतेकडे एका बौद्धिक भूमिकेच्या दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करतात. म्हणून चार्वाक तत्त्वज्ञानाचे कोरडे सिद्धांत, सूत्रे किंवा तांत्रिक विवेचन देण्याऐवजी, चार्वाक विचारांची वाटचाल, त्यांच्याभोवती निर्माण झालेली भीती आणि त्यांच्यामुळे घडलेली वैचारिक उलथापालथ यांचा मागोवा यापुढील अनेक लेखांतून आपण घेणार आहोत. त्यामुळे हे विचार तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ते सामाजिक प्रश्नांमध्ये रस असणाऱ्या, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारू इच्छिणाऱ्या आणि भारतीय परंपरेचा पुनर्विचार करू पाहणाऱ्या वाचकांसाठीही उपयुक्त ठरणारे आहेत.

कोणतीही समाजव्यवस्था, कितीही प्राचीन किंवा पवित्र मानली गेली तरी, प्रश्न उपस्थित केल्याशिवाय टिकू शकत नाही. प्रश्न विचारण्याची परंपरा थांबली की समाज स्थिरावतो, जड होतो आणि शेवटी अन्यायाला खतपाणी घालू लागतो. चार्वाकांनी ही धोक्याची जाणीव हजारो वर्षांपूर्वीच ओळखली होती. म्हणूनच त्यांचा विचार केवळ एका काळापुरता मर्यादित न राहता, प्रत्येक काळात नव्याने अर्थ घेऊ शकतो. आजचा भारत पाहिला, तर एक विचित्र विरोधाभास प्रकर्षाने जाणवतो. एकीकडे विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, डिजिटल क्रांती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे भारतीय समाज आधुनिकतेच्या उंबरठ्यावर उभा आहे; तर दुसरीकडे अंधश्रद्धा, चमत्कारांवरील विश्वास, देवदूत, बाबाबुवा, धार्मिक उन्माद आणि कर्मकांड यांचा प्रभाव अधिक तीव्र होत चाललेला दिसतो. टीव्ही चॅनेल्स, सोशल मीडिया आणि राजकीय व्यासपीठांवरून श्रद्धेच्या नावाखाली भीती, अपराधभावना आणि परलोकाचे आमिष यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. अशा वातावरणात चार्वाक विचारांचा संदर्भ ऐरणीवर येतो. कारण चार्वाकांनी हजारो वर्षांपूर्वी उपस्थित केलेला प्रश्न-जे दिसत नाही, तपासता येत नाही, अनुभवता येत नाही, त्यावर जीवन उभारणे योग्य आहे का? हा प्रश्न आजच्या भारतातही तितकाच अस्वस्थ करणारा ठरतो.

**वारसा चार्वाकांचा**

समकालीन भारतात विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळी ज्या ठिकाणी उभ्या राहतात, त्या ठिकाणी चार्वाकांचा वारसा नकळतपणे कार्यरत असलेला दिसतो. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी, गौरी लंकेश, डॉ. आ. ह. साळुंखे, श्याम मानव यासारख्या विवेकवादी विचारवंतांनी जे प्रश्न विचारले, ते चार्वाकांच्या परंपरेतीलच प्रश्न आहेत, फक्त वेगळ्या ऐतिहासिक संदर्भात. देवाच्या नावावर होणारा शोषणाचा व्यापार, स्त्रियांवर लादली जाणारी धार्मिक बंधने, जातिव्यवस्थेला पवित्र ठरवणारी धार्मिक मांडणी, आणि दुःखाचे उदात्तीकरण करत 'पूर्वजन्मीच्या कर्मा'त शोधण्याची प्रवृत्ती या सगळ्यांवर प्रश्न विचारण्याची हिंमत ही चार्वाक परंपरेचीच आधुनिक अभिव्यक्ती आहे. त्यामुळे चार्वाक विचार हे केवळ प्राचीन ग्रंथांपुरते मर्यादित नसून, ते आजच्या सामाजिक संघर्षांत जिवंत स्वरूपात दिसतात.

**अनुभवाधिष्ठित आग्रह**

राजकारणाच्या पातळीवरही चार्वाक विचारांचे अप्रत्यक्ष प्रतिबिंब दिसून येते. जेव्हा राष्ट्रवाद, धर्म आणि संस्कृती यांच्या नावाखाली जनतेला भावनिकरीत्या संघटित केले जाते, तेव्हा तर्क, तथ्य आणि वास्तव बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो. अशा वेळी कोणत्याही दाव्याचा पुरावा काय? हा प्रश्न विचारणे हे राजकीयदृष्ट्याही धोकादायक ठरते. चार्वाकांचा इतिहास आपल्याला हे शिकवतो की प्रश्न विचारणारा विचार नेहमीच सत्तेला अस्वस्थ करतो. त्यामुळे आज भारतात जेव्हा विवेकवादी, पत्रकार, लेखक किंवा अभ्यासक प्रश्न विचारतात आणि त्यांना 'संस्कृतीविरोधी' किंवा 'राष्ट्रविरोधी' ठरवले जाते, तेव्हा त्या प्रक्रियेत चार्वाकांचा इतिहास पुनःपुन्हा जिवंत होताना दिसतो.

समकालीन भारतातील मध्यमवर्गीय जीवनातही चार्वाक विचारांचे संदर्भ सहज सापडतात. शिक्षण, नोकरी, आरोग्य, विवाह आणि भविष्य यांसारख्या अत्यंत व्यावहारिक प्रश्नांमध्ये माणूस एकीकडे विज्ञानावर अवलंबून असतो, तर दुसरीकडे त्याच प्रश्नांची उत्तरे कुंडली, ग्रहमान, वास्तु किंवा देवपूजेवर सोपवतो. हा द्वंद्वात्मक व्यवहार चार्वाक विचारांच्या पार्श्वभूमीवर अधिक स्पष्टपणे समजून घेता येतो. चार्वाकांनी अनुभवाधिष्ठित जीवनाचा आग्रह धरला होता, कारण माणसाचे दुःख आणि सुख हे या जगाशी संबंधित आहे, ही जाणीव त्यामागे होती. आजही जेव्हा माणूस प्रत्यक्ष उपायांऐवजी श्रद्धेच्या शॉर्टकटचा आधार घेतो, तेव्हा चार्वाकांचा प्रश्न पुन्हा समोर येतो. याचा परिणाम प्रत्यक्ष जीवनावर काय होतो?



*चार्वाकांनी वैदिक यज्ञव्यवस्थेला आव्हान दिले. या व्यवस्थेला प्रश्न केले. तोवर या व्यवस्थेमुळे सामाजिक-आर्थिक उतरंड आकारास आली होती. स्वर्गसुख, मोक्ष, दानकर्म आदी संकल्पनांनी समाजाच्या एका वर्गास बंदिवान करून सोडले होते. चार्वाकांनी शोषणाचे हे प्रारुप नाकारले होते...*

**हिंमत देणारा प्रश्न**

आजची पिढी प्रश्न विचारते, पण त्याच वेळी ती सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या अर्धसत्यांनाही बळी पडते. विज्ञान आणि अंधश्रद्धा, माहिती आणि अफवा, विवेक आणि भावनिक उन्माद यांच्यातील संघर्ष आज अधिक तीव्र झाला आहे. अशा वेळी चार्वाक विचारांचा अभ्यास हा केवळ बौद्धिक व्यायाम न राहता, वैचारिक आत्मसंरक्षणाचे साधन ठरतो. म्हणूनच 'चार्वाक कोण होते?' हा प्रश्न आजच्या भारतात अधिकच महत्त्वाचा ठरतो. कारण हा प्रश्न आपल्याला विचार करायला भाग पाडतो की आपण विज्ञानयुगात जगत आहोत की केवळ विज्ञानाचा वापर करून प्राचीन श्रद्धायुग अधिक मजबूत करत आहोत. चार्वाकांचा संदर्भ घेतल्याशिवाय हा प्रश्न पूर्णपणे समजून घेता येत नाही. या लेखमालेतून वाचकाला ही जाणीव करून द्यायची आहे की चार्वाक हे भूतकाळातील अवशेष नाहीत, तर आजच्या भारतातील वैचारिक संघर्षांचे एक अदृश्य पण प्रभावी सूत्र आहेत.

अशाप्रकारे समकालीन भारताशी नाते जोडल्यावर ही लेखमाला केवळ चार्वाकांचा इतिहास न राहता, आपण आज कोणत्या वैचारिक भूमीवर उभे आहोत याचे आत्मपरीक्षण करायला लावणारा महत्त्वाचा दस्तऐवज ठरणार आहे. कदाचित हेच या लेखमालेचे खरे प्रयोजन आहे. चार्वाक कोण होते, यापेक्षा आपण आज कितपत चार्वाकांसारखे प्रश्न विचारण्याची हिंमत ठेवतो, हा प्रश्न वाचकाच्या मनात रुजवणे महत्त्वाचे आहे. ही लेखमाला त्या प्रक्रियेचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

शेवटी, 'चार्वाक कोण होते?' हा प्रश्न एकाच उत्तराने संपणारा नाही. चार्वाक ही केवळ एक व्यक्ती नव्हती, पंथ नव्हता किंवा केवळ तत्त्वज्ञानाची शाळा नव्हती; तर चार्वाक हा एक प्रश्न विचारणारा असा समुदाय होता, तो प्रश्न आजही आपल्यासमोर उभा आहे. हा प्रश्न आपल्याला श्रद्धा आणि विवेक यांच्यातील सीमारेषा तपासायला भाग पाडतो, परंपरेचा आदर करताना तिचे चिकित्सक मूल्यमापन करण्याची हिंमत देतो, आणि सत्य शोधण्याच्या प्रवासात कोणत्याही अधिकाराला अंतिम मानू नये, हे शिकवतो.

ही भूमिका मांडताना एवढेच म्हणावेसे वाटते की, चार्वाकांना समजून घेणे म्हणजे केवळ त्यांच्याविषयी जाणून घेणे नाही, तर ही स्वतःच्या विचारांच्या मर्यादा ओळखण्याची आणि त्या विस्तारण्याची प्रक्रिया आहे. आपण श्रद्धेच्या आधारावर जगणार आहोत की विवेकाच्या आधारावर, परंपरेचा सन्मान करताना तिचा पुनर्विचार करणार आहोत की तिला पवित्र मानून प्रश्नच विचारणार नाही, हे ठरवण्याची वेळ प्रत्येक पिढीवर येते. आजचा भारत या वळणावर उभा आहे. म्हणूनच चार्वाकांना समजून घेणे म्हणजे केवळ भूतकाळात डोकावणे नाही, तर वर्तमानाचा आरसा पाहणे आणि भविष्यासाठी प्रश्नांची मशाल पेटवणे होय. या मशालीचा प्रकाश प्रखर करण्यासाठी चार्वाक विचारांची मांडणी करणारा हा एक छोटासा पण प्रामाणिक प्रयत्न आहे.

**जगदीश काबरे हे समाजचिंतक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारक आहेत. संपर्क : ९९२०१९७६८०**

**ई मेल :** jetjagdish@gmail.com

# मंडी हाऊस कॉलिंग!



आशय गुणे

बरसाती मजला



'त्रिवेणी'चा रसिक संगम...




*मंडी हाऊसची अखंड नाट्यधारा...*

**२०१७ च्या जानेवारीत दिल्लीला गेलो, ते माझ्या ऑफिसच्या एका कार्यक्रमासाठी. पुढे त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये महिनाभर आणि त्याच्या पुढल्यावर्षी दोन आठवडे असे विस्तारित प्रवास झाले. कोविडची महासाथ येईपर्यंत वर्षात किमान आठ ते दहा छोट्या फेऱ्या होत असत. या सर्व दिल्ली वाऱ्यांनी माझ्या मनात दिल्लीत स्थायिक होण्याच्या इच्छेचे बीज रोवले. या इच्छेची तीव्रता ज्या एका जागेमुळे सर्वाधिक प्रकट झाली ती म्हणजे, मंडी हाऊस...**

नव्या महाराष्ट्र सदन येथे काही मित्रांना भेटायला जात असताना गुगल मॅपवर सर्वात जवळचे मेट्रो स्थानक मंडी हाऊस आहे, हे समजलं. तिथून चालत जाताना मंडी हाऊस सर्कल येथे वेगवेगळ्या नाटकांच्या जाहिराती दिसल्या आणि तिथे फेमस नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (एनएसडी) आहे असंही कळलं. आजूबाजूला पाहिलं आणि तानसेन मार्ग, कोपर्निकस मार्ग अशी रस्त्यांची नावं दिसली आणि निश्चितच आपण एका वेगळ्या मंत्रभारल्या भागात उतरलो आहोत हे लक्षात आलं. तेवढ्यात जवळच त्रिवेणी कला संगमची इमारत दिसली आणि तिथेही संगीत व नाटकांच्या कार्यक्रमांचे फलक लावलेले दिसले. कोपर्निकस मार्गावरून पुढे चालत आलो, ललित कला अकादमीची इमारत दिसली. थोडं पुढे श्रीराम भारतीय कला केंद्र व कमानी ऑडिटोरियमच्या इमारती दिसल्या. एकूणच हा भाग संगीत, कला आणि नाटक यांचे केंद्रस्थान आहे, हे एव्हाना स्पष्ट झालं. हाच कोपर्निकस मार्ग थेट इंडिया गेटपर्यंत जातो, तर मंडी हाऊसच्या सर्कल (दिल्लीच्या भाषेत गोलचक्कर) पासून बाराखंबा मार्ग हा कनॉट प्लेसपर्यंत जातो.

**अजब प्रभाव वर्तुळांचा**

इंडिया गेट, मंडी हाऊस आणि कनॉट प्लेस ही तीन सर्कल्स आणि त्यांच्या भोवती असलेलं क्षेत्रफळ आणि जुन्या दिल्लीचा काही भाग यात जवळजवळ ९० टक्के दिल्ली दर्शन पूर्ण होते. शिवाय, आपल्या सर्वांच्या मनात सरकारी कार्यालयांची दिल्ली आहे ती देखील हीच. दिल्लीत मॉल येण्याआधी अनेक दशकं कनॉट प्लेस हेच इथलं प्रमुख बाजारपेठेचं ठिकाण होतं. त्याचबरोबर चाणक्यपुरी, आर. के. पुरम, मोती बाग, लोधी कॉम्प्लेक्स इथल्या सरकारी कॉलनी, खाजगी कंपन्यांनी बांधलेल्या ग्रेटर कैलास, साऊथ एक्सस्टेंशन आणि राजुरी गार्डनसारख्या कॉलनी आणि नंतर ऐंशीच्या दशकात बांधलेल्या वसंत कुंज, द्वारका आणि रोहिणी यांच्यासारख्या टाऊनशिप इत्यादी भागांमध्ये छोटी दुकानं उभी राहिली (अशी अजूनही त्या भागात दिसतात). त्याच बरोबर सरोजिनी नगर, चांदनी चौक, लजपत नगर आणि अभिजनांचा वावर असलेलं खान मार्केट अशा बाजारपेठा दिल्लीत आहेतच. मुंबईत ठिकठिकाणी छोटी, मोठी दुकानं पाहण्याची सवय असलेल्या व्यक्तीला दिल्ली तुलनेत ओकीबोकी वाटते, ही तिच्या या 'colony market' संकल्पनेमुळे. कारण एखादी कॉलनी संपली की दुसरी येईपर्यंत मोकळ्या जागेशिवाय काही नसते.

तर, अशा या कॉलनी-युक्त दिल्ली शहराचे कला केंद्र आहे, मंडी हाऊस. या मंडी हाऊसचा पहिला, प्रत्यक्ष अनुभव घेतला १ फेब्रुवारी, २०२० या दिवशी. त्या दिवशी कुमार केतकरसरांमुळे अमोल पालेकर यांचे एकपात्री हिंदी नाटक 'कुसूर' पाहता आले. निमित्त होते, २१व्या भारत रंग महोत्सवाचे आणि ठिकाण होते, कमानी नाट्यगृह. या आठवणीत कायम राहणाऱ्या प्रसंगानंतर मंडी हाऊसचा संबंध आला, २०२४ च्या डिसेंबर महिन्यात. तोपर्यंत मी दिल्लीत स्थायिक झालो होतो.

**अमर्त्य सेन घराणे**

फेसबुकवर एका कार्यक्रमाची माहिती दिसली. डिसेंबर ६ ते ८ या दिवशी संध्याकाळी साडेपाच वाजल्यापासून मंडी हाऊस स्थित त्रिवेणी कला संगम येथील नाट्यगृहात रोज तीन कलाकार अशा एकूण नऊ कलाकारांचा कार्यक्रम होता. त्याचा शेवट पं. स्वपन चौधरी यांच्या तबला वादनाने होणार होता. तिथे दिलेल्या फोन नंबरवर तिकिटासाठी विचारल्यास कार्यक्रम मोफत असल्याचे समजले. मात्र मी गुडगावहून ऑफिस संपवून येणार, याचे संबंधित व्यक्तीला आश्चर्य वाटल्याचे दिसले. 'स्वपनजी का तबला सुनने हम कहीं से भी आ सकते हैं,' असं मी सांगितल्यावर त्यांनी माझी अधिक चौकशी केली आणि मी महाराष्ट्रातून आलो आहे, हे समजल्यावर तर त्यांना विशेष आनंद झाला. 'आप महाराष्ट्र से हो, आप को तो संगीत पसंद ही होगा,' असं ते म्हणाले. 'पर आप भी तो बंगाल से हो,' असं म्हणून मी माझ्या राज्याला मिळालेली दाद बंगालशी सामायिक करून घेतली!

देशात ही दोन राज्य अशी आहेत, जिथे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत योग्य पद्धतीने जपलं गेलं आहे. मध्ययुगात जरी शास्त्रीय संगीत आज असलेल्या हिंदी प्रांतात विकसित झालं असलं तरी ते बहरलं आणि त्याला योग्य दाद मिळाली ती, महाराष्ट्र आणि बंगाल येथेच! त्यातही मला विचारलंत, तर मी बंगालला वाद्य संगीताची खाण म्हणीन आणि कंठसंगीतासाठी तो मान महाराष्ट्राकडेच राखून ठेवीन. परंतु हे संभाषण पुढे सरकलं ते मला मिळालेल्या आश्चर्याच्या आणि सुखद धक्क्याने. कार्यक्रमाच्या दिवशी त्यांचा फोन आला. आपके लिये एकदम फर्स्ट रो में सीट रिजर्व कर दिया हैं. आपका नाम वहाँ दिख जायेगा. आणि मी स्वपन चौधरी यांचं स्वतंत्र तबला वादन पहिल्या रांगेत बसून ऐकलं. कारण काय? तर, आप महाराष्ट्र से हो.

त्या दिवशी पं. स्वपन चौधरी यांचं वादन उत्कृष्ट झालं. महत्त्वाचं म्हणजे, त्यांची खासियत असलेला 'धीरे धीरे' हा बोल त्यांनी वाजवून नेहमीप्रमाणे सर्वांना स्तिमित केलं. माझ्या शेजारच्या खुर्चीवर आजचे आघाडीचे तबलावादक बनारस घराण्याचे शुभ महाराज बसले होते. स्वपनदा तबला जुळवीत असताना मी त्यांच्याशी थोड्या गप्पा मारल्या. ते देखील महाराष्ट्राबद्दल आणि लोकांच्या दाद देण्याबद्दल खूप आपुलकीने बोलले. तबलावादन झाल्यावर मी स्वपनदांना नमस्कार करताना त्यांच्या अर्थशास्त्र या विषयाच्या आवडीबद्दल थोडं बोललो. तुला बंगालमध्ये खूप इकॉनॉमिस्ट सापडतील, असं त्यांनी म्हटल्यावर, मला कल्पना आहे, मी अमर्त्य सेन घराण्याचा आहे, असं सांगितल्यावर त्यांची हसून दाद मिळवली.

त्या दिवसानंतर मात्र मंडी हाऊस या ठिकाणाने माझ्या दिल्लीच्या आयुष्यात एक हक्काचे स्थान प्राप्त केले. शाहिद परवेझ, पं. उल्हास कशाळकर, मंजुषा पाटील, संजीव अभ्यंकर यांच्यासारखे पट्टीचे कलाकार मी इथे ऐकले. त्याच बरोबर ओडिसी, कुचिपुडी अशा नृत्यांचे कार्यक्रमही मनःपूत अनुभवले. शिवाय मॉडर्न स्कूल, बाराखंबा रोड या गाजलेल्या कार्यक्रमांना हजेरी लावत परवीन सुलतान, राहुल शर्मा असे कलाकार ऐकले. वेळेअभावी नाटकांच्या कार्यक्रमांना मात्र जाता आलं नाही, मात्र ही उणीव पुढे दिल्लीला जाईन तेव्हा जरूर भरून काढायची आहे. खरं म्हणजे, मंडी हाऊस मार्गे एखाद्या ठिकाणी जाताना मात्र कधी कधी विजय तेंडुलकरांच्या हिंदी अनुवादित नाटकाच्या जाहिरातीचे फलक दिसायचे, तेव्हा छान वाटायचं.

माझं ऑफिस गुडगावला असल्यामुळे मला मंडी हाऊसच्या कार्यक्रमांच्या वेळापत्रकाशी जुळवून घेणं कठीण जात होतं. अनेक कार्यक्रम हे संध्याकाळी सुरू व्हायचे. ही माझी गुडगावहून निघण्याची वेळ होती. मला वाटतं राजधानी दिल्लीने एनसीआरचा विचार न केल्याचे हे एक प्रतिनिधिक उदाहरण असू शकेल. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे मेट्रोपूर्व कॉलनीयुक्त, सरकारी छाप असलेल्या दिल्लीत कदाचित रिक्षा करून किंवा सरकारी गाडीने ऑफिस संपवून मंडी हाऊसला नाटक बघायला किंवा गाणं ऐकायला जाणं सोपं असणार. केंद्रीय सचिवालयापासून किंवा राज्याच्या सरकारी कार्यालयापासून गाडीचा प्रवास केला, तर मंडी हाऊस आहेच

## दिल्लीचा ठाव

गेली जवळजवळ दोन वर्ष दिल्लीत राहून आल्यानंतर व तिथे अनेकदा जाऊन तिथला परिसर आपलासा आणि ओळखीचा वाटू लागल्यानंतर तिथल्या जीवनपद्धतीबद्दल कुणी काही बोललं किंवा लिहिलं तर साहजिकच आनंद होतो. हे बोलणाऱ्या किंवा लिहिणाऱ्या व्यक्तीबद्दल उत्सुकता व आपुलकी वाटू लागते. एक दुवा साधला जातो. जर संबंधित व्यक्तीने आपण ज्या गोष्टींचा अनुभव घेतलेला असतो, दाद दिलेली असते त्यालाच दुजोरा दिलेला असेल तर हा आनंद द्विगुणित होतो. नुकतेच सुप्रिया देवस्थळी यांचे 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेले 'दिल्ली डायरी' हे पुस्तक वाचले, तेव्हा नेमका असाच आनंद द्विगुणीत झाल्याचा अनुभव आला.

दिल्ली हा विषय काढला की साहजिकच आपल्याला (म्हणजे, महाराष्ट्रात राहणाऱ्यांना) सतत नकारघंटाच ऐकाव्या लागतात. याची अनेक कारणं असू शकतात. गेल्या काही वर्षांतल वाढत असलेले प्रदूषण, स्टँड अप कॉमेडी करणाऱ्यांचा मुंबई विरुद्ध दिल्ली हा सततचा विषय, सोशल मीडियाद्वारे एखाद्या जागेचे किंवा व्यक्ती अथवा समुदायाचे होणारे चित्रण किंवा दिल्ली तितके सुरक्षित नाही ही तक्रार. यांच्यापैकी कोणतीही कारणं खोटी अथवा मुद्दाम रचलेली अशी नाहीत. मात्र हीच आणि एवढीच त्या शहराची अथवा समुदायाची ओळख नाही, हे देखील खरं आहे. म्हणूनच हे पुस्तक महत्त्वाचे. यात दिल्लीची उगाचच स्तुती नाही आणि वरील कारणं सांगून केवळ नकारात्मक प्रतिमा सादर करणे हे देखील नाही. तर, माहिती असलेल्या व नसलेल्या ज्या घटकांमुळे दिल्लीचे दिल्लीपण सिद्ध होते, त्या घटकांचे प्रामाणिक वर्णन आहे.

अन्यथा अनेक लोक एखाद्या नव्या ठिकाणी राहायला किंवा फिरायला जाणार असतील तर आपली त्या जागेबद्दलची मतं काय आहेत, याच्या पार्श्वभूमीवर त्या जागेकडे पाहतात. किंबहुना याचमुळे ती जागा अनुभवताना अपेक्षित संतुलन साधता येत नाही. 'मी' पण समोर येत राहते. गोवा हे कदाचित अशा वागण्याचे उत्तम उदाहरण असेल. त्यामुळे देशभरातील बहुतांश पर्यटकांना

दहा मिनिटांच्या अंतरावर. परंतु शहर विस्तारलं आणि दिल्लीत आता एनसीआरचा समावेश झाला. बहुतांश मध्यमवर्ग हा गुडगाव तसेच नोएडाला जाऊ लागला. मात्र जुन्या सवयी तशाच आहेत.

**सरकारी खाक्या तसाच**

दिल्लीच्या अजून एका सरकारी स्वभावाचा अनुभव मला मंडी हाऊसलाच आला. साहित्य अकादमीच्या लायब्ररीत अनेक भाषांची पुस्तकं आहेत, असं माझ्या वाचण्यात आलं. तेव्हा मराठी आणि हिंदी साहित्य वाचता येईल अशा अपेक्षेने तिथलं सदस्यत्व घ्यायला गेलो. आणि काही क्षणातच डोक्याला हात लावून परत आलो. या लायब्ररीचे फक्त दिल्ली किंवा एनसीआर क्षेत्रात राहणाऱ्या लोकांनाच सदस्यत्व मिळू शकतं, मख्ख चेहरा ठेवून तिथल्या ग्रंथपाल बाईंनी मला सांगितलं. पण मी इथे राहिला आलो आहे, मला मेंबर होता येणार नाही? मी आश्चर्यचकित होऊन विचारलं. नाही. असा नियम आहे, हे साधं उत्तर आलं. पण मग इथली इतर भाषेतील पुस्तकं कोण वाचेल आणि ती पडून राहिली तर उपयोग काय? असे मुद्दे उपस्थित करून मी थोडा प्रयत्न सुरु ठेवला. पण शेवटी काहीच हाती लागलं नाही.

**गाण्याच्या शिकवणीचे धडे**

त्यामुळे साहित्य आणि नाटक या दोन्ही क्षेत्रांत मला फार शिरकाव करता आला नाही. संगीत ऐकणे सुरूच राहिले. इतके की एकदा त्रिवेणी कला संगम येथील गाण्याची क्लासची जाहिरात पाहून मी स्वतः तिथे गाणं शिकायचे ठरवलं. तिथल्या गायन मास्तरांसमोर जाऊन रीतसर ऑडिशन दिली. दर रविवारी संध्याकाळी ५ ते ७ ही बॅच निवडली. ही माझी शिकवणी मे २०२५ ते फेब्रुवारी २०२६ अशी एकूण दहा महिने चालली.

आमचे मास्तर डॉ. अजित सिंह हे अत्यंत भले आणि सुराला पक्के गृहस्थ होते. सुरुवातीच्या सुरांच्या रियाजात त्यांची स्वरावरची चांगली पकड लक्षात यायची. मला संगीताचे प्राथमिक ज्ञान असले, तरीही जवळजवळ वीस वर्षांनी मी विद्यार्थ्याच्या भूमिकेत गेलो होतो. गायन शिकणे, तिथल्या क्षेत्रात शिरकाव करणे आणि एकंदर थोडासा विरंगुळा आणि आनंद प्राप्त करणे हाच माझा उद्देश होता. मात्र तिथे आलेले विद्यार्थी यातील एक सोडला, तर इतर सर्व नवखे होते आणि त्यातील दोन मुलं तर शाळेत जाणारी होती. अशी सर्वांची मिळून जवळजवळ पंधरा मुलांची बॅच तयार झाली होती. दहा





सुप्रिया देवस्थळी

गोव्याबद्दल – म्हणजे, तिथला इतिहास, तिथली लोकं, तिथली भाषा इत्यादी – जवळपास काहीच माहिती नसते. अशा वृत्तीमुळे साचेबद्ध समजुती निर्माण होतात. या पुस्तकात सुप्रिया देवस्थळी यांनी अशा कोणत्याही साचेबद्ध समजुती (stereotypes) मांडलेल्या नाहीत, तशा त्या अप्रत्यक्षरित्या देखील समोर येत नाहीत.

हे संतुलन साधले गेल्यामुळेच दिल्लीची टोकाची वर्णनं केली जातात तशी ती या पुस्तकात आढळत नाहीत. म्हणूनच टोकाची थंडी, टोकाचा उन्हाळा, हिवाळ्याआधी निर्माण होणारा गारवा व थंडीनंतर वसंत ऋतुत वातावरणातील प्रसन्नता ही दिल्लीच्या वातावरणातील स्थित्यंतरे व त्यातून मिळणारा आनंद पुस्तकात छानपैकी झळकला आहे. दिल्लीत प्रचंड प्रदूषण आहे हे जरी खरं असलं तरीही या संतुलनामुळे देवस्थळी यांनी तिथली हिरवळ, तिथल्या मोठ्या बागा या देखील डोळसपणे टिपल्या आहेत. प्रदूषणाबद्दलच सांगायचे असल्यास पुस्तकात त्यावर एक स्वतंत्र प्रकरण आहे. त्यात विषयाच्या मुळापर्यंत जाऊन प्रदूषण नेमके कोणत्या घटनांमुळे झाले, त्यात सरसकट एका समूहाला लक्ष्य करण्यात किंवा पंजाब/हरियाणा विरुद्ध दिल्ली अशी प्रक्षोभक मांडणी करण्यात (जी सोशल मीडियावर अगदी नेटाने केली जात असते) काहीही अर्थ नाही, हे सविस्तरपणे मांडले आहे. ही समंजस मांडणी खरं तर कोणत्याही धोरणात्मक निर्याणाचा पाया असायला हवी. दुर्दैवाने दिल्लीच काय, तर इतर कोणत्याही शहरातील समस्या या मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमे इथपासून सोशल मीडियावर पोहोचल्यापासून ही मांडणी आपले स्थान हरवून बसली आहे.

महिन्यांनंतर जवळजवळ पाच ते सहा विद्यार्थीच टिकून होते.

या कालावधीत मला लक्षात आलेली गोष्ट म्हणजे. गेल्या वीस वर्षात (म्हणजे घरी, पनवेलला, हार्मोनियम शिकतानाच्या माझ्या शेवटच्या वर्षापासून) संगीत कसे शिकवावे या पद्धतीत जराही बदल घडलेला नाही. मात्र समोर बसलेल्या मुलांमध्ये – विशेषतः शाळेत जाणाऱ्या मुलांमध्ये – ही पद्धती आत्मसात करण्याचे सामर्थ्य मला तरी दिसत नव्हते. उदाहरणार्थ, सा, रे, ग, म ची नोटेशन आणि नंतर बंदिशींचे शब्द हे मोजून दोन जण सोडून इतर सर्व इंग्लिशमध्ये लिहीत होती. म्हणजे आपण पुन्हा मौखिक परंपरेकडे चाललो आहोत, की काय असं मला अधूनमधून वाटत असे. पुढे काही महिन्यांनी बंदिशी शिकवताना या पोरांची बरीच पंचाईत होत असल्याचं दिसायचं. उदाहरणार्थ; यमन रागातील एका बंदिशीच्या अंतऱ्याची ओळ 'नाद वेद सब वेद से कठीण हैं' अशी होती, जी एका सहावी की सातवीतील शीख मुलाने 'नाग वेद' असं लिहिलं आणि मास्तरांचा ओरडा खाल्ला! रागांची नावं, बंदिशींचे शब्द, थाट, ताल यांची कोणतीही प्राथमिक ओळख न देता मास्तर माहिती द्यायला सुरू करायचे. त्यामुळे मुलांना हळहळू कंटाळा यायला लागायचा. परिणामी हळूहळू मुलांची गळती सुरू झाली. गळती थांबून शेवटी उरलेली मुलं अशी होती ज्यांना संगीताची थोडीशी माहिती होती. याचा अर्थ, ज्यांना संगीत थोडंसं कळतं त्यांच्यासाठीच गाणं शिकायचे दरवाजे उघडे आहेत. इतरांनी त्यांचं काय ते बघून घ्यावं. जर देशातील नावाजलेल्या केंद्रात गाणं शिकवायची ही गत असेल, तर शास्त्रीय संगीताचा प्रचार होणार कसा? डॉ. सिंह हे मनाने भले होते, हे इथे पुन्हा एकदा नमूद करायला हवं.

**महाराष्ट्राचा आदर**

एकूणच, संगीत शिकवण्याच्या पद्धतीत कोणताही बदल झालेला नाही हे मात्र मला चांगलेच लक्षात आले. मात्र ज्यांना संगीत कळत होतं त्यांना महाराष्ट्र या स्थानाबद्दल विशेष आदर होता हे मला पुन्हा एकदा समजलं. सभी कलाकार वहीं से आते हैं, असं मला तिथला एक पंजाबी मुलगा म्हणाला होता. आम्ही पॉप संगीतात फार वेळ फुकट घालवतो. त्यामुळे तुमच्यासारखे कलाकार इथे तयार होत नाहीत, अशी त्याची नेहमीची तक्रार असे. आमचे मास्तर महाराष्ट्राबद्दल विशेष बोलत नसत, पण एका कलाकाराचं नाव त्यांच्या तोंडी सतत असे. ते म्हणजे भीमसेनजी. कधीही चांगल्या गाण्याचे किंवा गायकाचे उदाहरण

'मंडी हाऊस'सारख्या दिल्लीच्या सांस्कृतिक प्रदेशातील वावर, खान मार्केटमधील ऐतिहासिक पुस्तकांच्या दुकानाचे रसाळ वर्णन व निजामुद्दीन दर्ग्यातील वसंत पंचमी साजरी होण्याचे वर्णन एक वाचक म्हणून मला विशेष भावले. कारण ही ठिकाणं व हे अनुभव माझेही भावविश्व व्यापून राहिले आहेत. त्याचबरोबर विश्व पुस्तक प्रदर्शन आणि त्याच्याद्वारे 'भारत मंडपम' व जश्न-ए-रेख्ता यांची वर्णनही चांगली झाली आहेत. या वर्णनांमुळे दिल्लीचे तसे अपरिचित (कदाचित जश्न-ए-रेख्ता अपवाद असावे) चित्र वाचकांपुढे मांडले जाईल याची मला खात्री आहे.

एरवी फक्त सत्ताकेंद्र, राजकारण या व अशाच बाबींशी जोडली गेलेली दिल्ली ही अनेक अंगांनी समृद्ध आहे, हेच या लेखांद्वारे उलगडून येते. तसेच दिल्लीतील बाजारपेठ, तिथे काय मिळते, तिथली खासियत काय याची देखील महत्वाची मांडणी लेखिकेने केली आहे. याच कारण असं की मॉल्सच्या वाढत्या प्रभावामुळे सर्व मोठ्या शहरांमध्ये एका विशिष्ट प्रकारचा एकजिनसीपण आलेला आहे. मध्यमवर्गाच्या वावरण्यातही स्थानिक बाजारपेठ क्वचित आढळते. गंमत म्हणून उदाहरण द्यायचे झाल्यास मी माझी थंडीची शॉपिंग (जॅकेट, वॉर्मर इत्यादी) ही दिल्लीच्या सदर बाजार कॅन्टोन्मेंट इथून केली हे समजल्यावर माझ्या ऑफिसमधील सहकाऱ्यांनी आश्चर्य व्यक्त केलं होतं. ॲमेझॉनवर मिळतं की हे त्यांचं कारण. अशा पार्श्वभूमीवर स्थानिक बाजारपेठांचा उल्लेख होणे निश्चितच खास.

दिल्ली व मुंबई संबंधित बऱ्याच जणांचा आणखी एक आवडता विषय म्हणजे, दोन्ही शहरातील खाद्यपदार्थ किंवा फळं-भाज्या यांच्या नावात होणारे गोंधळ. 'कांदा विरुद्ध प्याज' किंवा 'खुल्ले रुपये विरुद्ध छुट्टे पैसे' हे स्टँड-अप कॉमेडियन किंवा रील उत्पादक यांनी चावून चोथा केलेले विषय! या मांडणीत काही गैर नसले तरीही दिल्लीत चुकून प्याज ऐवजी 'कांदा देना' ही एकच घटना घडत नसते. लेखिकेने या दोन शहरांमधील गोंधळ मांडला आहेच, परंतु त्याचबरोबर दोन्ही शहरातील भाज्यांच्या नावातील फरक इथपासून दिल्लीतील मदतनीसांकडून स्वयंपाक करवून घेत असताना काय परिस्थिती येऊ शकते याची विस्तृत मांडणी केली आहे. दिल्लीत दीर्घकाळ स्थायिक होण्याची संधी

द्यायचे असल्यास, भीमसेनजी जैसे बडे कलाकार, अशी सुरुवात होत असे. अशा वेळेस मला लहानपणी तेव्हाच्या स्टार टीव्हीवर पाहिलेल्या 'मास्टर कार्ड फॅमिली फॉर्च्युन' या कार्यक्रमाची आठवण होत असे. दोन कुटुंबं एकमेकांचे प्रतिस्पर्धी असायचे आणि प्रत्येकाला एखाद्या सर्वेक्षणात विचारलेला प्रश्न विचारायचे. जर संबंधित गटाचे उत्तर सर्वेक्षणात विचारलेल्या जास्तीतजास्त लोकांच्या उत्तराशी मेळ खात असेल, तर त्यांना सर्वाधिक गुण असे काहीसे त्या कार्यक्रमाचे स्वरूप होते. मला इतकं आठवतंय, की लहानपणी पाहिलेल्या त्या एपिसोडमध्ये संबंधित कुटुंब दिल्लीचं होतं. त्यांना विचारलं होतं, की भारतातील सर्वात लोकप्रिय गायकाचे नाव सांगा. त्यांचे आणि सर्वेक्षणातील १०० पैकी सर्वात जास्त लोकांचे उत्तर होते, भीमसेन जोशी. तेव्हा मला शास्त्रीय संगीत कळतंही नव्हतं. मात्र पुढे भीमसेन जोशींची गायकी ऐकली, त्यांचा जीवनप्रवास पाहिला, तेव्हा खऱ्या अर्थाने उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम दाद मिळवलेला कलाकार हाच, याची प्रचिती आली.

**गायकांमधले नेहरू**

भीमसेन जोशींचे निधन होऊनही आता पंधरा वर्ष झाली. तरीही त्यांच्या सुरांची जादू दिल्लीतल्या त्या मंडी हाऊसमधील गाण्याच्या वर्गात आणि गाणं ऐकणाऱ्या लोकांमध्ये अजून टिकून आहे हे विलक्षण होते. मी तिथे जाण्याच्या खूप वर्ष, खरं तर काही दशकं, आधीपासून 'महाराष्ट्र' म्हणजे उत्कृष्ट शास्त्रीय संगीत सादर करणाऱ्यांचे व ऐकणाऱ्यांचे स्थान ही ओळख निर्माण होण्याचे निमित्त देखील. त्यांचा हा विलक्षण प्रवास पाहता मी त्यांचे वर्णन माझ्या एका लेखात गायकांमधील नेहरू असे केले होते. कारण आपल्या कलेद्वारे देशाला स्वातंत्र्यानंतर 'राष्ट्र' म्हणून एकत्र बांधण्याचे श्रेय ज्या काही लोकांना जाते त्यात मी भीमसेन जोशींचा समावेश करतो.

सारांश असा, की मंडी हाऊस आजही अगदी दिमाखात उभे आहे. मात्र त्याचा ऐतिहासिक वारसा आहे म्हणून. आधी लिहिल्याप्रमाणे मी विद्यार्थी दशेत होतो, त्याला आता वीस वर्षांचा काळ लोटला. तेव्हाची मुलं मराठी किंवा हिंदीत लिहू शकत होती आणि वातावरणात काही मोजकेच आवाज ऐकू येत होते. आतासारखा डिजिटल कोलाहल नव्हता. आम्ही संगीत किंवा कोणत्याही कलेकडे वारसा म्हणून पाहू शकत होतो, कारण आजच्यासारखे रोज वेगवेगळे ट्रेंड नव्हते. मी

मिळाल्यास हे पुस्तक त्यासाठी वाचणे आवश्यक आहे.

दिल्लीत दीर्घकाळ स्थायिक होण्यासाठी आणखी एक उपयुक्त माहिती या पुस्तकात आहे, ती म्हणजे शहरात कार्यरत असलेल्या मराठी संस्थांची. कुणी व्यक्ती अथवा कुटुंब दीर्घ काळासाठी दिल्लीत राहणार असेल, तर तिथले मराठी सांस्कृतिक जीवन समजून घेणे आवश्यक वाटू शकते. त्यासाठी या पुस्तकातील 'मराठा तितुका मेळावा, महाराष्ट्र धर्म जागवावा' हे प्रकरण उपयोगी ठरेल.

दिल्लीची माहिती इतक्या छान पद्धतीने मांडणाऱ्या या पुस्तकाकडून ज्या आणखी काही अपेक्षा पूर्ण होऊ शकल्या असत्या, त्याही या निमित्ताने मांडाव्याशा वाटतात. लेखिकेने नमूद केल्याप्रमाणे त्या आता दिल्लीत आठ वर्षांपासून राहत आहेत. या आठ वर्षात त्यांनी या शहरातील अनेक घडामोडी पहिल्या आहेत. खरं तर या आठ वर्षात (किंवा खरं तर पंधरा वर्षांचा कालावधी ध्यानात घेतल्यास) दिल्लीच्या एनसीआरमध्ये झपाट्याने विस्तार झाला आहे. याचे एक कारण दिल्ली मेट्रो हे आहे. हा विस्तार केवळ पायाभूत सुविधात्मक नसून त्याने संबंधित परिसराला एक वेगळी ओळख दिली आहे. गुडगाव आणि नोएडा ही दोन नावं देशात अधोरेखित होणारा काळ देखील हाच. त्यामुळे आता दिल्लीची ओळख सांगताना किंवा त्या शहराबद्दल बोलताना या दोन शहर-समूहाचा उल्लेख होणं गरजेचं आहे. पुस्तकात याचा ओझरता उल्लेख जरी असला तरीही दिल्लीप्रमाणे गुडगाव आणि नोएडा यांना काय म्हणायचं आहे हे सांगणं महत्त्वाचं ठरेल. कारण  मराठी माणसांचे जे स्थलांतर दिल्लीत होते आहे किंवा या पुढे होईल, ते सरकारी नोकरीसाठी नसल्यास गुडगाव किंवा नोएडात होते आहे/होईल. अर्थात, लेखिका या सरकारी क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे त्यांचे या दोन भूभागात जाण्याचे प्रसंग कमी असावेत, हे समजून घेण्यासारखे आहे.

पुस्तकात आणखी एका विषयाचा समावेश हवा होता तो म्हणजे, सामान्य दिल्लीकर. तसा त्यांचा काही प्रसंगी उल्लेख आहे व त्या प्रसंगांद्वारे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य मांडण्याचा प्रयत्नही झाला आहे. परंतु दिल्लीबद्दल महाराष्ट्रातील सर्वसामान्य मत हे 'सत्ताकेंद्र' हेच असल्यामुळे तिथल्या सामान्य जनतेबद्दल फार कमी माहिती



*सत्तेची सळसळ अनुभवत असलेल्या दिल्लीच्या त्रिवेणी कला संगमावर मन हरखून टाकणारे संतूरवादक राहुल शर्मा, गायक पं. उल्हास कशाळकर, तबलावादक पं. स्वपन चौधरी आदी कलावंतांचे कार्यक्रम नित्य होत असतात. सर्व अडथळे पार करून ते अनुभवणे हा एक मनाला समृद्धी देणारा क्षण असतो...*

वर्गात पाहिलेल्या मुलांचा तर हिंदी लिहिण्याशीच संबंध नव्हता – ते स्वतः हिंदी असूनही! दुर्दैवाने हीच गत सध्या देशभरात सगळीकडे आहे. त्यामुळे दिल्लीचे मंडी हाऊस असो वा मुंबईचे एनसीपीए – पुढली पिढी ही अशी आहे. दाक्षिणात्य शास्त्रीय संगीताची परिस्थिती यापेक्षा बरी आहे, असं वाचण्यात आलं आहे, पण फार लक्षणीय बरी असेल असं मला वाटत नाही. त्यामुळे शिकवण्याच्या पद्धतीत बदल करणे, संगीत हे 'a source of fun' आहे अशाप्रकारे शिकवणे, मुलांच्या बाजूने विचार करून त्यांना समजून घेणे आणि मुख्य म्हणजे, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील दरी कमी करणे हाच एक उपाय मला दिसतो आहे.

मंडी हाऊसच्या त्या गायन वर्गाने मला पुन्हा एकदा विद्यार्थी दशेत आणले खरे. मात्र मधल्या दोन दशकात झपाट्याने बदललेला काळ आणि त्यात आपण आता बऱ्यापैकी अप्रासंगिक होतो आहे की काय, हा प्रश्न या दोन्हींजवळ मला आणून ठेवतो आणि अंतर्मुखही करतो...

**आशय गुणे हे दिल्ली–मुंबई स्थित कम्युनिकेशन कन्सल्टंट, लेखक, अनुवादक आणि संगीत आस्वादक आहेत. त्यांचे डॉ. मनमोहन सिंग–ए टेम्पेस्टुअस टेन्यूर–सहलेखक सुजय शास्त्री– हे पुस्तक प्रकाशित आहे.**
**संपर्क:** gune.aashaygmail.com

आहे. माझ्या दिल्लीतील वास्तव्यात मला दिल्लीत, तिचे एनसीआरमध्ये रूपांतर होत असताना देखील, कमालीची 'फुरसत' जाणवली. कारण सकाळी गुडगाव किंवा नोएडा येथे कामाला गेल्यानंतर लोकं संध्याकाळी परत येईपर्यंत दिल्ली ही सुस्त आणि शांत असते (याच्या उलट मुंबईत उपनगरातून लोकं कामाला येतात, म्हणून ती सदैव सक्रिय वाटते). हाच टिकलेला सुस्तपणा दिल्लीचे एकूण न बदलेले रूप अधोरेखित करतो. या पार्श्वभूमीवर तिथले लोक अत्यंत थंड, सुस्त आणि गप्पिष्ट भासतात. याबाबतीत लेखिकेचा अनुभव वाचायला आवडेल.

सारांश सांगायचा तर, या पुस्तकात दिल्लीबद्दल विस्तृत माहिती आहे. तिथल्या लोकांबद्दल सहवेदना दाखवत त्यांचे रंजक वर्णन आहे. कोणाला दिल्लीचा शोध घ्यायचा असल्यास योग्य माहिती आहे. तसेच, मराठी ही आपली ओळख जपून या ओळखीशीसंबंधित दिल्लीत कोणते पर्याय आहेत, याची देखील उपयुक्त माहिती या पुस्तकात आहे.

दिल्लीबद्दल कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता लेखिकेने आपल्या मराठी असल्याच्या ओळखीत दिल्लीची ओळख समाविष्ट करून स्वतःला समृद्ध केले आहे. हे पुस्तक याच समृद्ध होण्याचा परिपाक आहे.

**– आशय**

# पाब्लो पिकासोची ‘वि’ चित्रकला



डॉ. आनंद जोशी





शरीरात हार्मोन्सच्या लाटा उसळी घेत असतानाचे ‘फर्स्ट कम्युनियन’...



पोरगेलेसा पण ‘गंभीर’ ‘पिकासाचे ‘स्व’चित्र...

पिकासोने विसाव्या शतकातील दृश्यकलेत – चित्रकलेत क्रांती घडवून आणली असे कलेचे इतिहासकार मानतात. त्याने ५० हजार चित्रकृती घडवल्या आहेत. त्याच्याकडे अनेक तांत्रिक कौशल्ये होती. त्याने चित्रकलेत अनेक प्रयोग केले. ख्रिश्चियन झेर्वोस (१८८९ – १९७०) हे ग्रीक–फ्रेंच ‘कलेचे इतिहासकार’ आणि ‘समीक्षक’ यांनी पिकासोच्या चित्रांचा आणि रेखाचित्रांचा ३३ खंडी कॅटलॉग तयार केला आहे. स्वत: पिकासोचा हा कॅटलॉग तयार करण्यात सहभाग होता. यात १६ हजारांहून अधिक चित्रे आहेत. १९३२ ते १९७८ दरम्यान तो प्रकाशित झाला. अभ्यासकांकरिता हा अमूल्य ठेवा आहे. त्याची चित्रकला आणि त्याच्या चरित्रातील ठळक खुणा यांचा दुपेडी गोफ गुंफत हा लेख लिहिण्याचा प्रयत्न करणार आहे. मेंदूविज्ञान आणि चित्रकला यातील तज्ज्ञांनी यावर जे संशोधन केले आहे, त्याचा संदर्भ या लेखाला आहे...

**'वि'** हा उपसर्ग लागला म्हणजे त्या शब्दातून अनेक चांगले वाईट अर्थ उगवतात. त्याची चित्रकला विशेष होती, या अर्थाने पिकासोची विचित्रकला. 'चित्र' या शब्दाचा एक अर्थ 'चमत्कारिक' असाही आहेः देवस्थळी शब्दकोश.

पिकासोचे वर्तन आणि व्यक्तिमत्व 'विचित्र' होते. मानवी वर्तन मेंदूतून निर्माण होते आणि पिकासोची चित्रकलाही त्याच्या मेंदूतून निर्माण झालेली आहे. या अंगाने मी त्याच्या चित्रकलेला विचित्रकला हा शब्द वापरला आहे. पिकासो म्हणाला होता, त्याचा थोडक्यात आशय असा : 'पेंटिंग म्हणजे स्वातंत्र्य. दर्शकाची गोष्टी ओळखण्याची नजर आमूलाग्र बदलायची असेल, तर निर्मिकाला अशा प्रतिमा निर्माण कराव्या लागतील. त्या दर्शक स्वीकारणार नाहीत. आपण खूपच विचित्र जगात राहतो हे समजून घेण्यास त्यांना भाग पाडा.' पिकासोच्या या विधानावर विचार केल्यानंतर काही गोष्टी स्पष्ट होतात. पेंटिंग म्हणजे स्वातंत्र्य हे फक्त चित्रकाराला लागू होत नाही, तर ते दर्शकाला सुद्धा लागू असते. दर्शक त्याच्या चित्रबुद्धिनुसार चित्राचा अन्वयार्थ लावत असतो. पिकासोचे जग आणि सामान्य माणसाचे जग हे निराळे असू शकते. 'जग' हे देशकाल, संस्कृतीनुसार बदलत असते.

**प्रारंभीचे प्रभाव**

स्पेनमधील मलागा शहर. २५ ऑक्टोबर १८८१ रात्रीचे सव्वा अकरा वाजलेले पिकासोच्या आईने मुलाला जन्म दिला. बाळ श्वासोच्छ्वास करत नव्हते, रडत नव्हते. सुईणीला वाटले पोर मेलेलेच जन्मले. बाळाचे काका डॉ. साल्वाडोर रुइझ जवळच सिगार ओढत उभे होते. त्यांनी सिगारचा मोठा झुरका पोराच्या नाजूक नाकपुड्यांवर सोडला. पोराने टाहो फोडला. प्रतिभावंत चित्रकार जन्माला आला. याच श्रीमंत डॉक्टर काकांनी पिकासोला आणि त्याच्या बापाला वेळोवेळी चित्रकलेसाठी मदत केली.

तो स्पेनमधील मेंदूविज्ञानाच्या आरंभाचा काल होता. मेंदूविज्ञानातील मूळ शोधक सानटिआगो राहमॉन इ काहाल (१८५२–१९३४) हे संशोधन करत होते, १९०६चे नोबेल त्यांना मिळाले होते. फ्रान्समध्ये लुई पाश्चर (१८२२–१८९५), जर्मनीत रॉबर्ट कॉक (१८४३–१९१०) १९०५चे नोबेल युरोपमध्ये असा विज्ञानाचा माहोल होता. फक्त १५ वर्षाचा असताना पिकासोने सायन्स अँड चॅरिटी (१८९७) हे तैलरंगात रंगचित्र केले आणि डॉक्टरकाकांना दिले. आज ते बार्सिलोना येथील 'पिकासो म्युझियम'मध्ये आहे. या रंगचित्रातील रंगबंध छाया प्रकाशाचा खेळ एका कुमारवयीन चित्रकारातून विकसित होत असलेल्या प्रतिभावंताची खात्री देणारा आहे, असे कलासमीक्षकांनी म्हटले आहे.

काहाल हा मेंदूवैज्ञानिक त्याच्या तरुण संशोधकांना मार्किस डी काँडर्सेट (१७४३–१७९४) या फ्रेंच तत्त्वज्ञ, गणितज्ञाचे पुढील विधान सांगत असे : 'सामान्य बुद्धीचे लोक शिकवणीतून शिकतात, तर प्रतिभावान स्वतःच्या कल्पकतेने आणि शोधातून शिकतात.' युरोपीय समाजातील विज्ञान महोलाची पार्श्वभूमी या रंगचित्राला आहे. चित्रवंत, लेखक, कवी हे समाज आणि सांस्कृतिक वातावरणाचे पुत्र असतात.

**चित्रकलेतील बाळबृहस्पती ?**

पिकासोचे वडील चित्रकलेचे शिक्षक होते. घरात चित्रकलेचे वातावरण होते. पिकासो वयाच्या दहाव्या वर्षी लक्षणीय आरेखने करत असे. तो सुप्रसिद्ध चित्रकार झाल्यानंतर एका मुलाखतीत त्याला विचारले 'तुम्ही चाइल्ड प्रॉडजी होता का?' तेव्हा पिकासो म्हणाला, 'चित्रकलेत कोणी बाळबृहस्पती नसतो.' तो तीन वर्षाचा असताना घोड्याचे चित्र काढू शकत नव्हता, सात वर्षाचा असताना त्याला कॅथेड्रल काढता येत नसे.

नादिया शॉमिन (१९६७–२०१५) ही 'ऑटिस्टिक सॅवन्ट' या दोन्ही गोष्टी ती वयाच्या तिसऱ्या वर्षी सहजतेने करत असे. द्विमितीय पृष्ठभागावर त्रिमितीय परिणाम साधणारी घोड्यांची चित्रे तिने या वयात काढली आहेत. वयापेक्षा अधिकप्रौढ अद्भुत कौशल्य नादियापाशी होते. ती जसजशी मोठी होऊ लागली भाषा शिकू लागली, तसे ते कौशल्य एकाएकी लयास गेले.

पिकासो म्हणाला होता, चित्रकलेत कोणी बाळबृहस्पती नसतो याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे. चित्रकलेच्या काही क्षमता उपजत असल्या तरी त्या प्रयत्नाने प्रशिक्षणाने विकसित कराव्या लागतात, तरच चित्रकार त्याच्या कलेत प्रगती करू शकतो. हे सगळे टंकत असताना विचारचक्रात अडकलो होतो. त्याला दिशा मिळाली ती पिकासोच्या विधानामुळे.

**पिकासोचे व्यक्तिशिल्प**

एकदा इंग्लंडमधील न्यू कॅसल या शहरात भटकंती करताना 'बिस्किट फॅक्टरी आर्ट गॅलरी' ही पाटी पाहिली. गंमत वाटली. म्हणून आत शिरलो. १८७० साली बांधलेली एक व्हिक्टोरियन

बिस्किट फॅक्टरी १९०० च्या सुमारास बंद झाली. पुढे त्याचा वापर एक गोदाम म्हणून होऊ लागला, नंतर २००१ साली त्याचे रुपांतर एका रेखीव कलादालनात झाले. भिंती लाल विटांच्या, व्हिक्टोरियन काळाची आठवण करून देणाऱ्या तशाच ठेवल्या आहेत. उंच खिडक्यांतून येणाऱ्या प्रकाशाने गॅलरी उजळून निघते. तळमजल्यावर तरुण निवासी चित्रकारांकरता सर्जनशील कामासाठी सर्वसोयी उपलब्ध असलेल्या जागा मुद्दाम तयार केल्या आहेत. नवोदित चित्रकर्मींची रंगचित्रे बघायला, विकत घ्यायला दर्शक उत्सुकतेने येतात. एका जुन्या बिस्किट फॅक्टरीचे रुपांतर कला दालनात ही कल्पनाच किती रंगरम्य आहे.

असाच भटकत चित्रकलेबद्दल विचार करत जुन्या पुस्तकाच्या दुकानात पोचलो. तेथे लेखक नॉर्मन मेलर (१९२३-२००७) यांचे 'Picasso- Portrait of Picasso As A Young Man' हे १९९५ मध्ये प्रकाशित झालेले पुस्तक मिळाले. 'A Portrait of The Artist As Young Man' (पहिली आवृत्ती १९१६) सुप्रसिद्ध लेखक जेम्स जॉइस (१८८२-१९४१) याच्या पुस्तकाच्या शीर्षकावरून नॉर्मन मेलर याने त्याच्या पुस्तकाचे शीर्षक घेतले आहे. पण नॉर्मन मेलर याने प्रस्तावनेत याचा उल्लेख केलेला नाही, याचे सखेद आश्चर्य वाटले.

तरुण पिकासोचे व्यक्तिशिल्प या पुस्तकात मेलर यांनी घडविले आहे. या पुस्तकाचा आधार विवरणासाठी घेतला आहे. माझ्या मनात येणाऱ्या संज्ञाप्रवाहानुसार हा लेख रंगवला आहे.

**स्त्रियांच्या गराड्यातले पालनपोषण**

पिकासोच्या बालपणी तो घरी लाडाकोडात वाढला. आई, आजी, दोन मावश्या आणि दाई इतक्या बायका त्याच्या अवतीभवती होत्या. मलागात मोठा भूकंप झाला त्यानंतर तिसऱ्या दिवशी त्याची बहीण लोला हिचा जन्म झाला. त्यावेळी पिकासो तीन वर्षाचा होता. त्याच्या आईचे त्याच्यावर अतोनात प्रेम. या प्रेमापोटी ती कौतुकाने म्हणत असे तू एकाच वेळी देवदूत आणि सैतान आहेस एकदा त्याची आई त्याला म्हणाली, ''जर तू सैनिक झालास तर तू जनरल होशील आणि धर्मगुरू झालास तर पोप होशील.''

मलगात भूकंपाचे हादरे बसू लागले. तीन वर्षाच्या पिकासोला ब्लँकेटमध्ये गुंडाळून त्याच्या वडिलांनी एक मोठे घर गाठले. ते घर होते, शहरातील प्रसिद्ध चित्रकार मुनॉझ डेग्राइन (१८४०-१९२४) याचे. भूकंपाकरता उत्तम संरक्षण म्हणजे, जणू चित्रकाराचे घर. तीन वर्षाच्या पिकासोचे जीवनातील चित्रकलेचे समीकरण असे जुळले होते. मुनॉझ हे सुप्रसिद्ध स्पनिश लँडस्केप चित्रवंत होते. त्यांच्या चित्रशाळेत पिकासोचा चित्रकलेचा ओनामा झाला.

छोट्या पिकासोने पहिला शब्द उच्चारला 'piz म्हणजे पेन्सिल'! या छोट्याच्या हातात पेन्सिल दिली तर तो काय चकित करणाऱ्या गोष्टी काढेल, त्याच्या अवतीभोवतीच्या आयाबायांना वाटले असावे. त्याचे वडील चित्रकलेचे मास्तर. त्यांना कबुतरे चितारण्याची आवड. त्यांची कबुतरांची तैलरंगातील पेंटिंग शहरात प्रसिद्ध होती. १९६० साली पिकासोने ब्रासाइ (१८९९- १९८४) या सुप्रसिद्ध हंगेरियन-फ्रेंच फोटोग्राफरला दिलेल्या मुलाखतीत त्याच्या स्वत:च्या बालपणीच्या चित्राबाबत सांगितले आहे. त्याचा आशय असाः 'माझी लहानपणाची चित्रे मुलांच्या चित्रप्रदर्शनात कधीही प्रदर्शित झाली नाहीत. त्यात बालसुलभ निरागसता आणि कच्चेपणा नव्हता, त्याऐवजी वयाच्या मानाने आश्चर्यकारक अचूकता आणि कौशल्य होते. लहान मुलांची असते, तशी चित्रातील सुलभता नव्हती. माझ्या त्या बाळकालाच्या चित्रात ती नव्हती म्हणून या अचूकतेची मला भीती वाटते. लहान असतानाही तो प्रौढ कलाकारासारखी चित्रे काढत असे. त्यावर तो म्हणतो, ''माझे वडील चित्रकलेचे मास्तर होते. कदाचित त्यांनी मला चित्र कसे काढायचे हे समजावून सांगून त्या दिशेने ढकलले असेल.''

पिकासोच्या चित्रातून त्याचे लहानपण गायब झाले होते. म्हणून मोठा चित्रवंत झाल्यावर तो सांगत असे, ''मला लहान मुलांसारखी चित्रे काढायची आहेत, ते मला आवडेल.''

**फरफटत शाळेत**

सहा वर्षाच्या पिकासोला त्याची दाई फरफटत शाळेत घेऊन जात असे. शाळेत वाचन लेखन त्याला कठीण जात असे. गणितात त्याला अजिबात गती नव्हती. शेवटी वडिलांनी त्याला या शाळेतून काढले आणि त्यांचा एक मित्र घरात छोटी शाळा चालवत असे, तिथे पिकासोला घातले. त्याच्या शिक्षकांनी त्याची चित्र काढण्याची आवड आणि ओढ बघून त्याला चित्र रेखाटण्याची मुभा दिली. पिकासो स्वयंपाकघरात बसून कागदावर काही बाही काढत असे. मास्तरीणबाई

स्वयंपाक करत.

त्याला गणित येत नसे आणि आवडत नसे, याला कारण आहे. लहान पिकासोला आकडे ही अमूर्त संकल्पना समजत नसे. त्याच्यासाठी आकडे म्हणजे आकार होते. तो म्हणत असे, '7' म्हणजे मला उलटे काढलेले नाक 'upside down nose' दिसते '0' म्हणजे डोळा. '3' हा आडवा केला म्हणजे दोन 'कुले'. '4' म्हणजे शिडाची होडी वगैरे.

याला मेंदूविज्ञानात 'सिनेस्थेसिया' संवेदनासंकर म्हणतात. मेंदूतील आकडे ओळखण्याचे केंद्र आणि आकार ओळखण्याचे केंद्र यांची 'क्रॉस कनेक्शन्स' झाल्यामुळे असे घडते. दोन वेगवेगळ्या संवेदनांचा संकर होतो असे सुलभतेने म्हणता येईल. पिकासोच्या मेंदूत आकडे विविध आकारात राहत होते.

सिनेस्थेसिया बाबत मेंदूविज्ञानात संशोधन सुरू आहे. हळूहळू उलगडा होत आहे. बाळाच्या मेंदूत न्युरॉन्सच्या अनंत जोडण्या असतात. बाळ जसे मोठे होऊ लागते तशा काही जोडण्या छाटल्या जातात. याला 'प्रूनिंग ऑफ न्युरॉनल कनेक्शन्स' असे म्हणतात. कोणत्या जोडण्या ठेवायच्या आणि कोणत्या छाटायच्या, हे प्रत्येक व्यक्तीच्या जनुकांवर अवलंबून असते. यातून संवेदनासंकराची निर्मिती होते. म्हणून काहींना काही आकडे रंगीत दिसतात. काहींना सूर-स्वर निरनिराळ्या रंगात दिसतात. ही न्युरॉन्सची क्रॉस कनेक्शन्स, 'फंक्शनल एम आर आय' या स्कॅनिंगच्या तंत्रांनी संशोधनात दाखवली आहेत. लेखक, कवी, चित्रकार, संगीतकार अशा निर्मितिक्षम मंडळीत सिनेस्थेसियाचे प्रमाण सामान्य लोकांपेक्षा जास्त असते असे आढळून आले आहे.

'दृक् चिंतन' लेखक चित्रकार प्रभाकर कोलते (अनुनाद प्रकाशन, पुणे, साद पहिली २०२१) या पुस्तकातील 'शंकर बळवंत पळशीकर सर – एक साक्षात्कार' या लेखात हे विधान आहे. 'ध्वनीला रंग आहे' या संकल्पनेचा चित्र माध्यमाद्वारे घेतलेला अनुभव ही त्यांच्या दृष्टीने एक साधना होती.'

'शंकर बळवंत पळशीकर परिपूर्ण चित्रकार' या पुढच्या लेखात पुढील विधान आहे, 'पळशीकर यांनी अखेरच्या काळात रंगवलेली चित्रे समीक्षकांना तांत्रिक शैलीची वाटत असली तरी पळशीकर यांच्या मते, ती नाद व रंग (साउंड अँड कलर) यांची चित्रमय सांगड घालणारी प्रयोग-विश्वे होती.' मेंदूविज्ञानाच्या नजरेतून हे सिनेस्थेसियाचे सुंदर उदाहरण आहे. सिनेस्थेसिया हा वैयक्तिक अनुभव असतो. तो शब्दात मांडणे कठीण.

**बार्सिलोनाचे धडे**

पिकासोच्या वडिलांना चित्रशिक्षकाची नोकरी बार्सिलोना येथील आर्ट स्कूलमध्ये मिळाली. सगळे कुटुंब छोट्या शहरातून मोठ्या शहराकडे निघाले. पिकासो चौदा वर्षाचा होता. मलागा येथे त्याने 'ऑन्ट पेपा' हे तैलरंगातील व्यक्तिचित्र तेव्हा काढले होते. ते आजही मलागा येथील संग्रहालयात आहे. बार्सिलोना म्हणजे, पाश्चात्य जगातील 'अराजकतावाद' 'अनार्कीझम'ची राजधानी, असे त्या काळात समजले जात होते. १८९५ ते १९०४ या काळात किशोरवयीन पिकासो घडत होता, त्याच काळात तो बार्सिलोना मध्ये राहत होता. बार्सिलोना हे एक गजबजलेले वेगाने औद्योगीकरण होणारे शहर होते. सामाजिक विषमता खूप होती. सार्वत्रिक संप, बॉम्बस्फोट आणि राजकीय हत्या घडत होत्या. किशोरवयीन पिकासो कवी चित्रकार आणि मूलगामी विचारांच्या गटात सामील झाला होता. त्याचा एक जवळचा मित्र कार्लेस कासागेमास त्याला इथेच मिळाला. हा त्याच्या स्टुडियोचा पुढे भागीदार झाला. पिकासो धर्म आणि लैंगिक आकर्षण या दोहोत दुभंगला होता. कुटुंब मात्र धार्मिक होते. डॉक्टरकाका आणखी श्रीमंत झाले होते. पिकासोच्या जीवनघाटात वळणे सुरू झाली होती.

**दुपेडी प्रभाव**

कौटुंबिक वातावरण धार्मिक होते. कुमारवयीन पिकासोच्या शरीरात होर्मोन्सच्या लाटा उसळी घेत होत्या. त्याच्या वडिलांनी पिकासोकडून 'फर्स्ट कम्युनियन'(१८९६) हे पेंटिंग मुद्दाम रंगवून घेतले. या तैलरंगातील चित्रासाठी त्याचे वडील आणि बहीण लोला हे दोघे मॉडेल होते. कॅथोलिक चर्चमधील हा एक महत्त्वाचा संस्कार मानला जातो. चौदा वर्षाच्या पिकासोने चर्चमधील या धार्मिक समारंभाचे सर्व तपशील सुंदर दाखवले आहेत. कोणत्याही भौतिक अचेतन वस्तूबद्दल त्याच्या मनात एक गूढ मूल्य होते. म्हणजे प्रत्येक वस्तू त्याला महत्त्वाची वाटत असावी. त्यामुळे चर्च मधील प्रत्येक वस्तू त्याने सूक्ष्मातून रंगवली आहे.

एकीकडे मुलींबाबत असलेले लैंगिक आकर्षण त्याला स्वस्थ बसू देत नव्हते. वयाच्या चौदाव्या आणि पंधराव्या वर्षातील बराच काळ त्याने वेश्या वस्तीत म्हणजेच




*चित्रकाराच्याच नव्हे, तर चित्राच्या मनात काय चाललेय, याचा अचूक ठाव घेणारी पिकासोची ही दोन गाजलेली चित्रे...*

'ब्रॉथेल'मध्ये घालवला. २० व्या शतकातील पूर्वार्धात स्पॅनिश आणि फ्रेंच समाजात सांस्कृतिकदृष्ट्या चौदा वर्षांच्या मुलाने ब्रॉथेलमध्ये जाणे स्वीकार्य होते. सोळा वर्षांच्या पिकासोला प्रौढांपेक्षा सेक्सबद्दल जास्त माहिती होती. त्याचा एक गंडगोपाळ मित्र मॅन्युएल पॅलारेस (१८७६-१९७४) त्याच्याबरोबर अंगरक्षकासारखा जात असे. त्या दोघांची मैत्री चित्रशाळेत झाली होती. पिकासो ब्रॉथेलमधील सेक्स वर्कर्सना पैशाऐवजी त्यांची स्केचेस काढून देत असे, अशी आख्यायिका आहे. त्याचा दोस्त मॅन्युएल पॅलारेसचे 'ऑईल ऑन बोर्ड' (१८९५) वर व्यक्तिचित्र पिकासोने तैलरंगात खास रंगविले होते.

चित्रशाळेत चित्रफलकावर दोघे बाजूबाजूला उभे राहून काम करत असत. मॅन्युएल वीस वर्षांचा, तर पिकासो चौदा-पंधरा वर्षांचा. पिएरे कबान (१९२१-२००७) या फ्रेंच कलेच्या इतिहासकाराने मॅन्युएल पॅलारेसची १९७२मध्ये मुलाखत घेतली होती, त्याचा आशय असाः पिकासो प्रभावी व्यक्तिमत्वाचा, त्याचा आत्मविश्वास दांडगा, त्याच्यापेक्षा चार पाच वर्षांनी मोठ्या विद्यार्थ्यांपेक्षा तो खूपच पुढे होता. त्याला 'कलात्मक संस्कृती' नव्हती. म्हणजे तो कलेचे पारंपरिक नियम मानत नसे. पण त्याला सगळ्याचे विलक्षण कुतूहल होते. त्याची आकलन शक्ती भन्नाट होती. प्राध्यापक काय शिकवत आहेत, त्याकडे त्याचे फारसे लक्ष नसे. तो अत्यंत गरम डोक्याचा होता, केव्हा भडकेल हे सांगता येत नसे. पटकन थंड पण होई. कधी उदास तर, कधी उल्हसितही. त्याच्या 'सुपिरिओरिटीची' त्याला जाणीव होती. तो पंधरा वर्षांच्या मुलासारखा वागत नसे. तो अकाली प्रौढ होता.

पिकासोने १८९६ मध्ये एक 'आत्मचित्र' काढले होते. अवघ्या पंधराव्या वर्षी पिकासोने स्वत:ला बंडखोर प्रतिमेत न दाखवता एका शिस्तबद्ध, गंभीर आणि आज्ञाधारक कला विद्यार्थी म्हणून सादर केले आहे. हे चित्र त्याने वडिलांच्या पारंपरिक कला-शिकवणीनुसार काढले होते, असे कला समीक्षकांनी म्हटले आहे. ते अजूनही बार्सिलोनाच्या म्युझियममध्ये दर्शकांसाठी ठेवले आहे.

मॅन्युएल आणि पिकासो यांची दोस्ती अगदी शेवटपर्यंत टिकली. दक्षिण फ्रान्समधील मौगिन्स येथील पिकासोच्या मोठ्या घरी मॅन्युएल वयाच्या ९०व्या वर्षी सुद्धा उन्हाळ्यात राहायला जात असे.

**नावात काय आहे?**

पाब्लोचा अर्थ इंग्लिशमध्ये पॉल असा होतो. या दोघांचे मूळ अर्थ सारखे आहेत. प्राचीन लॅटिन नाव पोलस पासून हे शब्द उगवले. याचा अर्थ लहान किंवा नम्र. नाव सोनुबाई हाती कथिलाचा वाळा, या नुसार तो लहान नव्हता आणि नम्रही नव्हता. सुरुवातीला तो Pablo Ruiz पाब्लो रुइझ असे नाव लिहीत असे. रुइस हे त्याच्या वडिलांचे आडनाव तो लावत असे. पुढे पाब्लो रुइस पिकासो, त्यानंतर पी आर पिकासो. १९०१ पासून पाब्लो पिकासो अशीच सही तो करू लागला. तेच नाव त्याने नक्की केले. पिकासो 'Picasso' हे त्याच्या आईचे आडनाव होते. तो त्याच्या आईचा लाडका होता आणि आई त्याला जास्त जवळची होती. स्पॅनिश संस्कृतीत आईचे आडनाव लावत नसत. पण पाब्लोचे सगळेच विलक्षण. पिकासोने १९४३ मध्ये दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे आडनावात डबल एस असणे हे स्पेनमध्ये अगदी विरळा. मी त्यामुळे त्याच्याकडे आकर्षित झालो. आणि तुमच्या कधी लक्षात आले आहे. Matisse 'Poussin' Rousseau या तीनही नावात डबल एस आहे. याच्यातील पहिले दोन फ्रेंच मास्टर्स आणि तिसरा तत्त्वज्ञ. पिकासोला यांच्या रांगेत बसायचे असावे.

**सृजनाचे आदिम वळण**

पिकासोचे वडील आणि कुटुंबीय यांनी ठरविले, पाब्लोला माद्रिद येथील रॉयल अकादमीत पुढील कलाशिक्षणासाठी पाठवायचे. त्याच्या वडिलांचे मित्र तेथे प्रमुख चित्रशिक्षक होते. पाब्लो माद्रिद अकादमीत दाखल झाला. तेथील वातावरण, यम-नियम कलेच्या शिक्षणाची पारंपरिक पद्धती पिकासोला

फारच जाचक वाटली. कळीत अडके/फूल फुलेना;/ सृजनाला का धाक? (कवी ग्रेस संध्यापर्वातील वैष्णवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई) पाब्लो अकादमीत न जाता माद्रिदच्या रस्त्यावर रेखाटने करत भटकत होता. अकादमीच्या प्रमुखांनी पाब्लोच्या वडिलांना पत्र लिहून कळविले 'पाब्लो वर्गात कधीही दिसत नाही. उपास्थिती शून्य.' पाब्लो स्कार्लेट फिवरने आजारी पडला. थोडा बरा झाल्यावर बार्सिलोनाला परत गेला.

बार्सिलोनावर युद्धाचे ढग जमा झाले होते. 'क्युबा' येथे स्वातंत्र्याचा क्रांतिकारी लढा सुरू झाला होता. हवानाच्या बंदरात अमेरिकेची युद्धनौका बुडवण्यात आली होती. तरुणांना स्पॅनिश लष्करात भरती होण्याची सक्ती करण्यात येईल अशी हवा होती. पाब्लोचा मित्र मॅन्युएल दूरवरच्या डोंगरकपारीतील त्याच्या गावाकडे निघाला होता. पाब्लोने त्याच्याबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. रंगकामाची सर्व साधनसामग्री, रंगफलक वगैरे घेऊन ते दोघे दोस्त निघाले. १८९८-१८९९चा तो काळ. होर्ता दे एब्रो या मॅन्युएलच्या डोंगरगावाला जायला रेल्वेने तोर्तासा शहरापर्यंत जायचे आणि पुढे ४० कि. मी. घोडागाडी. पाब्लो आणि मॅन्युएल स्टेशनच्या बाहेर आले मॅन्युएलचा भाऊ खेचर घेऊन आला होता. त्या खेचराच्या पाठीवर दोघांचे सगळे सामान ठेवले आणि तिघांनी डोंगर चढायला सुरुवात केली. पायवाटेच्या दोन्ही बाजूला दाट रानटी जंगल होते. शहरी पाब्लोसाठी हा विलक्षण अनुभव होता. गावातील शेतकऱ्यांच्या शारीरिक श्रमाला मातीचा गंध होता. श्रमातून सृजन पाहणे हे त्याच्याकरता आदिम शिक्षण होते. गावातील लोहारखान्यात तो बराच वेळ घालवत असे तापलेल्या लोखंडावर घाव घालून त्याला आकार देणे, घोड्याच्या पायाला नाल ठोकणे यातील कौशल्य त्याने त्याच्या नजरेने टिपून घेतले. याचा पाब्लोच्या कलाविचारावर तसेच त्याच्या राजकीय विचारसरणीवर प्रभाव पडला.

गावात एक विलक्षण अपघात झाला. एक म्हातारी आजीबाई आणि तिची नात वीज पडल्यामुळे मरण पावल्या, असा संशय होत्या. हा संशय दूर करण्यासाठी त्याच रात्री कबरस्तानात कंदिलाच्या प्रकाशात ऑटॉप्सी झाली. कबर खोदणाऱ्याने करवतीने त्या मुलीचा मेंदू बघण्यासाठी डोक्याची दोन शकले केली. हे पाब्लोला बघवेना. त्याच्या मनावर त्या दृश्याचा गहन परिणाम झाला. १९२५ साली पिकासो ने 'हेड ऑफ अ वूमन' कोळशाने कागदावर केलेले रेखाटन आणि १९५८मध्ये काढलेले स्त्रीच्या दुभंगलेल्या चेहऱ्याचे तैलरंगातील पेंटिंग या परिणामातून निर्मिले असावे, असे काही कलासमीक्षकांचे मत आहे.

एक दिवस मॅन्युएल आणि पाब्लो यांनी आठवडाभर आणखी वर डोंगरमाथ्यावर जाऊन राहायचे, रंगकाम करायचे ठरविले. खेचरावर सामान लादून दोघेजण वर पोहोचले. डोंगरमाथा आणखीनच जंगलगर्क होता. दोघांना राहण्याकरता चांगली गुहा मिळाली. जवळ खळाळून वाहणारा ओढा होता. गुहेत गवत पसरून बिछाना तयार केला. इथे कपड्याची गरज नव्हती. डोंगररानात छाया प्रकाशाचा खेळ चालू असे. रानफुले फुलली होती. सगळीकडे रंगहास्य पसरले होते. पाब्लोचे दृश्यकलेचे आदिम शिक्षण इथे झाले असावे. या सात महिन्यांच्या वास्तव्याबाबत पिकासो म्हणतो, मला जे काही माहीत आहे ते सगळे मी मॅन्युएलच्या गावात शिकलो ही सगळी शिदोरी घेऊन पाब्लो बार्सिलोनाला परतला...

अचानक गडगडण्याचा आवाज आला, माझा टंकित हात थांबला. बाहेर बघितले, 'मग क्षितीज किनाऱ्यावरती/ढगबाळे दुडुदुडु येती. (कवी ग्रेस). सांध्यकाळाने काळी रंगभूल दिली होती. दाटून आले होते...

**(जुलै २०२६ अंकाच्या अनुक्रमणिकेमध्ये डॉ. आनंद जोशी यांच्या नावासह चुकून जून २०२६ अंकातील लेखाचे शीर्षक पुनर्मुद्रित झाले. झालेल्या चुकीबद्दल दिलगीर आहोत– कार्यकारी संपादक)**

**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट', 'अक्षर पाविजे निधरि', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) 'ऑर्वेलच्या अवतीभोवती' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत.**

**ई मेल :** drjoshianand628@gmail.com

# जो डुबा है सो पार...



गणेश मनोहर कुलकर्णी

सुरानुबंध



*ब्रह्मानंदी टाळी पं. रविशंकरांची...*



*समाधिस्त होताना पं. जसराज*

ए. के. रामानुजम या थोर कवीचा एक काव्यसंग्रह आहे. त्याचं नावच मुळी 'ड्राउनिंग' – 'बुडणं' असं आहे. त्या संग्रहात काय आहे? तर अलवार नावाची एक जमात आहे. त्यांच्यापासून सहाव्या शतकात भारतात भक्तिसंप्रदाय सुरू झाला, असं म्हणतात. ते सगळे तमिळ कवी. 'अलवार'चा अर्थच मुळी बुडलेले असा आहे. कृष्णभक्तीत बुडालेले. त्यांतले बारा जण... अलवार. त्यांच्या कवितांचं राजानुजम यांनी भाषांतर केलं आहे. फार सुंदर कविता आहेत त्या. तद्वत सुरांमध्ये बुडणं महत्त्वाचं आहे...

**त्या** काळी मध्यमवर्गीय मानसिकतेत निषिद्ध मानल्या गेलेल्या तवायफांच्या कोठ्यावर जाऊन गाणं प्रत्यक्ष ऐकण्यापासून तबकड्यांनी म्हणजे रेकॉर्ड प्लेयरने दर्दींची सुटका केली. पण तरुण जसराजांची याबाबत एक वेगळीच आठवण आहे. जसराजांच्या घराण्यात संगीताची परंपरा होती. पंडित जसराज सुरूवातीला तबला वादन करायचे. एकदा एका मोठ्या गायकाला संगत करायला यांच्या घरातील बुजुर्गांनी जसराजजींना बसवले. गाणाऱ्याने बहुतेक भीमपलास किंवा तत्सम राग सादर केला. मैफल संपल्यावर सगळे चर्चा करत बसले होते, तर इतक्यात लहानगे जसराज त्यांना म्हणाले, 'उस्तादजी सबकुछ ठीक हैं, लेकीन आपका रिषभ बराबर नही लग रहा था.' बुजुर्ग गायक भयंकर चिडून त्यांना म्हणाले, 'मरा हुआ चमडा बजानेवाला क्या जानता है गाने के बारेमे?' हे ऐकून जसराज खूप दुखावले गेले. त्यांनी मनोमन ठरवलं, की आपण गायक होऊनच दाखवायचं. मग तबला सोडून ते गाणं शिकायला प्रवृत्त झाले.

**अधीरतेतून सुरांच्या डोहाकडे...**

सुरुवातीला घरूनच शिकणं झालं. मग काय गाणं रूजत गेलं. तोपर्यंत बेगम अख्तरचं गाणं आवडायला लागलं होतं. ते लखनौला असताना रोज संध्याकाळी बेगमच्या कोठीच्या खाली अधीरतेनं, उत्सुकतेनं वाट बघत उभे राहायचे, की बाई कधी एकदा दिवाना बनाना है... तो दिवाना बना दे... ही गझल गाताहेत. त्यांना फक्त हीच गझल ऐकायची असायची. पण कोठीवर जाणं तसं सर्वसामान्य नव्हतंच. त्यामुळे आपल्याला गायचं असेल तर ते इतकं रसभरीत आणि जीवघेणंच असायला हवं, या विचाराने त्यांना झपाटून टाकलं. या गझलने त्यांची गाण्याची आवड जोपासली.

गंमत म्हणजे, या कोठीवर उच्चभ्रू समाजातील मुली गाणं ऐकायला, शिकायला सर्रास जायच्या. तिथून शिकलेलं गाणं रेडिओवर किंवा इतर ठिकाणी गाऊन त्या मोठ्या होत जायच्या, त्यांचं नाव व्हायला वेळ नाही लागायचा. याबाबत पं. भास्कर चंदावरकर त्यांच्या 'रंगभास्कर' या पुस्तकात लिहितात, की मुंबईतल्या कोठ्यांवरच्या तवायफांचे व्यवस्थापन बघणाऱ्या चौधरींपैकी एक म्हणाला होता की, 'यह हो गया साहेब के हमारे यहाँ लोग आते थे गाना सुनने के लिए, लेकिन ये बम्मनोंकी लडकियाँ जो है ना, बहुत जल्दी गाना सीख जाती हैं. हमसे तो गाना सीख जाती हैं और रेडिओ में वही जाती हैं. लेकिन हमारी गानेवाली और हम लोग वैसेही रह गये, नंगे के नंगे. हमारे यहाँ न कोई आता है, ना कोई हमें रेडिओ में ले जाता है.'

त्या काळावर आणि वसाहतवादावर हे अतिशय बोलकं भाष्य आहे. म्हणजे साधारण इथून कच्चा माल घ्यायचा, प्रक्रिया करायची आणि रेडियोवर विकायचा ही आपली प्रवृत्ती. खरंतर चांगुलपणा कलाकाराच्या जीवनशैलीशी निगडित असतो. कलेतलं सत्य, कलात्मक सत्य म्हणून काही चीज असते. ती आपल्या आविष्कारामध्ये मिळविणं प्रत्येक कलाकाराचं परम कर्तव्य असायला पाहिजे. त्या कलात्मक सत्याला तुम्ही स्पर्श करू शकलात, तर खरं.

**शाश्वत सुखाचा कोपरा**

भास्कर चंदावरकर म्हणतात, हे मी पं. रविशंकरांच्या मैफलीत अनुभवलं आहे. ज्यांना संगीतातलं काही कळत नाही, असे श्रोते अवाक् होऊन ऐकत राहतात. मैफल चालू असताना वाटतं की, ती संपूच नये... अफाट असा शाश्वत सुखाचा अनुभव आपल्याला येत राहिल्याची भावना होते. पंडित जसराजजी जेव्हा स्टेजवर 'ओम् नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र किंवा एखादा ख्याल गायचे, तेव्हा ते पूर्णपणे डोळे बंद करायचे. त्यांचा आवाज थेट आत्म्यातून येत असल्यासारखा वाटायचा. त्यांच्या स्वरांमध्ये एक प्रकारची दैवी शांतता असायची, ज्यामुळे श्रोतेही मंत्रमुग्ध होऊन डोळे मिटून बसायचे.

रवीजी एकदा चंदावरकरांना म्हणाले होते, 'स्वतःसाठीच केवळ, असं जे वाजवणं असतं – त्यामध्ये बुडणं, ते करता आलं पाहिजे.' बंदेअली खाँ साहेबांना रवीजींनी ऐकलं नसणार, कारण खाँसाहेब वारले, अठराशे ब्याण्णवमध्ये; पण बाबांनी अल्लाउद्दीन खाँसाहेबांनी रवीजींकडे वर्णन केलं होतं, त्यांचं आदमी सूर में इतना डुबा था... ते बुडून जाणं असतं, ते काय असतं? त्याबद्दल कधीतरी लिहायला हवं. जिगर मुरादाबादींच्या दोन पंक्ती प्रसिद्ध आहेत –

*'इश्क नहीं आसान इतना तो समझ लिजिये!*
*एक आग का दर्या है वह डुबके जाना है।'*

तिकडे शहा लतिफ म्हणतो, 'ये प्रेम का दर्या है, उसकी उलटी धार। जो उभरा सो डूब गया, जो डुबा है सो पार...'

गीतकार गुलजार आणि कवी गुलजार बऱ्याचदा वेगळे काढता येत नाहीत. ते असेच गायक-वादकांप्रमाणेच इमर्शनची आस लावून असतात. एकदा आपले किशोर कदम ऊर्फ कवी सौमित्र आणि गुलजारसाहेब न्यूयॉर्कच्या रस्त्यांवरून निर्हेतूक




*पं. भास्कर चंदावरकर यांनी त्यांच्या 'रंगभास्कर' आदी ग्रंथ लेखनातून केवळ संगीताची चिकित्सा केली नाही, तर कला आणि कलावंतांच्या एकरुपतेच्या क्षणांचाही आवर्जून शोध घेतला...*

भटकत असताना, सौमित्रच्या काय मनात आलं, त्यांनी प्रश्न केला, गुलजारसाब आपको तैरना आता है... झटकन गुलजार म्हणाले, नहीं मुझे डुबना आता है...

अनेकांच्या बाबतीत अडचण अशी असते की ते लोकांपर्यंत सादरीकरण दाखवण्याचा त्यातून काहीतरी पोचविण्याचा, व्यक्त करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. किशोरीताई यांच्यासारख्या कलावंतांची मात्र याकडे बघण्याची दृष्टी फारच निराळी होती. ताई म्हणायच्या, जो राग मलाच दिसत नाही तो मी तुम्हाला कसा दाखवणार? ताईंच्या गाण्यातून प्रत्ययास येणारी अध्यात्मिक अनुभूती कैकदा रसिकांनाही जाणवायची. अगदी शेवटच्या मैफलीनंतरही ताईंना रसिकांनी जेव्हा दाद दिली, ती त्यांनी सादर केलेल्या रागाला याचा त्यांना प्रचंड आनंद झाला होता. किशोरी आमोणकरांच्या नावानं राग ओळखला न जाता तो स्वतःच स्वयंभू पद्धतीनेच ओळखला जायला हवा यावर त्यांचा कटाक्ष असायचा. हे सगळं करताना त्यांच्या सादरीकरणातली उत्कटता जराही हरवून जायची नाही. किशोरीताई गाताना रागाच्या भावामध्ये आकंठ बुडून जायच्या की त्यांना मैफलीत थोडाही आवाज किंवा व्यत्यय सहन होत नसे. त्या रागाला देवासारखे पूजायच्या. गाताना त्या स्वतःला विसरून केवळ एक 'माध्यम' बनून उरायच्या.

**सूर समाधी**

पंडित भीमसेन जोशी एकदा हुबळीला त्यांचे शिष्य श्रीपती पाडिगर यांच्या घरी पोहोचले. हुबळीला गेल्यावर त्यांना मंत्रालयाला (रायपूरजवळील राघवेंद्र स्वामींचे जागृत देवस्थान) जायचं असायचं. गुरू-शिष्या दोघेही राघवेंद्र स्वामींचे भक्त. तर रोट्टी सिनप्पा, माधव गुडी आणि श्रीपती या शिष्यांबरोबर मंत्रालयात पोचले. तुंगभद्रा नदीत स्नान करून ओलेचिंब अवस्थेत स्वामींची सेवा करूया म्हणून हे राघवेंद्र स्वामींच्या वृंदावनाच्या समोर बसले. माधव गुडी म्हणाले, राघवेंद्र स्वामींचे एकमेव भजनच सगळे मिळून म्हणुया. साथीला तबला पेटी काही नव्हते. पंडितजींनी 'हरिभजने माडू निरंतर' हे भजन सुरू केले. भजन झाल्यावर पंडितजींना शेषवस्त्र, फळाफुलांचे ताट प्रसाद म्हणून मिळाले, ते घेऊन सगळे हुबळीस निघाले, मधल्या कोप्पळ या गावात पोचेस्तोवर सगळ्यांनाच भूक लागली होती, पण जेवणाच्या अगोदर तिथल्या राघवेंद्र स्वामींच्या मठात जाऊन यावे म्हणून श्रीपती एकटेच मठात गेले, तर तिथे गुरूजींचे वडील अगोदरच येऊन बसलेले. श्रीपती धावत परत कारजवळ गेले. म्हणाले, गुरूजी, मठात मास्तर आले आहेत. पंडितजींच्या वडिलांना गावाकडे सगळे मास्तरच म्हणायचे. गुरूजी चटकन कारमधून उतरून पुढे झाले आणि श्रीपतीला म्हणाले, ते प्रसादाचे ताट घेऊन ये. सगळे मठात गेले, गुरूजींनी ते ताट आपल्या वडिलांना देऊन नमस्कार केला. वडिलांनी फर्मावले, सेवा रूजू करा. मग तिथेच बैठक लावली. सर्वात शेवटी 'इदुएनगे गोविंदा' हे पद म्हणायला सुरुवात केली. सगळ्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. गुरूजींना गाणं पूर्ण म्हणताही येईना इतका बांध फुटला होता. सावरल्यावर म्हणाले, म्हणूनच मी मंत्रालयात हे पद म्हणत नव्हतो, इथेच ही अवस्था आहे तिथे तर त्यांची समाधीच आहे.

एकदा पाटणा प्रवासात पहिल्या वर्गाच्या डब्यातून केसरबाई आणि पं.गजाननबुवा जोशी एकत्र प्रवास करत होते. या गजाननबुवांच्या डोंबिवलीतच मी लहानाचा मोठा झालो. माझ्या लहानपणी अनेक जण चर्चा करायचे, की बुवा डोंबिवली शहराबाहेर बसून व्हायोलिनचा रियाज करायचे. डोंबिवलीत प्रसिद्ध पेंढारकर कॉलेजच्या ठिकाणी एक टेकडी सदृश जागा होती, बरीच झाडं वगैरेही होती. तिथे बुवा रियाज करायचे. त्यांच्या नावाचा डोंबिवलीत एक चौकही आहे. यांच्या दोन मुलांपैकी एक मधुबुवांनी गाण्यात कारकीर्द घडवली, तर नारायणबुवांनी उस्ताद थिरकवांचा गंडा बांधला. डोंबिवलीतल्या एका मैफलीत मधुबुवांचा मालकंस ऐकल्याची आठवण अजूनही ताजी आहे. बरोबरच्या नवथर तबलजीला सांभाळून घेत गाणारे मधुबुवा नेहमीच भावले होते. मी आयोजित केलेल्या स्वरप्रज्ञ मिलिंद रायकरांच्या व्हायोलिन वादनाच्या कार्यक्रमाला वय साथ देत नसतानाही संपूर्ण वेळ येऊन बसल्याची आठवणही मला मोहवून जाते. गजाननबुवांचं गाणं जितकं बोलकं होतं तितकंच व्हायोलिनही नादमय आणि

गायकी अंगानं वाजायचं. तर, सांगत हे होतो की केसरबाई आणि गजाननबुवा एकत्र प्रवास करत असताना रात्रीच्या वेळी मुगलसराईचा कार्यक्रम संपवून भीमण्णा याच गाडीत शिरले. सकाळी जागे होऊन बसले, तर केसरबाई म्हणाल्या, तुम्ही कोण? हे म्हणाले, मी जोशी! बाई म्हणाल्या, वरच्या बर्थवर पण जोशी आहेत, ते चहाची व्यवस्था करायला गेले आहेत, ते गातात, तुम्ही काय करता? तर हे म्हणाले, मी भीमसेन जोशी, मी पण गातो. तर बाई म्हणाल्या, मी तुझ्या गाण्याबद्दल ऐकून आहे. या जोशींसारखं ओरडून गाऊ नकोस, तू चांगलं गातोस. सुराला सोडू नकोस, सुरसंगत-रागविद्या हे ध्यानात ठेव. अतिशय फटकळ असलेल्या केसरबाईंनी अगदी अगत्याने आणि वत्सलतेनं नंतरचे दोन दिवस पाटणामध्ये त्यांना स्वतःजवळच ठेऊन घेतले. इतकी माया आणि आशीर्वाद सुरुवातीलाच मिळाल्याने भीमण्णांचं गाणं समृद्ध होत जायला मदतच झाली

**आकंठ बुडी त्यांची...**

अशीच बांधिलकी पंडित रवीशंकरजींच्या सतार वादनातही जाणवायची. आपल्याला जे करायचं आहे, तेच आपण करायचं आहे आणि ते कोणाला दाखवण्यासाठी मुळीच करायचं नाही, असा एक ठाम विश्वास पूर्वीच्या कलाकारांच्या सादरीकरणात दिसतो. ते वाजवणं हा अनंताचा शोध असतो, त्यामध्ये शिरायचं असतं आणि शिरता शिरता त्यामध्ये बुडून जायचं असतं, अशीच त्यांची भावना असे. माझं मलाच सोलत जाणं जमत नाही, याच्या वेदना असतात. त्या वेदना गिळत जावं लागतं. कारण आपल्याला शोधायचं होतं ते सगळं काही मिळालं, अशी वेळ कधीच येत नाही. चंदावरकर म्हणतात, की रवीजींनी एकदा मला सांगितलं होतं की, आपण मैफलींचा धसका घेतला आहे. मैफल म्हटली की, इतकी स्वतःलाच स्वतःची रोज परीक्षा द्यावी लागते. त्यामध्ये ताण आणि श्रम दोन्ही असतात. नुसतं वाजवणं हे यापेक्षा फार वेगळं असतं. सॉमरसेट मॉमच्या एका गोष्टीत स्वतःला पेटवून घेऊन हौदात उडी मारणारा कोणी – एक खेळवाला आहे. तो म्हणतो की, 'मी उडी कशी मारतो, यामध्ये कोणालाच रस नसतो. हा माणूस केव्हा तरी एकदा खेळ करता करता मरेल आणि त्या क्षणाचे आपण साक्षीदार असलं पाहिजे अशा उत्सुकतेनं, अशी इच्छा मनात ठेवून लोक पुन्हा पुन्हा माझा खेळ पाहायला येतात.'

तसा हा वेदनांचा भाग असतो. याच संदर्भाने इथे, बाशोचा जपानी हायकु आठवतोय. त्याचा अनुवाद विजय पाडळकर यांनी केला होता,

***प्राचीन तलाव***
***बेडकाची उडी***
***डुबुक***

हा आत्मसाक्षात्काराचा क्षण प्रत्येकासाठी वेगळाच असणार. मैफल सुरू असताना, एखाद्या शांत अशा वरदानाच्या छत्रीखाली आपण बसलो आहोत, असं ऐकणाऱ्याला वाटलं; तरी कलाकाराला मात्र ते कलात्मक सत्य सापडण्याचा अनुभव क्वचितच येतो आणि एकदाच तो अनुभव येऊन चालत नाही. तो पुन्हापुन्हा शोधावा लागतो. शोध सुरू ठेवावा लागतो...

**लेखक संपर्क : ९८१९९५७८५२**



# स्त्री मनाचे बंडखोर स्वगत



डॉ. नेहा सावंत

**काव्यगत संवाद**






कवयित्री मलिका अमर शेख, *साभार: सदानीरा*

मलिका अमर शेखांच्या कविता वाचताना त्या आतून आलेल्या आहेत, हे प्रकर्षाने जाणवत राहते. त्यांनी विविध विषयांवर कविता लिहिल्या, पण प्राधान्याने स्त्री, प्रेम या केंद्रांभोवती त्यांच्या कविता फिरताना दिसतात. त्यांच्या बहुतांशी कवितांमधून त्यांची संवेदनशीलता आणि व्यक्तिगत जाणीव मुखर झालेली दिसते. आत्मपरता, व्यक्तिगत जाणीवही प्राधान्याने डोकावताना दिसते, तर दुसरीकडे स्त्रीची मानसिकता, तिची भावनिक कोंडी, तिचे शारीरिक, मानसिक शोषण, तिच्या मनातील प्रणय भावना, कामप्रेरणा, लैंगिक जाणिवा, पुरुषप्रधान संस्कृती विरुद्ध पुकारलेलं बंड शिवाय महानगरीय जाणीव अशी विविध आशयसूत्रंही दिसून येतात...

# बायका

*बायका जगतात अलबत जगतात बुडणाऱ्या गलबतातसुद्धा*
*थेंबभर कुंकवात*
*एका गर्द हिरव्या चुड्यातल्या खोल डोहात*

*गच्च गळा काचेल अशा काळ्याभोर मण्यांत*
*जगतात बायका*
*तीनशे रुपये पगारात*
*मुलाला पाळण्यात*
*न् नवऱ्याला ओच्यात ठेवून*

*त्या भराभरा शहरांची कापणी करतात*
*बायका वापरतात फण्याकंगव्यांसारखं*
*शहराला न् पुरुषाला न् स्वतःलासुद्धा*

*पण जगतात बायका*
*काय वाट्टेल ते झालं तरी*

*त्यांचं जगणं अस्तंय दुधारी शस्त्र*
*गळ्यातली घुंगरं खुळकावत*
*माना डोलवत*
*शेपटानं माशा वारत*
*डोळा काजळ घातलेली गाय बैल*
*पाणी प्यायला येतील*
*आकाश सूर्य तारे चंद्र*
*सारे पाण्यात डोकावून पाहतील*

*छळवणूक झालेल्या बाईला*
*विहीर अस्तं दुसरं माहेर*
*पण बायका कधीच आत्महत्या करत नाहीत*

*बायकांना प्रचंड आवडतं जगायला*
*at any cost*
*न् ज्या मेलेल्याच असतात मुळात*
*त्या पण चक्क मरणात जगतातच*

*एकूणात दोनच प्रकार बायांच्या जगण्याचे*

*मेल्यावर जगणं मान्य असलेल्या बाया*
*न् जगतानाचं मरण मान्य असलेल्या*

*पण तरी*
*तरीपण बाया जगतात*
*at any cost जगतातच खऱ्या अर्थी*
*बायका या जगातल्या!*

महाविद्यालयीन शिक्षण घेत होते तेव्हाची ही गोष्ट. आठवड्याचा एक दिवस महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून पुस्तक घेण्याचा असे. ग्रंथालयाच्या एका कोपऱ्यात पुस्तकांचा ढीग ठेवलेला असायचा, त्यातून एक पुस्तक आम्ही निवडून ते आठवडाभर वाचून परत करायचं, अशी आमच्या कॉलेज लायब्ररीची पद्धत होती. आम्ही दोन तीन मैत्रिणी हावऱ्यासारख्या वाचणाऱ्या असल्यामुळे एकमेकींच्या पुस्तकाची आपापसात अदलाबदल करून आठवड्याला तीन पुस्तकं वाचत असू. एक दिवस 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' हे मलिका अमर शेख यांचं आत्मकथन माझ्या हाती आलं. अगदी बसल्या बैठकीतच ते वाचून संपवलं, इतकं त्या पुस्तकाचं गारुड मनावर झालं होतं. कारण जबरदस्त बंडखोर जगणं अभिव्यक्त केलं होतं, त्यात. या पुस्तकावर आम्हा मैत्रिणींची चर्चा चांगलीच रंगली होती. नुकतीच शालेय अवस्था संपवून महाविद्यालयीन जीवनात आम्ही प्रवेश केलेला होता. चाळीतील मध्यमवर्गीय जीवन जगणाऱ्या आम्हा मुलींना या आत्मकथनातील भावविश्व चक्रावून टाकणारं होतं. मनाच्या अपरिपक्व अवस्थेत या आत्मकथनासारखं पुस्तक वाचनात आलं आणि डोक्याला अगदी झिणझिण्या आल्या.

या पुस्तकातील लेखिकेच्या बंडखोरीचं निश्चितच आकर्षण त्या वयाला वाटलं होतं. ही लेखिका कविताही करते, हे त्यातून जाणवलं होतं आणि म्हणूनच तिच्या कविता वाचल्या

पाहिजेत असं वाटू लागलं. कारण त्या वयात प्रत्येक जण कविता करत असतोच. कवी, कवयित्री होण्याची स्वप्नं पाहत असतो. आमच्याही बाबतीत असंच घडत होतं. चांगली कविता लिहिता यावी म्हणून कविता वाचायला सुरुवात केली. मलिका अमर शेख यांच्या काही कविता वाचल्या आणि या कवयित्रीकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन तयार झाला.

**उद्वेगी आशय**

तिच्या सगळ्याच कविता कळत होत्या किंवा आवडत होत्या असं नव्हे, पण काहीतरी भन्नाट लिहिते हे जाणवत राहायचं. स्त्रीची शारीर जाणीव, तिच्या मनातील प्रणय, शारीर जाणिवेविषयीची मुक्त, बंडखोर मते, पुरुषसत्ताक संस्कृतीविषयीचा उद्वेग इत्यादी आशय त्या वयात वेगळाच वाटत होता. पुढे मी अध्यापनाच्या क्षेत्रात आले आणि मग अभ्यासक्रमातच पुन्हा एकदा मलिका अमर शेख यांच्या कवितांची भेट झाली. एव्हाना त्यांच्या कविताही अधिक संपृक्त आणि गहन झाल्या होत्या. स्त्रीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक झालेला जाणवला होता. इतकंच नव्हे तर महानगर या विषयाबाबत अधिक सजग होऊन त्या कविता लिहू लागल्या होत्या. एकंदरीत काव्यलेखनाच्या आशय आणि अभिव्यक्तीत वैविध्य येऊ लागले होते. मलिका अमर शेख यांचे काव्यलेखन समृद्ध होऊ लागल्याचे ते द्योतक होते. या प्रवासात माझी काव्य आकलनक्षमताही समंजस होत होती.

मलिका अमर शेख यांचा पहिला काव्यसंग्रह 'वाळूचा प्रियकर' प्रकाशित झाला त्यानंतर 'महानगर' (१९९३), 'देहऋतू' (१९९९), 'माणूसपणाचं भिंग बदलल्यावर' (२००७), 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' (आत्मचरित्र), 'एक होता उंदीर' (२००६), 'कोऽहम् कोऽहम्' (२००६) कथासंग्रह, 'हॅण्डल विथ केअर' (२००७) कादंबरी असे विविध साहित्यप्रकार त्यांनी लीलया हाताळले, पण आपली विशेष मुद्रा ठसवली ती कवितेतच. मुळात कविता या साहित्यप्रकाराकडे त्या अधिक गांभीर्याने पाहू लागल्या होत्या. म्हणूनच त्या म्हणतात, कवीची बांधिलकी हवी फक्त दुःखाशी, प्रेमाशी, शोषितांच्या अश्रूंशी आणि तीही 'पोज' नको 'आतून' आलेली हवी – spontaneous reaction तरच ती कविता, कविता होऊ शकते. मलिका यांच्या कविता वाचताना त्या आतून आलेल्या आहेत, हे प्रकर्षाने जाणवत राहते. त्यांनी विविध विषयांवर कविता लिहिल्या पण प्राधान्याने स्त्री, प्रेम या केंद्रांभोवती त्यांच्या कविता फिरताना दिसतात. त्यांच्या बहुतांशी कवितांमधून त्यांची संवेदनशीलता आणि व्यक्तिगत जाणीव मुखर झालेली दिसते.त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये सांगायची झाल्यास त्यांच्या कवितेतून एकीकडे आत्मपरता, व्यक्तिगत जाणीव अधिक डोकावताना दिसते, तर दुसरीकडे स्त्रीची मानसिकता, तिची भावनिक कोंडी, तिचे शारीरिक, मानसिक शोषण, तिच्या मनातील प्रणय भावना, कामप्रेरणा, लैंगिक जाणिवा, पुरुषप्रधान संस्कृती विरुद्ध पुकारलेलं बंड शिवाय महानगरीय जाणीव अशी विविध आशयसूत्रं दिसून येतात. त्यांनी काव्याचे सगळेच फॉर्म हाताळले आहेत लावणी, अभंग, समरगीत, गझल, विरुपिका, विडंबन इ. तरीही कवितेच्या आंतररचनेच्या बाबतीत मलिकांनी फारसे प्रयोग केलेले दिसत नाहीत, कारण ती जशी आतून स्फुरते, तसा कवितेला आकारही आतूनच मिळतो, यावर त्यांचा विश्वास आहे. त्यांच्या बहुतांशी कविता गद्यप्राय तसेच मुक्तछंद स्वरूपाच्या असलेल्या दिसतात.

**अभिव्यक्तीचे आगळेपण**

समकालीन कवयित्रींच्या कवितेशी त्यांच्या कवितेचं नातं असलं, तरी त्यांची अभिव्यक्ती वेगळी आहे. नीरजा, प्रज्ञा दया पवार, रजनी परुळेकर, कविता महाजन यांच्याप्रमाणे त्यांच्या कवितेतही स्त्रीवादी जाणिवांचा आविष्कार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यातही आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत म्हणायचे झाल्यास मलिका अमर शेख यांच्या कवितेचे नाते रजनी परुळेकर यांच्या कवितेशी अधिक जवळचे आहे, असे म्हणता येईल. कारण दोघींच्याही कवितेत सामाजिक, राजकीय घडामोडींवरील प्रतिक्रिया तुरळक व्यक्त झालेल्या दिसतात. व्यक्तिगत जाणीव, आत्मपर अनुभव या केंद्रांभोवती कविता विशेषत्त्वाने फिरताना दिसतात. एका अर्थाने त्या स्वांतसुखाय भूमिकेतून लिहिलेल्या दिसतात. आपल्या कवितेबाबत त्या म्हणतात, माझ्या कवितेचा चेहरा प्युअर माणसाचा किंवा सजिवाचा आहे. ना तो स्त्रीचा आहे, ना पुरुषाचा. या अर्थाने त्यांची कविता माणूसपणाचा शोध घेणारी आहे, असं म्हटल्यास वावगे ठरू नये.

अर्थात या जाणिवा नीरजा, प्रज्ञा दया पवार, कविता महाजन यांच्याही कवितेत आढळतातच, पण या कवयित्रींच्या कवितेत सामाजिक घडामोडी, उलथापालथ यांचाही धांडोळा

घेतलेला दिसतो, तसा रजनी परूळेकर, मलिका यांच्या कवितेत फारसा दिसून येत नाही. त्यांची कविता व्यक्तिगत अनुभवांना, वैयक्तिक जाणिवांना, मानसिक उलथापालथींना कवेत घेणारी दिसते. या अर्थाने या दोघींच्याही कविता व्यक्तिगत भूमिकेतून लिहिलेल्या दिसतात. दोघीही अभिव्यक्त होण्याची गरज म्हणून कविता लिहितात, मनात साठलेल्या, साचलेल्या अनुभवांना शब्दबद्ध करतात, एखाद्या प्रतिक्षिप्त क्रियेसारखं. म्हणूनच त्यांच्या कविता आत्मकेंद्री झालेल्या दिसतात, असे म्हटल्यास गैर होणार नाही.

**खोल डोहाचा वेध**

मलिकांच्या अनेक कवितांपैकी उल्लेखनीय कविता म्हणजे 'बायका' ही होय. सर्व स्तरातील, सर्व वयोगटातील बायकांच्या जिवट, चिवट आणि विजिगीषुवृत्ती आणि स्त्रीची जीजीविषा यावर भाष्य करणारी ही कविता. कवितेची सुरुवातच स्त्रिया किती विपरीत परिस्थितीत चिकाटीने जगतात, याचा साध्या सोप्या शब्दातून निर्देश करणारी आहे. येथे अलबत आणि गलबत ही शाब्दिक यमक रचना केलेली असली तरी अलबत या शब्दातून स्त्रीची चिवटवृत्ती दर्शवली असून भवसागराच्या, संसाराच्या विशाल जबाबदाऱ्यांची, तरीही जीवनाच्या अनिश्चिततेची म्हणून तरंगत्या विश्वाची प्रतिमा म्हणून गलबत ही प्रतिमा योजलेली दिसते. गलबत या प्रतिमेतून स्त्रीच्या आयुष्यातील संकटांचे महाकाय रूप सूचित केलेले दिसते. कवयित्री म्हणते–

*बायका जगतात अलबत जगतात बुडणाऱ्या गलबतातसुद्धा*
*थेंबभर कुंकवात*
*एका गर्द हिरव्या चुड्यातल्या खोल डोहात*

येथे थेंबभर कुंकू आणि हिरवे गर्द चुडे या सांसारिक स्त्रीच्या सौभाग्य प्रतिमा म्हणून योजलेल्या दिसतात. थेंबभर कुंकू, हिरवे गर्द चुडे या शब्दप्रतिमा आकारदृष्ट्या छोट्या दिसत असल्या तरी नवरेपणाच्या, अहंकारीवृत्तीच्या कचाट्यात पिचणाऱ्या स्त्रीची व्यथा व्यक्त करणाऱ्या आहेत. तर गलबत या प्रतिमेतून संसारातील तरंगते, हेलकावे खाणारे, अनिश्चित भावविश्व अधोरेखित केलेले दिसते. कुंकू, बांगड्या आणि गलबत या प्रतिमा यांच्या आकारातील आणि त्यातून व्यक्त होणाऱ्या अर्थातील विरोधही दर्शवतात. तसेच बुडणाऱ्या गलबतात सुद्धा स्त्री जिद्दीने, कणखरपणे जगत असते हे सांगताना कवयित्री स्त्रीचा कणखरपणा, तिची निर्णयक्षमता, तिची निर्भयताच ठसवू पाहाते. स्त्रीच्या आयुष्यातील अनाकलनीय विवंचनांसाठी, संकटांसाठी हिरव्या गर्द चुड्यातल्या खोल डोहात ही एक आगळी वेगळी प्रतिमा कवयित्रीने योजली आहे. गर्द हिरवा चुडा या शब्द समूहातून नवविवाहित मुलीचं चित्र उभं केलं आहे, पण हिरव्या चुड्यातील खोल डोह या शब्दसमूहामुळे अर्थाला वेगळेच गहन आणि गूढ असं परिमाण लाभलेलं दिसतं.

नव्या नवरीच्या मनातले नव्या घराविषयीचे उत्सुक भाव व्यक्त करतानाच, खोल डोहाची गूढता, गहनताही त्यामागे आहे, हे नेमक्या शब्दातून कवयित्री मांडते. तो चुडा केवळ सौभाग्यलंकाराचं सूचन करत नाही, तर लग्नानंतरची हातातील बंधनं, जबाबदाऱ्यांचं ओझं, तिच्या मनातील भावनांचा खोल डोह यांचंही सूचन करतो. थेंबभर कुंकू म्हणजेच नवऱ्याच्या निमित्ताने येणाऱ्या अनेक गोष्टींचे ताण या अर्थाने कवयित्रीने डोहाची प्रतिमा योजलेली दिसते. इतके सारे नवे ताण तणाव असतानाही, ती मोठ्या आशेने, उत्साहात नवी नवरी किंवा परंपरा जपणारी स्त्रीही जगते, काहीही घडलं तरी त्याला सामोरी जाते, माघार घेत नाही याचे कवयित्रीला विलक्षण कौतुक वाटते.

आज एकविसाव्या शतकात प्रवेश करूनही स्त्रियांचं जगणं बदललेलं नाही. मनातील भीती, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रीला दिलेले दुय्यमत्त्व स्वीकारूनही त्या चिवटपणे जगत असतात आणि आपल्या कुटुंबालाही जगवत असतात. अगदी तळागाळातील, गरिबीत जगणारी किंवा खेडेगावात राहणारी स्त्री देखील परंपरांचे, परिस्थितीचे जोखड स्वीकारूनही, कोंड्याचा मांडा करून जगत असते. म्हणूनच कवयित्री म्हणते–

*गच्च गळा काचेल अशा काळ्याभोर मण्यांत*
*जगतात बायका*
*तीनशे रुपये पगारात*
*मुलाला पाळण्यात*
*न् नवऱ्याला ओच्यात ठेवून*

वरील ओळीतून संसारासाठी कष्ट करणाऱ्या स्त्रीचा संघर्ष सूचित केलेला दिसतो. तीनशे रुपये कमावणारी सर्वसामान्य स्त्री घरातही व घराबाहेरही कष्ट करत असते. मुलाला पाळण्यात आणि नवऱ्याला ओच्यात म्हणताना, तिच्या कर्तव्य भावनेला अधोरेखित केलेले दिसते. काळ्याभोर मण्यात ही विवाहित, संसारी स्त्रीची प्रतिमा योजली आहे. ही प्रतिमा केवळ सौभाग्य

किंवा सांसारिकता अधोरेखित करणारी नाही, तर ही प्रतिमा गच्च गळा काचेल या शब्दसमुहाला अनुसरून येते. या ओळीतून संसारातील नवऱ्याचा काच, जाच त्याची परंपरेच्या नावाखालील जाचक बंधनं तसेच त्याची हुकूमशाही अशी अनेक अर्थाची परिमाणं या प्रतिमेला लगटून आलेली दिसतात. त्यामुळे परंपरावादी, अहंकारी नवरा नावाच्या पुरुषाच्या जाचाला उद्देशून गळ्याला काचणाऱ्या काळ्याभोर मण्यांची प्रतिमा योजलेली दिसते.

काही स्त्रिया संसाराचे पाश, जोखड तोडून, परंपरेने लादलेली चौकट तोडून स्वतःचं अवकाश शोधू पाहात आहेत, स्वतःची ओळख घडवू पाहात आहेत, याची जाणीव पुढील ओळींतून व्यक्त केलेली दिसून येते.

*त्या भराभरा शहरांची कापणी करतात*
*बायका वापरतात फण्याकंगव्यांसारखं*
*शहराला न् पुरुषाला न् स्वतःलासुद्धा*

वरील ओळीतून स्त्रीचा धाडसीपणा, चटपटीतपणा दिसून येतो. कामधंद्यासाठी शहरात वणवण करणं, अशावेळी त्या शहराची किंवा पुरुषाची तमा न बाळगता आपलं ईप्सित साध्य करत असतात. मग ती एखादी सुशिक्षित स्त्री असेल किंवा हातावर पोट घेऊन, रोजंदारीवर काम करणारी किंवा घरकाम करणारी कोणतीही स्त्री असो, ती स्वतःचा चरितार्थ चालवण्यासाठी रोज आटापिटा करीत असते, ती असहाय नसते. खरंतर अनेकदा संसार सांभाळताना कष्ट करण्यात तिचाच वाटा मोठा असतो. काबाडकष्ट करताना ती मागेपुढे पाहत नाही. एक वेळ पुरूष खचतो, पण ती नीडरपणे आपल्या जबाबदाऱ्या उचलते, हे दाखविण्यासाठी म्हणूनच येथे पुरुषाला फणी कंगव्याची उपमा मलिका अमर शेख देतात.

कवयित्रीला बायकांचं जगणं दुधारी शस्त्रासारखं वाटतं. एकीकडे अथांग कारुण्याने भरलेल्या गाई, बैलांच्या डोळ्यासारख्या, अतीव मायेने, वात्सल्याने त्या भरलेल्या असतात, तर वेळ पडलीच तर आपल्या हक्कासाठी त्या चंडिकेचा अवतारही धारण करतात.

*गळ्यातली घुंगरं खुळकावत*
*माना डोलवत*
*शेपटानं माशा वारत*
*डोळा काजळ घातलेली गाय बैल*
*पाणी प्यायला येतील*

वरील ओळीतील गळ्यातली घुंगरं खुळकावत, माना डोलवत, शेपटानं माशा वारत या ओळी गाय, बैलांच्या वागण्याचा निर्देश करणाऱ्या आहेत. स्त्रियासुद्धा गायी बैलांसारखं असं निमुटपणेही त्या जगत असतात, पण जगणं सोडत नाहीत किंवा नाकारातही नाहीत. याकडे कवयित्री निर्देश करते. गळ्यातील घुंगुरं, डोळा काजळ घातलेली गाय–बैल या प्रतिमाही स्त्रीच्या सोशिक आणि परिस्थितीला शरण जाणाऱ्या वृत्तीला उद्देशून योजलेल्या दिसतात. माना डोलवत, शेपटीने माशा वारत या शब्दप्रयोगातून स्त्रीची सहनशीलवृत्ती सूचित केलेली दिसते. पण तरीही ती स्वप्नं पाहणं सोडत नाही. तिची आशावादी जाणीव व्यक्त करताना कवयित्री म्हणते–

*आकाश सूर्य तारे चंद्र*
*सारे पाण्यात डोकावून पाहतील*

कितीही अडचणी आल्या, दुःख आली तरी ती आपली सकारात्मकता सोडत नाही, जगण्याचा आशावाद सोडत नाही. मग ती स्त्री कोणत्याही स्तरातील किंवा वर्गातील असूदे. जगण्याचा चिवट धागा ती आशेने विणत असते.

संसारातील दुःखाने पिचलेल्या स्त्रियांच्या मनात जरी आत्महत्येचा विचार आला तरी त्या आत्महत्या करीत नाहीत. खेडेगावातील स्त्रियांना नेहमीच विहीर जवळची वाटते. मैत्रिणींसोबत सुख दुःख व्यक्त करण्याचं ठिकाण म्हणून विहीर हे ठिकाण माहेरसारखं जवळचं वाटतं, (दुसऱ्या बाजूला ही विहीर बाईच्या दुःखासह तिला आपल्यात समावूनही घेते) तरीही बाई सहजासहजी आत्महत्या करीत नाही, ती चिवटपणे जगत राहते. हीच तिची विजिगीषुवृत्ती तिला समर्थ करत असते. म्हणूनच कवयित्री म्हणते –

*छळवणूक झालेल्या बाईला*
*विहीर अस्तं दुसरं माहेर*
*पण बायका कधीच आत्महत्या करत नाहीत*

बाईचं जगणं किती कठीण आणि संघर्षाचं असतं! जीवन जगत असताना खरं तर ती रोज मरणच जगत असते. मुख्य म्हणजे प्रपंचात, कुटुंबासाठी खस्ता खाऊनसुद्धा तिला कुणी खिजगणतीत धरत नाही, हा पराभव पचवणं म्हणजे एक प्रकारचे मरणच अनुभवत असते ती. किंबहुना ती त्या मरणातच आपल्या जगण्याचा उत्सव एकटीने साजरा करत असते, ही तिची विजिगीशुवृत्ती नाही तर काय? म्हणूनच कवयित्री म्हणते–

*बायकांना प्रचंड आवडतं जगायला*
*at any cost*
*न् ज्या मेलेल्याच असतात मुळात*
*त्या पण चक्क मरणात जगतातच*

वरील ओळींतून स्त्रीचं जगणं आणि मरणं यातील विरोध कवयित्री नेमकेपणाने अधोरेखित करते. सगळ्या जबाबदाऱ्या पेलून, कुटुंबीयांच्या मनाचा विचार करून, त्यांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करून स्वत:च्या इच्छा आकांक्षांचा बळी देऊन ती आनंदात जगत असते. पण अनेक स्त्रिया घरातल्यांचा जाच सहन करून, दु:खात पिचून मेलेल्या मनाने केवळ कर्तव्य म्हणून जगत असतात, ते त्यांचं जगणं नसतंच तर मरणच अनुभवत असतात, अशा जगण्याची त्यांना सवय झालेली असते. म्हणजेच त्यांची सहिष्णुवृत्तीच त्यांना जगवत असते. हे चित्र सर्वत्रच पाहायला मिळतं, त्याबद्दलचा विशाद व्यक्त करताना कवयित्री म्हणते–

*न् ज्या मेलेल्याच असतात मुळात*
*त्या पण चक्क मरणात जगतातच*

कवयित्री स्त्रीच्या जगण्याचं, तिच्या सामर्थ्याचं समर्थन करताना म्हणते, की स्त्रीचं जगणं दोन प्रकारचं असतं. जगतानाचं मरण मान्य असलेल्या आणि मेल्यावर जगणं मान्य असलेल्या. अर्थात कोणत्याही प्रकारचं जगणं जगताना स्त्रीला मरणाचा सामना करावाच लागतो, हे कवयित्री विशेषत्वाने अधोरेखित करू पाहते. मरणानंतर आपल्या कर्तृत्वाने अमर होणाऱ्या स्त्रियांचे सामर्थ्य कवयित्री मुखर करू पाहते. खरं तर ती बाईपणाचंच सामर्थ्य मनात ठसवू पाहते. बाईचं जगणं हेच खऱ्या अर्थानं जगणं आहे असं तिला वाटतं.

**स्त्री सामर्थ्याची जाणीव अधोरेखित**

एकंदरीत मलिका अमर शेख 'बायका' या कवितेतून बाईच्या संघर्षशील जगण्याचा, तिच्या जिवनेच्छुक वृत्तीचा गौरव करतात. या कवितेतील स्त्री जीवनाच्या विशिष्ट स्तरांचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नसला, तरी ते केवळ शहरातील स्त्रीचे नसून जगभरातील सर्वच स्त्रियांच्या संघर्षाचे वर्णन नेमकेपणाने केलेले दिसते. किंबहुना, स्त्रीची महती सांगताना आपल्या मनातील विचार अतिशय मोकळेपणाने, तिच्या शैलीत आणि तिच्या भाषेत मांडतात. म्हणूनच ती at any cost जगतातच खऱ्या अर्थी असं ठासून म्हणतात. हे विधान सार्वत्रिक अर्थाने योजतात. जगातील सगळ्या स्त्रियांचं जगणं असंच असतं हेच त्या दाखवून देतात. कारण संपूर्ण जगातील स्त्रीशक्तीचा, स्त्रीच्या सामर्थ्याचा त्या जोरकसपणे गौरव करतात.

मुंबईसारख्या महानगरात राहणाऱ्या बायका मुक्त असतील, स्वतंत्र असतील असा भ्रम अनेकांचा झालेला असतो, पण खरं सांगायचं झाल्यास त्यांचं राहणीमान बदललेलं असलं तरी मानसिकता बदललेली नाही, हेच 'बायका' या कवितेत अधोरेखित केलं आहे. जग कितीही बदलेलेलं असलं तरी बायका सर्व परिस्थितीतून तावून सुलाखून निघूनही, हार न मानता जगतातच. या तिच्या चिकाटीवृत्तीला मुखर करताना मलिका अमर शेख म्हणतात–

*तरीपण बाया जगतात*
*at any cost जगतातच खऱ्या अर्थी*
*बायका या जगातल्या!*

जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी स्त्रीच्या वाट्याला येणारे भोग, व्याप सारखेच असतात. ती सुशिक्षित असो, उच्च शिक्षित असो वा अडाणी असो, आंतर पातळीवर स्त्रीचे जीवन सारखेच असते. काहीही झाले तरीही ती खंबीरपणे प्रत्येक संकटाचा सामना करून, कच न खाता जगतेच. आपल्या जगण्यातून आशावाद पेरते, हे स्त्रीचं महात्म्य आणि स्त्रीचं सकारात्मक जगणं मलिका अमर शेख यांनी या कवितेतून विशेषत्त्वाने मनावर ठसवलं आहे, असं निश्चितपणे म्हणता येतं.

**संदर्भ :**

**ढेरे अरूणा (संपा.) – स्त्री–लिखित मराठी कविता (१९५०–२०१०) पद्मगंधा प्रकाशन, पुणे.**

**डॉ. नेहा सावंत अंधेरी–मुंबई येथील भवन्स महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी कुपारी बोलीतील साहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएच.डी. मिळवली असून, लेखन, शब्दांकन, संपादन, अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन आदी क्षेत्रात त्या सक्रिय राहिल्या आहेत.**
**संपर्क** : nehasawant603@gmail.com

# श्यामसमान



अनुवाद : सुमती जोशी

मूळ कथा : इंद्रनील सान्याल

बंग नाद




लघुकथेची खुमारी काही औरच असते. त्यातही लघुकथेची मूळ भाषा बंगाली असेल, तर ती कथा बंगालच्या मातीचा आणि त्या मातीत फुलणाऱ्या मानवी नातेसंबंधांचा गंध घेऊनच अवतरते. त्यात त्या नातेसंबंधातून आलेली लय असते, नादही असतो. ही लय आणि हा नाद कधी वाचकाला धक्का देतो, कधी अंतर्मुख करतो, तर कधी बुचकळ्यातही पाडतो. बंगाली भाषेचे सौंदर्य यात असतेच, पण त्या त्या लेखक-लेखिकेची दृष्टी वाचकांचे भानही विस्तारते. अशाच काही निवडक कथांचा हा भावानुवाद...

ईस्टर्न मेट्रोपोलिटन बायपासपाशी असलेल्या पंचतारांकित नर्सिंग होमच्या इंटेन्सिव्ह थिरपी युनिट किंवा आय.टी.यु.तून बाहेर येऊन सर्जन कल्लोल मुखर्जी जेव्हा म्हणाले, ''मिस्टर मित्र, आपण माझ्या चेंबरमध्ये या'', तेव्हाच बासष्ट वर्षांचे सुदीप्त मित्र जे काय समजायचं ते समजले. सुदीप्तपाशी उभे होते, त्यांचे बालपणापासूनचे मित्र मानस सेनगुप्त. सुदीप्तचा हात धरून ते म्हणाले, ''मन घट्ट कर.''

कल्लोल चेंबरमध्ये गेले आणि खुर्चीकडे बोट दाखवून म्हणाले, ''आपण बसा.'' त्यानंतर चेंबरला लागून असलेल्या बाथरूममध्ये शिरले.

खुर्चीवर बसल्यावर सुदीप्त खिडकीतून बाहेर पाहू लागले. रात्री दीड वाजतासुद्धा पूर्व कोलकात्याच्या महामार्गावरून अनेक गाड्या धावत होत्या. त्याच ठिकाणी चार दिवसांपूर्वी त्यांच्या मुलाच्या – सुमित्रच्या गाडीला एका ट्रकने धडक मारली होती. मुलाची पत्नी प्रिया आणि नात ऋजू यांचा तत्काळ मृत्यू झाला होता, सुमित्र बेशुद्ध पडला होता. पादचारी आणि दुकानदार ताबडतोब त्या तिघांना या नर्सिंग होममध्ये घेऊन आले. त्यावेळी सुदीप्त डोव्हर लेनच्या वडिलोपार्जित घरात बसून मानसशी गप्पा मारत होता. सुदीप्तची पत्नी नीलिमा आणि मानसची पत्नी पुरबी यासुद्धा तिथेच होत्या.

मानस आणि सुदीप्त एका पाड्यावरचे दोस्त, शाळेत क्लासमेट. त्यानंतर मात्र कॉलेजेस् वेगळी, व्यवसाय वेगळे, कार्यक्षेत्रही वेगळं. तरीही मैत्री टिकून राहिली होती. निवृत्त झाल्यावर दोघेही आपापल्या वडिलोपार्जित घरी स्थिरावले होते. दोघाही मित्रांची सांपत्तिक स्थिती उत्तम होती, मुलंही सुस्थितीत होती. मानसचा मुलगा अमेरिकेत राहात असे. सुदीप्तचा मुलगा कोलकात्यात होता. दोघंही विवाहित. सुदीप्त आणि मानस दोघेही निवृत्त झालेले आनंदी मित्र.

त्या रात्री सुदीप्तच्या मोबाइलवर नर्सिंग होममधून फोन आल्यावर मात्र सगळं चित्र पालटून गेलं.

नर्सिंग होममधून सरकारी हॉस्पिटलच्या शवागारात. पोस्ट मॉर्टेम झाल्यावर डोव्हर लेनच्या घरी आणून मग स्मशान. अपघाती मृत्यू झाल्यामुळे तिसऱ्या दिवशीच पारलौकिक क्रियाकर्म उरकावी लागली. मानस आणि पुरबी यांनी सारं धकवून नेलं होतं. सुदीप्त आय.टी.यु.च्या कॉरिडॉरमध्ये ठेवलेल्या खुर्चीवर बसून राहिला होता.

आदल्या दिवशी प्रिया आणि ऋजू यांचं कार्य होतं. सुदीप्त थोड्या वेळासाठी घरी गेला होता. गेल्या काही दिवसात त्याने दाढी केली नव्हती, स्नान केलं नव्हतं. जेवण म्हणाल तर नर्सिंग होमच्या कॅफेटेरियातली चहा–कॉफी–बर्गर. वर्तमानपत्र वाचून आणि मोबाइलवरून नीलिमा आणि मानस यांच्याशी बोलून त्याने वेळ घालवला होता.

रोज सकाळी अकरा आणि रात्री नवाच्या सुमारास पेशंट बघून झाल्यावर कल्लोल रुग्णाच्या नातेवाईकांशी संवाद साधत असे. आज रात्री नवाच्या ऐवजी दीड वाजला होता. सुमित्रच्या मेंदूवर आज आणखी एक ऑपरेशन करावं लागलं होतं.

बाथरूममधून बाहेर पडून स्वत:च्या खुर्चीवर स्थानापन्न झाल्यावर कल्लोल म्हणाले, हात आणि पाय दोन्हीला फ्रॅक्चर झालंय, बरगडीलाही फ्रॅक्चर आहे, प्रचंड रक्तस्त्राव – हे सारं सांभाळून घेतलंय. पण सुमित्रची खरी समस्या आहे, त्याची हेड इंज्युरी. ब्रेनमध्ये खूप रक्त जमा झालं होतं. आम्ही ते काढून टाकलंय पण रिझल्ट आशादायक नाहीय. किडनी आणि लिव्हर काम करत नाहीयेत. असं मल्टी ऑर्गन फेल्युअर झाल्यावर काही करता येत नाही. ''इट्स अ मॅटर ऑफ टाइम. आज नाहीतर उद्या...''

सुदीप्त कल्लोल यांच्याकडे पाहू लागले. त्यांची नजर खाली वळलेली. अशा वेळी डॉक्टर रुग्णाच्या नातेवाईकांच्या नजरेला नजर देऊ शकत नाहीत, याची सुदीप्तना जाणीव होती.

दोघं मित्र चेंबरमधून बाहेर पडले.

## दोन

घरी परतल्यावर दाढी–स्नान उरकून काहीतरी तोंडात टाकून सुदीप्तने बिछान्यावर अंग टाकलं. दुपारी दोनच्या सुमारास त्याला जाग आली. शर्ट पँट चढवून ते नीलिमाला म्हणाले, ''मी बाहेर पडतोय. हॉस्पिटलला जाऊन परत येईन.''

नीलिमा शोक लपवायला शिकली होती. शांतपणे म्हणाली, ''बरं.''

सुदीप्त गाडी घेऊन मानसच्या घरी गेले. मानसला बरोबर घेऊन बाहेर पडले. मानस विचारू लागले, ''भर दुपारी नर्सिंग होममध्ये जायला निघालास का? संध्याकाळी गेलो असतो तर चाललं नसतं का?''

सुदीप्त म्हणाले, ''दुसरीकडे जायचंय. गाडीत बस.''

बोलणं आणखी न वाढवता मानस गाडीत बसले. गाडी चालवता चालवता सुदीप्त म्हणाले, ''नर्सिंग होममध्ये बसल्या बसल्या मी अनेक वर्तमानपत्रं वाचली. बघितलं, कोलकत्यात



रोज नवीन शॉपिंग मॉल्स, बुटिक, रेस्तराँ, पब, डान्स ॲकॅडमी यांची उद्घाटनं होतायत. या सगळ्यात आणखी एका संस्थेची जाहिरात पाहून अतिशय चकित झालो. आज सकाळी फोन केला होता.''

मानस विचारू लागले, ''कोणती संस्था?''

सुदीप्त बेक बागान रोडवरून जे.सी.बोस रस्त्यावर आले होते. मल्लिक बाजाराच्या दिशेला जाता जाता ते म्हणाले, ''त्या संस्थेचं नाव आहे चॅप्टर टू. आपण तिथेच निघालोय.''

मानस म्हणाले, ''द्वितीय अध्याय? हे पुस्तकांचं दुकान आहे का?''

''अजिबात नाही'' असं म्हणत सुदीप्तनी मल्लिक बाजाराचं क्रॉसिंग ओलांडून इलियट रोडवर डाव्या बाजूला गाडी पार्क केली. ''ही एक इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी. हे आफ्टर लाइफ सर्व्हिसविषयीचे सारे व्यवहार पार पडतात.''

''आफ्टर लाइफ सर्व्हिस? ही काय भानगड आहे?''

''लाइफ हा झाला पहिला अध्याय. चॅप्टर टू आहे आफ्टर लाइफ. म्हणजेच डेथ.''

गाडीतून उतरल्यावर समोर एक नवीन शो रूम उघडलेली त्यांना दिसली. दुधी काचेत भिंतीचा फिक्कट निळा रंग मिसळल्यामुळे बहिःरंग आकर्षक दिसत होतं. भिंतीवर लावलेल्या लाकडी बोर्डवर सूर्यास्ताचे नारिंगी रंग पडले होते. त्यावर लिहिलं होतं, 'चॅप्टर टू. आफ्टर लाइफ सर्व्हिस.'

दरवाजा ढकलून दोघं मित्र आत शिरले. समोरच्या सफेद भिंतीवर रवी ठाकुरांच्या कॅलिग्राफीची फ्रेम टांगलेली होती. त्यावर लिहिलं होतं, ''हे मृत्यू, तू मला श्यामसमान.'' साऊंड सिस्टिमवर गाणं चालू होतं, 'त्या महासिंधूच्या पैलतीरावरून कोणतं संगीत वाहात येतंय...'

पंचवीसेक वर्षांची तरुणी डेस्क टॉपवर काम करत होती. क्लायंट आलेला पाहून हात जोडून म्हणाली, ''नमस्कार. बसा.''

खुर्चीवर बसता बसता सुदीप्तने विचारलं, ''आपणच आदिती का?''

मान हलवत ती तरुणी म्हणाली, ''आपणच मिस्टर मित्र, होय ना? सकाळी फोन केला होतात.''

''होय. आपण कशा प्रकारची सर्व्हिस प्रोव्हाइड करता, ते मला समजून घ्यायचंय. वर्तमानपत्रातली जाहिरात वाचून काही कल्पना करता येत नाही.''

मानसकडे बघत अदिती म्हणाली, ''आफ्टर लाइफ, सर्व्हिस प्रोव्हाइड करायचा कन्सेप्ट परदेशात खूप कॉमन झालाय. आपल्या देशात दिल्ली आणि मुंबई या ठिकाणी अशी व्यवस्था आहे. कोलकात्यात आत्ता सुरुवात झालीय.''

मानसने अडाणी माणसासारखी मान हलवली.

अदिती म्हणाली, ''जन्म आणि विवाह याप्रमाणे मृत्यू ही सुद्धा एक महत्त्वपूर्ण घटना. कोणाचा मृत्यू झाला, तर त्याच्या निकटवर्तीयांना खूप कामं पार पाडावी लागतात. 'चॅप्टर टू' तीच कामं करून देतात. समजलं?''

मानसने होकार दिला. ते ऐकल्यावर मानसना वाटलं, सुदीप्तने इतकी घाई करायला नको होती. कल्लोल मुखर्जी म्हणाले होते, इट्स अ मॅटर ऑफ टाइम. आज किंवा उद्या... ती काळ्या दगडावरची रेघ समजून मुलाच्या अंत्यविधीची आधीच व्यवस्था करून ठेवणं उचित आहे का? सुदीप्तला गुडघ्याने ढकलत हळू आवाजात तो म्हणाला, ''डॉक्टर मुखर्जींनी अजूनही डेथ डिक्लेअर केला नाहीय.''

मानसला थांबवत अदिती म्हणाली, ''आपल्या मित्राने योग्य तोच निर्णय घेतलाय. ॲडव्हान्स बुकिंग केलं तर आम्ही बेटर सर्व्हिस देऊ शकतो. आम्ही हे डेथ शॉप दीड महिन्यापूर्वी उघडलंय. तेवढ्या वेळात सतरा ॲडव्हान्स बुकिंग्ज मिळालीयत. तिघा क्लायंटसची मुलंमुली परदेशात राहतात. सुट्टी मिळवून, प्लेनचं तिकिट काढून इथे येऊन पोचायला त्यांना कमीत कमी तीन दिवस लागतात. आम्ही डेड बॉडी एम्बामिंग करून पीस हेवनमध्ये ठेवून देतो. एम्बामिंग कशाला म्हणतात, ते माहितेय का तुम्हाला?''

मानस म्हणाला, ''केमिकल इंजेक्ट करून मृतदेह प्रिझर्व करायची पद्धत.''

थम्स अप करत अदिती म्हणाली, ''अगदी बरोबर.'' मग सुदीप्तकडे वळून म्हणाली, ''आपल्याला कशा प्रकारचं क्रीमेशन हवाय? हिंदू, मुस्लीम की ख्रिश्चन?''

सुदीप्त म्हणाला, ''हिंदू बंगाली अंत्यविधी. आपण काय काय करू शकता ते सविस्तर सांगता का? आपली प्रोफेशनल फी किती, तेही सांगा.''

## तीन

अदिती म्हणाली, ''हे बघा सर, आमच्याकडे तीन स्कीम्स आहेत. स्वस्त आणि मस्त आहे यांत्रिक स्कीम. यात स्मशानापर्यंत पोचण्यासाठी गाडी, गुलछडीच्या फुलांचं डेकोरेशन, इलेक्ट्रिक दाहिनीत दहन, गंगेत अस्थिविसर्जन. याचा खर्च दहा हजार.''

हात हलवून माशा उडवत सुदीप्त विचारू लागले, ''आणखी काय स्कीम्स आहेत?''

''नेक्स्ट लेव्हल आहे तीस हजार रुपयांची प्रवासी स्कीम. या स्कीममध्ये स्मशानापर्यंत जायला ए.सी.गाडी, डेकोरेशन आपल्या आवडीच्या फुलांचं. दहन इलेक्ट्रिक वाहिनीत करायचं की पारंपारिक पद्धतीने लाकडं रचून करायचं असा ऑप्शन आहे. अस्थी विसर्जन कुठे करायचं तेही क्लायंटच्या मतानुसार ठरतं.''

मानस विचारू लागला, ''अस्थी विसर्जन आणखी कुठे करतात का?''

''आमच्या एका एन.आर.आय.बंगाली क्लायंटला त्याच्या आईचा मृत्यू झाल्यावर तिच्या अस्थी कोलकात्याच्या घराच्या बागेत विखरून टाकाव्यात असं वाटत होतं. आम्ही तेच केलं आणि त्याचा व्हिडीओ काढून क्लायंटकडे पाठवला.''

सुदीप्तनी पुन्हा एकदा प्रश्न केला, ''आणखी काय स्कीम्स आहेत?''

''आमच्या एक्सक्लुझिव्ह स्कीमचं नाव आहे स्थलांतरित. एक लाख रुपयांचं पॅकेज.'' असं सांगून अदितीने रिमोट दाबून भिंतीवर माउंट केलेला टी.व्ही. ऑन केला. टी.व्ही.च्या पडद्यावर मुंबईच्या एका वृद्ध नायिकेच्या अखेरच्या यात्रेचा व्हिडीओ दिसू लागला. अदिती म्हणाली, ''स्पेशल डिझाइनर गाडी. दिसते रथासारखी. आपल्याला हवं असेल त्या डिझाइनच्या गाडीची व्यवस्था करता येईल. फुलांच्या बाबतीतही आम्ही एक्सक्लुजिव्ह. डॅफॉडिल्स, ट्युलिप्स, क्रिसेंथेमम, कार्नेशन, ऑर्किड याखेरीज इतर फुलं आम्ही वापरत नाही. दहन केलं जातं चंदनाच्या चितेवर. अर्थात कोणाला हवं असलं तर आम्ही इलेक्ट्रिक दाहिनीचाही वापर करू शकतो.''

सुदीप्त म्हणाले, ''इतके पैसे खर्च करण्यात काही अर्थ नाही. दोन नंबरची स्कीम चांगली आहे.''

''गुड! आता डीटेल्स नक्की करू या. श्राद्ध हवाय की स्मरणसभा?''

जरा विचार करून सुदीप्त म्हणाले, ''स्मरणसभा.''

''कोणाकोणाला बोलवायची इच्छा आहे तुमची?''

पुढचा अर्धा तास अतिथींची नावं, पत्ते, मोबाइल नंबर्स आणि ई मेल आयडी यांची यादी तयार करण्यात गेला. सुदीप्तने स्मार्ट फोन धुंडाळून ही माहिती उपलब्ध करून दिली. स्मरण सभेनंतर चहापानाची व्यवस्था केली जाणार होती. त्यावेळी डिशमधून आणखी कोणते पदार्थ घालायचे त्याचीही यादी तयार झाली. सगळ्या चौकशा पूर्ण झाल्यावर अदिती म्हणाली, ''ॲग्रीमेंटनुसार सगळं होताय की नाही, हे बघण्यासाठी तुम्ही वकिलाची नेमणूक करू शकता.''

मानसकडे बघत सुदीप्त म्हणाला, ''मी फोनवर आपल्याला आधीच सांगितलंय, वकिलाची काही जरूर नाही. माझा हा मित्र सगळं पाहील.''

कि बोर्डवर बोट ठेवून अदिती म्हणाली, ''क्लायंटचं नाव सांगा.''

स्वत:चं आणि बायकोचं नाव सांगून सुदीप्त विचारू लागला, ''आपण कार्डाने पेमेंट घेता ना?''

''अवश्य'' असं म्हणत अदितीने सुदीप्तच्या हातातून क्रेडीट कार्ड घेऊन स्वाइप करून ते परत दिलं. फडफड आवाज करत प्रिंट आउटचं शेवटचं पान दाखवून अदिती मानसला म्हणाली, ''इथे सही करा. चार कॉपीजवर सही करावी लागेल.''

सह्या करून झाल्यावर अदितीने ॲग्रीमेंटची कॉपी लिफाफ्यात घालून तीन बंद केलेले लिफाफे सुदीप्त आणि मानसच्या हातात दिले. ती मानसला म्हणाली, एक कॉपी आमच्यापाशी राहील. एक आपल्यापाशी आणि उरलेल्या दोन यांच्यापाशी.

'चॅप्टर टू'मधून बाहेर पडल्यावर दोघं मित्र गाडीत जाऊन

बसले. मल्लिक बाजारातून पार्क सर्कसला जोडणाऱ्या रस्त्यावरून गाडी बायपासच्या दिशेने पुढे जाऊ लागली. मानस म्हणाले, ''इतक्या लवकर ॲग्रीमेंट केलं नसतं, तर चाललं नसतं का? अजून सुमित्र हयात आहे.''

गिअर बदलून सुदीप्त शांतपणे म्हणाला, ''मुलासाठी मी आहे. मीच त्याच्या स्वर्गपथाची व्यवस्था करणार आहे. मीच त्याच्या शरीरावर तुपाचा लेप देणार आहे, मीच त्याला मुखाग्नी देणार आहे, मीच त्याच्या अस्थी गंगेत विसर्जित करणार आहे. सून आणि नातीच्या बाबतीतलं सारं पारलौकिक काम मी करू शकलो, तसंच मुलाचंही करीन.''

अवाक् होत मानस म्हणाला, ''मग हे काय केलंस?''

''यांच्याकडे ॲग्रीमेंट केलं ते मी आणि नीलिमा यांच्यासाठी. आमच्यापैकी एकजण देवाघरी गेला तर दुसऱ्याची खूप गैरसोय होईल. प्रेत घरी पडून राहील. तोंडावर माशा भणभणू लागतील. तिरडी उचलायला माणसं मिळणार नाहीत. ती परिस्थिती अतिशय पॅथेटिक असेल.''

फोन घेत सुदीप्त म्हणाला, ''ठीक आहे. आम्ही येतोच.'' उसासा टाकत मानसकडे पाहून तो म्हणाला, ''मुलगा निघून गेलाय.''

बायपासपाशी गाडी उभी करून स्टीअरिंगवर डोकं टेकवून सुदीप्त ओक्साबोक्शी रडू लागले. मानसला म्हणाले, ''माझ्या बाबतीत वंशाचा दिवा तेवत ठेवायला कोणी उरलं नाही. तुझा एन.आर.आय. मुलगा असूनही नसल्यासारखाच आहे. तूसुद्धा ॲग्रीमेंट करून ठेव.''

**इंद्रनील सान्याल यांनी लिहिलेल्या 'श्यामसमान' या बंगाली कथेचा (आनंदबाजार पत्रिका, रबिबासरीय ३१ डिसेंबर २०१७) भावानुवाद. अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

**ईमेल :** sumatijoshi154@gmail.com



# सुवर्ण प्राशन: किती आस्था, किती विज्ञान?



डॉ. श्रीराम सावरीकर

आयु:रंग





**बा**ळ जन्माला आले की विविध रोगप्रतिबंधक लशी बरोबरच त्याला सुवर्ण प्राशन करविण्याची पद्धत आजकाल रूढ होऊ लागली आहे. हे आयुर्वेदाच्या ब्रँडिंगचे यश म्हणायचे, की आई-बापांची त्यांच्या अपत्याप्रतीची भावनिक अगतिकता म्हणायचे हे कळणे अवघड आहे. पूर्वीच्या काळी घराघरांतून बाळाच्या जन्मानंतर इतर अनेक संस्काराबरोबरच सुवर्ण प्राशन संस्कारही केला जात असे. पण आज इतर संस्कार करो ना करो सुवर्ण प्राशन मात्र आवर्जून केले जात आहे. त्याला अगदी तथाकथित उच्चशिक्षित आणि उच्चभ्रूही अपवाद नाहीत. कारण आता बाळाचे सुवर्ण प्राशन हा श्रद्धा आणि आस्थेचा विषय झाला आहे. ती मातापित्यांची भावनिक अगतिकता बनली आहे. ते केले नाही तर आई-बाप आपल्या बाळाच्या आरोग्याविषयी व भविष्याविषयी निष्काळजी आहेत, असा विचार रूढ होऊ लागला आहे. असे असले तरी ही आस्था किंवा भावनिक गरज पूर्ण करताना मातापित्यांनी या सुवर्ण प्राशनासंबंधात काही मूलभूत गोष्टी जाणून घेणे आवश्यक आहे...

आजकाल भारतातील अनेक राज्यांतून कित्येक आयुर्वेद महाविद्यालये सुवर्ण प्राशनाचा सढळ प्रचार व प्रसार करीत असल्याचे दिसून येते. काही वर्षापूर्वी सुवर्ण प्राशनाची मोठमोठी शिबिरे भरल्याचे मी पाहिले आहे. या शिबिरांमधून आई-बाप आपल्या काही महिन्याच्या बाळाला कडेवर घेऊन त्याला सुवर्ण प्राशन करविण्यासाठी हजारोंच्या संख्येने गर्दीमध्ये रांगा लावून उभे असलेले आपल्यातील अनेकांनी पाहिले असेल. या गर्दीमध्ये गरीब, श्रीमंत, सुशिक्षित, अशिक्षित अशा सर्वांचा समावेशही आपल्या निदर्शनास आलाच असेल. त्या काळात सुवर्ण प्राशन फारसे प्रचलित झालेले नव्हते. त्यामुळे ते करणारे आयुर्वेदिक डॉक्टर्सही फारसे उपलब्ध नसत. म्हणूनच सुवर्ण प्राशनाच्या शिबिरांना लोक खूप गर्दी करत असत. या शिबिरांनी आयुर्वेद व्यावसायिकांना एक नवे व्यावसायिक दालनच उघडून दिले असे म्हणावयास हरकत नाही. मात्र, आता आपल्या बाळाला सोने पाजण्यासाठी पालकांना शिबिरांची वाट पाहण्याची आवश्यकता राहिलेली नाही. हे पाहून आयुर्वेद प्रेमी मनोमन आनंदी होत असले तरी आयुर्वेदाला छद्म विज्ञान ठरवणाऱ्या तथाकथित विद्वानांच्या हाती या निमित्ताने एक कोलित मिळाले आहे, हे मात्र निश्चित. या पार्श्वभूमीवर सुवर्ण प्राशनाची वैज्ञानिकता तपासणे अत्यावश्यक आहे.

**सुवर्ण प्राशनाची आयुर्वेदोक्त पद्धत**

सुवर्ण प्राशन या शब्दाचा उल्लेख काश्यप संहिता या इ.स. पूर्व सहाव्या शतकातील आयुर्वेद संहिता ग्रंथात मिळतो. काश्यप संहितोक्त सुवर्ण प्राशन विधीमध्ये कसोटी पाषाणावर (टचस्टोन) पाणी टाकून त्याबरोबर सोने घासून त्यात मध व तूप मिसळून चाटण तयार करून बाळाला ते चाटवले जाते. कसोटी पाषाणावर सोने घासले की त्यावर सोन्याच्या अतिसूक्ष्म कणांची एक सोनेरी रेघ उमटत असते. या रेघेतील अति अत्यल्प प्रमाणांतील सोन्याचे अतिसूक्ष्म कण मिसळलेल्या पाण्यामध्ये तूप व मध मिसळून त्याचे चाटण बाळाला केले जात असे. सुश्रुत संहितेतील उल्लेखाप्रमाणे असे चाटण करणे हा एक जात संस्कार आहे. या संस्कारामध्ये बाळाच्या जन्मानंतर त्याची नाळ कापल्यानंतर लगेचच त्याचे मुख स्वच्छ करून त्याला चाटण केले जाते. यात पहिल्या प्रहरांत म्हणजे बाळाच्या जन्मानंतर साधारण तीन तासाच्या आत आईचे दूध पाजण्याआधी असे चाटण करणे आवश्यक आहे.

या सर्व औषधांमध्ये सोन्याच्या कणांची उपस्थिती कोलायडल स्वरूपांशी समकक्ष असल्याचे दिसते. सुश्रुतोक्त सुवर्ण प्राशनामध्ये मध आणि तुपाच्या मिश्रणामध्ये सुवर्ण चूर्ण मिसळून अनामिका बोटाने ते मिश्रण चाटवायचे आहे. हे अधिक सयुक्तिक वाटते. कारण या प्रकारामध्ये सोन्याच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. बाळाच्या जन्मानंतर सुवर्ण प्राशनाचा पुढील काल ते मूल जेव्हा अन्न प्राशन सुरू करते तेव्हा सामान्यतः मूल एक वर्षाचे झाल्यानंतर सुरू होतो. बाळाच्या जन्मानंतर एक वर्षापर्यंत त्याला शिशु आणि १ ते १२ वर्षापर्यंत कुमार म्हटले जाते. शिशु काल उलटल्यानंतर म्हणजे त्याने पूर्णपणे घन अन्न सेवन करण्यास सुरुवात केल्यानंतर त्याला सुवर्ण प्राशन करवण्याचा योग्य काल होय. वाग्भटांनी पुष्य नक्षत्रोदयावेळी सारस्वत घृत हे सुवर्ण चूर्णयुक्त औषधी तूप हे कुमार वयाच्या मुलाला एक वर्षभर नित्य देण्यास सांगितले आहे. सारस्वत घृता ऐवजी वेखंड आणि सुवर्ण चूर्ण मिसळलेले तूप व मधाचे मिश्रणही चाटवता येते. याच प्रकारे तूप व मधाच्या मिश्रणात इतर काही वनस्पतींची चूर्णे, सुवर्ण चूर्णासह मिसळून चाटवण्यासाठी वाग्भट व सुश्रुतांनी सुचवली आहेत. ही सर्व औषधे कुमार वयाच्या मुलाला वर्षभर नित्य द्यावयाची आहेत. कधीतरी एक दिवस देऊन त्याचा काही उपयोग व्हावयाचा नाही. अशा प्रकारच्या सुवर्ण प्राशनामुळे बाळाच्या बुद्धी, पचन आणि देहबलाचे वर्धन होते. तसेच तो मेधावी म्हणजे बुद्धिमान होतो. त्याची रोगप्रतिबंधक क्षमता वाढते. तो श्रुतीधर होतो म्हणजे त्याची स्मरणशक्ती वाढते अशी या सुवर्ण प्राशनाची महत्ता आयुर्वेदिक ग्रंथामध्ये वर्णिली आहे.

**सुवर्ण प्राशन औषधातील सोन्याचे प्रमाण**

या विधीमध्ये सुवर्ण चूर्णाच्या प्रमाणाबाबत अत्यंत संभ्रमाची स्थिती आहे. पाषाणावर सोने घासून घेण्याच्या पद्धतीमध्ये सोन्याचे कण किती प्रमाणांत मिसळतात हे कळत नाही. सुश्रुताच्या डल्हणादि टीकाकारांनी एक गुंजा म्हणजे १२५ मि. ग्रॅ. सुवर्ण चूर्ण तूप व मधामध्ये मिसळून ते बाळाला चाटवावे असे म्हटले आहे. हे सुवर्णाचे प्रमाण खूप जास्त आहे. कारण कसोटी पाषाणावर सोने घासून घेण्याच्या पद्धतीमध्ये औषधांत सोन्याचे अतिसूक्ष्म कण अति अत्यल्प प्रमाणांत म्हणजे अगदि नॅनोग्रॅम्समध्ये मिसळण्याची शक्यता आहे. या नॅनोग्रॅम्सच्या तुलनेत सुश्रुत १२५ मि.ग्रॅ. सोन्याचे चूर्ण मिसळण्याचा सल्ला देणे शक्य नाही. सोन्याचे प्रमाण इतके अधिक नसण्याच्या शक्यतेचे आणखी एक कारण म्हणजे, पुढे धातु भस्मांचा वापर प्रचलित झाल्यानंतर सुवर्ण भस्माची वयस्क व्यक्तीची मात्राही १ ते २ यव म्हणजे १५ ते ३० मि.ग्रॅ प्रचलित झाली. हे इथे लक्षात घेतले पाहिजे. अद्यतन वैज्ञानिक माहितीनुसार

आयुर्वेद ग्रंथोक्त सुवर्ण प्राशन मिश्रणामध्ये सोन्याचे अतिसूक्ष्म कण आज ज्ञात असलेल्या कोलायडल गोल्ड स्वरूपांशी समकक्ष उपस्थित असल्याचे सकृद्दर्शनी वाटते. त्यामुळेच हे सोन्याचे प्रमाण १००-१२५ मि.ग्रॅ. असणे शक्य नाही.

**सुवर्ण प्राशनासाठी औषध तयार करण्याची हल्लीची पद्धत**

आयुर्वेद ग्रंथातील उपरोक्त वर्णनाधारेच आजकाल सुवर्ण प्राशन केले जात आहे. परंतु यामध्ये ग्रंथोक्त वर्णनाप्रमाणे काहीही केले जात नाही. हल्ली सुवर्ण भस्म तूप व मधाच्या मिश्रणांत मिसळून वाटेल तितक्या प्रमाणांत व वाटेल त्या पद्धतीने, वाटेल तेव्हा बालकाला दिले जात आहे. कालानुसार पद्धतीमध्ये बदल घडणे यात काही चुकीचे नाही. पण असा बदल करताना संबंधित क्रियेचा हेतूच पराभूत होत असेल, तर तो बदल काय कामाचा?

सुवर्ण प्राशन औषधात एकूण तीन घटक आहेत. सुवर्ण, गाईचे तूप व मध. हल्ली सुवर्ण हे सुवर्ण भस्म स्वरूपात वापरले जाते. आयुर्वेदोक्त सुवर्ण प्राशन विधीची सुरुवात झाली, त्या प्राचीन काळात सुवर्ण भस्म बनवण्याची पद्धतच ज्ञात नव्हती. हल्ली १ ते १.७५ ग्रम. तूप व मधाच्या मिश्रणात १ ग्रॅम ते २.५ ग्रॅम सुवर्ण भस्म मिसळून सुवर्ण प्राशनाचे औषध बनवले जात असते. काही ठिकाणी एक किलो तूप मधाच्या मिश्रणात दहा ग्रॅम सुवर्ण भस्म मिसळतात, असेही समजते. पण यात कोणत्या प्रकारचे सुवर्ण भस्म वापरले जाते, हे ज्ञात नाही. सुवर्ण भस्मातील सोन्याचे प्रमाण २० ते ९० टक्क्यांपर्यंत त्या सुवर्ण भस्माच्या तयार करण्याच्या पद्धतीनुसार बदलत असते. सुवर्ण भस्म बनवण्याच्या यातील एका पद्धतीत अर्सेनिक आणि शिशाचाही वापर केला जातो. त्यामुळे असे सुवर्ण भस्म सुवर्ण प्राशनासाठी वापरता कामा नये. पण यापैकी कोणते सुवर्ण भस्म वापरावे आणि त्याचे तूप व मधाच्या मिश्रणात किती प्रमाण असावे याबाबत आयुर्वेद तज्ज्ञांत एकमत नाही. ज्याला जे वाटेल ते व वाटेल तितके सुवर्ण भस्म सुवर्ण प्राशन औषधात मिसळले जात असते. या औषधातील अन्य महत्त्वाचे घटक म्हणजे तूप आणि मध. या दोघांचे परस्पर प्रमाणही निश्चित नाही. ते सम असू नये, इतकाच नियम आहे. त्यातच बाजारात मिळणारे तूप आणि मध या दोन्ही पदार्थांच्या गुणवत्तेबाबत वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. या औषधासाठी गाईचे तूप लागते. पण मुळात बाजारात मिळणारे तूप हे खरेच तूप आहे काय? इथपासून ते कोणत्या प्राण्याचे आहे? त्यात भेसळ किती प्रमाणात आहे? या सगळ्याच प्रश्नाबाबत संशयाची स्थिती आहे. जे प्रश्न तुपाच्या गुणवत्तेचे आहेत तेच मधालाही लागू आहेत.

**एकजिनसीपणाचा अभाव**

सुवर्ण प्राशनासाठी औषध तयार करण्याची पद्धत व तयार झालेले औषध साठवून ते बाळाला प्रत्यक्ष देण्याची वेळ यांचा विचार करता, या औषधी मिश्रणाच्या एकजिनसीपणाचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. मुळात मध आणि तूप मिसळून त्यापासून एकजीव मिश्रण तयार होऊ शकत नाही. हे दोन्ही मिसळल्यानंतर त्यापासून मध व तूप यांची स्वतंत्र उपस्थिती दिसणारे एक चिकट सस्पेन्शन तयार होते. जे वेळ उलटेल तसे वेगवेगळे होत जाते. याचे कारण मध हे पाण्यामध्ये विरघळलेल्या साखरेच्या स्वरूपाचे तर तूप हे शंभर टक्के चरबीयुक्त असते. हे दोन्ही पदार्थांचे मिश्रण एकजीव कधीच होऊ शकत नाही. त्यांना मिसळल्यानंतर थोड्याच वेळात ते एकमेकांपासून वेगळे होऊ लागतात. या वेगळे होण्यास वातावरणातील तापमानाचाही हातभार लागतो. त्यामुळे सुवर्ण प्राशनाचे औषध मुळातच एकजिनसी नसल्यामुळे बाळाला प्रत्यक्ष देण्याच्या वेळी ते एकजिनसी राहण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. यानंतर प्रश्न येतो, तो सोन्याचे भस्म मध व तुपात मिसळण्याचा. सोने हे ॲक्का रेजिया या नायट्रिक ॲसिड व हॅड्रोक्लोरिक ॲसिड यांच्या मिश्रणाव्यतिरिक्त इतर कशातही विरघळत नाही. त्याचमुळे ज्या तूप आणि मधाच्या मिश्रणांत सुवर्ण भस्म विरघळून त्यापासून होमोजिनस म्हणजे एकजिनसी मिश्रण तयार होणे दुरापास्त आहे. सुवर्ण प्राशन मिश्रण एकजीव राहावे म्हणून काही लोक त्यामध्ये कृत्रिम इमल्सिफायर मिसळत असतात. परंतु इमल्सिफायर मिसळल्यानंतर त्या मिश्रणाचा एकजिनसीपणा कितपत टिकतो याचा अभ्यास न करताच ही मिश्रणे वापरली जातात. इमल्सिफायर मिसळूनही मिश्रणाचा एकजिनसीपणा आवश्यक तितका काल टिकून राहात नाही. हे विचारात घेतले जात नाही. असे दिसून येते. त्यामुळे अशा आधीच बनवून ठेवलेल्या एकजिनसी नसलेल्या सुवर्ण प्राशन औषध मिश्रणाच्या १ ते २ किलो साठ्यातील तीन चार थेंब ड्रॉपरच्या सहाय्याने बाळाच्या तोंडात टाकले जात असतात. या थेंबातून बाळाला किती सुवर्ण? किती तूप? आणि किती मध? मिळत असेल हा प्रश्न न विचारलेलाच बरा.

वास्तविक आयुर्वेदोक्त बहुसंख्य औषध प्रदान पद्धतीप्रमाणे सुवर्ण प्राशन ही एक व्यक्तिकेंद्रित औषध प्रदान पद्धती आहे. या पद्धतीमध्ये आवश्यक असेल त्याचवेळी व सबंधित रूग्णाला लागेल तेवढेच औषध तयार करून देणे आवश्यक असते. म्हणूनच बाळाला सुवर्ण प्राशन प्रत्यक्ष देताना त्याला चाटवायचे असेल तेवढेच तूप व मधाचे मिश्रण एका चमचामध्ये घेऊन आवश्यक

तेवढेच सुवर्ण त्यात मिसळून चमच्यातील ते पूर्ण चाटण बाळाला चाटवले पाहिजे. तरच सुवर्ण प्राशन झाले असे म्हणणे योग्य होते. घाऊक प्रमाणात साठवून ठेवलेल्या औषधातील काही थेंब बाळाच्या तोंडात टाकून सुवर्ण प्राशन होणार नाही.

**सुवर्ण प्राशनाचा योग्य काल**

सुवर्ण प्राशन नेमके केव्हा व कसे करावे, या बाबतीतही आयुर्वेद संहिता ग्रंथात स्पष्ट निर्देश नाहीत. तसेच तज्ज्ञांमध्येही एकमत नाही. ज्याला जसे वाटते तसे तो करतो. जात कर्मामधील सुवर्ण प्राशनामध्ये जन्मानंतर लगेचच किंवा जन्मोत्तर पहिल्या तीन तासात नवजात बालकाला मधात व तुपात मिसळून सोने चाटवायचे आहे. जे सहसा कुणी करीत नाही. पुढे कुमार वयामध्ये म्हणजे मुलाच्या १ ते १२ वर्षापर्यंत सुवर्ण प्राशन करवण्याचा काल सांगितला आहे. पण त्यासाठी कुमार वयाच्या मुलाला एक वर्षभर सुवर्णयुक्त तूप व मधाचे मिश्रण इतर औषधी वनस्पतीसह नित्य देण्यास सांगितले आहे. पण हल्ली मूल काही महिन्यापासून ते काही वर्षाचे झाल्यावर कधीतरी एकदाच त्याला सुवर्ण प्राशन करवून आणले जाते. काही ठिकाणी महिन्यातून एकदा हे केले जाते. असे केव्हातरी मनात येईल तेव्हा सोने चाटवून बाळाची बुद्धी आणि शरीर बल वाढत असेल का? याचा विचार करणे आवश्यक आहे. बरे, या संदर्भात कुठलाच अधिकृत अभ्यासही झालेला नाही. ग्रंथोक्त माहितीच्या पुनरावलोकनापुरते मर्यादित काही लेखन झालेले दिसते. सुवर्ण प्राशनाचा उपयोग सध्याच्या काळात गेल्या २५ वर्षापेक्षा अधिक काळापासून नियमितपणे केला जात आहे. पण या काळात प्रत्यक्ष प्रयोग करण्यात आलेल्या बालकांचा प्रतिवर्ष मागोवा घेऊन त्याच्या परिणामांचा अभ्यास करून तो सम समीक्षा (पीअर रिव्ह्यू) पद्धतीने तज्ज्ञांद्वारा पुनरावलोकनोत्तर निर्देशांकित संशोधन पत्रिकेमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्याचे आढळत नाही. तथाकथित फुटकळ पत्रिकांमधून जे लेखन झालेले आढळते, त्याला वैज्ञानिक अधिष्ठान नाही.

**सुवर्ण प्राशनाची वैज्ञानिक समीक्षा**

या पार्श्वभूमीवर आस्था आणि भावनिक गुंतवणूक बाजूला ठेऊन सद्योपलब्ध अत्याधुनिक आणि अद्यतनित औषधगुणधर्म शास्त्राच्या ज्ञानाच्या आधारे सुवर्ण प्राशनाच्या उपयोजितेची आयुर्वेद तज्ज्ञ व बाळाच्या आई–बाबांनी वैज्ञानिक समीक्षा करणे आवश्यक आहे. आयुर्वेदामध्ये उल्लेखित सुवर्ण प्राशन हे कोलायडल गोल्डच्या औषधीचे समकक्ष उदाहरण दिसते. द्रव्याचे कोलायडल स्वरूप म्हणजे, एक असे मिश्रण ज्यामध्ये द्रव्याचे अतिसूक्ष्म कण द्रवामध्ये न विरघळता त्यात तरंगत राहतात. या मिश्रणामध्ये द्रव्याचे कण १ मायक्रोमीटरपेक्षाही कमी म्हणजे, नॅनोमीटर आकारामध्ये असतात. १००० नॅनोमीटरचा एक मायक्रॉन होतो. यावरून कोलायडल मिश्रणातील कणांची अतिसूक्ष्मता लक्षात घ्यावी. १०० नॅनो मीटरपेक्षा लहान आकाराच्या कणांना नॅनोपार्टिकल असे संबोधले जाते. आधुनिक वैद्यक शास्त्रामध्ये सध्या गोल्ड नॅनो पार्टिकल्सवर भरपूर संशोधन चालू आहे. हे संशोधन प्रामुख्याने रोग निदान, कॅन्सर चिकित्सा व इम्युनोथेरपी म्हणजे रोगप्रतिबंधक क्षमता वर्धन चिकित्सा या क्षेत्रांत केले जात आहे. यात कॅन्सर ट्यूमरसाठी गोल्ड नॅनोपार्टिकल्स वापरून फोटोथर्मल थेरपी तसेच संधिवाताच्या चिकित्सेचा समावेश आहे. याशिवाय गोल्ड नॅनोपार्टिकल्सच्या इम्युनोजेनिक म्हणजे रोगप्रतिबंधक क्षमता जनक कार्यावरही संशोधन केले जात आहे. त्याचबरोबर गोल्ड नॅनोपार्टिकल्सचा उपयोग इतर औषधांसाठी वाहक म्हणून वापराची शक्यता पडताळली जात आहे. या पद्धतीमध्ये औषधाला त्याच्या लक्ष्यापर्यंत पोहोचवण्याचे काम गोल्ड नॅनोपार्टिकल्स करीत असतात. असे असले तरी आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या किंवा सध्या सुरू असलेल्या संशोधन कार्यामध्ये आयुर्वेदोक्त सुवर्ण प्राशन ज्यासाठी केले जाते, त्या सोन्याच्या बुद्धिवर्धन व शरीर बलवृद्धीकर परिणामांची पुष्टी करणाऱ्या अहवालांचा दूरान्वयानेही समावेश दिसत नाही.

वास्तविक गोल्ड नॅनोपार्टिकल्सच्या रोगप्रतिबंधक क्षमता वर्धक परिणामांच्या आश्वासक संशोधनोत्तर अहवालाधारे आयुर्वेदोक्त सुवर्ण प्राशन संस्काराचा अभ्यास होणे आवश्यक आहे. पण तसे काही होताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर सद्य प्रचलित सुवर्ण प्राशनाच्या उपयोजितेवर, त्याच्या वापराच्या पद्धतीवर, सुवर्ण युक्त औषध म्हणून चाटवल्या जाणाऱ्या मिश्रणावर, त्यातील सुवर्णाच्या प्रमाणावर, त्याच्या दिल्या जाणाऱ्या मात्रेवर आणि एकूणच लोकप्रियतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. त्यामुळे आपल्या बाळाला सुवर्ण प्राशन करविणाऱ्या प्रत्येक आई–बाबांनी त्या सुवर्ण प्राशनामागे किती आस्था, किती श्रद्धा आणि किती विज्ञान आहे, हा प्रश्न स्वतःसच विचारायला हवा नाही का?

**लेखक संपर्क :** sssavrikar@gmail.com


प्रत्येक क्षणी तुमच्या हाती
सादर आहे एलआयसीचे नवीन कस्टमर ॲप
MY LIC
तुमच्या पॉलिसीज, पेमेंट्स आणि मन:शांती आता एकाच ठिकाणी.
360° पॉलिसी माहिती सर्व काही एकाच ठिकाणी
प्रीमियम त्वरित भरा
शोधा आणि पॉलिसी त्वरित खरेदी करा सोपे, जलद, डिजिटल
पॉलिसी लाभांची माहिती रिअल–टाइममध्ये मिळवा
त्वरित पेपरलेस पॉलिसी कर्ज
पॉलिसीज ऑनलाइन अपडेट करा
जलद, सुरक्षित, पेपरलेस ई-केवायसी
बंद/लॅप्स पॉलिसीज ऑनलाइन पुन्हा सुरू करा
आणि बरीच वैशिष्ट्ये...
LIC/R1/2026-27/01/Mar
क्यूआर कोड स्कॅन करा आणि आताच ॲप डाउनलोड करा!
App Store वर उपलब्ध
Google Play वर मिळवा
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
PRGI NO-MAHMAR/2023/86554

